घोरपडे घराण्याचा इतिहास

श्री.बा.बा.राजे घोरपडे









महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.

राजे घोरपडे घराण्याचा इतिहास

— लेखक —
श्री. बा. बा. राजे घोरपडे

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

प्रथमावृत्ती — मार्च १९८९.

●

प्रकाशक —
सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य
आणि संस्कृती मंडळ,
नवीन प्रशासन भवन,
पहिला मजला,
मुंबई ४०० ०३२.

●

●

मुद्रक —
श्री. प. म. महाबळ
प्रॉम्प्ट सर्व्हिस
६५६, गणपती पेठ,
सांगली — ४१६ ४१६.

●

किंमत रु. Rs. 56 = 00

यशवंतराव चव्हाण

१, रेस कोर्स रोड.
नवी दिल्ली.
११० ०११

दिनांक- 21 जानेवारी 1984

प्रिय श्री बाबुराव घोरपडे यांसी
स.न.वि.वि.

तुमचे दिनांक 9 जानेवारीचे पत्र मिळाले. परवा आपल्या घरी येऊन जवळ जवळ दोन तास तुमचे इतिहास संशोधन क्षेत्रातील कार्य पाहून फार समाधान वाटले. तुम्हीं या कामात रस घेत आहांत हे पूर्वीपासून माहित होते. परंतु तुम्हीं इतके परिश्रम केले हे माहित नव्हते. घोरपडे घराण्याच्या इतिहासाबद्दल असलेला अभिमान सार्थ आहे. पण त्या अभिमाना-बरोबर त्याचा इतिहास जमविण्याचे कार्य केले ते घोरपडे घराण्याचे ऋण फेडण्यासारखे आहे. तुम्हीं केलेले काम हे महत्वाचे आहे व अजूनही तुमची प्रकृती उत्तम आहे तोंपर्यन्त पुढे प्रयत्न करा असे मी सूचवीन. श्री. बारलिंगे यांनी तुम्हांला आश्वासन दिले आहे. त्यामध्ये कांही अडचणी निर्माण झाल्या तर कळवा. मीही त्यांच्याशी यासाठी बोलू शकेन. तुमचे पत्र वाचून फार बरे वाटले.

कळावे

आपला
यशवंतराव चव्हाण

श्री. बाबुराव घोरपडे
186 रविवार पेठ
सातारा

प्रस्तावना

इतिहास या शब्दाचा अर्थ 'हे असे घडते' म्हणजेच जे घडले त्यांची नोंद. पण जे घडते ते तसेच्या तसे नोंदले जात नाही. त्यातील काही भाग आपोआप गळतो, काही आपण नकळत गाळतो, आणखी कांही भाग तर मुद्दामच गाळला जातो. आपल्या स्वार्थाच्या आड येऊ नये एवढ्याकरिताच गाळला जातो. त्यामुळे इतिहासाच्या नोंदी जशा लिहावयास पाहिजेत तशा त्या कधीच लिहिल्या जात नाहीत, आणि त्यामुळे इतिहासाचे पुनःपुनः निश्चयन लेखन करावे, लागते, इतिहास पुनःपुनः तपासावा लागतो, त्यात नव्यानव्या गोष्टींची दैववशात माहिती झाली तर ती नोंदवावी लागते आणि इतिहास—संशोधकांना सुदैवाने अशी माहिती मिळत रहाते.

घोरपडे घराण्याचा इतिहास हा जो ग्रंथ श्री. बा. बा. घोरपडे यांनी संशोधित, संपादित केलेला आहे. तो अशा इतिहास ग्रंथांपैकी एक आहे. मराठ्यांचा इतिहास ज्यांनी घडविला त्यांत अनेक घोरपडे घराणी आहेत. खानापूर, मुधौळ ही घोरपड्यांची इतिहास प्रसिद्ध घराणी. यांच्या अनेक पाती असतील, या सगळ्याच घराण्यात काही कागदपत्रे असणारच. ही दप्तरे काही खऱ्या गोष्टींवर प्रकाश टाकू शकतील आणि त्यामुळे बनावट आणि अस्सल इतिहास कोणता हे पण आम लोकांना कळेल. इतिहासप्रसिद्ध संताजी घोरपडे यांच्या जीवनावर आणि वंशावरसुद्धा त्यामुळे साधकबाधक चर्चा होऊ शकेल. घोरपडे या आडनावाने कधी कधी दिशाभूल होऊ शकेल. जसे मराठे सरदारात घोरपडे आहेत तसेच ब्राम्हणातही. पण जे संशोधित दप्तर आज प्रकाशीत होत आहे ते मराठे सरदार घोरपडे यांचे. या सरदारांचे वंशज आजही सातारा मुक्कामी आहेत. या ग्रंथाचे संशोधनकार बा. बा. उर्फ बाबूराव घोरपडे हे त्या वंशजांपैकी एक त्यांच्या घरी केवळ हे दप्तरच पाहाण्याचा योग मला आला नाही तर, अनेक सनदा, चित्रे इ. दुर्मिळ गोष्टी पाहाण्याचाही मला योग आला.

या इतिहास- प्रसिद्ध घोरपडे घराण्यातील श्री बाबूराव घोरपडे यांचे व्यक्तिमत्त्वसुद्धा अनेक कार्याकरिता इतिहासात नमूद होण्यासारखे आहे. इतिहाससंशोधक म्हणुन तर ते प्रसिद्ध आहेतच, पण ४२/४५ च्या मंतरलेल्या दिवसात कुंडल, सातारा, सांगली, वाळवे, तासगांव, औंध या प्रदेशातील लोकानी जो क्रांतिकारी लढा ब्रिटीशांशी दिला त्या लढ्याशीही बाबूरावांचे नाव निगडित झालेले आहे. त्या प्रतिसरकारचे बाबूरावजी न्यायाधीशच होते असे म्हणण्यास प्रत्यवाय असू नये. शिवाय सहकारी बँकिंग क्षेत्रातही त्यांनी फार मोठे काम केले आहे. अशा या इतिहासाचा मागोवा घेणाऱ्या, इतिहास निर्माण करणाऱ्या व्यक्तीच्या घरी त्यांचे दप्तर जेव्हा मी पाहिले तेव्हा मराठेशाहीच्या इतिहासावर अधिक प्रकाश टाकणाऱ्या या दप्तराचे प्रकाशन झाले पाहिजे असे माझ्या मनाने घेतले. श्री. यशवंतरावजी चव्हाण यांनीही हे दप्तर पाहिले होते आणि त्यांच्याही मनात हे दप्तर प्रसिद्ध करण्याची इच्छा होती, हे बाबूरावानी मला जे यशवंतरावजींचे पत्र दाखविले त्यावरुन कळले. साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या विद्वान, व्यासंगी आणि विद्याप्रेमी सदस्यांनीही ही कागदपत्रे प्रसिद्ध करण्यास संमती दिली, आणि हे कार्य मार्गी लागले. श्री. बा. बा. घोरपडे यांचे पुस्तक प्रकाशित करताना मला एक वेगळाच आनंद होतो. कारण त्यामुळे काही नवीन माहिती उजेडात येईल असे मला वाटते.

श्री. घोरपडे यांच्याकडे मागणी केल्यानंतर त्यांनीही हे पुस्तक ताबडतोब माझ्या हवाली कल याबद्दल साहित्य आणि संस्कृती मंडळातर्फे मी त्यांचे आभार मानतो. साहित्य आणि संस्कृती मंडळाने प्रसिद्ध

केलेल्या दुर्मिळ ग्रंथापैकी हे एक होईल. साहित्य आणि संस्कृती मंडळाने तंजावरची मराठी नाटके, फ्रेंच रेकॉर्ड असे अनेक दुर्मिळ ग्रंथ प्रसिद्ध केले आहेत. हा ग्रंथही तशापैकीच एक. तो प्रसिद्ध करताना मला व साहित्य आणि संस्कृती मंडळाला अभिमान वाटणे सहाजिकच आहे

सुरेंद्र बारलिंगे.
अध्यक्ष
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

४२, यशोधन,
दिनशा वाच्छा रोड,
मुंबई – ४०० ०२०

२ ऑक्टोबर, ८६

मनोगत

सन १९३४ साली मुधोळ संस्थानच्या श्रीमंत मालोजी राजे घोरपडे घराण्याचा इतिहास छापून प्रसिद्ध केला.

मुधोळ संस्थानचे दप्तर खान्यातील फारशी बखरीचे मराठी भाषांतर व फर्माने वगैरेचे साधनाने कै. दत्तात्रय विष्णू आपटे बी. ए. भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे यानी संपादक म्हणून इतिहास लिहिला. तो इतिहास प्रसिद्ध होताच तो इतिहास मी विकत घेऊन संपूर्ण अत्यंत काळजीपूर्वक वाचला. त्याचप्रमाणे त्यात छापलेली फर्माने त्या इतिहासात दिलेली वंशावळही पाहिली व माझे तीर्थरुप बाळासाहेब मल्हारजी घोरपडे यांना त्या इतिहासाबद्दलची सर्व हकिकत सांगितली व मुधोळच्या घोरपडे घराण्याचे इतिहास, मुधोळचे घोरपडे घराण्याचे वंशज, इतिहास प्रसिद्ध भाऊबंद भाडळे, नांदगांव व तासगाव बहादूरवाडी आष्टे वगैरे भाऊबंधांचा कोठेच उल्लेख नाही. तुम्ही तर आम्हास कळू लागल्या पासून सांगत आहात की मुधोळकर राजे घोरपडे आपले भाऊबंद आहेत. आपले नादगाव आणि तासगांव येथील घोरपडे राजे घोरपडे देशमुख वडील घराणे व मुधोळचे राजे घोरपडे धाकटे घराणे आहे. आपले घराण्याचे लोकांनी फार मोठा पराक्रम केलेला आहे. छत्रपती शिवाजी राजे याना साह्य केले असे म्हणता मग आपला उल्लेख इतिहासात अगर वंशावळीत मुधोळकारानी का केला नाही, ? त्यावर वडीलानी सांगितले, आपले देशमुखी व पाटीलकी बद्दल अनेकवेळा व अनेक वर्षे वाद चालला होता, तो २०० वर वर्षे होता. त्याचे निकाल प्रत्येकवेळी मुधोळचे राजे घोरपडे विरुद्ध होऊन नादगावच्या राजे घोरपडे यांच्या सारखे झाले आहेत. त्यामुळे त्यांचे व आपले संबंध प्रेमाचे राहिलेले नाहीत व भाऊबंदकीचे वैर आहे. त्याचे सर्व कागद देशमुखी वतन व पाटीलकी वतन या भांडणात वडीलकीमुळे वतन उपभोगत्याचा अधिकार नादगाव व तासगांव येथील सध्या रहात असलेल्या घोरपडे घराण्यातील त्याना व आपणास आहे. त्यात मुधोळकर याना अधिकार नाही. त्याचवेळी माझे वडीलांनी असेही सांगितले की ५—६ वर्षापूर्वी मुधोळचे राजेसाहेब यांचे नातेवाईक व अधिकारी माझ्याकडे आले होते. मुधोळचे राजेसाहेब आपले घोरपडे घराण्याचा इतिहास लिहित आहेत. तेव्हा आपण आपलेकडे असलेले नांदगावचे राजे घोरपडे घराण्याचे ऐतिहासिक कागद आम्हास द्या इतिहास लिहून झाल्यावर परत देवू. त्यावेळी आमचे कागद तुर्त आमच्याकडे नाहीत, ते कागद आम्ही इतर चालविलेल्या दाव्यात गुदरले असल्याने व काही कागद सापडत नसल्याने आम्हाला देता येणार नाहीत; म्हणून त्यांना वाटेला लावले. कारण तसेच भाडळे बहादुरवाडी आष्टे वगैरे गावचे कागद त्यानी मागितले होते, परंतु ते कागद त्या गावच्या घोरपड्यानीही दिले नाहीत असे वडिलांनी सांगितले. पण पुढे वरील बहादुरवाडीकर, भाडळेकर आष्टेकर व खानापूरकर व नांदगावकर राजे घोरपडे देशमुख, यानी त्या त्या त्यांच्या संग्रहात असलेले कागद प्रसिद्ध केले. (भारत इतिहास संशोधक मंडळामार्फत) मुधोळच्या घोरपडे घराण्याचा इतिहास प्रसिद्ध झाल्यानंतर तो पाहिला असता नावजी राजे घोरपडे याना बाजीराजे, आबाजीराजे, खंडोजीराजे, विठोजीराजे ही मुले होती व ती सर्व बाजी राजेघोरपडे यांचे इतकीच शूर व कर्तबगार असताना त्यांचा उल्लेख मुधोळचे राजेसाहेब घोरपडे यानी कोठेही इतिहासात केलेला नाही, ही गोष्ट जाणून बुजून केली आहे असे स्पष्ट होते. शहाजीराजास पकडताना बाजीबरोबर अंबाजी, खंडोजी हे होते. हा शिवभारतात उल्लेख आहे.

मी आमचे घोरपडे घराण्याचे पुर्वजांचे इतिहासाचा व परंपरेचा, पराक्रमाचा अभिमानी असून मी त्या गोष्टीकडे ऐतिहासिक सत्याचे दृष्टीने पहात असतो. अंधश्रद्धेने पहात आलेलो नाही. तसेच जुन्या सरंजामशाही मनोवृत्तीस बिलकुल थारा न देता सत्य इतिहास लोकांचे पुढे येणे गरजेचे वाटते. जे बरोबर ते

बरोबर व जे चूक ते चूक ही माझी मनोधारणा आहे. तसेच कोणत्याही विभागाचा देशाचा व समाजाचा इतिहास सत्याला डावलून विकार व सत्तेचे केलेले लिखाण निर्दोष असू शकत नाही. म्हणून ततकालिन ऐतिहासिक दोन तीनशे वर्षा पासून अस्सल पत्रे आमचे घरी आहेत व जी उपलब्ध झाली आहेत व जी राजवाडे इतिहास संशोधक मंडळ, भारत इतिहास संशोधक मंडळ तसेच भारतीय इतिहास आणि संस्कृती महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती, मंडळाने पुरस्कार दिलेले अशा सारख्या संस्थेने प्रसिद्ध केलेली पत्रे वगैरे व त्या निमित्ताने कित्येक पुरुष वंशावळी, स्थळे व प्रसंग व सनावळ्या जाती–जमातीतील वतना संबंधी झालेले तंटेबखेडे बटपेडे त्यातून झालेले घोर परिणाम पिढ्यान पिढ्या कसे भोगावे लागतात ते पहावयास मिळतात. कित्येक गोष्टी किती भयानक तसेच अविश्वसनिय आहेत हे दाखवून खऱ्या इतिहासात भर घालण्यास मदत करुन साहित्य निर्मिती करीत आहोत. उदाहरण – वतनाचेपाई झालेले भयंकर हत्त्याकांड.

कै. द. वि. आपटेकृत मुधोळचे मालोजी राजे घोरपडे घराण्याचे इतिहासातील नं. १०-११ १२–१३ ही चार पर्शियन फर्मान तसेच पर्शियन बखर व मुधोळ दप्तरातील अत्यंत जुनी अशी म्हणून प्रसिद्ध केलेली वंशावळ व काही फोटो लेख व प्रसंग बनावट असल्याची नक्की खात्री येत आहे. मुधोळकर राजेघोरपडे यांचे घराण्याचे निरनिराळे शाखा व त्याचेकडील व आतापर्यत प्रसिद्ध झालेली व अप्रसिद्ध ऐतिहासिक कागदपत्रे अशी माझे संग्रही आहेत आमचे नादगांवचे घोरपडे घराण्याची कागदपत्रे व वंशावळी ही कागदपत्रे पूर्वी मुंबई सरकारने प्रसिद्ध केलेला इतिहास पहाता माझे वरील विधानास पुष्ठी आलेली आहे. त्याप्रित्यर्थ मी संशोधनार्थ सन १९४० पासून भारत इ. संशोधक मंडळाचे त्रैमासिकातून ऐतिहासिक कागद व सनदा पत्रे यांचे आधारे दिलेले लेख शिवचरित्र साहित्यखंड ८ या त्रैमासिकात नमूद आहेत, त्याचप्रमाणे अनेक वेळा माझे भाषणांतून व इतिहास परिषद, अधिवेशन ४ शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथे ता. २५–२६ जानेवारी १९६९ रोजी निबंध, मुधोळकर राजेघोरपडे यांचा इतिहास वंशावळ व काही चुकीची फर्माने हा निबध, श्री. बा बा. राजेघोरपडे देशमुख नांदगांव, ता. जि. सातारा या नावाने वाचला आहे. त्या निबंधात अस्सल कागदांचा पुरावा दिला आहे. तो निबंध व त्यावर कसलीही परिषदेत चर्चा न होता पास केला आहे. तो इतिहास ४ थे अधिवेशनात प्रसिद्ध झाला आहे.

भारतीय इतिहास आणि संस्कृती, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने पुरस्कार दिलेले जुलै, सप्टेंबर १९८१ चे त्रैमासिक यातही पहिलाच लेख वतनाचे पाई झालेले शिवकालिन हत्त्याकांड हा लेख प्रसिद्ध झालेला आहे महाराष्ट्र व मराठ्यांचा इतिहास लिहिताना घोरपडे घराण्याचे कागदपत्र व माहिती वगळून त्यांचा इतिहास पुरा करता येणार नाही. इतका निकटचा संबंध महाराष्ट्राचे इतिहासात घोरपडे घराण्याचे व्यक्तींचा निरनिराळे ऐतिहासिक प्रसंगात आलेला आहे. मुधोळचे राजेघोरपडे घराण्याचे इतिहासात प्रस्तावना पान १५६ वर भोसले व घोरपडे घराण्याचा संबंध दाखविणारी जी वंशावळ दिलेली आहे, तसेच त्याच इतिहासात शेवटी घोरपडे घराण्याची जी वंशावळ दिलेली आहे, त्यात बाजीराजे घोरपडे यांचे वडिल, आजे–पणजे यांची नांवे व ही नावे वर म्हटल्याप्रमाणे ज्या पर्शियन फर्मानात आलेली आहेत ती १०–११–१२–१३ नंबरची फर्माने पहाता बाजीराजे घोरपडे यांचे वडील प्रतापराव, आजे पिलाजी व पणजे चालराज अशी नावे दिलेली आहेत. तसेच त्याच पान १५६ वर बाजीचा मुलगा मालोजी व दुसऱ्या शाखेपैकी वल्लभ सिंगाचा मुलगा बहिरजी, त्याचा मुलगा मालोजी, त्याचा मुलगा संताजी ही नावे दिलेली आहेत. हा संताजी सेनापती संताजी होय व भोसले घराण्याचा छत्रपती संभाजी एथपर्यंतच नावे दिलेली आहेत, यापुढे कोणाचीच नावे दिलेली नाहीत. याचा अर्थ ही वंशावळ बाजी घोरपडे अगर बाजीचा मुलगा मालोजी यांचे कारर्किर्दीतच तयार झालेली आहे, असा भास निर्माण केला आहे. कारण मालोजी नंतर कोणत्याच घोरपडे

याचा, संताजी नंतर कोणत्याच वंशजाचा व छ. संभाजी नंतरच्या कोणत्याच वंशजांची नावे दिलेली नाहीत. याचा अर्थ ही वंशावळ अत्यंत जुनी अशी दाखविणेकरिता बाजी घोरपडे, त्याचा मुलगा मालोजी घोरपडे यांचे कारकिर्दीतच ही वंशावळ तयार झालेली आहे. अशी दाखविण्याचा प्रयत्न निर्माण केलेला आहे. कारण मालोजीनंतर कोणत्याच वंशजांचा, संताजी नंतर कोणत्याच वंशराजाचा, संभाजी नंतर कोणत्याच वंशजाचा व संभाजी नंतर कोणत्याच वंशजांचा वंशावळीत उल्लेख नाही, कारण त्यानंतर अनेक वंशजांचे पिढीचा उल्लेख केला असता तर ती वंशावळ जुनी अशी दाखविता आली नसती. ही खबरदारी घेंऊनच शेवटचे मालोजी राजेघोरपडे उर्फ नानासाहेब राजेघोरपडे यानी इतिहास लिहिण्याचे अत्यस असे साधन पुरविले आहे व तयार केले आहे. मुधोळ घोरपडे घराण्याचे इतिहासात एकमेकास पोषक अशी या इतिहासातील चार साधने निर्माण केली आहेत ती म्हणजे (१) वंशावळ (२) त्या वंशावळीतील नांवे ज्या बखरीत आहेत ती बखर व तीच नांवे असलेली चार फर्माने व नावाचें फोटो (चित्रे) हे सर्व लिखान ही एकसमयाछेदे करुन पाहिली असता ही सर्व साधने खरी आहेत असे कोणालाही वाटल्याशिवाय रहाणार नाही. अशा तऱ्हेची मांडणी मुधोळकर घोरपडे घराण्याचा इतिहास लिहिताना अत्यंत धूर्तपणाने व साधकपणे एकमेकाना पोषक अशी वरीलप्रमाणे साधने दिलेली आहेत. कदाचित हा इतिहास लिहून घेणारे मालोजी राजेघोरपडे यांची अशी कल्पना असणेचा संभव आहे. की आपण उपलब्ध करुन दिलेली इतिहासाची साधने इतकी जुनी आहेत की, एकदा हा इतिहास लिहून प्रसिद्ध झालेवर त्या इतिहासाचे साधन सामुग्रीवर व तसेच पुरुष व प्रसंग साधनाचे कालावर कोण शंका घेणार व वाद विवाद निर्माण करणार आहेत ? या इतिहासातील निर्माण केलेला पुरावा खोटा आहे असे शाबित करण्याइतका ऐतिहासिक कागदपत्राचा ततकालिन अस्सल कागदाचा कालाचे ओघामुळे नाहीसा झाला असेल अशी चुकीची कल्पना करुन घेऊन इतिहास लिहिला गेला आहे.

तसेच मुधोळचे घोरपड्यांचा इतिहास लिहिणे पूर्वीची माहिती मिळाली. त्या प्रमाणे आमचे राजे घोरपडे मुधोळ याचे भाऊबंदाकडून कागद मिळविण्याचा प्रयत्न माझे वडिलांकडून झाला, तसा प्रयत्न अनेक शाखेकडून झाला आहे. परंतु त्यांनी आपले दप्तरातील कागद कोणीही दिले असल्याचे दिसत नाही. ते कागद दिले असते तर कदाचित ते दडपून टाकणे किंवा नाहीसे केले असते. परंतु मुधोळच्या घोरपडे घराण्याचे शाखेकडून त्या घोरपडे मंडळीकडून, काही त्याचे कारभारी मंडळीकडून कागद उपलब्ध मालोजी राजेघोरपडे यानी केले होते. ते कागद त्यांचे इतिहासाला पोषक नसतील व मारक असतील ती कागदपत्रे नाहिशी केली असल्यामुळे आपण जी साधन सामुग्री प्रसिद्ध करू तीच प्रमाण ही कल्पना उराशी बाळगून इतिहास लिहिला गेला आहे. परंतु अभासूदृष्टीने व संशोधक या दृष्टीने त्या इतिहासाकडे पाहिले असता एवढा मोठा खटाटोप करून लिहिलेला इतिहासाची सामुग्री अविश्वसनीय आहे, हे या पुढील अस्सल साधनाचे विवेचनावरुन सहज दिसून येईल. जे घडले नसेल ते घडते. ज्या नावाची व्यक्ती जन्मालाच आली नसेल व ज्या व्यक्तीचे अस्तित्वच नव्हते तिचे अस्तित्व दाखविण्यात आलेले आहे व न घडलेला प्रसंग घडला असे दाखविलेले आहे. या इतिहासात जी फर्माने प्रसिद्ध केलेली आहेत त्यापैकी एकही अस्सल फर्माने त्यावेळी द. वि आपटे, याना दाखविले नाही. त्याचप्रमाणे श्री. गं. ह. खरे यानाही दाखविलेली नाहीत. त्याचे फोटो फक्त दिलेले होते. तसेच त्यातील बऱ्याच फर्मानात दिलेले कालही चुकीचे असल्याचे खैरेनीही म्हटलेले आहे. फर्मानाचे फोटो व त्याचे भाषांतर तसेच अक्षर व तिचे भाषांतर असे कागद मिळाल्याचे मुधोळ घोरपडे घराण्याचे इतिहासाचे संपादकांचे निवेदनाचे सदरात अगदी आरंभीच निवेदन केले आहे. फर्मानाचा काल ठरविताना ज्या मित्या व सन दिलेले आहेत त्यातही मेळ नाही. चुकीचे आहेत.

इ. स. १६६ साली शिवाजी महाराजानी पन्हाळा घेऊन चौल पासून दाभोळ पर्यंतची किनारपट्टी काबीज केली. परंतु लखम सावंत ह्यानी महाराजांना वेगुर्ल्याचे परिसरात रोखून धरले. इकडे विजापूरचा सरदार सिद्दी जोहार ह्याने विजापूरकरांना शस्त्रे आणि दारुगोळा पुरविणाऱ्या इंग्रज व्यापाऱ्याची मदत घेऊन पन्हाळा पुनः काबीज केला ह्या गोष्टीचा वेंगुर्ले येथील डच वखारीतील लोकांनी दि. ५ मे १६६० रोजी लिहिलेल्या एका पत्रात उल्लेख केला आहे.

इ. स. १६६१ साली शिवाजी महाराजानी राजापूर, खारे पाटण आणि शृंगारपूर ही तीन ठाणी घेतली. महाराजाचे हे विजय रेव्हिग्टन रेलर आणि गाय्फोर्ड ह्या तिघा इंग्रजानी १६६१ सालच्या जन महिन्यात लिहिलेल्या एका पत्रात मान्य केले आहेत.

शिवाजी महाराजांना त्यांचे वडील शहाजीराजे ह्यांची पूर्व सूचना मिळाल्याने त्यांनी विजापूरचा सरदार खवासखान, मुधोळचे राजे बाजी घोरपडे आणि लखम सावंत ह्या तिघा दोस्तांचा पराभव केला. मुधोळचे राजे बाजी घोरपडे व लखम सावंत ह्या दोघांनी महाराजांचे मांडलिकत्व पत्करले तर विजापूरचे सुलतानाने शहाजीराजे ह्यांचे मार्फत महाराजाशी तह करुन त्यांना उत्तरेस कल्याण, दक्षिणेस फोंडा, पश्चिमेस दाभोळ आणि पूर्वेस इंदापूर या दरम्यानचा प्रदेश बहाल केला. Gazzetter of Bombay preseidency XXIP 9374 ह्या तहाला शिवाजी महाराजानी कैद केलेल्या इंग्रज व्यापाऱ्यांनी दि. ६ फेब्रुवारी १६६३ रोजी सुरतेला पाठविलेल्या एका पत्रात दुजोरा दिला आहे. हे व्यापारी विजापूरकरांना शस्त्रे आणि दारू गोळा पुरवित होते म्हणून महाराजानी त्यांना कैद केले होते.

मराठ्यांचे इतिहासाची साधने पान ३ पोतुगीज दप्तर खंड तिसरा आशिया विभाग (भाग १ ते ५) इ. स. १६६३ ते १७३९.

संपादक — ए. बी. द. ब्रागास परेरा.
अध्यक्ष — पुराण वस्तु संशोधन विभाग गोवा १९३९ — ४०
अनुवादक :— श्री. स. शं. देसाई, विश्वकोष कार्यालय, वाई.
हे पहाता या युद्धात बाजीराजे घोरपडे यांना ठार मारल्याचे दिसत नाही. तसेच मी बाबूराव घोरपडे म्हणून ता. २०।९।५४ रोजी इतिहासाचार्य श्री गो. स. सरदेसाई याना पत्र पाठवून मधोळ इतिहासाबद्दल स्पष्ट विचार माडले आहेत. त्याचे उत्तर गो. स. सरदेसाई यानी ता. २२ सप्टेंबर १९५४ रोजी दिलले आहे व त्यात त्यांनी मुधोळचे घोरपडे घराण्याचे इतिहासाबद्दल व फर्माने याबद्दल स्पष्ट संशय निर्माण केला आहे. कै. सरदेसाई यांना पाठविलेले पत्र व रियासतकार गो. स. सरदेसाई याचे बाबूराव घोरपडेना आलेले पत्र, या पत्रातून सरदेसाई यानी मुधोळच्या इतिहासाबद्दल त्याचे झालेले मत सहआधार पत्राने कळविले आहे व त्यांनी मला समक्ष भेटीसही बोलविले होते. त्याप्रमाणे मी जाऊन त्यांचे व माझे मन मोकळेपणाने बराच वेळ बोलणे झाले. मी सरदेसाई यांना लिहिलेले पत्र व त्याचे आलेले उतर यांच्या अस्सलवर नकला सोबत जोडलेल्या आहे.

त्या नंतर रियासतकारानी सन १९५७ मध्ये मुंबई गव्हमेंट सेट्रल प्रेस मध्ये ऐतिहासिक घराण्याच्या वंशावळी प्रसिद्ध केलेल्या आहेत. त्यात पान न. ३६ घोरपडे मुधोळकर, बाजी घोरपडे व पुढचे वंश (आपटे मु. घो. इ. परिशिष्टे पृ. १७०) मुधोळची फारसी फर्माने डॉ. बाळकृष्ण यानी प्रसिद्ध केली. ती बनावट असावी असा प्रवाद आहे. त्यावरच या वंशावळी रचलेल्या आहेत.

मागे २०|९|५४ रोजी रियासतीकार श्री. गो. स. सरदेसाई याना पाठविलेले पत्र व त्या पत्राचे त्यानी दिलेले उत्तर व मुधोळचे राजे घोरपडे मालोजीराव यांचेबद्दल त्यांचे झालेले बोलणे ती साद्यंत हकिकत मला पाठविलेले उत्तर या सोबत जोडलेले आहे. तसेच बाजीराजे घोरपडे यानी शहाजीस जेवावयास बोलाऊन त्याना कैद केले असे मल्हारराव चिटणीसानी म्हटले ते कसे खोटे आहे व चिटणीस यानी लिहिलेली बखर छ. शिवाजी महाराज याचे मृत्यूनंतर १३० वर्षांनी ते लिहिण्याची प्रेरणा मल्हाररावाना झाली आहे. मराठ्याचे इतिहासाची साधने राजे घोरपडे घराण्याचे पान १३ वर शहाजी महाराज कैद इ. स. २५-७—१६४८ रोजी झाली. त्याबद्दलची सर्व हकिकत कवी परमानंदाने शिवभारतात लिहिलेली आहे. ती पाहिल्यानंतर मल्हारराव चिटणीसाचे शहाजीराजे याचे अटकेबद्दल बाजी घोरपडे यांना जेवावयास बोलविणे व अटक केली, हे कसे खोटे आहे हे सिद्ध होईल. तसेच या अटकेस कोण कोण होते, ती कशी झाली, मुसलमान सरदार कोण होते, मराठे कोण होते तसेच ब्राम्हण सरदार कोण होते हे कळेल.

मल्हारराव चिटणीसानी शिवाजी महाराजांचे चरित्र लेखनास प्रारंभ केला तेव्हा त्यांच्या घरी साधनाचे भारे पडलेले होते. इतर जुन्या घराण्यातूनही पुष्कळ संभार होते, असा बहुतेकांचा गैरसमज आहे. शिवचरित्र लेखनासाठी मल्हाररावाना फार थोडी साधन सामुग्री उपलब्ध होती, याचा मुद्दाम येथे उल्लेख केला पाहिजे. टीपेमध्ये अनेक ठिकाणी चिटणीसांच्या वर्णनाची चर्चा करताना त्याच्या समोर कोणते आधार होते आणि त्या आधारावर ते कशारितीने उपयोग करतात याची चिकित्सा केली आहे. त्याजवरुन आपणास असे दिसेल की, चिटणीसानी सभासद बखरीचा मोठ्या प्रमाणावर उपयोग केला आहे. चिटणीसाचे पुर्वी रघुनाथ यादव चित्रे यांनी सभासद बखर पुढे ठेवून त्या बखरीतील आशयच काव्यमयतेने व आकर्षक भाषाशैली वापरुन आपले शिवचरित्र सजविले होते. मऱ्हाररावानी मात्र स्वतंतरित्या शिवचरित्र लिहावयाचे ठरविले, त्यावेळी सभासदावर रीस इतर साधनाची त्यानी जोड दिली. मल्हाररावानी सभासदाबरोबर अनेक ठिकाणी ९१ कलमी बखरीचा वापर केला आहे. अफझलखानचे मोहिमेचे मल्हारावाचे वर्णन परमानंद कवीच्या शिवभारताशी जुळते, त्यावरुन चिटणीसानी शिवभारत पाहिले असावे.

मल्हारराव चिटणीसाची दृष्टी ही चोखंदळ इतिहासकाराची असणे शक्य नव्हते. कारण शास्त्रशुद्ध भूमिकेतून इतिहास लेखन करावे ती भूमिका आपल्याकडे रुजली नव्हती आणि पुन्हा साधार, सत्य, वस्तुनिष्ट व रेखीव असा इतिहास लिहावा यासाठी जी एक विशेष प्रकारची मनोवृत्ती लागते तिचा मल्हाररावजवळ संपूर्ण अभाव होता. तत्कालीन लोकमानसावर पुराणादिकांचा दैववादी चमत्काराची भारुडाचा व अदभूततेचा अंश असलेला दंतकथेचा जो मोठा परिणाम होता त्याच्या पकडीतून मल्हाररावासारखा कारकुनी बाण्याचा इसम सुटू शकेल ही कल्पनाच मुळी असमंजसपणाची आहे. पूर्वजानी मिळविलेली वतने जप्त होण्याची भाऊबंदकीच्या भांडणात ती नाहिशी होण्याची वेळ आलेली पेशव्याचे अवकृपेमुळे परागंदा होऊन भयंकर दारिद्र्याचे चटके भोगण्यात आयुष्यातील उमेद खर्च झालेली ज्यांची निष्ठेने चाकरी करण्याची मनिषा धरावी त्या छत्रपतींचे सारे वैभव नष्ट झालेले त्यातही ग्रामाण्य प्रकरणामुळे ब्राम्हणाच्या उपद्रवामुळे मन दुखविलेले, क्षुब्ध झालेले अशा अवस्थेत मल्हाररावानी चरित्र लेखनाला हात घातला. आपले चरित्र क्रमवार सुसंगत तारीखवार लिहावे ही त्यांची भूमिका नसल्यामुळे त्यांनी आपल्या सोईसाठी चरित्राचे सात कप्पे केले आणि घटनांचा क्रम लक्षात न घेता निरनिराळ्या प्रकारांच्या घटनांची वर्गवारी करून त्यानुसार आपल्या चरित्राची पाहणी केली. अशारितीने कप्पे पाडून चरित्र लिहिण्याची बखरकाराची दृष्टी नीट लक्षात घेतली तर त्याच्या लेखनपद्धतीचे मर्म लक्षात येते.

छत्रपती शिवाजी महाराजांचे मृत्यूनंतर १३० वर्षानी त्यांचे चरित्र लिहिण्याची प्रेरणा मल्हाररावास आली व उपलब्ध असलेल्या बखरीपेक्षा मोठ्या आकाराचे चरित्र त्यांनी मोठ्या आत्मविश्वासाने लिहिले.

चरित्रनायक आणि चरित्रकार यामध्ये कालखंडाच्या दृष्टीने फार मोठी तफावत पडलेली संभाजी राजाराम शाहू इत्यादिकांच्यावेळेची अत्यंत आस्थिर अशी राजकीय परिस्थिती आणि त्यामुळे आधारभूत ठरतील अशा अस्सल कागद कागदाचे साधनाची झालेली वाताहत इ. कारणामुळे सभासदानंतरच्या बखरकारास परंपरागत चालत आलेल्या अनेक प्रकारच्या वेड्या वाकड्या दंतकथा व आख्याईका यांचेवर आवलंबून आपल्या बखरी सजवाव्या लागल्या ह्या उत्तरकालीन बखरीतून म्हणूनच मोठ्या प्रमाणात ऐतिहासिक घटनाचे व वस्तुस्थितीचे तारतम्य संपुष्टात तथा सुटल्याचे लक्षात येते इतिहासकार किंवा चरित्रकार म्हणून जी एक पात्रता त्याच्या अंगी असणे आवश्यक असते तिचा त्याच्या ठिकाणी अभाव होतो. केवळ आपल्या चिटणीसी अथवा कारकुनी लेखणीचे बळावर ते स्वतःला लेखनाअधिकार समजतात आणि वंश परंपरेने चालत असलेल्या नोकरीमुळे पुरातन सेवक म्हणून चरित्रें किंवा बखरी लिहावयास बसतात आणि मग मनुष्य स्वभावानुसार आपल्या पुर्वजंने अतिरिक्त गोडवे गाण्यात किंवा वापल्या जाती जमातीच्या व्यक्तिचा पुरस्कार करण्यात अथवा आपल्याला अप्रिय वाटतील अशा व्यक्तिचा उपहास करण्यात त्यांना कसलिच दिक्कत वाटत नाही.

त्यामधून त्याच्या वतनलोभ जातीद्वेष इ. प्रवृत्तीचे चांगल्या रितीने दर्शन घडते मल्हाररावाच्या सत्य प्रकरणात्मक चरित्रात वरील सारे दोष चांगल्या रितीने एकवटले आहेत, त्यामुळे आकाराने मल्हाररावाचे चरित्र खूप मोठे असते तरी विश्वासनीयतेच्या दृष्टीने ते अगदी सामान्य प्रतीचे आहे. सभासदानंतर निर्माण झालेल्या दुसऱ्या कोणत्याही बखरिस शिवचरित्रात कसली भर घालता आली नाही. उलट नंतरच्या बखरितून असत्य अर्धसत्य अशा भाकड कथांची भरती मोठ्या प्रमाणात होऊन या शिवचरित्राला पुराणाची कळाआली आहे.

परंपरेने चालत आलेल्या निरनिराळ्या प्रकारच्या हकिकतीचा बखरकार वापर करीत असल्यामुळे बखर कारावर अप्रामाणिकपणाचा अरोप करता येणार नाही किंवा बखरकार झालेल्याप्रसंगाची हकिकत सांगताना जाणुनबुजून सत्यापलाप कुठे करित नाहीत. ही समजुतही सर्वस्वी बरोबर नाही. पक्षपाती भूमिका स्विकारुन ते कित्येक ठिकाणी बेधडकपणाने सत्यापलाप करण्यास मागेपुढे पहात नाहीत. हे चिटणीसी बखर व शिवदिग्विजय यामधील बाळाजी आवजी विषयक व रघुनाथ हणमंते यांच्याबद्दलच्या वर्णनावरून लक्षात आल्याखेरीज रहात नाही. याशिवाय कर्णोपकर्णी ऐकलेल्या हकिकती आपल्या चरित्रात कुठेना कुठेतरी अंतर्गत केल्याखेरीज त्याना चैन पडत नाही. कुठेतरी कुणाबाबतीत तरी घडलेली एकादि आख्याईका त्याच्या ऐकण्यात किंवा वाचण्यात असते ती आपल्या चरित्रात हटकून आणतात, वडाची साल पिंपळाला ह्या म्हणीचे प्रत्यंतर या उत्तरकालीन बखरीतून चांगल्यारितीने येते.

श्री छत्रपती शिवाजी महाराज यांचे आज्ञेवरून लिहिलेले कविंद्र परमानंद कृत

श्री शिवभारत

(संस्कृत मूळ व मराठी भाषांतर)

या कविंद्र परमानंदाचा काळ शके १५८६ इ. स. वैशाख महिन्यात राजापूर येथे धर्मनिर्णयार्थ एक मोठी सभा भरलेली होती. या सभेने दिलेल्या निर्णय पत्रात सभेतील पंडीतांची यादी आहे. त्यात कविंद्र परमानंदाचे नाव आहे यावरून पहाता श्री शिवभारत हा ग्रंथ हा शिवाजी महाराजाचे हयातीतच पुरा होत आला आहे. असे मानणे योग्य वाटते कारण शिवाजीचा मृत्यु इ. स. १६८० मध्ये झालेला आहे.

या शिवभारतात ग्रथांचे एकंदर ३२ व्या अध्याय आहेत. त्यापैकी ३१ पूर्ण असून बत्तिसावा अध्याय त्रूटीत आहे. ३२ व्या अध्यायाचे शेवटी ग्रंथसमाप्तीचे गमक नाही, या अध्यायाची श्लोक संख्या एकंदर २२६२ आहे.

मराठ्याचे इतिहासची साधने राजे घोरपडे घराण्याचा इतिहास पान १३—१४—१५ पहा.

शिवभारत या ग्रंथात शहाजी महाराज यांना कैद केल्याचे वर्णन शिव भारत अध्याय ११ व १२ अध्यायापासून केलेले आहे व त्यात मुस्तफा खानाने सांगितले आहे की आपल्या मानीधनी महुमद शहा याने शहाजीस कैद करा असा निरोप पाठवून मला कळविले आहे की, आम्ही स्वहित साधकानी बलाढ्य शहाजी राजेभोसले जो जागा झाला नाही, तो केला पाहिजे.

यावेळी (आरणोदयापूर्वी) दिलावरखान मसूदखान सरजायाकदखान अंबरखान अदबनिचा राजा कर्ण कर्णपूरनचा राजा फरादखान आजखान व बहोतील खान मानी मलीक रेहानखान राधव मंबाजी वेदोजी भास्कर आणि हैबत राजाचा पुत्र महाबलवान असे तिघे मदोनमस्त ब्राम्हण सरदार. सिदोजी आणि मंबाजी पवार मंबाजी भोसला त्याचप्रमाणे खंडोजी अंबाजी बाजराज घोरपडे यशवंतराव वाढवे हे (यशवंतराव गाढवे होत) श्री. वा. सि. बेंद्रे यानी शिवचरित्र लिहिले आहे. त्यात वाढवे हे गाढवे होत असे लिहिलेले आहे पवार कुलाचे भूषण मालोजी राजा विख्यात तुळोजी राजा भोसले असे सर्व बलिष्ठ सरदार आपण बसलेल्या घोड्याचे खुरानी पृथ्वीचे चूर्ण करित शहाजीचे शिबिरात (शहाजीस पकडण्याकरिता) शिरले वरील वरीलप्रमाणे मुसलमान सरदार ब्राम्हण सरदार मराठे सरदार याची नावनिशी व पराक्रमाचे वर्णन परमानदाने केले आहे. त्यात शहाजी राजाचे चुलत बंधू मंबाजी भोसले हे होते ते पुढेही प्रतापगडचे युद्धातही अफजलखानबरोबर शिवाजी महाराजाविरूद्ध लढ्यास आले होते ते प्रतापगडचे युद्धात ठार झाले.

श्री. कविंद्र परमानंदाचा उल्लेख इ. स. १६६१ पासूनच झाल्याचे दिसून येत आहे. इ. स. १६६४ मध्ये राजापूर येथे धर्मनिर्णयाची एक सभा भरली होती तीत परमानंद हजर होते सन १६६६ मध्ये शिवाजीमहाराज अग्र्यास गेले त्यावेळी परमानंद त्यांच्याबरोबर असल्याचा उल्लेख समकालीन अशा राजस्थानी पत्रातून आढळतो इ. स. १६७३ मध्ये महाराजानी पन्हाळा गड घेतला. गडावर जाण्यापुर्वी महाराज पोलादपूर (महाडमार्गे) तेथे परमानंदाचे भेटीस गेले होते असे वर्णन पर्णाल पर्वत ग्रहस्थान या ग्रंथाचा कर्ता जयराम पिंडे यानी केलेला आहे.

परमानंद इ. स. १६७४ पुर्वी वारलेला असावा कारण शिवराज्याभिषेकाच्या हजर असलेल्या मंडळीत त्याचे नाव आढळत नाही.

परमानंदाने आपल्या शिवचरित्राला अनुपुराण सुर्यवंशी असे नाव दिले असले तरी महाराष्ट्रात या ग्रंथाचा उल्लेख शिवभारत असाच होतो आपण हे काव्य महाराजाच्या आज्ञेवरून तयार केले असे परमानंद

सांगतो हे काव्य काशी येथील पंडीतापुढे सांगितले, यामुळे कविंद्ध हा वक्ता व काशी येथील पंडीत हे श्रोते अशी मांडणी केली आहे. महाराजांचे ह्यातीतच लिहीलेले ते त्यांचेचरित्र अनेकदृष्टीने अपूर्व (श्रेष्ठ) आहे.

शिवाजी महाराज म्हणजे प्रत्यक्ष विष्णूचा आवतार अशी परमानंदाची भूमिका आहे. शहाजी महाराजांना अटक करणाऱ्यामध्ये अनेक मुसलमान सरदार ब्राह्मण सरदार मराठे सरदार शहाजीना पकडताना लढले व त्याना महमदशहा बादशहाचे हुकमाने लढावे लागते. हा उल्लेख इतिहासात कोठेच झालेला दिसत नाही, फक्त शिवभारतात लिहलेला आढळतो. व शिवभारत हा ग्रंथ (इतिहास) शिवाजी महाराजाचे आज्ञेने परमानंदाने लिहिलेला व त्यास शहाजीना पकडताना कोण कोण होते या सर्वांचा उल्लेख आहे, परंतू मल्हाररामराव चिटणीस विरहित श्री शिवछत्रपतीचे सत्यप्रकरणात्मक चरित्र संपादक प्रा. भिमराव कुलकर्णी पान ३७ वर शहाजीस दगा करुन धरले. (तेव्हा (झळाजी महाराजांनी) दाखववायाचीजोगी पत्रे आली. तीच पाठवून आपले स्वाधिन लेक नाही, अशी खातरजमा करविली ती पत्रे पाहिली. परंतू राजे यांचा विस्वास पडून संशय बादशहा न जाई तेव्हा बाजी घोरपडे त्याप्रांती होते. त्यास सांगाने हरतऱ्हेने शहाजीस कैद करुन आणावे असे करविले राजे ते समई त्रिवादी नजीक चंदावर येथे असता घोरपडे यानी भोजनास म्हणून बोलावून निखालसपणा दाखविल्यावरुन जेवणास गेले तेथे दगा करुन घरिले आणि बादशहापाशी नेले.)

शिवाजी महाराजांचा समकालीन पंडीत कविंद्र परमानंद (नेवासकर) याने संस्कृत काव्यात शिवाजी महाराजांचे चरित्र वर्णिले आहे ते चरित्र ३२ अध्याया पर्यंत असून ते अपूर्ण आहे या ग्रंथात शहाजी महाराज यांना अटक केल्याचे वर्णन शिवभारत अध्याय ११ व १२ अध्यायापासून केलेले आहे व त्यास मुस्तफाखानाने सांगितले आहे की आपला मानीधनी महुमदशहा याने शहाजीस कैद करा असा निरोप पाठवून मला कळविले आहे की, आम्ही स्वहित साधकानी बलाढ्य शहाजीराजा भोसले जो जागा झाला नाही तोच केले पाहिजे.

२. महाराष्ट्रांत स्वदेशाच्या इतिहासाची आस्था अठराव्या शतकांत व एकोणिसाव्या शतकाच्या पहिल्या चतुर्थांत बरीच होती व तत्समाधानार्थ बखरी निर्माण झाल्या.

हिंदुस्थानांत इतिहास काय तो दोन भाषांत लिहिलेला आढळतो. एक फारशीत व दुसरा मराठीत. कारण, इतिहास लिहून ठेवण्यासारखी कृत्ये हिंदुस्थानांत मुसलमानांच्या व मराठ्यांच्या हातूनच काय ती म्हणण्यासारखी घडली आहेत. शीख, रजपूत, मवास व पाळेगार ह्यांनीही पुंडावे व बखेडे बरेच केले आहेत. त्यांचे गद्यापद्य इतिहास अधूनमधून पहाण्यांत येतात. परंतु संगतवार इतिहास ज्यांचा अभिमानाने सांगता येईल अशी व्यवस्थित प्रौढीला पोचलेली राष्ट्रे म्हटली म्हणजे एक मराठ्याचे व दुसरे मुसलमानांचे. इराण, तुराण, अफगाणिस्थान व अरबस्थान या देशांतील मुसलमानांना इतिहासाची गोडी पूर्वीपासूनच आहे. मुसलमानांच्या सहवासाने, त्यांच्या तवारिखा पाहून मराठ्यांनाहि बखरी लिहिण्याचा प्रघात पाडला. सध्यापर्यंत छापून प्रसिद्ध झाल्या आहेत त्या सर्वात बडोदे येथे छापलेली चिटणिशी बखर अगदी जुनी आहे. त्याच्या अगोदर लिहिलेली कोणतीही बखर उपलब्ध नाही. त्याच्यापुढे मात्र पुष्कळ बखरी लिहिल्या गेल्या. खुद्द पेशव्यांच्या येथे बखरनवीस असत. त्यांचा धंदा जुने गादपत्र पाहून बखरी सजविण्याचा असे खुद्द पेशव्यांना वाचण्याकरिता ज्या बखरी लिहिल्या जात असत त्यातील मजकूर कालानुक्रमाने लिहिलेला असे. त्या बखरीच्या गांवोगांव ज्या नकला होऊन गेल्या त्यांत नांवाचा व तारखांचा घोटाळा होण्याचा संभव असे. कांही बखरी प्रांतोप्रांतीच्या माहितगार मंडळीनी कर्णोपकर्णी ऐकून लिहिलेल्या आहेत. त्यांत मोठमोठे

प्रसंगहि वाकडे–तिकडे व पौराणिक तऱ्हेने व बाष्कळ रीतीने वर्णिलेले आहेत. पेशव्यांच्या येथील बखरीतील मजकूर कालानुक्रमाने लिहिला जात असे म्हणण्यास मजजवळ आधार आहे. दुसऱ्या माधवरावाची आजी ताईसाठी म्हणून होती. तिच्या वंशजानी आपले दप्तर मला दाखविले. त्यांत सवाईमाधवराव आठ वर्षाचे असताना त्यांना वाचण्याकरिता एक लहानशी बखर साळबाईच्या तहापर्यन्त लिहिलेली आहे. तिच्यातील मजकूर बहुतेक कालानुक्रमाने लिहिलेला आहे. गेल्या शतकांत व पंचवीस तीस वर्षापाठीमागे ह्या शतकांत महाराष्ट्र देशांत बखरी लिहिण्याचा व वाचण्यांचा सपाटा फार असे. अक्षर चांगले झाले म्हणजे मुलाकडून एक तरी बखर लिहवून घेण्याचा परिपाठ सार्वत्रिक असे. गांवोगांव व खेड्यापाड्याने सुद्धा ब्राम्हणांच्या येथे व पाटील कुळकर्ण्यांच्या येथे बखरी सांपडण्याचा संभव असे. आजपर्यंत महाराष्ट्रांत खालील बखरी छापून प्रसिद्ध झाल्या आहेत.

१) शहाजी महाराज भोसले यांची कैफियत (पत्रे व यादी ४३८).
२) चिटणीसकृत शिवछत्रपतीचे सप्तप्रकरणात्मक चरित्र.
३) चिटणीसकृत संभाजी महाराजांची बखर
४) चिटणीसकृत थोरले राजाराम महाराज यांची बखर
५) चिटणीसकृत शाहूमहाराज यांची बखर.
६) चिटणीसकृत धाकटे रामराजे यांची बखर.
७) चिटणीसकृत शाहूमहाराज यांची बखर चतुर्शिगाचे हकीकतीसह.
८) चित्रगुप्तविरचित शिवाजी महाराजांची बखर
९) सभासदविरचित शिवछत्रपतीचे चरित्र
१०) शिवदिग्वीजय
११) शिवप्रताप
१२) भूषणकविकृर शिवराजभूषणकाव्य
१३) मराठी साम्राज्यांची छोटीबखर
१४) पुरुषोत्तमकविकृत शिवकाव्य
१५) पेशव्यांची बखर सोहनीकृत
१६) बाळाजी विश्वनाथ यांची कैफियत (पत्रे व यादी ४९४)
१७) बाळाजीराव बल्लाळ यांची कैफियत (पत्रे व यादी ४९५)
१८) नारायण पेशवे यांची बखर
१९) पांडूरंगकृत नारायणराव पेशवे यांचे ओवीबद्ध चरित्र
२०) भाऊसाहेबांची बखर
२१) भाऊसाहेबांची कैफियत
२२) रघुनाथ यादवकृत पानिपतची बखर
२३) साष्टीची बखर
२४) विंचुंरकरांची बखर
२५) दाभाड्यांची हकीकत
२६) गायकवाडांची हकीकत
२७) खर्ड्याच्या स्वारीची बखर
२८) ब्रम्हेद्रस्वामींचे चरित्र
२९) जयराम स्वामीचे चरित्र
३०) रामदासस्वामीचे चरित्र
३१) होळकरांचे कैफियत
३२) नागपूरकरं भोसल्यांची कैफियत
३३) मल्हाररावकृत राजनिती
३४) संभाजी महाराजकृत राजनिति
३५) पंतप्रधान यांची शकावली.
३६) कंपनीप्रतापमंडनम
३७) गोविंदपंत बुंदेल्यांची कैफियत
३८) पंतप्रतिनीधीची कैफियत
३९) काशिराजाची बखर (भाषांतर)
४०) पोवाडे
४१) नानाची बखर
४२) अमात्य बावडेकर यांची कैफियत

३. परंतु एकंदरीत येथून तेथून सर्व बखरीत कालविपर्यासाचा दोष ओतप्रोत भरला आहे.

कोणतीहि बखर घ्या, तीत कालाचा विपर्यास झाला नाही असे क्वचितच आढळेल. पुराणातील कल्पित कथांच्या संसर्गाने, मुद्रणकलेच्या अभावामुळे व ऐतिहासिक सत्यासत्यतेसंबंधी लोकांत असलेल्या औदासीन्यामुळे हा दोष ह्या बखरनविसाच्या बखरीतून शिरला आहे रामरावणी कथांच्या श्रवणाने विचारात अतिशयोक्तींचे प्राबल्य फार झाले ब कालाच्या पौर्वापर्यांचे महत्व ह्या बखरनविसांच्या अगदीच लक्ष्यांतून गेले. कालविपर्यासाचा दोष अत्यंत कमी म्हटला म्हणजे "भाऊसाहेबांच्या बखरीत" अतिच कमी आहे व अत्यंत जास्त पहावयाच्या असल्यास 'पेशवांच्या बखरीत" अमूप आहे. ह्या दोन आद्यंताच्यामध्ये इतर सर्व बखरीचे वर्गीकरण दोषांच्या न्यूनाधिक्यांच्या प्रमाणाने करिता येईल.

निरनिराळ्या प्रसंगाचे अन्योन्य महत्व ह्या बखरीतून मुळीच दाखविले नाही व शिल्लक गोष्टीचा निरर्थक पाल्हाळ मात्र केला आहे.

अ) (१) शिवाजीची सूर्यवंशापासूनच उत्पत्ति (२) शिवाजीच्या मरणसमयी त्यांच्या कोठारांतील दाण्यागल्याची याद (३) भाऊसाहेबांच्या बखरीतील मलकाजमानीचे रडगापे इत्यादि कथा कमजास्त कल्पित असून क्षुल्लक आहेत. त्यांचा अन्यदृष्ट्या कितीही उपयोग असला तरी अतिहासदृष्ट्या फारच थोडा आहे.

ब) (१) शिवाजीच्या पूर्वीच्या व त्याच्या वेळच्या मुसुलमानी राज्यांची माहिती (२) शिवाजीच्या कोणत्याही मोहिमेचा संगतवार वृत्तांत (३) शिवाजीच्या किंवा पेशव्यांच्या गृहस्थितीची चोख हकीकत ह्या बखरीतून बिलकुल मिळण्यासारखी नाही, जी कांही थोडीबहुत माहिती दिली आहे ती इतकी असंबद्ध, परस्परविरोधी, संदिग्ध व प्रायः अविश्वनीय आहे की, इतर साधनांच्या साहाय्यावाचून त्यापैकी कोणतीहि एक खरी मानणे मोठे संकटाचे आहे.

(क) अस्सल कागदपत्रांच्या साहाय्यव्यतिरिक्त ह्या बखरी वाचू गेले असता एक प्रकारची चमत्कारिक चूक होते. ह्या बखरीतून जो मजकूर खरा असतो तो त्यांत असलेल्या खोट्या मजकुरापासून विलग काढून घेता येत नाही सारांश केवळ ह्या बखरीवर भिस्त ठेवून इतिहास लिहिण्याचा प्रयत्न केल्यास, सत्यासत्यतेच्या निर्णयाची कसोटी जवळ नसल्यामुळे तो वायफळ जाण्याची बहुतेक खात्री आहे. पुष्कळ बखरीतून एकच मजकूर एकसारिखा आल्यास बहूमताच्या न्यायाने तो खरा मानण्याचीहि ह्या बखरीच्या संबंधाने सोय नाही. पुष्कळ ऐतिहासिक गोष्टींच्या अभावाचे साधारणत्व ह्या बखरीतून सापडते. परंतु तेवढ्यावरून त्या गोष्टी झाल्याच नाहीत असे विधार करणे मोठे धोक्याचे काम होईल. तात्पर्य एक अस्सल चिटोरे सर्व बखरीच्या बहुमताला हाणून पाडण्यास बस्स आहे. ह्या संबंधाने विचार करता Mejority of document वर फारशी भिस्त ठेविता येत नाही. कांकी विश्वासाई अस्सल कागदाच्या एका चिटोऱ्यावर जितका विश्वास ठेविता येतो तितका स्वदेशीय व विदेशीय बखरकारांच्या व बखरवजा इतिहासांच्या भाकड कथांवरती अर्थात ठेविता येत नाही.

ही स्थिती ह्या बखरीची आहे.

बाजी घोरपडे शिवाजी महाराज यांचे हातून मारले गेले अशा बद्दल निरनिराळ्या व्यक्तिनी व इतिहास संशोधकांनी आपली मते व अंदाज दिलेले आहेत ते येणेप्रमाणे.

१) मुधोळ घोरपडे बखरीमध्ये पान २४० वर शिवाजीने बाजीराजे यास सन- १०७० सबन अलफ हा दिला आहे तो इ. स. १६६० आहे.
मुधोळचे इतिहासाचे लेखक: द. वि. आपटे यांनी बाबाजी मृत्यू १६६४ साली गृहित धरला आहे.

२) जेधे शकावतीत कार्तिक मासी शके १५८६ (इ. स. १६६४ आक्टोंबर नोव्हेंबर इदिल शहाचा व राज्याचा (शिवाजी) राजाचा बिघाड झाला खवासखान कुडाळास आले राजे तेथे जाऊन घोरपडे मारिले खवासखानाशी झगडा केला तो पळोन घाटावर गेला कलम १
शिव चरित्र प्रदिप पृ. २३ - २९

३) वरिल शिव चरित्र पान ५९-६० वर शिवापूरकर देशपांडे वहितील शकावली यात जेथे शकावली प्रमाणेच काल दिला आहे. त्यात वरील प्रमाणेच घोरपडे मारले म्हटले आहे.

४) गोव्याचा व्हाईसराय इ. स. १६६४ नोव्हेंबर ११ तारखेस लिहीलेल्या पत्रांत शिवाजी व खवासखान यांचेमध्ये झालेल्या युद्धाची बातमी ऐकली असे म्हणतो. पिसुर्लेकर कृत शिवाजी पान १२ टीप ५,

५) मराठ्याचे दप्तर खंड तिसरा असिया विभाग भाग १ ते ५ या पुस्त्कांत पान ३ वर मुधोळचे बाजीराजे घोरपडे शिवाजी महाराजांना त्याचे वडिल शहाजीराजे याची पूर्व सूचना मिळाल्याने त्यांनी विजापूरचा सरदार खवासखान मुधोळचे राजे बाजी घोरपडे आणि लखम सावंत ह्या दोघांनी महाराजांचे मांडलिकत्व पत्करिले. तर विजापूरच्या सूलतानाने शहाजीराजे यांच्या मार्फत महाराजांशी तह केला व उत्तरेस कल्याण दक्षिणेस फोंडा पश्चिमेस दाभोळ आणि पूर्वेस इंदापूर ह्या दरम्यानचा प्रदेश बहाल केला. ग्याझिटीयर ऑफ बॉम्बे प्रेसिडन्सी पान नं. ३७४ या तहाला शिवाजी महाराजांनी कैद केलेल्या इंग्रज व्यापाऱ्यांनी ६ फेब्रुवारी १६६३ रोजी सुरतेस पाठविलेल्या एका पत्रात दुजोरा दिला आहे. हे व्यापारी विजापूरकरांना शस्त्रे आणि दारूगोळा पुरवित होते म्हणून महाराजांनी त्यांना कैद केले होते.

६) डॉ. बाळकृष्ण—

यांनी शिवाजी द ग्रेट खंड १ भाग २ सन १६६४ हा दिला.

तो झोपेत असताना शिवाजीने मारला म्हटले आहे.

बाजी राजे घोरपडे हे लढाईत इतर माणसाबरोबर जखमी झाले व नंतर मेले असे डच कागद पत्रांत म्हटले आहे. तो खुलासा डॉ. बाळकृष्ण यांनी वरील पुस्तकांत केला आहे. हे रेकॉर्ड हालंड मधील हेग येथे आहे.

तसेच खवासखान व सावंत यांचा पराभाव शिवाजीने केल्याबद्दलची डच रेकॉर्डमध्ये माहिती सांगितलेली आहे.

शिवाजी व बाजीराजे घोरपडे यांचे लढाईचा काळ १६६४ नोव्हेंबर दिला आहे. या लढाईत बाजी घोरपडे जखमी होऊन पुढे मृत्यू पावले तसेच खवासखान याचा पराभव १६६४ डिसेंबर मध्ये झाला.

कोल्हापूर ग्याझिटियरमध्ये बाजीराजे घोरपडे व शिवाजी राजे यांची लढाई झाली त्यात बाजीराजे मेले. सन १६६१ दिला आहे.

शिवकालीन पत्रसार संग्रह

पत्र नं. १०४१ - यात इ. स. १६६४-६५ मध्ये बाजी मारल्याचे म्हटले आहे. तसेच मुधोळकर यांनी स्वधर्म साधनता सोडून यवन दुष्ट तुरूक याचे कृत्यास अनुकूल होऊन दगाबाजीने हुजरे करून विजापूरास येणे घडले असे म्हटले आहे.

आता शहाजीराजाचे मृत्यूचा काल पाहू—————

शिवापूरकर दप्तरातील यादी पान ५१ वर म्हटले आहे मात्र माघ शुः ५ शके १६८५ शहाजी राजे समाप्त झाले म्हणजे फेब्रुवारी १६६३ वर्षी

डॉ. बाळकृष्ण पान नं. ५४० ता २३ जानेवारी १६६४ शहाजीचा मृत्यू हे गृहित धरले तर-

बाजीराजे घोरपडे व शिवाजीचे युद्ध झाले त्यावेळी शहाजीराजे जिवंतही नव्हते. कारण शि. का. पत्र सा. संग्रह पत्र १०४१ यात या युद्धाचा काल १६६४—६५ दिला आहे. डॉ. बाळकृष्ण यांनी या लढाईचा काळ नोव्हेंबर १६६४ दिला.

वरील सर्व विवेचनावरून हे वडिलास लिहिलेले पत्र खरे आहे असे धरल्यास त्यावेळी शहाजीराजे जिंवत असलेच पाहिजेत. त्याचप्रमाणे पत्रातील मजकूराप्रमाणे कोणती स्वधर्मसाधनता सुरू होती ती शहाजीराजाची की शिवाजीराजाची त्याबद्दल स्पष्ट धोरण व त्याप्रमाणे चाललेली कृती इतिहासात कोठेही दिसत नसल्यामुळे तेही ठरणे क्रमप्राप्त आहे.

इतिहास निरविकार बुद्धीने लिहिलेला असला पाहिजे. त्याचप्रमाणे अस्सल पत्राचे प्रामाण्याने तो सिद्ध झाला पाहिजे. विकारवषतेने लिहिलेला इतिहास हा कोणाची तरी चूक व कोणाची बाजू खरी, कोणाची निंदा, तर कोणाची स्तुती, कोण शूर तर कोण भित्रा, कोण निर्व्यसनी तर कोण व्यसनी या गोष्टी इतिहास लेखकाकडून नकळत होत असतात. या गोष्टी टाळल्या पाहिजेत. त्याचप्रमाणे कोणाचे आतून साह्य तर कोणाचे बाहेरून साह्य हेही ठरविण्याचा ऐतिहासिकदृष्ट्या प्रयत्न सुरू आहे. त्यासही कांही हरकत नाही, परंतु वर म्हटल्याप्रमाणे अस्सल साधनानें ठरले पाहिजे, नाहीतर तो ऐतिहासिक सत्याचा खून करून लिहिल्याचे प्रत्ययास येते. कारण इतिहास नेहमीच विजयी लोकांचा साह्यकर्ता ठरतो.

सत्तेवर असणारे राजाची व पदावर असणाऱ्या पदाधिकाऱ्यांची वकिली करण्यास पुष्कळ लोक मिळतात व त्याचे स्तुतिपाठक बनतात.

ऐतिहासिक कालातील व्यक्ति त्याचे कूवतीप्रमाणे देशाला, समाजाला पोषक ठरल्या असतील त्याचाही इतिहासाने गौरव केला असला पाहिजे, ऐतिहासिक व्यक्ति चंदनाचे झाडाप्रमाणे आहेत. चंदनाचे झाड जरी वटले तरी त्याची वाढ खुंटेल पण त्याचा वास नाहिसा होत नाही.

मराठ्याचे इतिहासाचा सुक्ष्म अभ्यास केल्यास मराठ्यात दोन गुण प्रामुख्याने दृष्टिस पडतात. एक त्यांचे शौर्य व दुसरा त्यांचा प्रमाणिकपणा. ज्या धन्याची चाकरी करावयाची त्याच्याशी कधीही बईमान व्हावयाचे नाही. त्याचेकरिता जिवावर उदार होवून लढावयाचे अशी भावना पुष्कळाच्या अंतकरणात होती. त्या दृष्टीने शहाजीराजे भोसले, बाजीराजे घोरपडे व इतर मराठा सरदारात हीच प्रवृत्ती होती. तलवार गाजवावयास मिळाली म्हणजे झाले मग ती कोणाकरता गाजवतो आहे व त्यात कोणाचा नाश होत आहे याचा विचारच नव्हता. शहाजीने निजामशाही पुन्हा प्रस्थापित करताना नगरच्या निजामाचे लहान मुलास मांडीवर घेऊन राज्य चालविले. त्यात या लहान मुलासच राज्य करण्याचा हक्क कां आहे, मला कां नाही, मीही बादशहा होऊ शकतो ही दृष्टीच नव्हती, ती दृष्टी शिवाजी महाराजाचे पुढील कालांत निर्माण झाली.

राजे शहाजी व बाजीराजे घोरपडे यांचा संघर्ष झाला. हे दोघेही अदिलशहाचे नोकर होते व राज्य न कर्त्याचा हुकुम मानणे हे त्यांचे कर्तव्य होते. यातूनच शहाजीला कैद झाली या कैदेबद्दल बाजी घोरपडे किती जबाबदार याचा विचार होणे जरुरी आहे.

कै. राजवाडे यांनी म्हटले आहे बखरीमध्ये विश्वसनीय भाग कोणता व अविश्वास भाग कोणता, हे ते एकमेकात मिसळते असल्यामुळे जो मजकूर खरा भासतो. तो त्यास असलेल्या खोट्या मजकुरापासून विल काढून घेता येत नाही. केवळ या बखरीवर भिस्त ठेवून इतिहास लिहीण्याचा प्रयत्न केल्यास सत्यासततेच्या निर्णयाची कसोटी जवळ नसल्यामुळे तो वायफळ जाण्याची बहुतेक खात्री आहे. पुष्कळ बखरीतून एकच मजकूर एकसारखा आल्यास बहुमताच्या न्यायाने तो खरा मानण्याचिही ह्या बखरीच्या संबंधाने सोय नाही. पुष्कळ ऐतिहासिक गोष्टीच्या आभावाचे साधारणत्व ह्या बखरीतून सापडते. परंतु तेवढ्यावरून त्या गोष्टी झाल्याच नाहीत असे विधान करणे मोठे धोक्याचे काम होईल. या संबंधाने विचार करता मेज्यारटी ऑफ डॉक्युमेटसवर फारशी भिस्त ठेवता येत नाही. का कॉ, विश्वासार्ह अस्सल कागदाच्या एका चिटोऱ्यावर जितका विश्वास ठेविता येतो तितका स्वदेशीय व विदेशीय बखरकाराच्या व बखरवजा इतिहासाच्या भाकड कथावरील अर्थात ठेवता येत नाही. इतिहासाचार्य राजवाडे प्रस्तावना पान ४.

घोरपडे व शहाजीची कैद या प्रकरणात बखरकारानी आपले पदरची हकिकत देवून बराच रंग चढविलेला आहे. (शिवदिग्विजय मृ. १४४–४५ व त्यांनी शहाजीच्या कैदेच खापर बाजीराजे घोरपड्याचे माथ्यावर फोडले आहे. उलट मुसलमान ग्रंथकारानी वरील प्रकरणाची जबाबदारी मुस्तफाखानावर टाकिली (महंमतनामा व बुसतीनुस्सलातील पृ. ५०७–९) जुलै १९२९ च्या मॉर्डन रिन्हयुच्या सरकार यांनी (शिवाजी भोसले इन म्हैसूर) हा लेख महंमद नाम्याचे आधारे लिहला आहे. त्यात त्यानी म्हटले आहे की, मुस्तफाखान वृद्ध झाला असून त्याला बरा न होणारा आजार जडलेला आहे. शिवाय त्याचे मुख्य हाताखालचे लोक उदाहरणार्थ–शिंद्दी रह्यान व शहाजी यापैकी कमी कमी शहाजीला अटक केली पाहिजे. सभासद या कैदेविषयी कांही लिहीत नाही. बखरकारानी वरील प्रकरणाशी बाजीराजे घोरपडे यांचा संबध

आणून महाराजानी तो द्वेश मनात धरुन बाजीराजे घोरपडे मारले त्याचे बायकामुलाची कत्तल केली वगैरे हकिगत लिहिल्या. बखरकाराने कांहीही म्हटले असले तरी बाजींराजे घोरपडे यांची तिन्हीही मुले हयात होती. ती राजे शिवाजींनी मारलेली नव्हती हा माझेजवळ पुरावा आहे. (पत्र शिवचरित्र साहित्य खंड आ. पा. ८६ ते ७४)

बाजी घोरपडे, मुधोळकर यांनी स्वधर्म साधनता सोडून यनवदुष्ट तुरुक योच कृत्याला अनकुल होवून दगाबाजीचे हुजरे करुन विजापुरास येणे घडले – सांप्रत पुन्जा दुबुँधी धरुन खवासखाना विजापूराहून फौजेसुद्धा रवाना झाले त्याची हरोळी बाजी घोरपडे यांनी व लखम सावंत व खेम सावंत यांनी प्रतिज्ञापूर्वत जतन करुन सेना समवेत निघाले .... आमचे मनोदय शेवटास नेणार तुम्ही तुम्ही सुपुत्र निर्माण आहा–

पहा शि. का. प. सा. संग्रह पत्र १०४१ शिवाजी १६६४–१६६५
“सर्व माणूस घोरपडे यांचे नसल कापून काढले ... ...
गर्भ देखिल कापले (९१ कलमी बखरत्र)

याप्रमाणे शिवाजीमहाराजावर आपण केवढा व कोणता आरोप करतो याचासुद्धा विचार लेखकानी केला नाही. महाराजाचे मुसूलमान इतिहासकार काफिखान यांनी म्हटले आहे.

मुसलमान समाजातील स्त्रिया व मुले ही हातात पडील होती त्याचेशीसुद्धा शिवाजी महाराज आदरपूर्ण वागत होते असे व वरील उ उद्धार महाराजांचे स्त्रिया व मुले यांचे बाबतीत अत्यत आदरणीय वर्तन होते हे दाखविते ते महाराज बाजी घोरपड्यांशी व त्यांचे बायका–मुलांशी असे वर्तन करतील हे शक्यच नाही.

बाजीराजे घोरपडे हा विजापूरकराचा नोकर होता. त्याने शहाजीस विजापूरास नेले ते मुस्तफाखानाच्या सांगण्यावरुन, खुद्द महाराजांनी मालोजी घोरपडे यांस जे पत्र लिहले त्यात महाराज म्हणतात “जेव्हा कांही मुस्तफाखाने” महाराजास दस्त करविल श्री सरस्वती मंदिर वर्ष ५ अंक ५

पुढे विजापूरकराचे स्वारीत मदत करण्याचे पत्करिले ते बादशहाच्या सांगण्यावरुन, सारांश त्यांनी जे जे म्हणून कांही केलं ते विजापूरकाराचा नोकर म्हणून केले. व ते करावे लागले.

आधुनिक इंग्रज व मराठी इतिहासकार यांनी १७ व्या शतकातील हकिगतीकडे २० शतकातील दृष्टीकोनाने पाहून तत्कालिन घोरपडे, सुर्वे मोरे, मोहितेवाडीचे सावंत वगैरे घराण्यास अप्रत्यक्षपणे स्वराज्यास घातक वागणारे समजले आहे. महाराज ज्यावेळी जन्मास आले त्यावेळी सर्वत्र यावनी अम्मल सुरू होता. महाराष्ट्रांत त्यावेळी आदिलशाही, कुतूबशाही, निजामशाही व मोगल हे मालक होऊन बसले होते. या यावनी राज्यातच मराठे सरदार व ब्राह्मण सुस्सदी पुढे आहे. आदिलशाहित मुरार जगदेव व धानतराव निजामशाही साबाजी अनत, कुतुबशाहीत आकारस भानजी मधोभानजी (आकण्णा मादण्णा) जायाप्पा लिंगरस ही मंडळी पुढे आली व आपआपली आसने स्थिर करून होते, जो तो आपली जहागीरी व वतने सांभाळून यावनाची थुंकी झेलण्यास तत्पर असे. देश बुडो व कांही होवो माझे घोडे पुढे गेले पाहिजे असे तो मनांत म्हणे. इकडे प्रजेकडे पहावे तर ती यावनी आमलाखाली जर्जर होऊन गेली होती. तिला

कोणी त्राता उरला नव्हता. कोणीही डोके वर काढण्यास तयार नव्हता अशावेळी शिवाजी महाराजाने प्रथम डोके वर काढले. त्यांनी आपले मावळी संवगड्यास हाती धरून हळूहळू रक्तपाताशिवाय मुलूख व किल्ले काबीज केले व पुढे एक एक बादशहा जागे झाले.

आता या बादशाहाचे सरदाराकडे पाहू. खुद्द महाराजांचे वडिल शहाजीराजे अनेक शहाचा कारभार करून शेवटी विजापूराकडे आले. महाराजाचा चुलता मंबाजी विजापूरकराचा नोकर असून तो विजापूराचेवतीने महाराजाबरोबर लढून मेला. महाराजाचे चुलते मोंगलाचे नोकर होते. आप्त फलटणचे निंबाळकर, सिंदखेडचे जाधव हे निजामशाहीचे व मोगलाचे सरदार होते. ही झाली वडिलाची व आप्तेष्टाची स्थिती त्याचप्रमाणे, शिवकालात सावंत बंधुंही शिवाजीचे विरूद्धच होते. शिवाजीचा शरिर संरक्षम संभाजी कावजी, नेताजी पालकर, खुद्द युवराज संभाजी महाराज वगैरे मोगलास मिळाले. संभाजीमाराजानो तर भयंकरच उद्‌गार काढलेले आहेत. ते मी औरंगजेबाचे सैन्याचे अवगाहन करण्यासाठी जात आहे आता येईन ते राज्य उध्वस्त करण्यासाठी, म्हणजे संभाजी राजापुढे एकच मी परत येईन आणि सह्याद्रिचे राज्य उध्वस्त करीन दुसरे राज्य निर्माण करण्याची भाषाच नाही.

सेतुमाधव पगडी : शिवचरित्रावरील एक अभ्यास पान ९५.

शहाजीराजे यांना बाजीने पकडले ते स्वतः नोकर म्हणून आज्ञा पाळली असेल.

शिवाजी महाराजाचे आज्ञेवरुन परमानंदाने शिवभारत नांवाचा संस्कृत काव्यमय ग्रंथ लिहिला यात या शिवभारताचा अध्याय ११ व १२ वाचल्यावर आपले हे सर्व लक्षांत येईल; यात झालेली लढाई व नंतर झालेली अटक यामध्ये कोण कोण लढले, त्यात मुस्तफाखाचे बाजूने कोण लढले, शहाजीचे बाजूने कोण लढले याची नावे दिलेली आहेत. या झालेल्या लढाईबद्दल व त्यात असणारे लोकाबद्दल असलेला डंक अगर गैरसमज परमानंदाने दाखविलेला नाही तसाच शिवाजी महाराजानाही दाखविले नाही. उलट त्या लढाईत दोन्ही बाजूचे योद्धे लढले त्यांचे बहादूरी बद्दलचे वर्णन अत्यत बहादूरीने केले आहे. आज शिवभारत हा ग्रंथ मराठ्याचे इतिहासास मुख्यत्वे साधन म्हणूनच त्या ग्रंथाचा उपयोग केला जातो. या ठिकाणी शहाजी व बाजी घोरपडे यांचा संघर्षावर चर्चेचा विषय नाही. फक्त बाजी घोरपडे यांचे मृत्यूचा काळ याबाबतचाच विषय आहे. परंतु या विषयाची पार्श्वभूमि व शिवाजीने शहाजीराजाना लिहिलेले पत्र त्या पत्राचा काल पहाता शहाजीराजे पत्र पाठविणेपूर्वी १० महिने अगोदर मृत्यू पावले असल्यामुळे या लक्षांत घेण्याकरितां या मृत्यू पूर्वीच्या घटना काय घडल्या लिहणे गरजेचे होते. शहाजीराजे हे शिवाजीराजे व बाजीराजे घोरपडे यांची झालेली लढाई व आपणांपुढे आज मी दिलेल्या अस्सल पत्राचा पुरावा दिला आहे. त्यावरून हे शिवाजीने शहाजीस म्हणून लिहिलेले पत्र व सन यापूर्वी दिलेली माहिती विश्वसनिय ठरत नाही.

आरंभी मी दिलेल्या पत्राचा सन — सबा सितैन अनफ हा दिला आहे. त्यावरून हा सन पहाता इ. स. १९६७ येतो. त्यावेळी बाजीराजे घोरपडे व त्यांचे बंधू अंबाजी खंडोजी हे जिवंत होते. व त्यांनी व इतरांनी देशपांडे, नाडगौडा नायकवडी वगैरेनी कबूल कतबा लिहून दिलेला आहे. व वाळवे परगण्याचे देशमुख म्हणून या तिघानी आपली नावे दिलेली आहेत. व सिक्के उठविलेले आहेत. त्याचप्रमाणे वाळव्याचे देशकुलकर्णी महादोबल्लाळ यांचाही उल्लेख या पत्रांत आहे.

सर्व ऐतिहासिक लेखांचे प्रमान्य व त्याची विश्वसनियता (मग ते लेख, ग्रंथ, शिलालेख, इत्यादि कोणत्याही स्वरूपाचे असोत) त्याच्या लेखन कालांवर सर्वस्वी अवलंबून असतात.

कोणताही प्रसंग घडत असता एखाद्या चितारी समक्ष हजर असून तो त्या प्रसंगाचे जे चित्र तयार करतो ते चित्र सर्वांशी विश्वासार्य होते, परंतु जर प्रसंग होऊन गेल्यानंतर कांही कालाने एखाद्या चिताऱ्याने नुसत्या ऐकीव माहितीवरुन चित्र तयार केले तर त्या चित्राचे उभारणीस काल्पनिक गोष्टींचा समावेश होतो. त्यामुळे मुळच्या समकालिन चित्राशी ताडून पहाता असे मागाहून काढलेले चित्र विसंगत दिसते व त्या प्रमाणातच ते विश्वासासहि अपात्र ठरते. हा सिद्धांतही ऐतिहासिक लेखांच्या कृतिना सर्वांशी लागू पडतो.

प्रसंग व त्या प्रसंगाचे लेखन करणारा लेखक यांचेमध्ये कालाचे जितके जितके अंतर पडते तितकी त्याच कृति काल्पनिक व ऐकिव साधनानी सजविली जाते व म्हणूनच ती कृति विश्वसनियाच्या प्रमाणांत उतरत नाही.

व या कारणास्तव इतिहास संशोधन शास्त्रात विषम कालीन लिहलेले बखरी वगैरे लेख प्रमाण याच्या दृष्टीने आगदी खालच्या पायरीचे ठरतात, यास्तव इतिहास संशोधनदृष्ट्या विश्वासार्ह ठरण्यास कोणताही पुरावा अस्सल व समकालीन असला पाहिजे. उदाहरणार्थ तत्कालीन सरकारी संबंधित अधिकाऱ्यांचा पत्रव्यवहार किंवा तत्कालिन जमाखर्च किंवा तत्कालिन राजकीय घटनेशी संबंधित झालेल्या कुटुंबाच्या तर्फेल झालेला पत्रव्यवहार वगैरेसारखी प्रत्यक्ष अनुभवलेली किंवा पाहिलेली माहिती देणारे पुरावे हे प्रथम श्रेणीचे साक्षीदार होत.

सारांश प्रत्येक भूतकालीन लेंखी पुरावा हा त्याच्या पात्रापात्रतेप्रमाणे इतिहास लेखनास आधारभूत होऊ शकतात या दृष्टिने मी दिलेले वाळव्याच देशमुखांनी इतरानी कबुल कतबा हा कागद अत्यंत महत्त्वाचा तसाच बाजी घोरपडे याचा मृत्युचा काल हा महत्त्वाचा शोध इ. स. १६६७ पुढे जगला हा आहे. तो १६६४ साली शिवाजीने ठार मारले. तसेच बायकामुलांची कत्तल केली हे साफ खोटे आहे. सर्व मुले जिवंत होती मुधोळचे घोरपडे इतिहासकारास बाजीचा मुलगा मालोजी हा आपले आजोळी असल्यामुळे तो वाचला हे दाखवावयाचे होते.

आपल्याला इतिहास आहे पण इतिहासकार नाहीत. ग्रंट डफ आणि नंतर १२५ वर्षानी झालेले रियासतकार सरदेसाई या खेरीज चटकन सांगता येण्यासारखी इतिहासकारांची नावे दृष्टीपुढे येत नाहीत. मराठ्यांच्या इतिहासावर आज महाराष्ट्राबाहेरच अधिक संशोधन होत आहे. कलकत्ता ते लखनौ, राजस्थान, या भारतीय आणि इंग्लड, न्युझीलंड, जपान, ऑस्ट्रेलिया, आणि अमेरिका इत्यादी भारताबाहेरील देशात होत आहे. आणि या सर्वांना इतिहास संशोधन करण्यासाठी आपण विपूल सामुग्री पुरवित आहोत. आपले अभितेखागार आणि संशोधन मंडळे जणू काय त्यांच्यासाठीच सिद्ध केली आहेत.

अर्थात ही सामुग्री म्हणजे राष्ट्राची संपत्ती आहे. व त्याचा कोणीही वापर करावा हे तत्त्व ठीक असले तरी प्रादेशिक इतिहासाची विशेषतः सामाजिक ऐतिहासिक आर्थिक इतिहासाची ज्या जाणकारपणे त्या देशातील संशोधक हाताळू शकतील तितके इतरांना नेहमीच शक्य होईलसे नाही, अशा या संशोधनावर आधारित ग्रंथ इंग्रजीत प्रसिद्ध होतील. आधारभूत ग्रंथ म्हणून त्याचा वापर होऊ लागेल आणि आपण मात्र या लेखकांना महाराष्ट्राचे मर्म उमजले नाही, अशी टीका करीत राहू. ग्रॅड उफच्या मराठ्यांच्या

इतिहासातील चुकांचे हप्ते एकेकाळी जसे आपण देत होतो. तसेच आता देखील होईल. म्हणून महाराष्ट्राचा निर्दोष इतिहास जगापुढे मांडावयाचा असेल तर आपण आपला प्रादेशिक इतिहास सर्व दृष्टीकोणातून परिश्रमपूर्वक संशोधन करून (ऐतिहासिक तत्कालिन कागदोपत्राचे) आधारे तयार केला पाहिजे. तसे न झाल्यास संशोधकांना कच्चा माल पुरवणारी एक वसाहत असेच आपल्या इतिहास संशोधनाचे स्वरूप राहील.

मध्ययुगीन भारताचे इतिहासात १७ वे शतक हे अनेक दृष्ट्या महत्वपूर्ण आहे. मोगली सत्ता याच शतकात कळसास पोहोचली आणि इतर दक्षिणी मुसलमानी राज्ये धुळीस मिळाली ती देखिल याच शतकात. मराठी सत्तेचा उदय आणि विकास याच शतकाने नोंदविला आणि पाश्चिमात्यांनी भारतात आपली पावले टाकावयास प्रामुख्याने याच शतकात प्रारंभ केला.

विकेंद्रीकरणाची आवश्यकता होती, म्हणूनच देशाधिकारी अथवा देशक (देशमुख देशपांडे) आणि राज्याधिकारी अशी सत्तेची विभागणी केली होती. तेव्हा अशा या काळात शिवाजी मुत्सदी महाराजा राज्य स्थापनेस आणि ते वाढीला लावण्यास आवश्यक अशा वतनदारांचे शत्रुत्व कसा पत्करतील ?

सतराव्या शतकात वतन हे सामाजिक, राजकीय आणि आर्थिक प्रतिष्ठेच गमक होते. तेव्हा साहाजिकच वतनासाठी ते का जिवावर उदार होत असत. ?

वतनाच्या या विलक्षण आसक्तीमुळे राजसत्तेला त्याबाबत जपून पावले टाकणे भाग होते. उदाहरण म्हणून एक कौलनामा इ. स. १६५५ या ठिकाणी देत आहे.

अजर रा. शिवाजी राजे हेबतराऊ देशमुख, ता. गुजणमावळ तुमचे बाबे हुजर खबर मालूम जालीनें कित्येक बडिया लोकांनी तुमचे पाठी शक घातला आहे की तुमची देशमुखी आम्ही घेऊ तुम्हास वाईट काम ऐसा शक घातला आहे व दळवी याचे कर्जआहे. त्यास तुम्ही जमान आहा जमानती झाडे लाऊन आम्हास कष्टी करू ऐसा शक तुमचे पोटी बसविला आहे व कित्येक तुमचिया घरोबिया मध्ये एक प्रकार वर्तणूक जाली आहे, असे कित्येक लोक बोलताती तरी तेही गोष्टीच्या निमित्या येऊन कष्टी करतील ऐसा शक वसविला आहे. या तिही गोष्टी करिता व कित्येक गोष्टीकरिता तुम्ही शक जावे आहा डावीडौल होता तरी तुम्हास साहेब घरिच्या लेकरासारिखे जाणितो आणि तुमचे फार हेही गोष्टीचे वाईट करावे ऐसे मनावर कधी धरणार नाही हे तुम्हास वित्तिम कळले असावे. कोणीही गोष्टीचा शक न धरणे तुमचे हजार गुन्हे माफ आहे ती तुम्हासी आम्ही काहीही वाईट वर्तणूक करु तरी आम्हास महादेवाची आण असे व आईसाहेबाची आण असे कोणतो गोष्टीची चिंता न करणे अवांतराहि लोक भेडसाविले असेल ते मेटविणे आमच्या इमानावरि आपला मान ठेवून आम्हा पासि येणे कोणी गोष्टी चिंता न करणे

मोर्तब

शिवकालीन पत्र सार संग्रह लेख नं. ७०८

शिवकालीन वतनदारी विषयी बरेचसे गैरसमज आहेत. शिवाजी महाराजानी वतनदारी नष्ठ केली आणि जनतेची पिळवणूक करणाऱ्या देशमुखी देशपांडे सरदार दरकदार याच्यापासून रयतेची मुक्तता केली. समाजात वर्गीय लढ्याला प्रारंभ झाला होता, आणि या लढ्यात जनतेचे नेतृत्व करुन सरंजामशाही वर्गाविरूद्ध लढा पुकारला आणि नवीन समाज निर्माण केला. अशा तऱ्हेचे विचार काही वेळा मांडले जातात.

परतु समाजात अशाप्रकारचा वर्गकलह होता. वतनदाऱ्याच्या विरूद्ध जनतेने बंड पुकारले होते. अशातऱ्हेच्या विधानांना पुरेसा आधार आढळत नाही.

वतनदारी ही त्या काळची एक आवश्यक अशी राज्यकारभाराची संस्था होती. अपुरी दळणवळणाची साधने, राज्य कारभारास योग्य अशा जाणकार माणसांची चणचण, अशा अवस्थेत शांतता आणि सुव्यवस्था राखण्याकरिता शिवाजी महाराज वतनदारिविरूद्ध होते, असे मत मांडले जाते. तेव्हा प्रामुख्याने आधार घेतला जातो तो सभासद बखरीचा आणि आज्ञापत्राचा. ही दोन्ही साधने शिवाजी महाराजांच्या मृत्युनंतरची आहेत. आदिलशाही निजामशाही मोगलाई यांच्या ताब्यातील मराठी मुलूख हळू हळू महाराजाच्या अधिकारात येऊ लागला. तेथील मिरासदार पैकेकरी होऊन गावास हुडे वाडे कोट बांधून प्यादे (सैन्य) बंदुखी घेऊन बळावले आहेत, याची प्रचिती महाराजाना उत्तरोत्तर येत गेली असावी.

आणि म्हणून त्यानी काही बाबतीत मिरासदार इनाम इजारतीने मनास मानेसारखे आपण घेत होते ते सर्व अनामत करून जमीनदारास गल्ला व नख्त (पैसे) पाहून देशमुखास व देश कुलकर्णी यास व पाटील कुलकर्णी यासि हक्क बांधून दिला.

आज्ञा पात्रात देखील असाच सूर आहे. 'हे लोक म्हणजे राज्याचे दायादच आहेत. आहे वतन इतकियावरी कालक्रमणा करावी, सर्व देशाचा स्वामी म्हणजे राजा निष्ठेने वर्तावे कोणाचा करावा ही त्यांची वृद्धी नाही. जंव जंव नूतन संपादाव व बळकट व्हावे, बळकट झाले म्हणजेच एकाचे घ्यावे दावे दरवडे करावे हा याचा सहज हव्यास.'

या दोन्ही उताऱ्यावरून शिवाजी महाराज वतन संस्थेच्या उपयुक्तते विषयी साशंक होत असे म्हणता येणार नाही. त्यांचा आक्षेप होता तो मनास मानेसारखे वागणाऱ्या वतदाराविरुद्ध अथवा आहे तेवढ्या वतनावर संतुष्ट राहून स्वामीशी एकनिष्ठेने न वागता सतत हव्यास करणाऱ्या वतनदाराविरुद्ध आपल्या राज्यातील वतनदार जर कर्तव्यच्युत बनले शिरजोर झाले तर आपली सत्ता संपुष्ठात येईल अशी त्यांना भिती वाटणे शक्य असेल. विशेषतः मराठी राज्याची रीतसर स्थापना झाल्यानंतर म्हणजे १६७४ नंतर अशा महत्वाकांक्षी अथवा बेमुर्वतखोर वतनदारांना त्यांची वतने अमानत करून शासन करण्याचा उपक्रम अल्पप्रमाणात सुरू करणे शक्य आहे. वतनदाराच्या विरूद्ध उघडपणे बंड करणे शक्य नव्हते. कारण त्यांची शासकीय गरज आणि रयतेवरील पकड या गोष्टी वृष्टीआड करून चालणार नव्हते.

वतनसंस्था ही उपयुक्त असल्यामुळे शिवकालापुर्वीची वतने चालू केल्याची आणि नवीन वतने दिल्याची उदाहरणे आढळतात. त्याचबरोबर उद्दाम वतनदारांना त्यांचे वतन अमानत करून शासन केल्याची उदाहरणे आहेत, वतने अमानत केली, याचा अर्थ तीनह केली असा होत नाही. वतन अमानत हे एक प्रकारे वतनदारास शासन होते.

कारीच्या जेधे देशमुखा सर्जाराव देशमुखीचे वतन केव्हातरी १६६८ पुर्वी जप्त केले होते. तेव्हा बहुत जबून वस्त तंगतुरासी जाहली तरी मेहर बानू होऊन आपला आवकास चालू आणि साहेबाच चाकरीस हाजीर राहो यैसे केले पाहिजे. अशी त्याने विनंती केली. तेव्हा त्याचे हक्क परत करण्यात आले.

शिवाजी महाराजासंबंधित त्यांच्या हयातीतच इतिहास लिहिणारे होते, त्याचे संबंधी, संस्कृत, मराठी, पर्शियन, दक्षिणी उर्दू इंग्रजीपोर्तूगीज डच फेंच इत्यादी भाषा मधून लिहिण्याची जी परंपरा सुरू झाली ती त्यांच्या हयाती पासून ते अगदी परवा परवा पर्यंत डच पोर्तुगिज फ्रेंच या भाषा सोडून दिल्या तर इतर भाषातून सारखीच चालू आहे. खुद्द छत्रपति शिवाजी महाराजांच्या आयुष्याच्या कारकिर्दीत त्याच्या देखरेखी खाली दरबारातील एक कवी नावाजलेला पंडित कविंद्र परमानंदं याने संस्कृत भाषेमध्ये शिवाजीचे चरित्र लिहावयास घेतले त्याला शिवभारत म्हणतात. दुर्दैवाने ते चरित्र अपुरे राहिले किंवा संपूर्ण चरित्र लिहिले असताना फक्त शिवचरित्राचे ३१ अध्यायच सापडले व इतर अध्याय सापडले नाहीत म्हणून सापडले तेवढेच अध्याय प्रसिद्ध केले असे होणे शक्य आहे. पण काही इतिहास संशोधकाचे मते हे शिवचरित्र पुरे झाले असले पाहिजे. म्हणून त्याचा शोध परवा परवा सन १९४०—४६ चे सुमारास इतिहास संशोधक कै. य. रा. गुप्ते याची मला पत्रे येत होती. कारण माझे घोरपडे घराण्यात जतन केलेले बरेच हस्तलिखीत ग्रंथ होते. तसेच मराठ्यांचे इतिहासाला उपयुक्त असे वडीलोपार्जीत घोरपडे घराण्याचे व इतर घराण्याचे कागद आहेत, असे अनेकाकडून कळले होते. त्यांमुळे शिवभारताचा अपुरा भाग मिळतो काय ? यांची चौकशी होत होती.

इतिहास नानाविध व्यक्तिंच्या पराक्रमाने तसेच बऱ्या व वाईट केलेल्या गोष्टीनेही बनतो. अर्थात त्या व्यक्ति कोणत्या घराण्यांतल्या कशा पुढे आल्या, त्यांचे जन्ममृत्यु केव्हां कसे झाले, त्याची समकालीन परिस्थिती कशा प्रकारची होती, हे तपशिल जितक्या विपुलतेने उपलब्ध होतील तितका तो इतिहास भरीव मार्गदर्शी बनतो, बनेल.

व्यक्तिंची कुटुंबे बनतात आणि कुटुंबाचे समाज व राष्ट्र बनत जाते. यास्तव व्यक्तिचा व कुटुंबाचा भरपूर तपशील वाचकापुढे येण्यास तत्संबंधी तत्कालीन समाज परिस्थिती, ऐतिहासिक पुरुष व प्रसंग याबद्दलचा ऐतिहासिक तत्कालीन कागदपत्राचा पुरावा, वंशावळी, ते कोठे जन्मलें, त्यानी कोठे कसा इतिहास निर्माण केला हे कळणे अगत्याचे असते. इतिहास एका पुरुषाचा असो की मोठा विस्तृत असो. इतिहासास दोघेही मौल्यवान हे लक्षात घेऊन शक्य तितक्या व्यक्तिंची माहिती व कागदपत्रे उपलब्ध होणे गरजेचे आहे. कित्येक घराण्यांतील पुरुषांनी पिढ्यांपिढ्यान ऐतिहासिक पराक्रमाची साथ दिलेली आहे. उदाहरणार्थ — घोरपडे, भोसले, निंबाळकर वगैरे होत. तर कित्येकांची नावनिशी व्यक्ती पुरतीच संपुष्टात आलेली असा प्रकार नजरेस येत आहे. मुरारबाजी देशपांडे, बाजीप्रभू देशपांडे, नेताजी पालकर, जिवामहाले, बर्हिजी नाईक, तानाजी मालुसरे इत्यादी महापराक्रमी पुरुष आकाशातील तुटलेल्या ताऱ्याप्रमाणे चमकून त्यांनी सर्व जगाचे लक्ष आपणाकडे ओढून घेतलेले आहे.

शहाजीच्या तीन स्वाऱ्या, बंगलोरास वास्तव्य (स. १६३७–४०)

रणदुल्लाखानाने शहाजीला बरोबर घेवून कर्नाटकांत लागोपाठ तीन स्वाऱ्या केल्या, त्या सन १६३७ पासून १६४० पावेतो झाल्या. दसऱ्यास फौजा स्वारीस निघावयाच्या त्या पुढील पर्जन्यापूर्वी परत यावयाच्या असा क्रम चालला. महंमदशहाचा असा सक्त हुकूम होता की, कर्नाटकातील हिंदू सत्ताधीशांस जिंकून त्यांचा प्रदेश हस्तगत करावा, हिंदु धर्माचा पाडाव करुन मुसलमानी धर्म वाढवावा. आणि संपत्ति लुटून विजापुरास आणावी. पहिली स्वारी पश्चिम बाजूने मालनाड प्रांतातील इक्केरीवर झाली. हे धनाढ्य शहर हल्लीच्या दक्षिण कॅनरा जिल्ह्यात होते. तेथे भद्राप्पा नाइकाचा पराक्रमी पुत्र वीरभद्र राज्य करीत होता. आदिलशाही फौजा प्रचंड व सज्ज असल्यामुळे त्यांजपुढे वीरभद्राचा निभाव लागला नाही. एक दोन महिन्यांत त्याचा पाडाव होवून इक्केरी शहर मुसलमानांचे हाती गेले. नाइकाने शरण येऊन अर्धे राज्य व अठरा लाख होन दंड देऊन आपला बचाव केला. त्याने पुढे बेदनुरास जाऊन वस्ती केली. एवढा विजय संपादून शहाजी व रणदुल्लाखान स. १६३८ पावसाळ्यात विजापुरी परते आले.

दुसरी स्वारी पुढील सालच्या दसऱ्यास निघाली. तीत रणदुल्लाखानाचे हाताखाली अफझलखान व शहाजी हे दोन मुख्य सरदार होते. कर्नाटकांत प्रवेश केल्यावर रणदुल्लाने अफझलखानास शिऱ्यावर पाठविले. शिरे येथे मजबूत किल्ला असून तेथे कस्तुरीरंग नाईक यांचा अंमल होता. अफझलखानाने किल्यास वेढा घालून नायकास जेर केले, तेव्हा नाइलाज होवून त्याने खानाकडे तहाची याचना केली. वाटाघाटीसाठी अफझलखानाने नायकास अभयवचन देऊन भेटीस बोलावले पुढे भेटीच्या प्रसंगी विश्वासघात करून अफझलखानाने नायकाचा शिरच्छेद केला. आणि किल्ला, व संपत्ती कबजात घेऊन पुढे प्रयाण केले. खानाच्या या विश्वासघाताबद्दल चहुकडे अत्यंत बोभाटा होवून आदिलशाही दरबारावरील लोकांचा विश्वास उडाला. अफझलखान अत्यंत विश्वासघातकी आहे असा त्याचा लौकिक देशात इतका पसरला होता की, पुढे २० वर्षानी शिवाजी त्याचे भेटीस गेला तेव्हा खानाचा हा कपटी स्वभाव तो पूर्णपणे ओळखून होता.

अफझलखान शिऱ्यावर चालून गेला, त्याचवेळी शहाजीची रवानगी बंगलोरवर झाली. तेथे केंपगौडा नावाचा अंमलदार होता. त्याचा पराभव करून शहाजीने बंगलोर हस्तगत केले. नंतर रणदुल्लाखान स्वतः तेथे गेला. आणि तेथील कारभारावर त्याने शहाजीचीच नेमणूक केली, केंपगौड पळून सावनदुर्गावर राहिला. नंतर शहाजी श्रीरंगपट्टणावर चालून गेला. तेथे कांतीराय नरसराज वोडियार हा अधिकारी होता शहाजीने कांतीरायापासून मोठा दंड घेऊन त्यासच आपले तर्फे तेथे स्थापिले आणि तो बंगलोरास परत आला. रणदुल्लाने आपले वकील मदुरा व कावेरी पट्टण येथील अधिकाऱ्यांकडे पाठविले. तेथील सत्ताधीशांनी आदिलशहाचे स्वामित्व कबूल करून खंडणी पाठविली. येणेप्रमाणे विजय मिळवून रणदुल्लाखान पावसाळ्यापूर्वी विजापूरास परत आला. मागील बंदोबस्तासाठी शहाजी बंगलोरास राहिला. यावेळी बंगलोरास इसलामपूर मुसलमानी नाव देण्यात आले.

रणदुल्लाखानाची तिसरी स्वारी सन १६३९–४० झाली. या स्वारीत त्याने बसवापट्टणच्या लढाईत शहाजीनेही मोठा पराक्रम केल्याचे वर्णन शिवभारतात आहे. लगेच चिक्कनायकहल्ली, बेलूर, टुमकूर, कांदळ, बाळापूर इत्यादी स्थळे आदिलशहास हस्तगत होऊन लूटही अपरंपार पैदा झाली. तिचा काही अंश सरदारांस मिळूनही या खात्यांत विजापूरास इतकी संपत्ती आली की, तिच्यातून दादमहाल वगैरे कित्येक प्रचंड इमारती तेथे बांधल्या गेल्या. तिनही स्वाऱ्यांत कल्पनातीत यश मिळाल्याबद्दल महंमदशहास मोठी

धन्यता वाटली, आपण दक्षिणचे सर्व राजे व महाराजे जिकिंयले, मोठमोठी मंदिरे धुळीस मिळविली. तीन वर्षाच्या अवधीत सेतुबंध रामेश्वराची भक्ती करणाऱ्या हिंदूच्या शेंड्या कापून काफरांचे निर्मूलन केले असा अभिमान शहाने जाहीर केलेला विजापुरच्या इतिहासात आढळतो. शहाजीला मात्र ही बढाई कितपत रूचली असेल ती असो. त्याला शक्य तितका खूष ठेवण्याची खबरदारी शहाने घेतली होती. रणदुल्लाखानपुढे दरबारी परत आल्यावर शहाजीच कर्नाटकात आदिलशहाचा मुख्य हस्तक झाला. प्रथम काही वर्षे बंगलोरास काढून नंतर बाळापूर व कोलार येथे त्याने कित्येक दिवस वास्तव्य केले. पुष्कळ ब्राह्मण व इतर हुन्नरी लोक त्यानंतर दक्षिणेतून कर्नाटकात नेले. त्यांची वस्ती अद्यापी तिकडे आढळून येते जिंकलेल्या प्रदेशाची, वसुलीची व इतर व्यवस्था लावण्याकरिता त्याने आपल्या भरंवशाची अनेक कुटुंबे बरोबर नेली. त्याने तिकडच्या रयत लोकांस न दुखविता त्यांचे प्रेम संपादन केले आणि ठिकठिकाणी आपले हस्तक नेमून नियमित वसूल जमा करुन जवळ धनसंचय केला. विजापूरास तो वेळेवर रकमा पाठवित असल्यामुळे त्याचा कारभार शहास पसंत पडला आणि कोणाही मुसलमान सरदाराचे हातून पूर्वी प्रांताची सुव्यवस्था इतकी चांगली लागली नव्हती. सन १६४० नंतरच्या तीन वर्षात कर्नाटकात पुनः मोठी स्वारी झाल्याचे दिसत नाही. शहाजी बंगलोरास राहून सर्व कारभार पहात होता. आपल्या हातून हिंदूंचा निःपात होतो हे या उद्योगाचे खरे मर्म त्याने ओळखले. हिंदू सत्ताधिशांचे वकील त्याजकडे जाऊ येऊ लागले. केव्हा उघड वाटाघाटी, तर केव्हा गुप्त कावे, त्यांचे सारखे चालू असत. दक्षिणेतील हिंदूचा पुरस्कार त्याजकडे येऊन, स्वतंत्र राजाचा थाट त्याने जमविला. स्वभावाचा थोडा रंगेल असल्यामुळे त्याचेजवळ आश्रित, कवी, शाहीर, गवई वगैरेचा भरणा जमून बंगलोरास हिंदू राज्य उत्पन्न झाल्याचा देखावा चालू झाला. शिवभारत राधामाधवविलासचंपू इत्यादिकांतून वरील ध्वनी स्पष्ट उमटलेला दिसतो.

स्वाऱ्या संपून बंगलोरास शहाजीची व्यवस्था स्थायिक झाल्यावर त्याने जिजाबाई व शिवाजी यांस पुण्याहून आपल्याकडे बोलावून घेतले. या हालचालीचे काल निश्चित ठरविता आले तर पुष्कळ गोष्टी स्पष्ट होतील. सन १६४० पासून सुमारे दोन वर्षे शिवाजीचे वास्तव्य बापाजवळ बंगलोरास व विजापूरास झाले. भेटी होऊन आनंदोत्सव झाला. भोजन करून जिजाऊचे व शहाजी राजांची बोलणी, नुतन लग्न, पुत्रसंपादनी प्रितिव्यवहाराची होऊन हास्य विनोद केला. शिवाजी महाराजास हजरतीचे भेटीस नेले. शहाजी राजांचे स्वारीपुढे शिवाजी महाराजांची स्वारी चिमणी घोडी, चिमणी पालखी, चिमणे भाई, चिमणे चोपदार समागमे चालत असता हजरतींनी कौतुक केले. शिवाजीचे पहिले लग्न ता. १६–५–१६४० रोजी दादोजी कोंडदेवाने पुण्यास केले असे शिवदिग्विजकार म्हणतो कोणी म्हणतात हे लग्न विजापुरास झाले. विजापूरचा मुसलमानी दरबार व बंगलोरचे निर्भेळ हिंदु वातावरण यांचा तिव्र विरोध कोणाच्याही नजरेस उघड दिसणारा होता. शहास कुर्निसात न करणे किंवा कसायांचे हातून गाई सोडविणे हे प्रकार शिवाजीचे हातून या मुक्कामांत घडले असल्याचा संभव आहे. सन १६४२ च्या आत–बाहेर शिवाजीची रवानगी परत पुण्यास झाली.

मुस्ताफाखानाशी शहाजीचा बेबनाव

(सन १६४४–४७) :– शहाजी विजापुरास असतो मागे कर्नाटकात कित्येक नायकांनी पुनः बंडाळी चालू केली. वीरभद्राचा धाकटा भाऊ शिवाप्पा हा बेदनूरच्या गादीवर आला. तो शूर व बाणेदार होता. त्याने बाहेर स्वाऱ्या करून नवीन प्रदेश हस्तगत केले. व इक्केरीसुद्धा पुनः परत घेतली. हा त्याचा बंडावा मोडणे आदिलशहास प्राप्त होते. सन १६४३ च्या मार्च–जूनच्या दरम्यान रणदुल्लाखान मरण पावला तेव्हा त्याचे जागी शहाने मुल्ला महंमदाचा जावई मुस्ताफाखान खानबाबा या कडव्या मुसलमानाची नेमणूक करून

शहाजीसह त्यास इक्केरीवर रवाना केले. आणि मागून ता. ३—१—१६४४ रोजी खुद्द महंमदशहा त्यांचा पाठपुरावा करण्यासाठी विजापूर सोडून निघाला आणि बंकापूरास मुक्काम करून राहिला. शिवाप्पाने मुस्ताफाखानाशी निकराचा सामना केला. इक्केरी व सागर येथे तुंबळ संग्राम होऊन शिवाप्पा शरण आला. तेव्हा पहिल्यासारखा बंदोबस्त करून मुस्तफाखान व शहाजी एप्रिलात परत विजापूर येथे आले.

आता पूर्व बाजूकडील कुत्बशाही आक्रमणाचा थोडा वृत्तांत सांगितला पाहिजे. त्या भागात चंद्रगिरी, वेलोर, जिंजी. तंजावर, मदुरा, ही स्थळे महत्वाची होत. चंद्रगिरीस श्रीरंगराय तिसरा हा बराच कर्तृत्ववान पुरूष जिंजी, तंजावर, मदुरा येथील नायकांस मिळवून घेवून पूर्वीचे विजयनगरचे राज्य पुनः उभारण्याची खटपट करू लागला. पश्चिमेकडील रणक्षेत्रावर जसे रणदुल्ला व मुस्ताफाखान मुख्य होते, तसा पूर्वेकडील क्षेत्रांत कुत्बशहाचा बलिष्ठ सरदार मीरजुम्ला मुखत्यारीने वावरत होता ठिकठिकाणच्या नायकांस आपले बाजूस आणून श्रीरंगरायाचा प्रयत्न हाणून पाडण्याचा उद्योग मीरजुम्ल्याने चालविला. चंद्रगिरीच्या राज्यात वेलोरेचा किल्ला मजबूत असल्यामुळे तेथेच मुख्य रणसंग्राम माजला. श्रीरंगराय सन १६४२ च्या नोव्हेंबरांत राज्य करू लागला. तेव्हापासून तीस वर्षेपावेतो हा झगडा सारखा चालूच होता असे म्हटले तरी चालेल. सन १६४३ व कुत्बशाही फौजा वेलोरवर चालून गेल्या असता बेदनूरच्या शिवाप्पा नायकाने श्रीरंगरायाचे साह्य करुन मीरजुम्ला यास वेलोरहून घालवून दिले. आणि तेथे दोन वर्षात श्रीरंगरायाने आपला जम पुष्कळसा बसविला. अर्थात श्रीरंगरायाचा बंदोबस्त वेळीच न झाला तर सर्व कर्नाटक हातचे जाईल असे वाटून आदिलशहा व कुत्बशहा यांनी पुनः एकत्र वाटाघाट करून पाहिली. संगनमताचा करार ताजा केला. तदनुसार त्या दोन्ही शहांच्या संयुक्त फौजांनी सन १६४५ त श्रीरंगरायावर चढाई करूनवे लोरचा किल्ला हस्तगत केला. त्या बरोबर पूर्व किनाऱ्यावरील बहुतेक ठाणी मुसलमानांस प्राप्त झाली. कुत्बशहा व आदिलशहा यांनी या प्रचंड विजयानिमित्त मोठा आनंदोत्सव करून एकमेकांस नजराणे व पोषाख पाठवून पूर्वीचे सख्य आणखी दृढ केले.

या घडामोडीत शहाजीची परिस्थिती कशी होती ते समजून घेतले पाहिजे. हिंदूंचा निःपात करण्यात त्याने प्रथम मुसलमानांना साह्य केले, तरी श्रीरंगरायाचा बचाव व्हावा अशी त्याची मनापासून इच्छा होती. बहुदा त्या दोघांनी गुप्तपणे संगनमत केले असावे. त्यांचे वकिल एकमेकाकडे सारखे जात येत होते. सन १६४२—४३ त शहाजी विजापूरास असून तेथे शिवाजीसह दादोजी कोंडदेव ही त्याजपाशी असावा. कुत्बशहा व अदिलशहा यांचे उद्योग त्यांना पूर्णपणे कळत होते. सन १६४४ च्या पहिल्या सहामाहीत दादोजी कोंडदेवाने शिवाजीच्या नावाने मावळात चढाई करुन कोंडाणा, राजगड, तोरंणा, पुरंदर हे किल्ले व तत्समाविष्ट प्रदेश आटोक्यात आणिला. आणि तेणेकरून आदिलशहाच्या आक्रमणास पश्चिमेकडून नवीन शह उत्पन्न केला. अर्थात शहाजीची बंगलोरास स्थायिक होण्याची प्रवृत्ती अदिलशहास जाचक वाटू लागली.

सन १६४४ च्या अखेरीस शहाजी बंगलोरास जावून आपल्या कारभारावर रुजू झाला. श्रीरंगरायाने वेलोर पुन्हा परत घेतले म्हणून अदिलशहाने त्याचा पाडाव करण्याकरिता मोठी फौज तयार करून ती मुस्तफाखानाचे हाताखाली कर्नाटकात रवाना केली. ता. १—६-१६४६ रोजी मुस्ताफा स्वारीसनिघाला. त्याचे हाताखाली रणदुल्लाचा पुत्र धाकटा रुस्तुमजमा, अफझलखान वगैरे सरदार होते. गदग लक्ष्मेश्वराहून फौजा बसवावट्टणावर आल्या. या ठिकाणी ता. ३—१०—१६४६ रोजी असदखान व शहाजीराजे मुस्तफाचे फौजेल सामील झाले. तदनंतर शिवाप्पा नाईक श्रीरंगपट्टणचा वोडियार, आबाजी घाटगे झुंजारराव, केंगनायकाचा भाऊ बाळाजी हैगतराव हेही खानास येऊन मिळाले. दर्यातील तुफानाप्रमाणे ही अवाढव्य

फौच आग्नेयकडे वाट चालू लागली, तेव्हा ठिकठिकाणचे लोक व सत्ताधीश भयग्रस्त झाले. मुस्ताफाखानाने आजूबाजूस आपले हस्तक पाठवून प्रदेश आपल्या कबजात आणिला असे करीत फौजा वेलोरपुढे येऊन थडकल्या. त्या बरोबर श्रीरंगराय व जिंजी, मदुरा, तंजावर येथील अधिकारी, शरण चिठ्ठ्या पाठवून मुलखास उपद्रव देऊ नये अशी याचना करू लागले. पैकी श्रीरंगरायाने गुप्तपणे मुसलमानास मागे हटविण्याचा अंतस्थ यत्न चालू केला. परंतु मुस्ताफाखानाने जिंजीच्या नायकास वश करून श्रीरंगरायाचे गुप्त बेत समजून घेतले. तेव्हा कठीण प्रसंग जाणून श्रीरंगरायाने शहाजीस भिडेस घातले. त्यावरून शहाजीने श्रीरंगरायाबद्दल खानाकडे रदबदली केली. ती खानास बिलकूल रूचली नाही. त्याने वेलोरच्या किल्ल्यास वेढा घालण्यासाठी निरनिराळ्या सरदारांस बाजू वाटून दिल्या. श्रीरंगरायाचा सेनापती दामलवार म्हणून होता, याची व शहाजीची गाठ पडून तुंबळ रणकदंन झाले. त्यात दामलवाराने मुसलमानांची रेवडी उडवून देण्याचा प्रसंग आणिला असता ऐन प्रसंगी तो मारला गेला, आणि श्रीरंगरायाची फौज उधळून पळाली. त्याबरोबर वेलोरचे ठाणे मुसलमानास हस्तगत झाले. (मार्च १६४७) पुढे पाऊसकाळ येणारसे पाहून शहाजी व आसदखान यांस बंदोबस्तास ठेवून मुस्ताफाखान विजापूरास परत गेला. या विजयाबद्दल महंमदशहास संतोष व धन्यता वाटून तो मुद्दाम चाळीस मैल पावेतो पुढे येऊन कृष्णेवर खानास सामोरा गेला. तेथे सन्मानाने भेटून शहाने खानाचा गौरव केला. शहाजीच्या पराक्रमाबद्दल याचाही शहाने "महाराज कर्जद शहाजी भोसले" या शब्दांनी सन्मान केला.

याच वेलोरच्या युद्ध प्रसंगात मुस्ताफाखान व शहाजी यांचे वैमनस्य प्रथम उद्‌भवले. रणदुल्लाखान शहाजीची योग्यता ओळखून होता, पण त्यानंतरचे मुस्ताफा व अफझलखान यांना शहाजीच्या पराक्रमाचा हेवा वाटू लागला. उलट पक्षी सर्व कामे यशस्वी करून दाखववावी शहाजीने, आणि गौरव व्हावा दुसऱ्यांचा, हा प्रकार शहाजीलाही दुःसह वाटला. वेलोरच्या युद्धापूर्वी श्रीरंगरायाने शहाजीच्या मार्फत तहाची याचना केली आणि श्रीरंगरायाचा बचाव करावा अशी शिफारस शहाजीवे मुस्ताफाखानाकडे केली. ती सिद्धीस गेली नाही हा प्रकार वेगळा. परंतु शहाजी हिंदूचा पुरस्कार करतो. आणि मुसलमानांच्या राज्यवृद्धीस हरकत आणितो. अशी सामान्य समजूत दरबारी मंडळींची झाली. तसेच हिंदुधर्माच्या नाशास आपण कारण व्हावे ही गोष्ट शहाजीस बिलकूल रूचली नाही. आणि शहाजी शिवाजीचे व सल्लागारांचे विचार या संकटाचा परिहार कसा करावा इकडे चालू लागले. एकंदरीत इकडे आड व तिकडे विहीर अशी बिकट परिस्थिती पुनः शहाजीस प्राप्त झाली.

शहाजीची कैद (ऑगस्ट १६४८)

वेलोरचा निकाल लावल्यावर मुसलमानाची दृष्टी जिंजीकडे वळली. मुसलमानांचे हे आक्रमण बंद पाडण्यास श्रीरंगराय कसून झटत होता. सन १६४८ च्या जानेवारीत मुस्ताफाखान आदिलशहाच्या हुकूमाने विजापूराहून निघाला. तो जिंजीवर आला. मीरजुम्लाही त्याजबरोबर होता. जिंजीचा अधिकारी रुपनायक याने मुसलमानांशी सामना करण्याची सिद्धता केली. त्याने मदुरा व तंजावर येथील नायकांस आपल्या मदतीस आणिले. पण मदुरेचा तिरुमल नायक श्रीरंगरायाचा द्वेष करी. श्रीरंगरायास वर्चस्व प्राप्त झाल्यास आपली स्वतंत्रता नाहीशी होईल अशी भिती तिरुमल यास वाटून तो अंतस्थपणे मुसलमानांस सामील झाला. अर्थात हिंदूंची एकजूट घडून आली नाही. शहाजी, आसदखान व रुस्तुमजमा यांचे एकमत असून, त्यांना मुस्ताफाखानाची अरेरावी दुःसह वाटत होती. खानाने जिंजीस वेढा घातला, पण चौघांची तोंडे चार दिशांस झाल्यामुळे वेढ्याचे काम बिघडले. मीरजुम्ला व मुस्ताफा यांचे वाकडे आले. मीरजुम्ला आपली फौज घेऊन जिंजीहून निघून गेला. अशा स्थितीत मुस्ताफाखानास कळून चुकले, की प्रथम ही आपसांतील

फूट बंद पाडिली पाहिजे, त्याशिवाय जिंजी हस्तगत होणार नाही. ह्या फुटीचा उत्पादक शहाजी होय अशी त्याची खात्री होऊन त्यासच प्रथम वठणीस आणण्याचे त्याने योजिले. आणि त्यास आपला संशय येवू नये म्हणून बाह्यतः अत्यंत गोडी दाखविली. मीरजुम्ला व शहाजी यांचे अंतस्थ सूत चालू झाले. आपणास कुत्बशहा आपले नोकरीत घेईल तर आपण त्यांचे कार्य उत्कृष्ट बजावून दाखवू, आदिलशहाचे नोकरीत मुस्ताफाखान, आपणास कधीच वर डोके काढू देणार नाही असा निराळाच बेत मनात, रचून शहाजीने ता. २३-१२-१६४७ रोजी एक लेखी अर्जी कुत्बशहास पाठवून, मला आपले नोकरीत घ्या अशी विनंति केली. ही गोष्ट मुस्ताफाचे कानावर गेल्याने तो जास्तच चिडून गेला आणि हात धुऊन शहाजीचे पाठीस लागला. जिंजीचा वेढा सुरू झाल्यावर शहाजीने खानास कळविले की “माझी फौज थकून गेली आहे, तर थोडे दिवस मी बंगलोरास जाऊन फौज ताजी तवानी करून परत येतो” ‘खानाने उत्तर पाठविले,’ हल्ली वेढ्याचे काम चालू आहे. तर तुम्हांस बाहेर जाण्यास परवानगी देता येत नाही. त्यावर शहाजीने खानास जबाब दिला, की, ‘खर्चास नसल्यामुळे माझ्या लोकांची उपासमार होत आहे, तर आता परवानगीची वाट न पाहाता मला निघून जाणे प्राप्त आहे.’ हा उद्धटपणाचा प्रकार पाहून शहाजीस कैद करण्याचा इरादा खानाने ठरविला. मात्र शहाजीचे कर्तृव खान ओळखून असल्यामुळे त्याने मोठी सावधगिरी ठेविली. आणि बाह्यतः त्याजवर विश्वास दाखविला. मध्यंतरीच्या काळात त्याने विजापूरास पत्रे पाठवून शहाजीला कैद करण्याविषयी आदिलशहाची परवानगी आणिली. श्रावण वद्य १ स. (ता. २५-७-१६४८) पहाटेच्या प्रहरी मंडळी निद्रित असता मुस्ताफाखानाने बाजी घोरपडे वगैरे कित्येक हिंदू व काही मुसलमान सरदार शहाजीचे गोठावर पाठवून बिछान्यातच त्यास पकडून आपल्या सानिध्य बंदोबस्तात ठेविले, आणि पुढील व्यवस्थेविषयी आदिलशहाकडून खुलासा मागविला. शहाजीजवळ त्याचा विश्वासू हस्तक कान्होजी जेधे होता त्यासही खानाने कैद करून कनकगिरीस ठेविले.

शहाजीचा बेदनुरचे स्वारीत मृत्यू (ता. २३—१—१६६४)

बेदनूरकर नाईक आदिलशहाचा ताबेदार असून त्याची हकीकत षूर्वी येऊन गेली आहे. अलीकडे तो खंडणी वगैरे पाठविना आणि स्वतंत्रपणे वागू लागला. तेव्हा त्यास वठणीस आणण्यासाठी आदिलशहाने शहाजीस लढाईचा भरपूर सरंजाम देऊन बंकापुराहून रवाना केले, शहाजी चालून गेला तेव्हा त्याजपुढे नाईकचा ईलाज चालला नाही. त्याने शरण येऊन विजापूरची ताबेदारी पत्करिली. तेव्हा बेदनूरचा कार्यभाग पुरा करुन शहाजी परत फिरला. शहाजीचा हा विजय ऐकून अदिलशहा संतुष्ट झाला. त्याने मरतबाची पत्रे, वस्त्रे, भूषणे. हत्ती, घोडे वगैरे पाठवून शहाजीचा गौरव केला, बेदनपुराहून परत येत असता आसपासच्या बखेडेखोरे ठाण्यांचा बदोबस्त करण्यासाठी तुंगभद्रा तीरी बसवापट्टणजवळ होडिकेरी (जि. शिमोगा) या गांवी त्याने मुक्काम केला. या ठिकाणी अनेक श्वापदे उठली. राजांस शिकार करण्याची इच्छा होवून घोड्यावर स्वार होवून हरणाचे पाठीस लागले. ईश्वरेच्छा त्यायोगे घोड्याचे पाय भंडोळीत अडकून घोडा व राजे एकावच्छेदे पडले. ते गतप्राण झाले. (शनिवार, माघ शु. ५ शके १५८४ ता. २३—१—१६६४) मागाहून लोक माणसे आली. त्यांनी एकोजी राजास तेथे आणिविले. एकोजी राजे यांनी उत्तरक्रिया सांग केली. आदिलशहाकडून दुख वटा येऊन मनसबदारिची वस्त्रे एकोजीचे नावे झाली. शिवाजी सुरतेच्या स्वारीहून परत आल्यावर वृत्त कळून जिजाबाईसुद्धा शोकसमुद्री पडून बहुपत विलाप केला. शहाजीराजे तुंगभद्रातीरी वारले, त्या जाग्यास छत्री इमारत मजबूद करविली. आणि पातशाही सनद घेवून यरगटनहळ्ळी गांव तेंथील खर्चास लावून दिला. तो गाव छत्रीकडे अद्याप चालत आहे.

शहाजीच्या कुटुंब विस्ताराचा विचार केला तर तो फार मोठा होता, परंतु हा शहाजीला तसा साह्यक झालेला नाही. कारण नेहमीच प्रस्थापित राज्य किंवा राजघराणे यांचे स्वामित्व मानूनच राहाण्याची सामान्य माणसांची प्रवृत्ति असते. त्यांतले त्यांत जहागिरी इनामतीत जखडलेली आर्थिक संबंधात गुंतलेली मंडळी तर क्रांतिकारक चळवळीशी सहसा सहमत होत नसतात. मात्र तत्कालीन राजकीय बंधने सामाजिक बाबतीत फारशी अडवणुकीची नसत. त्यामुळे तत्कालीन परिस्थिती फार निराळी होती.

राजकीय मतभेदामुळे कुटुंबाकुटुंबातील माणसांचे एकमेकाशी जुळलेले सामाजिक संपर्क कायमचे तुटले जात असे नाही. स्थानिक लोकांच्या अनिर्बंध खासगत प्रवासाला पूर्ण मुभा असे. त्यावेळच्या दळणवळणाच्या गैरसोयीच्या राजकारभारांत अशा तऱ्हेचे नियंत्रण लोकांवर घालणे व त्याबाबत बंदोबस्त करणे अशक्य होते. सैन्याचे घटक बरोबर असले तर शत्रुमित्रत्वाची चौकशी वाटेवरील गांवाचे मोकदम वगैरे करीत, इतरवेळी चौकशी होत नसे. इतकेच नव्हे तर शत्रूकडे असलेल्या लोकांच्या मोकदम्या. देशमुख्या वगैरे वंशपरंपरागत इनामती जप्त होत नसते. त्यां त्यां घराण्यांत किंवा घराण्यांतर्फे त्या चालत आणि वडिलकीचा हक्क सांगणारा कोणी उद्‌भवल्यास चौकशीअंती त्या त्यांचेकडे जात. सारांश, वैयक्तिक द्रोहावरुन भीतीचे स्थानिक वातावरण क्षुब्ध असल्या खेरीज शत्रूकडील सैनिकानी अगर सरदारांना आपापल्या प्रदेशांत वावरण्यास अडथळा होत नसे. अशा परिस्थितीत शाहाजीचे चुलतभाऊ व शिवाजी—संभाजीचे चुलत व चुलत—चुलत भाऊ आपल्या स्वामिनिष्ठेसाठी शाहाजी—शिवाजीशी लढतांना आढळले तर नवल कसचे ? चाकरी हा एकच त्यांच्या लढ्यामागे हेतु होता. तसेच आज एक चाकरी सोडून उद्या. शत्रूकडील दुसरी चाकरी स्वीकारली तरी त्यालाही आडकाठी होती असे नाही. परकीय इस्लामी सत्ता अशा अदलाबदलीची त्या काली फिकीरहि करीत नसते. उलट सरहद्दीवरील भांडणांत सर्वच इस्लामी सत्तांना स्थानिक लोकांचा जमाव मिळविणे इष्ट असे. इतकेच नव्हे तर शत्रूकडील जमाव शक्य तितक्या सवलती व अमिषे दाखवून तोडणे व आपला जमाव वाढविणे हा तर त्यांचा नेहमीचाच उघड प्रचार असे. सारांश, हे कुटुंबाकुटुंबातील शत्रुत्व त्यांच्या व्यक्तिविषयक कडवटपणामुळे उद्‌भवलेले असेच असे नाही. बहुतेक वेळा ते केवळ नोकरी जहागिरीसाठी स्वीकारावे लागे. कारण त्या काळी स्थानिक जनतेत एक अगर दुसऱ्या परकीय इस्लामी सत्तेचा अभिमान किंवा त्याबाबत एखादी राष्ट्रीयत्वाची भावना जागृत होती असे नाही.

वरील विवेचनावरून पहाता त्याकाळी घोरपडे व जेधे निरनिराळे सत्तेतील कांही वेळी नोकर होते तरी ते येथे ठिकाणी येऊन एकमेकाचे कुशल विचारित होते व सरंजामाबाबत चर्चा होऊन कोणास केव्हा सरंजाम होईल याची माहिती देत होते. या माहितीचा पत्रव्यवहार झालेला शिवचरित्र साहित्य खंड ५ पान १२७ व मराठ्याचे इ. साधने राजे घोरपडे घराण्याचा इतिहास पा. २४ हे प्रसिद्ध केलेल्या पुस्तकावरून पहाता सहज लक्षात येईल.

तसेच एक बंधू एका सत्ताधिशाचा नोकर व दुसरा त्याचाच बंधू दुसऱ्या सत्ताधिशाचा नोकर उ. छ. शिवाजी महाराज व त्यांचे सावत्र बंधू एकमेकाशी लढत होते.

बाप—लेकही एकमेंकाशी लढत होते. पेशवाईतील भिष्म मालोजी राजे घोरपडे मुधोळकर त्याचे पुत्र गोविंदराव असे बाप-लेकही एकमेकाशी लढत होते. शहाजीराजे यांचेविरूद्ध मंबाजी भोसले हे सखे चुलत भाऊ असून हे शहाजीशी लढले तसे मंबाजी प्रतापगडाचे मोहिमेस अफझलखानाचे बाजूने शिवाजीशी लढले तेव्हा त्यात ठार झाले. लखूजी जाधव व जावाई यांची लढाई झाली आहे. कोठे खंडाळ्याचा हत्ती प्रकरण त्या प्रकरणात नात्यागोत्याचा प्रसंग सोडून एकमेकाशी भोसले जाधव लढले. देशमुखी व सरंजामदारी

मिळविण्यास कोणीही एकमेकाशी लढत होते, तसेच पेशवाईतील नारायणराव पेशवे यांचा वध काय सांगतो ?

बा. बा. घोरपडे,
एम. एल. ए.
कौन्सिल हाल पुणे,
२०—९—५४

जा. नं. ४० / २०—९—६४

स. न. वि. वि.

आपला व माझा परिचय नसताना हे पत्र पाठवून आपलेकडून काही माहितीची अपेक्षा करित आहे.

मुधोळकर राजे घोरपडे घराण्याचा इतिहास कै. द. वि. आपटे यांनी लिहिलेला आपले वाचनात आलेला आहे. व त्या इतिहासातील ऐतिहासिक कागदपत्राचे पुरावे म्हणून राजा शहाजी छत्रपती शिवाजी वगैरे आपण प्रसिद्ध केलेल्या भागात दिलेले आहेत.

या घोरपडे घराण्याच्या अन्यत्र प्रसिद्ध झालेल्या वंशावळी व ऐतिहासिक अस्सल असे प्रसिद्ध व अप्रसिद्ध कागदपत्र तसेच इनाम कमिशनचेवेळी राजेसाहेब घोरपडे मुधोळकर यांनी दिलेल्या कैफियती व घोरपडे यांच्या अन्य ठिकाणी असलेल्या शाखा यांचेकडील कागदपत्र पहाता व प्रसिद्ध झालेला हा मुधोळकर राजे घोरपडे याचा इतिहास यात मेळ बसत नाही. पुष्कळ ठिकाणी, स्थळाचा, काळाचा व व्यक्तिंचा नामनिर्देश झालेला पाहून संशय निर्माण होत आहे. तो संशय म्हणजे कधिकाळी अस्तित्वात नसलेल्या व्यक्तिचा नामनिर्देश झालेला आहे. व अस्तित्वात असलेल्या व्यक्ति व कार्य हे दृष्टीआड केलेले दिसत आहे. तसेच बऱ्याच फर्मानाचे बाबतीत मजला संशय आहे म्हणून आपले सारखे अवल दर्जाचे इतिहास संशोधकाकडे मी आपले विचार मांडीत आहे.

तेव्हा आपण मजला मार्गदर्शन केल्यास चांगले होईल. ज्या घोरपडे, घराण्याचा इतिहास लिहिला त्यांचे एका शाखेपैकी आम्ही आहोत. असे आम्ही समजत आलो आहोत व हे समजण्यास आधारभूत पुरावाही आमचे जवळ आहे. म्हणून हा मुधोळकर राजे साहेब घोरपडे, मुधोळकर यांचे घराण्याचा इतिहास लिहिताना साधक बाधक गोष्टीचा विचार झाला असावा व निर्वीकार बुद्धीने राजे साहेबांनी इतिहासाचे साहित्य दिले नसावे असे माझे मत आहे. आपले पत्राची वाट पहात आहे.

आपला,
बा. बा. घोरपडे,

इतिहासाचार्य श्री. गो. स. सरदेसाई.
मु. पो. कामशेत, जि. पुणे.
सेंट्रल रेल्वे,

—श्री—

ता. २२ सप्टें. १९५४ पो. कामशेत, जि. पुणे.

श्री. बा. बा. घोरपडे एम. एल. ए. पुणे यांसी सादर नमस्कार विनंती, आपले पत्र तारीख २० चे घोरपडे इतिहास विषयक चर्चेचे पोचले. त्यांचा विस्तार मोठा असून अंतरंगाची वरील माहिती मला आहे. कै. मालोजीराव राजे मुधोळकर यांच्या प्रेरणेने स. १९३४ साली पुण्याच्या मा. इ. मंडळामार्फत द. वि. आपटे यांनी इतिहास प्रसिद्ध केला. त्यांचा उपयोग मी आपल्या रियासतीत फार जपून केला आहे. त्यांत आलेला पुरावा सर्व मला मान्य आहे. असे मी कोठेही सांगितलेले नाही. या इतिहासाचा मूळ पाया मालोजीराव नानासाहेब यांनी उभा केला. कांही फर्माने त्यांना नवीन उपलब्ध झाली. त्यांचा आधार घेवून आपल्या घराण्याचा इतिहास कोणी तंज्ञाने लिहावा ही त्यांची तीव्र इच्छा होती. मंडळाकडे हे काम देणेपूर्वी ते त्यांनी माझ्याकडे आणिले. त्याच्यामाझ्या पांच चार गांठी भेटी झाल्या. मी ती फर्माने पाहिली. उत्तर केले मला फारसी येत नाही. माझे मित्र सर जदुनाथ सरकार त्या भाषेचे ज्ञाते आहेत. त्यांनी ती फर्माने पाहून ऐतिहासिक सत्याचा निर्णय द्यावा. ही सूचना राजेसाहेबानी मान्य करुन ती त्यांनी जदुनाथकडे पाठविली. सुमारे एक वर्ष ती जदुनाथ जवळ होती. त्यास मध्यस्थ मी होतो. पण निश्चित मत ठरविणे जदुनाथाना अशक्य झाले. कारण इतर फारसी लेखातला प्रत्यंतर पुरावा हुडकून काढावा तेंव्हाच निर्णय देता येणार. शेपन्नास फारसी हस्त लिखीत ग्रंथ वाचून तपासणी करणे मला शक्य नाही. असे जदुनाथानी कळविले, राजेसाहेबांना निकड होती. सबब जदुनाथाने ते सर्व कागदपत्र व फोटोग्राफ परत पाठविले. पुढे ती फर्माने त्यांनी कोल्हापूरचे डॉ. बाळकृष्ण यास देवून त्यांचे मार्फत तीन चार भाग इतिहासाचे प्रसिद्ध झाले. मी व जदुनाथ दोघांनी हे काम अंगाबाहेर टाकले, त्यास आणखीन एक कारण घडले, ते असे, ही फर्माने सर्व बनावट आहेत, विजापूरच्या एका मुस्लीम मौलवीने ती मुद्दाम बनावट केलेली आहेत. अशी चर्चा बाहेर चालू झाली. आता तो मौलवी हयात नाही. अशा स्थितीत ही फर्माने बनावट मानावी की प्रमाण मानावी याचा निर्णय होवू शकला नाही. अद्यापी हा प्रश्न मुग्ध आहे. त्यांचा निकाल लावणे दुरापास्त आहे. पूर्वी ताम्रपट शिलालेख दानपत्रे शिक्के वगैरे पुरावे बनावट करण्यात आल्याचे दाखले इतिहासात विपुल आहेत. अशा स्थितीत माझ्याकडून निर्णय होणे अशक्य होते.

इतिहास असेल तसा सत्य लिहला जावा अशी माझी व जदुनाथाची तीव्र इच्छा आहे. पण आम्ही दोघेही आता उत्तरावस्थेत असून भोसले—घोरपडे इतिहास म्हणजे मराठी इतिहासाचा मुख्य गाभा खरा निर्माण व्हावा, ही आमची तिव्र इच्छा होती. तदनुसार सोंडूरचे राजेसाहेब यांनी हे काम पांच दहा वर्षापूर्वी अंगावर घेतले. त्यांस मी व जदुनाथाने थोडे बहुत मार्गदर्शनही केले. आम्ही दोघे सोंडूरातस जावून आलो. चर्चा केली दरम्यान संस्थोन विलीन होवून हे इतिहासाचे काम अपूर्ण राहिले. अलीकडच्या चार दोन वर्षात त्यांची मजल कोठवर आली ते मला माहित नाही. त्यातून येत्या चार दोन महिन्यात माझी प्रकृती त्वरेने खालवत आहे. म्हणून आंता नवीन काम अंगावर घेणे मला शक्य नाही. हे उत्तर देखील मी कष्टाने लिहित आहे. हातास कंप सुटतो म्हणून सुवाच्य लिहता येत नाही. शक्य झाल्यास आपण या विषयाचा पत्ता सोंडूरकरांकडून काढावा त्यांचे कारभारी नर्सिंगराव म्हणून होते, ते हे काम पहात ते मजकडे येथे आले होते. प्रस्तुत कोठे काय करतात मला माहित नाही.

सर्वच विषय महत्वाचा व अफाट आहे. पत्राने सर्व सांगण्याजोगा नाही. आपण सवड काढून येथे मला येवून भेटू शकला तर सर्व तपशिल व धागेदोर समक्ष सांगता येतील मुद्याच्या गोष्टी सूचल्या तशा

कळविल्या आहेत. इतिहासाचे सत्य निर्विकार मनाने तपासले गेले पाहिजे, त्यांत आग्रह नसावा हे तत्व संशोधकानी कडक पाळले पाहिजे. पुण्याच्या मंडळाने मुधोळचा इतिहास प्रसिद्ध करण्यात वरील तत्व बरोबर पाळले की, नाही हे मला सांगता येणार नाही. मला ज्या गोष्टी माहित आहेत. त्या मात्र वर सांगितल्या आहेत. वाचून आपणांस काय वाटते ते उत्तरी कळविल्यास आभारी होईल.

लोभ निरंतर असो द्यावा ही विनंती.

सही (गो. स. सरदेसाई)

शिवकालाचा इतिहास सांगताना आपण प्रामुख्याने, शिवाजी महाराजांची पराक्रमाची गाथा सांगण्यांत गढुन गेलेलो असतो, पण या कालात महाराष्ट्राच्या आर्थिक व सामाजिक जीवनात काय बदल झाले याकडे आपले फारसे लक्ष गेले नाही. व्यक्तीचा इतिहास लिहिला गेला. लोकांचा इतिहास राहून गेला. इतिहासाची क्षितीजे आजकाल फार रूंदावत चालली आहेत. मानवी जीवनाच्या विविध पैलुंचा ऐतीहासिक शोध घेण्याचा इतिहास तडस प्रयत्न करीत आहे. यासाठी अर्थशास्त्र, समाजशास्त्र, मानसशास्त्र, मानव ववशास्त्र, पुरातत्व शास्त्र, इत्यादी विविध ज्ञानशाखांची, इतिहास शाखेशी सांगड घालण्याचे प्रयत्न चालू आहेत. “लोकांचा इतिहास” अशी आजची सामाजिक गरज असल्यामुळे प्रगत देशातील इतिहासकारांनी अभ्यासाच्या पांरपारीक कल्पनाच बदलल्या आहेत. १९०५ साली लिहिलेल्या मराठ्यांच्या इतिहासाच्या साधनांच्या सहाव्या खंडाच्या प्रस्तावनेत इतिहास आचार्य राजवाडे यांनी इतिहासविषयीची केलेली शास्त्रीय चर्चा अत्यंत उद्‌बोधक आहे. इतिहास हा जगाचा विश्वाचा अथवा खंडाचा नाही, तर तो मानवाचा आहे. असा सांगून “मानवे—इतिहासाची आपली कल्पना मांडली आहे’ मानव समाजाचे आखिल चरित्र हा इतिहासाचा विषय व वर्तन क्षणाच्या पाठीमागील सवै गतकाल ही त्यांचा प्रांत अशी व्यापक दृष्टी स्विकारावी लागेल” असे त्यांनी म्हटले आहे.

इतिहास संशोधन क्षेत्रांत चाललेल्या या बदलांची दखल भारतीय इतिहासकारांनीही घेतली आहे. दिल्ली, अलिगड, पाटणा, कलकत्ता या विद्यापिठातून या नव्या दिशांच्या अनुरोधाने कांही संशोधन कार्य चालू आहे. सामाजिक शास्त्रांतील निरनिराळ्या व्यक्तींना एकत्र आणून परिसंवाद चर्चासत्रे, आयोजित करून, प्रसंगी परदेशी तज्ञांचे मार्गदर्शन घेवून भारताच्या इतिहासाच्या मांडणीत आमुलाग्र बदल घडवून आणण्याचा प्रयत्न करीत आहे.

विविध प्रकारच्या इतिहास—लेखंनास उपयुक्त अशी साधन संपत्ती महाराष्ट्रात उपलब्ध आहे. पण इतिहास संशोधनाने अद्याप जोर धरला नाही. महाराष्ट्राचा इतिहास हा भारताच्या इतिहासाचा एक अविभाज्य घटक आहे. अखिल भारतीय चळवळीशी तो कसा संलग्न आहे हे दाखवणे आवश्यक आहे.

आपल्याला इतिहास आहे, पण इतिहासकार नाहीत, ग्रॅट डफ आणि नंतर १२५ वर्षांनी झालेले रियासतकार सरदेसाई या खेरीज चटकन सांगता येण्यासारखी इतिहासकारांची नांवे दृष्टीपुढ येत नाहीत. महाराष्ट्राच्या इतिहासांवर आज महाराष्ट्राबाहेरच अधिक संशोधन होत आहे. कलकत्ता, लखनौ, राजस्थान या भारतीय आणि इंग्लंड, न्यूझीलंड, जपान, ऑस्ट्रेलिया आणि अमेरीका इत्यादी भारताबाहेरील देशांत होत आहे आणि या सर्वाना इतिहास संशोधन करण्यासाठी आपण विपुल सामुग्री पुरवत आहोत. आपले अभिलेखागार आणि संशोधन मंडळे जणू काय त्यांच्यासाठीच सिद्ध केली आहेत.

अर्थात ही सामुग्री म्हणजे राष्ट्राची संपत्ती आहे. आणि त्याचा कोणीही वापर करावा हे तत्व ठिक असले तरी प्रादेशिक इतिहासाची विशेषतः सामाजिक आर्थिक इतिहासाची साधने ज्या जाणकारपणे त्या प्रदेशातील संशोधक हाताळू शकतील तितकी इतराना नेहमीच शक्य होईल असे नाही. या संशोधनावर आधारीत ग्रंथ इंग्रजीत प्रसिद्ध होतील, आधारभूत ग्रंथ म्हणून त्याचा वापर होवू लागेल आणि आपण मात्र या लेखकांना महाराष्ट्राचे मर्म उमजले नाही अशी टिका करीत राहू. ग्रॅट डफच्या मराठ्याच्या इतिहासातील 'चुकीचे हप्ते' देण्यात एकेकाळी जसे आपण दंग होतो, तसेच आता देखिल होईल. महाराष्ट्राचा निर्दोष इतिहास जगापुढे मांडावयाचा असेल तर आपणच आपल्या प्रादेशिक इतिहास सर्व दृष्टीकोनातून परिश्रमपूर्वक संशोधन करून तयार केला पाहिजे. तसे न झाल्यास संशोधकांना कच्चा माल पुरवणारी एक वसाहत असेच आपल्या इतिहास संशोधनाचे स्वरूप राहिल.

सामाजिक, आर्थिक, इ. विषयांचा सुसंगत अभ्यास हा विशेषतः पहिल्या महायुद्धानंतरच्या काळापासून प्रामुख्याने सुरू झाला आहे. या विषयाला चालना मिळाली. ती राष्ट्रवादी आणि साम्राज्यवादी इतिहासकारांच्या विचारसरणीतील संघर्षामुळे होय. दुसऱ्या महायुद्धापासून मार्क्सच्या विचारसरणीचा, ऐतिहासीक घटनाचे विश्लेषण करण्याच्या कामी उपयोग केला जात आहे.

मध्ययुगीन भारताच्या इतिहासात १७ वे शतक हे अनेक दृष्ट्या महत्वपूर्ण आहे. मोगली सत्ता याच शतकात कळसास पोहचली आणि इतर दक्षिणी मुसलमानी राज्ये धुळीस मिळाली ती देखील याच शतकात मराठी सत्तेचा उदय व विकास याचा शतकीय नोंदवला आणि पाश्चिमात्यांनी भारतात आपली पावले टाकावयास प्रामुख्याने याच शतकात प्रारंभ केला.

अशा महत्वपूर्ण शतकात महाराष्ट्रातील जीवन कशा प्रकारचे होते ? १७ व्या शतकाच्या पूर्वार्धात महाराष्ट्र व गुजरात या देशांना अभूतपूर्व अशा दुष्काळाने ग्रासले होते. १६३० च्या भयानक दुष्काळाचे वर्णन मराठी, संस्कृत, इंग्रजी, फ्रार्सी, डच इत्यादी भाषांतील कागदपत्रांत आढळते, फॅक्टरी रेकॉर्डमधील एका नोंदीप्रमाणे या साली गुजरात ते गोवळकोंडा हा सारा प्रदेश म्हणजे एक स्मशानभूमीच बनली होती. एक डच प्रवासी म्हणतो "सर्वत्र लोकांची एकच ओरड होती, आम्हांस अन्न द्या अथवा मारा" इतकी असहाय्य उपासमार चालली होती. मोगल बादशहांना दुखः होते ते हे की, १६५३ पर्यंत दक्षिणापथापासून मोगली खजिन्यात कपर्दिकही पडली तर नाहीच पण स्थानिक कारभारातल्या खर्चापुरता देखील वसुल होत नव्हता असा उल्लेख बादशहानाम्यांत आला आहे. शिवभारतकार परमानंद म्हणतो, महागाई इतकी वाढली होती की, शेरभर सोने मोजून शेरभर कुळीत मिळत नसे. आणि माणसे माणसांना खात होती. रायदासांना या दुष्काळामुळे गाजलेले जनतेचे भेसूर चित्र आपल्या खणखणीत भाषेत उभे केले आहे.

> तथापि मार्गचि चालेना, भिक्षा मागता मिळेना
> अवघे भिकारीच जना ।, काय म्हणावे ॥
> किती येक ग्रामेचि ते ओस जाली ।
> पिके सर्व धान्ये च नाना बुडाली ॥

विसां लोकांत लोकांत येकच राहिले । तेणे उदंड उदंड दुःखचि साहिले ॥ धृ ॥
काही मिळेना मिळेना मिळेना खायाला । ठाव नाहीरे नाहीरे नाहीरे जायाला ।

इतिहास मजीरी पृ. २३—२६

संत श्रेष्ठ तुकाराम देखील या दुष्काळाच्या फेऱ्यातून सुटले नव्हते म्हणतात—

दुष्काळे आटिले द्रव्ये गेला मान । स्त्री एकी अन्न अन्न करिता मेली ॥
लज्ञा वाटे जीवा । त्रासलो या दुःखे । वेवसाय देखे । तुरी येता ॥

समकालीन लोकप्रवाह देणारी बातमी पत्रे किंवा बातम्याच्या नोंदी द्वितीय श्रेणीय ठरतात. त्यात हेतुपुरःस्सर केलेले लेखन व सहजा सहजी करण्यात आलेले उल्लेख ह्यात अप्रत्यक्ष पुराव्याचे दोन प्रकार असते तरी पहिले प्रकारच्या लेखनात आधारभूत वर्णन करण्याकडे कल राहातो म्हणून त्याचा दर्जा जरा वरचा लागतो. दुसऱ्या प्रकारातील दंतकथात मजकूराला प्रामाण्य कमी असते.

पहिल्या प्रकारात सरकारी बातमी पत्रे वगैरे तत्कालीन प्रमाणभूत लेखावरून केलेल्या सरकारी नोंदवह्या अगर शकावल्या, आत्मचरित्रे यांचा किंवा परराज्यातील कारभारी मंडळींनी मुद्दाम शोध घेऊन लिहिलेल्या बातमीत बऱ्याच दर्जाच्या माहितीचा समावेश होत असतो. त्यामुळे अशा साधनानांही अव्वल दर्जाच्या साधनाचे स्थान प्राप्त होते.

सरकारी संबंधित अधिकाऱ्याच्या पत्रव्यवहार किंवा तत्कालीन राजकीय घटनेशी संबंधित झालेल्या कुटुंबाच्या तर्फे झालेला पत्रव्यवहार, तत्कालीन जमाखर्च वगैरे सारखी प्रत्यक्ष अनुभवलेली किंवा पाहिलेली माहिती देणारे पुरावे हे अव्वल दर्जाचे किंवा प्रथम श्रेणीचे साक्षीदार होत. सारांश प्रत्येक भूतकालीन लेखी पुरावा हा त्याच्या पात्रपात्रतेप्रमाणे इतिहास लेखनास आधार भूत होऊ शकतो. छ. शिवाजी, संभाजी, राजाराम, शाहू वगैरेचा पत्रव्यवहार मराठ्यांचे इतिहास म्हणजे मराठ्यांची मनी भूमिका सांगण्यास जितकी प्रमाणभूत ठरतात तितकी मोगली बादशाही शास्त्रशुद्ध ऐतिहासिक लेखनास ज्या भूतकालिन पुराव्याचा आधार घेतला जातो, त्या पुराव्याचे गुण—वैगुण्याचा न्याय निष्ठुरतेने मुल्यमापन करून त्यातून सत्य परिस्थितीचा शोध व बोध करून घेणे आवश्यक असते. हे गुण अवगुण दोन प्रकारचे असतात. लेखकाची प्रकृती पूर्व दुषित असली किंवा विपरीत मापनेवर किंवा अपुऱ्या किंवा सदोष माहितीवर बनलेली असली तर त्याच्या लेखात वैगुण्याचा म्हणजे असत्य भूमिकेचाच अभिनिवेश झालेला असणार.

या अभिनिवेषाची माहितीची जाणीव करुन घेऊन त्या पुराव्यावर कितपत विसंबणे अथवा न विसंबणे हे ठरविणे प्राप्त प्रसंगाचा काल व लेखन काल यातील अंतर जसजसे वाढत जाते तसतशी लेखकाच्या माहितीत किंवा तपशिलाचे नोंदीत विस्मरणाचे दोष किंवा विपर्यास अधिकाधिक आढळतात. मग तो लेखक कितीही सद्भावनेने लिहिणारा असो. कोणत्याही प्रसंगाशी निगडीत असलेली व्यक्ती आपली बाजू मांडते आणि इतिहासात नेहमीच दोन पक्ष आपल्या परी सत्य भूमिकेवरूनच त्या प्रसंगाशी निगडीत झालेले असतात. याही प्रवृत्तीचा सांगोपांग विचार करावा लागतो. सहज बातमी देणारे लेखक तत्कालीन प्रवाद सांगतात. इतकेच संबंधित माणसांच्या लेखना इतके साहजिकच त्यास सत्य परिस्थिती दर्शनाचे मूल्य लक्षात नाही. हे सामान्य नियम लक्षात घेतले जाणे जरूर असते. या नियमाप्रमाणे समकालीन व उत्तर कालीन बखरी किंवा हकिकती तृतीय श्रेणीय दर्जाचे पुरावे ठरतात.

— बाबुराव बाळासाहेब घोरपडे

मराठ्यांचे इतिहासाची साधने- राजे घोरपडे देशमुख, यांचे प्रसिद्ध कागद

संदर्भ ग्रंथ : भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे त्रैमासिके,
राजवाडे इतिहास संशोधक मंडळ वगैरे.

१) शिवभारत कविंद्र परमानंद.
२) शिवकालिन पत्रसार संग्रह.
खंड १, खंड २, खंड ३.
३) शिवचरित्र साहित्य खंड ८ भा.इ.स. मंडळ, पुणे.
४) शिवाजी विद्यापिठामधील महाराष्ट्र इतिहास परिषद अधिवेशन ४ मुधोळचे राजे घोरपडे यांचा इतिहास व चुकीची फर्माने.
५) मुंबई गव्हमेंट रेकार्ड मेमायर ऑफ दि स्टेट सार्वमन्न मराठा कंट्री.
६) सातारा ग्याझिटियर.
७) महाराष्ट्र इतिहास परिषद अधिवेशन चवथे कोल्हापूर.
८) मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय भारतीय इतिहास व संस्कृती मंडळाने पुरस्कृत केलेले जुलै व सप्टेंबर १९८१ चे अंक.
९) भा. इ. सं. मंडळ माडळे– घोरपडे.
१०) भा. इ. स. मंडळ पुणे खानापूर घोरपडे.
११) भा. इ. स. मंडळ, पुणे खानापूर घोरपडे फारसी फर्माने
१२) मुधोळ घोरपडे घराण्याचा इतिहास.
१३) स्पेशल दिवाणी मुकदमा नं. ३–४३ सातारा. यातील साक्ष वंशावळ व गुदरलेले अस्सल सनदा पत्रे (लेखक बा. बा. राजे घोरपडे, नांदगाव)
१४) ऐतिहासिक घराण्यांच्या वंशावळी गो. सं. सरदेसाई.
१५) दि. मु. नं. ३-४३ या दाव्यात श्री. बाबुराव घोरपडे यांनी दिलेली मुधोळकर घोरपडे यांची इनाम कमिशनचेवेळी गुदरलेली वंशावळ. ही पहाता सन १९३४ साली मुधोळर राजे घोरपडे, यांनी इतिहासात दिलेल्या वंशावळीचा मेळ नाही.
१६) बहादूरवाडीकर घोरपडे.
अष्टेकर घोरपडे.
मुधोळकर मातोजी घोरपडे.
व माने वगैरेचे झालेले दावे.
इ. स.
१७) मालोजीराजे घोरपडे. पेशवाईतील भीष्म.– यानी वाजोजी घोरपडे हे माझे चुलत चुलते आहेत.
१८) बाबुराव घोरपडे यांनी सरकारी परवानगी घेऊन एलिएनेशन ऑफिसमध्ये केलेले संशोधन सुमारे १५० पाने त्याच्या हुकूम घेतलेल्या नकला.
१९) सनदा पत्रे पारसनीस
२०) कोल्हापूर ग्याझिटियर.
२१) रियासतकार सरदेसाई


२२) अ. रा. कुलकर्णी एम. ए. जी. एच. डी. डे. कॉलेज, पुणे, यांचा लेख इतिहास परिषद अधिवेशन चवर्थ शिवाजी विद्यापिठ कोल्हापूर.

२३) श्री.बा. बा. राजे घोरपडे, नांदगांव, ता. सातारा यांना इतिहास परिषद अधिवेशन ४ थे यात प्रसिद्ध केलेले कागद.


२४) प्रा. भिमराव कुलकर्णी यांनी चिटणीस बखरी बद्दल लिहिलेले विधान.



बाजीराजे घोरपडे




नावजी उर्फ महालोजी घोरपडे



राजे घोरपडे देशमुख यांचे गढीचा दर्शनी भाग १




गढी आतील दरवाजाचा भाग २



देशमुख गावे यादी भाग ४




गढीची उंची दर्शविणारा भाग ४



गढी भाग ३



गढी भाग ५



बहादुरवाडीकर राजे घोरपडे देशमुख
गढी भाग १ चौफेर खदक

१९ खानापूर – घोरपडे

(श्री. द. वि. आपटे व श्री. ग. ह. खरे)

हे कागद कोठून आले ते इतरत्र (ऐतिहासिक फारसी साहित्य खंड १ पृ. ६४) सांगितले आहे. पुढील कागद आम्ही दोघांनी तपासून निवडून काढले आहेत.

ले. ७१८ **श. १५४७ आषाढ वद्य ४**

भू. दा. प. **इ. १६२५ जुलै, १३**

श्री

(डाव्या अंगास पड्दळी शिक्का व त्यावर 'व चिनोजी' ही अक्षरे ○)

श्री सभुदेवाचे अण असे.

○ [१] द कौळूनामा राजेश्री घारराऊ (व) चिनोजी राजे देसमूख पा॥ फलेटण ता॥ राजेश्री खंडोजी राजे व राजेश्री बाजीराजे घोरपडे [पहा ऐतिहासिक फारसी साहित्य खं. १ ले. ४८] मोकदम मौजे कापसी पा॥ मजकूर सु॥ सीत इसरैन अलफ कारणे दिल्हा कौळूनामा यैसा जे मौजे मजकुरीचे पटेलगी पेसजी तुमचे वडील चालवीत होते हाली दरम्याने बोबडे हरकत करून पटेलगी चालवितात म्हणैउनू तरी बोबडे गैर मिरासी त्यासी दूर करूनू तुमचे पटेलगी तुम्हासी दिल्हे असे तुम्ही मौजे मजकुरी रेयेत लोकासी तकवा दिलदारी देउनू किर्दी मामुरी करूनू सुखे असणे यासी अनसारिखे असे तरी श्री.–_ _ _ _ _ हा कौळू सही.

तेरीख १७ माहे सौवाल

---

१ पहा शि. च. प्र. जेथे शकावली पृ. २२

ले. ७१९		श. १५४७ आश्विन शु. २
मू. द. प.		इ. १६२५ सप्टेंबर २३

" द (आरंभी बदामी शि.)

आज रख्तखाने मसुर (ल) आनाम राजेश्री कोबाजी राजे खडाडे दाम वजारतहू ता हुदैदारानी व मोकदमानी व रयानी मोजे कापसी पा फलेटण बिदानद सु सीत इसरीन आलफ खंडोजी वा बाजी घोरपडे पटेल मौजे मजकूर माळूम केले जे आपणासी मौजे मजकुरी इनाम ता पटेलगी चावर नीम आसे आपण दिवाण नफराई सचणी रचणी किर्दमामुरी करावया तकसीर करीत नाही तरी साहेबी सदरहू खेरीज ज्याजती चावर " देखील मला मऱ्हामती केलिया खातीरजमासी साहेबाचे नफराई किर्दी मामुरी करून बराये माहुमाती पटेलानी खातिरेसी आणुनू इनाम जमीन चावर येक १ बीा

कदीम चावर "

ज्याजती मऱ्हामती चावर "
मला बिधे वीस जिराती
२० –ा १०

येणेप्रमाणे जमीन सदरहू देखील मला माहासूल वा नख्तयाती वाजे बाजे उजा हाती कुलबाब कुलकानूसी दिले असे दुमाला करून दस्तीबाद कीजे तालीक लेहून घेऊनू आसल परतौनू दीजे या इनामस मुसलमान होऊन इस्कल करील तरी त्यासी सोराचे सोगद वा हिदू होऊन कुसूर करील त्यासी गाईचे अण असे पिढी दर पिढी लेकुराचे लेकुरी चालबीजे मोा

तेरीख १ माहे
मोहरम.

१) पहा ऐतिहासिक फारसी साहित्य खं. १ ले ३

ले ७२०	श्री	श. १५५० आषाढ शु. ३
मू दा. प.		इ. १६२८ जून २४

(आरंभी चौ. शि. व समासात 'रवा सूद' ही अक्षरे)

आज रख्तखाने मा हा राजश्री मुधोजी वणगोजी नाईक खलद अयाम दौलतह ता विठोजी घोरपडा मोकदम व प्रजा मौजे कापसी पा फलटण बिदानद सा सन तिसा इशरीन आलफ पा मजकुर

हजरत आलम पन्हा साहेबी आम्हास मुकासा मऱ्हामत केला आहे. तुम्ही कोणे बाबे ताळूक आदेसा न करिता कवीहाल होउनु किर्दी मामुरी करून सुख आसणे पा मजकुरीचे देसमुखीचा फरमानही आमचा आला आहे तुम्हास लागले ढेपेचा कौळू आसे दर निसबत विलाती किर्दी मामुरी करावयासि तक्सीर न करणे (नि) मोर्तब (ब. मो.)

(पाठीवर) तेरीख २ जिलकादा माहे जिल्हाद

ले ७२१		श. १५५० आश्विन शुद्ध २
मू. दा. प	श्री.	इ. १६२८ सप्टेंबर २०

महजर बतेरीख छ १ माहे सफर हाजीर मजासी
कारकून कारकिर्दी खान आजम अंबरखान साहेबू दाम दौलतहू

बा कौलू शाहासाहेबू

सिदो मुकुंद ठाणेदार	ळाहामाजी गोविंद मजमूदार
(बदामी शिक्का)	
नरसो गोमाजी सबनिवीस	

देसक

मधोजी वणगोजी नाईक देशमूख	गोमाजि पदमनिमी व आतो माहादेऊ देसकुलकरणी
(चौकोनी शिक्का)	
दर्याजि बेलदर गौड मोकदम मौजे सागवी	आकूसराऊ मोकदम मौजे तरडगांव
बाबजि पटेल मोकदम कसबे (नांगराचे चिन्ह)	बलगोजी मोकदम मौजे हिंगणगाव
मालजि व विटोजी मोकदम मौजे गिरवी	तान्हाजी निंबालकर मोकदम मौजे वाटार
जाऊजी खताळ मोकदम मौजे कापडगांव	नाऊजी मोकदम मौजे कोरेगांव
कमलोजी झंझाण मोकदम मौजे सासवड	
(नांगराचे चित्र)	

हे मुख्य करून पा फलेटण सुा तिसा इसरैन आलफ कारणे जाहाळा महजर यैंसा जें बीा खंडोजी व बाजी बिन जाऊजी घोरपडे मोकदम मौजे कापसी पा मजकूर हुजूर येउनू मालूम केले कीं मौजे मजकुरीचे पटेलगी आमच्या वडील वडिळांची मिरासी पिढी दर पिढी चालिळे आहे दरम्याने बोबडे गैरमिरासी थोडक दिवस दखल जाहाळे होते मग आपण दर साल सन सीत आशरैन आलफ पा मजकूर अमानत करून हजरत दिवाणीचे माहाव्दार कमाविसेस आळा होता ते वख्ती अपण जाउनू माहाव्दार मा व देसाई यापासि आहवाल मालूम केळेवरी त्याणी हमशाई मोकदम व सेटिये माहाजन कसबे मजकर व देसक बोलाउनू दरी बाबा तफवासि घेतळे देसकाने गोही दिधले की यांची पटेलगी हे सही बोबडे गैरमिरासी त्यांसी निसबत नाही यावरून मौजे मजकुरीची पटेलगी आपळे दुमाळे केले त्यावरून आपण दिवाण नफराई करून आहो हाली जाबती सनतल मजकुरासी पा मजकूर साहबासी मुकासा आर्जानी जाहाळा ठाणाहून महजर मऱ्हामत केळा पाहिजे म्हणउनू तरी सदरहू माळुमाती खातिसी आणौनु ये बाबेची तफवासी होता यांचे मिरासी पटेलगी होये यैंसे तहकीक जाहाळे बोबडे गैरमिरासी त्यासि पटेलगीस निसबत नाही मग तुम्हासी मिरासी पटेलगी देउनू महजर करून दिल्हा आसे ळेंकरांचे ळेंकरी पटेलगी खाउनू सुखे आसणे हा महजर सही (ष. शि.)

शिवचरित्र साहित्य ११ खंड

ले. १ सु. १०३२	१०६	श. १५५३ पौष वद्य ४
जखर १८ (१)	**विट्ठलदेव पंढरपूर**	इ. स. १६३२ जानेवारी १

(आरंभी डाव्या बाजूस समासात चौ. फा सि. खंडोजी बिन नावजी घोरपडे असा मजकूर)

र्द अजरक्तखाने मशरूल अनाम राजेश्री खंडोजी राजे घोरपडे दाम दौलतहू ता हूदेदारानी व मोकादमानी मौजे कालिखे पा कराहाड बिदानद सुा इसने सलासीन अलफ मौजे मजकुरा जमिन येकऱ्यावर १ दरसवाद दरको राजश्री (मो. जा) तालुका विठ्ठल भट बडिये बाा फर्मान दोा माहासूल व नक्त यानी व बाजे इजाहाती भट मजकुराचे दुबाला केले आसे बाा भोगवटा तसाफात पहून दुमाला की जे हरसाला खुर्दखताचे उजूरनकिजे तातीक लिहून घेऊन असल परतून दीजे (मो) तेरीख १८ (१) माहे जमादिलाखर पोा मौजे सिरटे

ले ४८ सु. १०४४		**१५६७ श्रावण शु. ८**
	फा. शि	
हि १०५४ जखर ७		**ह. स. १६४५ ऑगष्ट १**

बादशहा ---- कान्होजी जेधे

ज्या अर्थी शहाजी भोसले दरबारांतून निर्वासित झाला आहे व त्याचा मुतालिक दादाजी कोंडदेव कोंडाण्याच्या बाजूस आहे (त्या अर्थी त्यास) वपेन करण्यासाठी व ती विलायत ताब्यांत आणण्यासाठी खंडोजी व बाजी घोरपडे यास तुमच्यासह नेमिले आहे तरी तुम्ही आपल्या हशमासह मशारनिल्हे जवळ जाऊन त्यांच्या संमतीने दादाजी कोंडदेव व त्या हरामखोराचे संबंधी याना शिक्षा देऊन नेस्तनाबुध करा व ती विलायत ताब्यात आणा ते तुमच्या उत्कर्षाचे कारण आहे.

ता. ७ जमादिलाखर हि. १०५४.

४८ माडळे घोरपडे

(श्री. शं. ना. जोशी)

पुढील पत्रात खंडोजी राजे व बाजी घोरपडे ह्या दोघांनी अंबाजी राजे यास श. १५६८ (स. १६४६) मध्ये सकलकोटे येथे वाई परगण्यापैकी शिरो ढोणा येथील पाटलिकीचे वडीलपण दिल्हे तो मजकूर आहे. तसेच ह्या वडीलपणाचा कह म्हणून ६० बिघे जमीन आणि पटीपछोडी गाउट मोट वेठबेगार इ. इतर मानपान व उत्पन्नाच्या कुलबाबीहि दिल्याचे सांगितले आहे. मात्र ह्या वडीलकीचे काम म्हणून कोणी दावा दरफडा केला किंवा दिवाणदरबारातून एखादा अमल जाहला तर त्यावेळी साहाय्य करावयाचे ही अट घातली आहे. हा ह्या कागदातील मुख्य भाग होय.

ह्या पत्रावर फारसी दोन व मराठी एक असे तीन शिक्के आहेत. पत्र लिहून देणारे जे दोघे त्यापैकी एकाचा शिक्का मराठी आहे व तो बाजी घोरपड्याचा हे त्यातील कांही अक्षरे वाचता आली त्यावरून कळते तसेच आदिलशाही हेही बाजीचे विशेषण त्यास लाविलेले त्याच शिक्यात दिसते.

ले. ९२०	श्री	**श. १५६८ कातीक शु १ गुरु.**
मू. दा. प.		**इ. १६४६ ऑक्टोंबर २९**

श्रीसखे १५६८ व्या या स्वसर कार्तिक सुध पाडिवा वार गुरुवार ते दिसी राजश्री आबाजी राजे गोसावी यासि राजेश्री खंडोजी राजे वा बाजी राजे घोरपडे यानि लेहून दिल्हे यैसेजे सु॥ सबा अरबैन अलफ मा॥ सकलकोटे लेहून दिल्हे जे तुम्हास वडीलपणे पाटिलगी मौजे शिरोढणा पा॥ वाई दिल्हे आसे यासि तुम्हास वडीलपणासी दि (ल्हे) हक

इनाम चावरे नीम. ॥.

हकलाजिमा पटीपछेडी वा गावड मोट
वेठी बेगारी कुलबाबा दिल्हे आसे

मौजे मजकुरी आम्ही इनामपैकी बिघे .॥. देऊनू वा सैत कीर्दी उभयता दोघे .॥. करून वरचील वडीलपण कुलबाबा तुमचे दुबाला केले आसे लेकरांचे लेकरी खाउनु मुख असणे यासी दावा दरफडा वा दिवाणमुल हरयक अमल जाहली यकास एक मदती होवा हे लिहिले सही यासी जे वडिली केले मोडील त्यासि कासीचे आण आसे वा आपले बैतालिसाचे आण आसे हे सही सीत सणीच बागा वा मौजे माडाला बागा तकूप आसे हे लिहिले सही

(दोन फारसी व मध्य चौकोनी मुद्रा)
ता. २९ माहे रमजानु
(चौकटी शिक्का—० ० १ श्री रामत्री . . . २ ही बाजी आबा ३ जी घोरपडे ४ आदिल शाही)

शिवाजी महाराजांच्या पूर्वजांची सनदपत्रे

(पान नं. १०५ ते १०६) इ. स. १६४९

८ मोरेश्वर गोसावी यांस मिळालेली सनद

"आजरष्टखाने राजश्री शिवाजी राजे दामदौलत हूं बजानेब कारकुनानी हाल व इस्तकबाल व देशमुखानी परगणे सुपे, बिदानंद सुरूसन खमसैन अलफ. बेशमी राजश्री मोरेश्वर गोसावी क्षेत्र मोरेश्वरी हुजूर येऊन मालूम केले जे, आपणास इनामाबद्दल, धर्मादाउ दरसवाद मौजे पणदरे, परगणेमजकूर, जमीन गजशरायनी चावर, १ एक एकूण कास रूक्का १ एक कीर्द काळी पोलीजाप्रेज गोपाजी धनगर मुंजेरी, मौजे मजकूर स्थळ शेतपैकीं देणेबद्दल फर्मान हुमानयू व **खंडोजी राजे व बाजी राजे घोरपडे बेशमी खर्द (इ. स. १६४४) सन खमस आर्बेन अलफ.** देव महसूल व नख्तयाती व सैलबैल व सरदेशमुखपट्टी व मोइनी सादिलवार व पाडेवरी व हक्कदार व खर्चपट्टी व पायपोसी व बाबेजम व शेटी व तेजीपट्टी व मोहीमपट्टी व हेलेकट्टी, वाजंत्रीपट्टी व कुलकानू नकदी व जिनसी व कलमी व कदमी व इस्मी व रस्मी व तूप व कडबा व गल्ला व खरीफ व रबी व वेटो व बेगारी व फर्मायसी व आवजेवा कुलबाब व कुलकानू तर्फ ठाणे व तर्फ देहाय दिधले आहे., तेणेंप्रमाणे ता (गाइत सा) ल गुदस्त चालिले आहे. हल्ली मौजे मजकूर महाराजांसी मुकासां अर्जानीं जाला आहे. महाली खुर्द खाताच उजूर करिताती. तरी सदरहू इनाम म–हमती करून खुर्दखत देविले पाहिजे. म्हणोन मालूम जाले. तरी राजश्री मोरेश्वर गोसावी, क्षेत्र मोरेश्वर यांसी इनामबद्दल धर्मादाऊ दरसवाद मौजे मजकूर जमीन कीर्दकाळी पोलीज चावर गजशरायेनी १ एकूण कास रूक्के १ प्रेज गोपाजी धनगर मुंजेरी, मौजे मजकूर स्थळ शेतपैकीं देखील महसूल व नकदीयाती व सैलबैल व सदर देशमुखपट्टी व मोइनी सादिलवार व हक्कदार व पाडेवरी खर्चपट्टी व पायपोसी व तेजीपट्टी व शेटी व मोहीमपटी व हेलेकटी व जेंगीपटी व नकदी व जिनसी व कलमीं व कदमी व इस्मी व रस्मी व साइरे कानुजाती व ऐनजिन्नस गल्ला खरीफ व रबीतगारा जे हिस्सा व तूप व कडबा व वेटी व बेगारी व फर्मासी व आवाजेवा व तर्फ ठाणें व तर्फ देहाय कुलबाब, कुलकानू दिधले असे. तेणेप्रमाणे तागाईत सालगुदस्ता चालिले आहे. तेणेप्रमाणे मऱ्हामती केले असे. तुम्ही दुमाले करणे. कारकिर्द माजी पिलरती करितो, भोगवटा सारा जाला नसला, तरी त्याचा उजूर न करणे. हल्ली मौजे मजकूर आलेती, यांस सालाबाद कीर्दी लागवण जसें होत जाईल, तेणेंप्रमाणें यांची कासकिर्द रुक्का १ एक त्यावरी मौजे मजकुरी जे खंडणी होत जाईल व सदरहू पट्टीयाची तक्षीम व हाल व पेस्तर (साल) हिस्सा नक्त ठाणें व नक्त देहाय होत जाती याची तक्षीम पडिलें पान जे येईल, ते हुजूरुन दुमालें केले असे. तुम्ही कुलदुमा ले करणे व तूप कडबा व गल्ला खरीफ व रबी तगटराजे हिस्सा जो येईल तो सालाबाद दुमाले करणें.वेटो, बेगारी, फुर्मासी, आवाजेवा, बाजे, पडीझडी कुल हुजूरुन रोज श्रीचे दुमाले केले असे. तुमची दुपाले करणे मौजे मजकुरी आज आहे. बाबवग्ग गुरावरी पाळ करून उगवणी करितो त्याचे, तक्षीमीयाचे प्रजेच्या गुरावरी जे यईल ते हुजूरून याचे दुमाले केलें असे.तुम्हीं दुमाले करणें. दर दरसाल ताज्या खुर्दखताचा उजूर न कीजे. औलाद व अफलाद चालवीजे. तालिक घेऊन आसली फिराऊन देणे. सदरहू इनामास हिंदु होऊन एस्कील करील. त्यास गाय मारिल्याची शपथ असे. व मुसलमान होऊन जो इस्कील करील. त्यास आपल्या मसजेबाची बुरी सौगंद असे. सदरहूप्रमाणे होणे हरएक तजवीज लागो न दीजे. पेस्तर खुर्दखताचा उजूर न कीजे. याची प्रजेसी मुकासा कांही निसबती नाहीं. मोर्तबसुद."

शिवकालीन पत्रसार संग्रह

(५७२)

शि. प्र. पृ. १०० ते २३	खुर्द खत फा. मु. सी	रा. १५७१ कार्तिक व, १
सु. १०५० जिल्हाद १५		इ. १६४९ नोवे. १०

रा. खंडोजी राजे घोरपडे रा. नारो रुद्र हवाले तपेवाळवे

संपुपट उपाध्ये यास नागनाथाचे अभिषेकाबद्दल १ होन पुर्वीप्रमाणे चालविणे.

मराठ्यांचे इतिहासाची साधने

सदानंद

खंड १५ **१५७९ भाद्रपद वा ा १०**

लेखांक ९५ **इ. स. १६५०**

छ. अजरख्तखाने मा अनाम राजश्री अंबाजीराजे घोरपडेसाहेब दामदौलतहू ता हुदेदारानी हाल व इसाकबाल व मोहदमा नि चिंचणेर किले ताथोडे बिदानद सुा समान खमसैन व अलफ दरवडा बदल धर्मादाउ कमलनयन गिरी सन्यासी मठुमुकाम मौजे नींब पा वाई या सि गहू कैली ा पाच कुढी देविते असे आदा कीजे पेस्तर साल दरसाल देत जाणे दर हरसाला ताजा खर्द खताचे उजुर न करणे तातीक ते हून घेऊन असल परतोन देणे प्रो ा (सिक्का)

तेरीख २३ माहे जिल्हेज

ले. ७३	(२)	श. १५७४
मू न. प.	श्री.	इ.१६५२

(शर्तनामा स्वस्तिश्री नृपशालिवान शके १५७४ नंदननाम सवत्सरे सुरुर सन अर्बा समसैन अलफ कारणे राजश्री बाजी राजे व अंबाजी नाउजी राजे घोरपडे गोसावी यासि स्नेहपूर्वक माहाराज राजश्री शहाजी राजे भोसले जोहार लेहून दिल्हे शर्तनामा ऐसा जे तुम्हा आम्हा) मध्ये काही कुसूर पडिला होता त्या निमित्य हजरती आलम पन्हा साहेबी आपणा हुजूर येक करुन परस्परे समाधान केले तेसमई हाजरती साहेब बोलिले जे तुम्ही परस्परे एकएकास आपले तर्फेने तश्रीफ आपले मिरासी वतन देणे त्यावरुन तुमचा कुसूर तुटोन बेकुसूर पादशाही कामावरी साबीत आसणे त्यावरी पेसजी तुम्हास परगणे त्रिनामलचे देशमुखी मिरासी आजराम—हामत करून दिल्ही होती होन चक्रे हजार ६००० साहा हजार ते तुम्ही आम्हास मिरासी देशमुखी करून दिल्ही आम्ही तुम्हास आपली मिरासी देशमुखी व सरदेशमुखी पा कऱ्हाड देशमुखी व सरदेशमुखीपैकी देहे २२ बावीस बी तपसील

का शेलगाऊ देहे ११ याचा हक व इनाम

ता पाली तुमचा मुकासा देहे ११ याचा हक्क व ईनाम

येकून हक व इनाम बेरीज

नक्त—हक होन पातशाही

१५८ ाा—ता पाली देहे ११

१२३ ता शेलगाऊ देहे ११ ा

२८२

ईनाम मावगना चावर वीर चावर

२०

याखेरीज मोहतर्फा शेव धार व पाने व गुऱ्हालास गूळ व बरूरे व

(अपूर्ण)

शक १५७४ म्हणजे सुहूरसन (सुरूर नव्हे) १०५२ रबिलावल ३०, ते. सु. स. १०५३ रबिलाखर २८ पर्यंत पण येथे हा सन १०५४ दिला आहे. अर्थात तो चूक आहे.


मराठ्यांचे इतिहासाची साधने

लेखांक— २६० खंड १५

छ सकल गुण संपन्न गुरु सेवनी तत्पर सदाचार श्री. कमल नयन गोसावी मठाधिपती मुक्काम मौजे निंब पा. वाई गोसावी या प्रती प्रीतोपुर्वक बाजीराजे घोरपडे दंडवत विनंती उपरी गोसावी कृपा करुन पत्रिका पाठविल पावोन परम विश्रांती जाहली उडतरेच्या इनामाचे विशी लिहिले तरी राा गंगाजीराम पंडिता सव

मेलगिरी हुदेदारास ताकीद ते हून पाठविली असे गलव नख्त घेऊन येऊन अतीत मुखे सार्थक करणे बहुत लिहिणे तरी तुम्हा निरापेक्षित असा कृपणा दुणाविजे हे विनंती.

राम बाजींराउ जी घोरपडे (शिक्का)



बाजीराजे व शहाजीराजे यांच्यात झालेला तहनामा

ले ९२१ | **श. १५७६ वैशाख शु॥ ७ गुरुवार**

मू. दा. प. | **इ. १६५४ एप्रिल १३**

(फार्सी दोन शिक्के कांही नांवे व ८० ओळी फारसी मजकूर)
माहाजर बतैरीख छ ५ माहे जमादिलाखर बिहुजूर हाजीर मजालसी

कारकुनानी

मिया अजम मिया
दौलत माब क
———

नागोजी लाहामाजी
पडित मजमूदार
अलीखान नसरखान
सरनौबत

मोहदीनखान
निघावान
मीरो माणकेश्वर स—
मो॥ कांरेगाऊ

—— जी येमाजी
खासनीस

(दशदळी फा. शि.)
रायाजी नामाजी
हशबनिवीस

(वर्तूंशकृतीं फा. शि.)
तुकोजी कासी मजमूदार
शाहा अ———
नगर राजे है बदल

कबुखान
——— खान

शामाई सोना
मिया
सैख

सोन सेटी सेटीया

अमृतराऊ व पद—व अबाजी पेठ कालवट
मोजा बाणरकरी चौधरी व विठोजी
नांगर पा॥ पाटण स
माहाजन (तराजू)

येसाजी येल्हो पारसनीस

कृष्णाजी मुद्रल
चिटणीस

हुदेदार कसबा

हुदेदार मौजे
भाडिले

विठल सि—
वाजी निसिदे
(फा. गोल मु. दा.)

येल्होजी विश्नाथ बाजी दाऊद हुदेदार
निसिदा मा॥ पोता सामराज नरसिंह

(फा. वा. शि.)

सरगु—हे॥ व नाईकवाडी व देसाई

व देसकुलकर्णी

गुसर—हे व नाईकवाडी
अतसखान बु—हानगोरी
सरगु—हे दिमत सरगु—हे
हुजुरदारानी लस्करी

देसाई व देसकुलकर्णी व
सेटिये माहाजन
केशवजी नाईक देसाई पा पा
लिगोजी सबदेऊ व दतो लाहामाजी देसकलकर्णी

(फा. पिं. पा. शि)

श्री
केशवजी बि
न दताजी

है मुख करुन समस्त पा वाई स्वस्तिश्री शके १५७६ जये नाम संवछरे वैशाख सुध सप्तमी ब्रहस्पतवार मुहूर सन आर्बा खमसैन अलफ -- जाहाला माहाजर यैसा जे बा खंडोजी राजे व अंबाजी राजे बिन जाऊजी राजे घोरपडे मोकदम मौजे भाडिले सा कोरेगाऊ पा मजकूरू यानी ठाणियात येऊन मालुम केले जे मौजे (मजकुराचे) पटेलगी आपल (वडिल) वडिलाचे मिरासी आपले वडील पणजे कान्होजी व नालजी व येकोजी व सोमा चौघे भाऊ या मधे नालजीस देवाज्ञा जाहाली कान्होजी व येकोजी व सोमाजी हे तिघे भाऊ भाडिलाचे पटेलगी करीत होते मौजे मजकूरी दिडे म्हणौउनू कुणबी होते त्यास पटेलगीच मुतालिकेस ठेउनू तिघे भाऊ चाकरीस गेले तेथे कान्होजी दुखणे पडोन मौजे मजकुरास येउनू देवाज्ञा जाहाले त्यावरी येकोजी व सोमाजी हे दोघे चाकरी टाकून पटेलगीस अले दिडे मुतालिकास दूर करून येकोजी बेकुसूर पटेलगी करीत होता, त्यावरी ठाकूर घोरपडा निजामशाही याणे पहिले मखदुम खोजे जाहा बराबरी हे तर्फेस आला होता त्याने रूस्तुमखानापासी सरदारकीस चाकरी राहोन मौजे मजकूर मोकासा घेतला मोकासा खात असता ठाकराचे भावास दिडिंयाची मुली करून सोइरीक केली सोइरिके करिता दिंडियाचे पाठि राखून येकोजीस व त्याचे चुलतभाऊ दसजीस पातेजोन मारिले दिंडीयासी पटेलगी दिल्हे त्यावरी ठाकूर दता भाऊ मयत जाहले त्यावरी पा मजकूर खुरसिदखानास मुकासा जाहाला. त्यापासी ठाकुराचे लेक---- सरदारकीस चाकरीस राहून मौजे मजकूर मोकासा घेऊनु खात होता त्यावरी सोमाजी धाकटा भाऊ होता त्यांनी दिंडीयासी मारा----बदल माहालोजी नाईकाचा लेक नागमल घोरपडा खाने अजम यापासी सरकारकी करीत होता त्यापासी जाऊन त्यासी बोलणे केले की आपण दिंडियास मारीन तुम्ही आपले पाठीराखे होणे आपणास चौघ राऊत मदत देणे अपण दिंडियास मारीन आपली पटेलगी अपण घेउनू तुम्हास पाठी राखावयाबद्दल जमीन सेत बिघे १५ यासी इनामपैकी बिघे ५ व पालक बिघे १० व-- घाणेचे तेल व सेवधार इतुके चालउनु यैसा नेम करून पा मजकुरी सोमाजी आसता दिंडे बाप व लेक दोघे ठाणे यासी रसद घेउनु अले रसद देउनु फिरोन मौजे मजकुरास जात नागमलाचे चौघ राऊत घेउनु वाटेस दिंडे यास मारिले पा मजकुरी (-पा (व) लो फिराऊन सोमाजी बाहिर असता ठाणा---पाठउनू ठाणियास नेले पटेलगीची तश्रीफ देऊनु सेरणी होन येक्से १०० बाधले ते कबूल करुन मौजे मजकुरास यऊन पटेलगीस बादजीस देउनु आपण पैकियाचे ततबिरेस जाउनू होनु ६० साठी उसूल केला बाकी होनु ४० उरले होते त्यावरी खात्रेने अजम विजापूरास स्वार जाहले ते वख्ती सदरहू पैकियावरी छूट दराता हुजरुन केली या पैकियाबद्दल ठाणेदार येऊन बादजीस तगादा लाविला पैकी निमलेत मग बादजीस वरातदारी ठाणे यासी घेउनू गेले ठाणे मधे हवालदार--बोलिले की यास काये बदल आणिले म्हणौउनू अंबाजी सरदारास जमान घेउनू पैके याचे निघेबद्दल गावास पाठविले बादजी गावास येउनू कुणबियाचे समाधान केले की

आपले वडील येकोजीचा गला (?) मुकास्यावरी मुड आहे त्यामधे मंजरा होईल मुक्सायाचे हकामधे होन ४० सीस्त करून देणे म्हणौउनू कुणबीयांचे दिलासा करून सीस्त करून घेतले तो अंबाजी (कासी) गावासी आले तो है खबर मुकासाई यास कलले त्यावरी (मुकासी) याने बादजीस दस्त केला का आमचे हकामधे पैकी सीस्त करून घेवया काये निसबत म्हणौउनु बादजीवरी गदर करून गर्दन मारीत होते इतुकियामधे गांवलोकी मिलोन गुल केले की पाटिलांचे गला तुम्हावरी मुंड असोन उफराटे त्याचे गर्दन मारिता हे कोण इनसाफ यैसे बोलता मग अदबखाना घातले तेथून बादजी पलोन खोजेचे वाडीस गेला त्यावरी सोमाजी बेमक्सर दा–मफलीस परागंदा होऊन बाहेर होता मग नागमलाचे लेक ––– ठाकुराचे लेक अंबाजी व राजोजी व दत्ताजी व जाउजी व कृष्णाजी ––– यानी पटेलगी दो ठायी वाटून खाऊ लागले त्यावरी आपले –– क कान्होजी त्याचा लेक पदमोजी तोही थोड्याच दिवसामधे मयत जाहाला त्याचा लेक जाउजी आपले बाप मौजे मजकुरास येऊन आपले मिरासीचे जागा म्हणउनु सेतवाडी कुणबावा करून होता त्यास लेक साहाजण बितपसील––

नेगोजी	विठोजी	तुकोजी	खंडोजी	बाजी	अंबाजी
१	१	१	१	१	१

यामध्ये नेगोजी व तुकोजी हे दोघे भाऊ पहिलेच मयत जाहाल होते त्यावरी अम्ही चउघे भाऊ विठोजी राजे व खंडोजी राजे व बाजी राजे व अंबाजी राजे यैसे दिवाणीचे चाकरी करू लागले यावरी पैसजी राजे अंबाजी रुस्तुमे जमा साहेबास परगणे मजकूर मोकासा असता त्या पासी सदरहू अहवाल मालूम केले त्यावरी खाने अजमखान साहेबी माहालास खुर्दखत दिल्हे ते वस्ती शंकाजी दतो हवालदार होता त्यानी ठाकुराचे निसबती उखाई होती तेचा नागमलाचे लेक भिऊजी त्याचे लेक नागोजी निमे पटेलगी करीत होता त्यास ठाणियामधे तलब करून आणून सदरहू अमलाची बाजी पुसी करिता नागोजी मजकूराने गोही दिल्हे की ठाकुरानी याचे पटेलगी बले गेतली पटेलगी याचे वडील सोमाजी चालवित होता त्यावरी अंबाजी मोकासाइयाने सोमाजीस परागदा करून पटेलगी बले घेतली आहे आपण व आपले वडील याचे पाठीराखे मिरासी यांचे वडिलाचे होये अपले वडिलास ठाकुराचे मुलाने (तिन वरी) (स) पटेलगीस दखल होऊ दिल्हे नाही त्यावरी आपले बाप हिंदूजीने निमे पटेलगी घेतली हाली आपले इमान राखोन आपला जीऊ आहे तो निमे पटेलगी चालवितील तरी बरवे नाही तरी सारी पटेलगी याचे वडिलावडिलाचे मिरासी होये म्हणौउनू गोही दिल्हे यावरून शंकराजी दतो हवालदार व गंगाजी नाईक देसाई पा मा – गावगना पटेल व हक जवार गोत याचे मनास आले ते मिरासी –– चे नव्हे उखाईस पटेलगीस निसबत नाही पटेलगी मिरासी विठोजी व खंडोजी व बाजी व आंबाजी राजे घोरपडे यांचे वडीलवडीलाची होये उखाई ठाकूराचे निसबतीची तीस पटेलगी समध नाही यैसे जाहाले यावरुन उखाईस दूर करुन ठाकुराचे तरफ निमे अपले दुमाले केले व नागोजीचे तरफनिमे याचे तबदील बाकी नागोजी जिवंत आहे तोवरी नागोजीने खावे पेश्तर नागोजी मयेत जाहालियावरी तो सहज निपुत्रिक आहे तेही तरफ याचे –– करितील यैसे बालोन ते वख्ती निमे तरफ अपले दुमाले केले तेणेप्रमाणे आमचे व नागोजीचे चालत असता नागोजी मजकूर मयत जाहला त्यावरी सदरहू अमल हजरतो खाते अजम–– साहेबाचे बंदगीस मालूम करुन माहालास खुर्दखत आणिले व तेरीख छ ९ माहे रमजान पैा छ १० मोहरम सादीर जाहाले तेथे रजा जे बजारातमाब ––– घोरपडे याचे हेजीब हुजूर मालूम केले जे मौजे भाडले सा कोरेगांव तेथील पटेलगी आपले वडिलवडिलाची मिरासी दरम्याने नागोजी घोरपडे याचे वडिलास निमे पटेलगी देऊन आपले पाठी राखावया ठेविले होते तेणेप्रमाणे त्याचे व आमचे आजी पावेतो चालत आले हाली नागोजी घोरपडा मयेत जाहाला त्यास सतान नाही निपुत्रिक त्याने माहलोजी पालक (बेटा) पालिक आहे, तो कांही अपुले जातीगोताचा नव्हे तो रोहिडेकर जगदेराऊ त्याचे

बटकीचा त्यास पटेलगी लाभत नाही तरी साहेबी जनर यनायेत करून आपले पटेलगी आपले दुमाले करावया रजा होये म्हणौऊनू बराये मालुमाती खातिरेस आणून सहरहू निमे पटेलगी राजे मा॥ इलेची दुमाले केली आहे दुमाले कीजे माहलोजीचा मुतालिक असेल त्यास जमान घेऊन पेस्तर हिला हरकती न करी यैसे करणे फिर्याद येऊ नेदणे तालिक लेहून घेऊन असल फिराऊन दीजे म्हणऊन रजा रजे बा॥ माहालोजीचा मुतालिक आतोजी पवार व विसो बाबाजी कुलकर्णी तरफ नागोजी, यास ठाणेमधे तलब करून अणून सदरहू अमलाची वाजीपुसी करिता यानी तकरीर लेहून दिल्हे की पटेलगी खंडोजी राजे व अंबाजी राजे घोरपडे यांचे वडीलवडिलाची मिरासी होये दरम्याने नागोजी पटेलाचे वडिलास पाठी राखावया बदल निमे पटेलगी दिल्हे होते यैसे नागोजी जिवत असता बोलत होता तेणप्रमाणे आजीवरी चालत आले हाली नागोजी पटेल मयेत जाहाला तो निप्त्रिक यास सतान नाही त्याने पालक बेटा माहालोजी पालिक तो कांही जातीगोतीचा नव्हे अगर नागोजीचे भाऊबंद दाईज गौत्रजाचा घेतला नाही तो रोहिडेकर जगदेराऊ याचे बटकीचा त्याचे माये व बहीण पैसे तिघेजण आणिली होती त्यामध्ये माहालोजीस पालिले होते त्यास पटेलगी लाभत नाही म्हणऊन तकररीर लेहून दिल्हे याचे मोकाबला पाहाता नागोजी मजकुराचे दाईज गोत्रज व गावीचे गावलोक व बाराबलुते यास गोही मोकाबला पुसता सदरहु अमल खरा म्हणौऊन ठाणे मधे आर्दास लेहून पाठविले व यक –––– रोहिडेकर बिराजर जगदेराऊ रोहिडेकर तो सिरनामजाद आहे तो जुझाखान ठाणदार त्या बराबर –– दार अफजलनगरास माईणीचे जात्रेचे कीचाटा बदल आला होता यास पुसता त्याने गोही दिल्हे की आपले भाऊ जगदेराऊ त्या पासी नागोजीने बटीक घेऊन गेला तिचा फर्जद माहालोजी हे सही व ते जागा पा॥ मजकुरीचे विलायेतीचे पटेल होते त्यास ही गोही मोकाबला पुसता तेही सदरहू अमल खरा म्हणौऊन गोही दिल्हे त्यावरून सदरहू अमल सही यैसे समस्त मजालसी याचे मनात आले यावरून मौजे भाडिले सा॥ कोरगाऊ पा॥ मा॥ तेथील पटेलगी सारी याचे मिरासी सही यावरून सारी पटेलगी मौजे मजकुरीचे तुमचे दबाले केले असे मौजे मजकुराचे सारी पटेलगी तुम्ही लेकुरांचे लेकुरी चालऊन पटेलगीचा हकलाजीमा व इनाम व सेवधार व माहार व पटीपछोडी व तश्रीफ व गाऊड मोट व पालक व इनामामध्ये बर्दरख्ता झाड झाडोन जे काय असेल ते व मोहतरफीयाचे हक व बाजाराचे हक पसकी उकाला व बाजे हक पटेलगीच बा॥ भोगवटा मोजीब प्रमाणे खाउन लेकुराचे लेकुरी सारी पटेलगी चालऊन सुखे असिजे मोर्तब. (षट्‌कोनी फारसीमुद्रा.)

शहाजी महाराज कैद इ. स. २५–७–१६४८

(कावेरी पत्तनाच्या) जगदेवाने शरण येऊन, प्रणाम करुन साची (शाहाजीची) सत्ता पुण्याप्रमाणे मस्तकावर धारण केली. मदुरेचा अजिंक्य राजासुद्धा ह्यांच्या आज्ञेत वागू लागला. म्हैसूरच्या राजानेही ह्याचा ताबा मान्य केला. दुष्ट रणदुल्लाखानाने बलात्काराने घेतलेल्या आपल्या सिंहासनावर वीरभद्र हा शहाजीच्या आश्रयाने पुनः बसला. निरनिराळ्याप्रसंगी निरनिराळ्या मसलती योजणाऱ्या चतुर शाहाजीच्या पभावाने पुष्कळांनी यवनांची भीति टाकली. दुसऱ्यास अतिशय दुःसह असणारा रणदुल्लाखान स्वमिकार्य शाहाजीराजाच्या सल्लामलतीने करु लागला. पुढे सेनापति रणदुल्लाखान कालवश झाल्यावर कर्नाटकातील राजांना ताबडतोब आपल्या ताब्यात आणण्यासाठी ज्या ज्या सेनापतीस आदिलशाहाने तिकडे पाठविले तो तो सेनापति त्याचे इष्टकार्य सिद्धीस नेण्यासाठी शाहाजीच्या तंत्राने वागू लागला. तेव्हा अनीचीचा आश्रय करणाऱ्या त्या इब्राहिम आदिलशाहाच्या पुत्राने (महमूद शहाने) घमेंडीने भोसलेराजास कैद करण्याची मुस्तुफाखानास आज्ञा केली. सेनापतिपद प्राप्त झालेला, आदिलशहाच्या विश्वासातला नमटरुपी वृक्षाचे आगर असलेल्या खुरासान प्रांताचा अर्क महामानी, थोर कुळातला प्रख्यात मुस्तफाखान हा अनेक सरदारासह येत आहे. असे एकून आपला त्याच्यावर विश्वास नसताहि तो आहे असे दाखवून शाहाजी राजा आपल्या सैन्यासह लगबगीने त्यास सामोरा गेला. त्यावेळेस मुस्तफाखानाच्या तळाजवळच बलाढ्य शाहाजीराजे यांनीही आपल्या सेनेचा तळ दिला. छिद्रान्वेषी मुस्तफाखान जेव्हा पाही तेव्हा तेव्हा त्यास शाहाजी राजा अगदी सज्ज आढळे. पुढे त्या राजनितिनिपुण सेनापतीने समस्त सेनानायकास आणवून एकांतात भाषण केले. आपण सर्वचजण सध्या त्यांच्या पूर्ण ताब्यात आहोत. तेव्हा सर्व मिळून महमुदाच्या हितासाठी झटु या. आपला मानी धनी महंमूदशहा याने शाहाजीस कैद करा असा आज निरोप पाठवून मला कळविले आहे. ते काम आम्ही स्वहित-साधकांनी बलाढ्य शाहाजीराजा भोसला जो जागा झाला नाही तोच केले पाहिजे.

ही आजची रात्र उलटल्यानंतर मोठ्या पहाटेस आपापल्या सैनिकासह एकत्र होऊन त्या राजास पकडा. याप्रमाणे त्या मुस्तफाखानाने सेनानायकास कार्यसिद्धीस नेण्यास सांगितल्यावर ते आपापल्या शिबिरास गेले. ज्यांच्याशी मध्यरात्रीच्यावेळी मुस्तफाखानाने फारवेळ मसलत केली ते सेनानायक आपापल्या शिबिरात सज्ज होऊन राहिले आहेत असे हेरांनी येऊन सांगितले. तरी ते ऐकूनहि अतिशय बलाढ्य शाहाजी राजाने दुर्दैवामुळे तत्कालोचित गोष्ट केली नाही.

अशावेळी (अरुणोदयापुर्वी) दिलावरखान, मसृदान, सरजा याकुबखान, अंबरखान, अदवनीचा राजा वर्णपूरचा राजा, फरादखान व खैरातखान हे दोघे, त्याप्रमाणेच याकुतखान, आजमखान व बहलोलखान मानी मालिह रैहान खान, राघव संबाजी वेदोजी मास्कर आणि हैबत राजाचा पुत्र महाबलवान बल्लाळ, असे तिघे मदोन्मत्त ब्राह्मण सरदार, सिधोजी आणि मंबाजी पवार, मंबाजी भोसला आणि निरनिराळ्या कुळातले दुसरेहि सरदार युद्धाची खुमखुम अंगात चढल्यामुळे मोठमोठी आयुधे धारण करून आपल्या पताकांच्या गर्दीने आकाश जणू काय कांपवीत, घोड्यांच्या खुरांच्या अग्रांनी पृथ्वीचा जणू काय चुरा करीत, आपल्या तेजोराशीनी सकल त्रिभुवनास जणू काय जाळून टाकीत, प्रबल सैन्याच्या योगाने जणू काय सभोवती तट बांधीत अग्नीप्रमाणे तेजस्वी आणि यमाप्रमाणे निर्भय असे ते (सरदार) मुस्तुफाखानाच्या आज्ञेवरुन शाहाजी राजाच्या शिबिरास वेढा देते झाले. इकडे शाहाजीच्या शिबिरात हत्तीवर हौदे चढविले नव्हते. घोड्यावर खोगिरे घातली नव्हती. सैनिकांची पथके सज्ज नव्हती. नायक (सेनापती) निजून उठले

नव्हते. रात्रीच्या जागरणाने अतिशय ग्लानी आल्यामुळे पाहरेकरी निद्रित होते. यामुळे नाना प्रकारच्या भीतीने ग्रस्त होऊन त्या शिबिरात एकच गोंधळ उडाला. सागराप्रमाणे गर्जना करणाऱ्या त्या सैन्याच्या पिछाडीचे सर्व बाजूनी संरक्षण सेनापती मुस्तुफाखान स्वतः करीत होते. नंतर खंडोजी, मंबाजी, मानाजी हे बंधू, तसेच इतर सरदार आणि तलवारी धनुष्ये, भाले, बंदुका आणि चक्रे ही धारण करणारे सैनिक ज्याच्या भोवती आहेत, असा घोर कृत्ये करणारा महाबाहु बाजराज घोरपडे, जणू दुसरा वडवानलच असा यशवंतराव वाडवे, पवार—कुलाचे भूषण मालोजी राजा, विख्यात तुळोजी राजा भोसले असे ते सर्व बलिष्ठ सरदार आपण बसलेल्या घोड्यांच्या खुरांनी पृथ्वीचे चूर्ण करीत शाहाजीच्या शिबिरात शिरले. . . शत्रु आलेले ऐकून जागा होताच स्वतः सज्ज होत होत शहाजीने “सज्ज व्हा ।” असा सर्व सैनिकांस जोराने हुकुम सोडला. . .

. . . महाबाहु व महाबलाढ्य असा शाहाजी राजा सज्ज होत आहे आणि त्याचे मोठे सैन्य आकस्मिक भयाने ग्रस्त झाले आहे. (गोंधळून गेले आहे) इतक्यात प्रत्येक युद्धात सिंहाप्रमाणे अकुंठितगति असा खंडोजी पाटील हा एकटाच घोरपड्यांवर चालून गेला. . हल्ला करणाऱ्या शत्रुसमुहाच्या शेकडो तीक्ष्ण शस्त्रांचे प्रहार होऊन ज्याचे कवच भग्न झाले होते अशा त्या (खंडोजी) पाटलाने शत्रुरुपी हत्ती परतविले. शत्रुनी सोडलेल्या बाणांनी जखमी झालेला व रक्ताने भिजलेला तो (खंडोजी) मंगळाप्रमाणे शोभू लागला. . . तेंव्हा खंडोजी पाटलाने यमदंडाप्रमाणे भयंकर अशा तरवारीने बाजराज घोरपड्याच्या छातीवर वार केला. विशाल छातीवर केलेल्या त्याजोराच्या प्रहारामुळे महाबाहु बाजराज घोरपड्यास मुर्च्छा आली असता, अंबाजीने भयंकर परिघ (लोखंडी काटे असलेला सोटा) मानाजीने मुद्‌गल, मालोजीने अग्नीच्या ज्वाळेसारखी काळी शक्ति, बाळाजीने अप्रतिम भाला, जसवंताने बाण आणि खंडोजीने खड्‌ग (तरवार) अशी शस्त्रे त्या खंडोजी पाटलाच्या अंगावर फेकली . . . कार्तिकस्वामीच्या तीक्ष्ण शक्तीने क्रौंच पर्वत जसा पडला तसा बाजराजाच्या गदेने छिन्न होऊन तो उत्कृष्ट योद्धा खंडोजी पाटील स्वर्गवासी झाला. तेव्हा मार खाणाऱ्या शत्रुसैन्याकडून स्वतःचे सैन्य अतिविव्हळ झाले असता, शिरस्त्राण घट्ट बांधलेले, पटक्याचा शेंबला सोडलेले, ढाल घेतलेले, चिलखत घातलेले, धिप्पाड, उत्कृष्ठ धनुर्धर, भाला फेकण्यात व पट्टा खेळण्यात निष्णात असे युद्धकुशल महाबाहु शाहाजी महाराज जसा मेघावर मेघ आरूढ होतो, त्याप्रमाणे एका मोठ्या घोड्यावर स्वार होऊन बाजराज घोरपड्यास ठार करण्याच्या इच्छेने एकदम त्याच्यावर चालून गेले. दहाही दिशा जिंकणारा गवळ्यांचा राजा दसोजी, धनुष्यबाण धारण करणारा योगाजी मांडकर, संताजी गुंजावटकर, मेघाजी ठाकूर, बंधु त्र्यंबकराज आणि गर्विष्ठ दसराज यांनी व दुसऱ्याहि शेकडो सरदारांनी व पुष्कळ पृष्ठरक्षकांनी चोहोकडून शाहाजी राजाचे रक्षण केले . . . शस्त्रे उगारलेल्या शत्रूस आपल्या सभोवती पाहून शाहाजी राजाने सिंहाप्रमाणे गर्जना करून पृथ्वी व आकाश ही दणाणून सोडली . . . मस्त हत्तीचे ओरडणे जसे मस्त हस्तीस सहन होत नाही त्याप्रमाणेच बाजराज घोरपड्यास शाहाजी राजाची गर्जना सहन झाली नाही. तेव्हा विजेच्या भयंकर कडकडाटाप्रमाणे गर्जना करुन जवळ येऊन, आपली नावे पुकारुन लखलखीत व सुंदर ढाल धारण केलेले, कवच घातलेले, युद्धकुशल अशा घोरपडे सरदारांनी मेघ जसे चंद्रास वेष्टितात, त्याप्रमाणे पूर्णपणे पक्का गराडा दिला (घेरले) तेव्हा त्र्यंबकराज व दसराज, दसाजी व कार्तिकस्वामीप्रमाणे तेजस्वी महाबाहु मेघाजी व गुंजवटकरादि दुसऱ्याहि वीरांनी शाहाजी राजाचे रक्षण करण्याच्या इच्छेने शत्रूकडील योद्ध्यावर हल्ला केला त्यासमयी धनुर्धारी त्र्रूयंबकराजाबरोबर मानाजी, दुष्टास जिंकणाऱ्या दत्तराजा बरोबर खंडोजी शत्रुवीरास जिंकणाऱ्या योगाजीबरोबर मालोजी, त्याजप्रमाणे इंद्रजिततुल्य मेघाजीबरोबर अंबाजी आणि शाहाजीराजाबरोबर पराक्रमी बाजराज आणि दुसऱ्या पुष्कळ दीर्घबाहु वीरांबरोबर दुसरे पुष्कळ वीर लढू लागले . . . खंडोजी राजाने दत्तराजाचे हात तोडले. अहो, त्र्यंबक राजासुद्धा मानाजीराजाने जिंकले, त्याचप्रमाणे अंबाजीने केलेल्या प्रहारानी भयभीत झालेला मेघाजी

मागे हटला. दसाजीनेसुद्धा पळ काढला. अगस्तिमुनीनी प्यालेल्या समुद्राप्रमाणे इतरहि आपले सैन्य भयाकुल होऊन नष्ट झाले, त्याचप्रमाणे मालोजीच्या बाणांनी मांडकर त्रस्त झाला, अशी स्थिती पाहून शाहाजी राजाने बाजराज घोरपड्यावर आपल्या तीक्ष्ण बाणांचा वर्षाव केला, परंतु पराक्रमी बाजराज, त्या अत्यंत तीक्ष्ण आणि वेगवान बाणांच्या वर्षावानी छिन्नभिन्न झाला असताहि मूर्छित झाला नाही. नंतर त्या समयी चकाकणारे कवच घातलेल्या शाहाजीराजास पाहून त्याच्या छातीवर (बाजराजाने) आपल्या भाल्याने प्रहार केला. युद्धविद्येत कुशल आणि वज्राला सुद्धा ज्यांचे शरीर अभेद्य होते असा तो शाहाजी राजा त्या भाल्याच्या प्रहाराने व्यथित झाला नाही . . . बाजराजाचे रक्षण करणाऱ्या मानाजी प्रभृति योद्ध्यानी पराक्रमी शाहाजी राजास वेढले. तेथे प्रलयाग्नीच्या ज्वाळाप्रमाणे प्रखर अशा बाणांनी त्या सर्वास प्रतापी (शाहाजी) राजानं त्रस्त करून सोडले . . . झटकन घोड्यावरून उडी मारून गरूडाप्रमाणे झडप घालणाऱ्या, बाणानी विद्ध अशा शरिरातून वाहाणाऱ्या रक्ताने लाल झालेल्या फार लढल्यामुळे झालेल्या परिश्रमाने मुर्च्छा आलेल्या महाबाहू शाहाजी महाराजानी भूमीस आलिंगन दिले असता (भूमीवर पडले असता) शत्रु मंडळ गर्जना करू लागले व दंड थोपटू लागले आणि इकडे भोसल्यांच्या सैन्यात मोठा हाहाकार उडाला. तेथे धर्मराजाप्रमाणे शोभणारा धर्मनिष्ठ, धैर्यवान लोकांचे जणू काय सर्वस्व, सर्वांचाच आधार दुर्दैवाने आकाशातून पडलेल्या तेजस्वी सुर्याप्रमाणे मुर्च्छा येऊन भूमीवर पडलेल्या अशा त्या शाहाजी महाराजाचे बलाढ्य बाळाजीने वेगाने घोड्यावरून उडी मारून बंधुभाव दाखवून आपल्या ढालीने रक्षण केले. तेव्हा गारुडी जसा फुसफुसणाऱ्या नागास पकडतो, त्याप्रमाणे निश्वास टाकणाऱ्या महाबाहु शाहाजीराजास बाजराजाने स्वतः कैद केले. मग ज्यास मुर्च्छा आली आहे, ज्याचे तोंड सुकले आहे, ज्याचे डोळे मिटले आहेत, ज्यास कपटपटू, दुष्ट, मुस्तुफाखानाने फसविले अशा शहाजी महाराजास पकडून आणून पिंजऱ्यात (कोठडीत) घातलेल्या सिंहाप्रमाणे हत्तीवर घालून शत्रु घेऊन चाललेले पाहून लोक अतिशय आक्रोश करु लागले. ज्या मुस्तफाखानाने आपल्या कपटरुपी पटाने (वस्त्रान) शाहाजीराजास झाकून टाकले तो शहाजी सर्व कांही जाणणारा असूनहि त्यास तो कावा समजला नाही. असे आम्हास वाटते. स्वामिकार्येच्छु मुस्तुफाखानाने शाहाजीस विश्वास पटावा म्हणून आपला मुलगा आतशखान याची शपथ घेतली व आपले कुराण उल्लंघिले म्हणुन जनता त्या यवनाची सर्वत्र निंदा करु लागली, परंतू तो स्वामिकार्येच्छू मात्र कृतार्थ झाला. खोगीर नाही, घोडा नाही, हत्ती नाही, उंट नाही. आयुध नाही, योद्धा ही नाही, शस्त्र नाही, शस्त्रधारीहि नाही. वाद्य नाही, वाजंत्रीहि नाही, पलंग नाही, छतही नाही, पताका नाही, ध्वजही नाही, विक्रीची वस्तु नाही, विकणाराहि नाही, सर्पण नाही, मेखहि नाही, कनात नाही, तंबुही नाही अशी क्षणार्धात शाहाजीराजाच्या शिबिराची अवस्था झाली. प्रलयकालच्या अग्नीप्रमाणे प्रखर आणि यमाप्रमाणे क्रूर अशा त्या मुस्तफा खानप्रभृति सरदारानी इंद्राप्रमाणे पराक्रमी अशा त्या अभिमानी शाहाजीराजास युद्धात पक्के कैद केले आहे असे आपल्या दूतांकडून ऐकून महंमूद आदिलशाहास आनंद झाला. ५८

पहा शिवमा, अ. १०, श्लो. १–२, २४–२९, ४२–४३, पृ ८५–९१.

शिवमा, अ. ११, श्लो. ४–११, १६–१८, २१–२, २९, ३५–३९ व ४९, पृ. ९२–९८

शिवमा, अ. १२, श्लो. ४–१३, १५–२०, २२. २४–५, ३९–४०, ४४–४७, ५२–५९, ६३. ६५–७२, ८७–९३, ९५–६, १०३–११९, पृ. ९९–११३

ले. ७२२ मू. दा. प.	(समासात फा. चौ. शि.)	श. १५७६ माघ वद्य १२ इ. १६५५ फेब्रुवारी २३

द सहावायु चिरजीव सदासुखीभव राजमान्य राजश्री रवलोजी राजे ता तुकोजी राजे घोरपडे यासि राजश्री अंबाजी राजे घोरपडे आसीर्वाद येथील क्षेम ता छ ११ माहे रबिलाखर जाणौनू तुम्ही अपले क्षेम लिहाव्या लेखिकास निरोप देणे उपरि बहु दिवस जाले परत कागदीपत्री परामृष घेतले नाही याकरिता आतःकरण समाधान होत नाही आता येणार मनुस्यासमवेत आपले कुलश पाठउनू अमचेही परामृष घेणे यानंतर मागे माडलेचे पाटिलगी तरफ नागोजी पाटील ते अमचे वडीलवडीलाचे मिरासी बहुत दिवस सायास करिता गतवषी ते तरफ अमचे दुबाला करून घेतले ठाणेचे कौल माहजर करुन घेतले ठाणेचे मांहजरास होन २०० पडिले ते तेच वख्ती कर्जवाम करून व्याज कलतरे पैके दिल्हे कौल माहजर घेतले त्यावरी नागोजी पाटिलाचा फर्जद माहालोजी खाते अजम फतेखानाचे सरदारकी करितो त्याने खाने अजमास फिर्यादी करून त्या पाटिलगीनिमित्य तपे वालवेचे देसमुखी आमानत केले साल गु पासुन साल मा ता सलक माह जिल्हेज आमानत होते सेवड सामंदडभेद करुन कासी तमाजी पडित हेजिब खाने अजम याचे विदमाने खान साहेबाचे समजावीस बहुताप्रकारे करुन सला केला त्यास हो न ६०० पडले तेही मधवा नाईक घुणकी पासी चौरोतराप्रमाणे कालतरे काढून पैके दिल्हे त्यापैकी याचे तकसीम तरी रा बाजीराजे नेदीत हे भाडलेचे पाटिलगी निमित्य पडले म्हणौनू राजे गोसावी म्हणताती (रव) ळोजी राजे व विठोजी राजे व येमाजी (?) राजे यैसे तिघे (व) र्गानी द्यावे यैसियासी पहिले तुम्हास लिहिले होते की द्रव्य तिसरे तकसीम जे हिसेब होत असेल ते पाठवणे त्यावरी तुम्ही जाब लिहिले की मातुश्री गगाई— पाठवितो ती बराबरी पैकेही पाठवितो म्हणौनु लिहिले होते आजीवरी वाट पाहिले परंतु पाठविले नाही जरी तुम्हास मिरासीचे वास्ता आसेल तरी यैन भाडलेचे पाटिलगीस पडले होन २०० व माडलेचे पाटिलगीनिमित्य वालवेचे देसमुखी आमानत केले होते त्याबद्दल पडले हो न ६०० येकून हो न ८०० याचे तिसरे तकसीम तुमचे वाटेस जे येईल ते हिसेबी पैकी पाठउनू देणे याबद्दल मुमरद बाबान माहालदार पाठविले आसे त्या बराबरी दोघ विस्वासू देउनू पैके पदरी बाघोन अम्हापासी पाठवणे ज्याचे रीण घेतले आहे ते पकियाबद्दल आकांत करीत आहेती पैकी तूर्त पाठविणे व गगाई पाटिलणीसही तूर्त माडलेस पाठवणे तेथै जितरबास काण्ही दिक नाही तुम्ही उमयेता बंधू परमुलकास जाउनू तेथे समाधाने असत नाही यावरुन काय लिहावे उभयेता बधुमधे फूट दाखविलिया दुसरा माणूस फितवा करावया पैस करितो तुम्ही जवली आसतेस तरी उभयेतासी सागोन विवेक राहाटी करवितो आम्ही — दस्त आहो तुम्ही उभयेता बंधू बहूत समाधाने सौजन्ये आसिलिया लोकोतर किर्ती वाढेल भूषणही होईल आता कागद पावलियावरी मिरासी पाहिजे यैसे आसेल तरीच पैके हिसेची द्रव्य पाठविजे जर तुम्हासी मिरासीचे जरूर नसेल तरी तैसेच लेहून पाठविजे जो पैका नेदी त्याचे तकसीमेचे मिरासी राजेश्री बाजीराजे यास तकसीम देउनू पैके घेउनू ------- वाटा मागताती याचे उत्तर बहूत सीघ्र पाठविजे येविसी बहु लिहिणे नलगे हे आसीर्वाद (ष मो)

छ २५ रबिलाखर सुग खमस खमसेन

ल. ७२३		श.
मू. दा. प.		इ. १६५५

द सुजायेता व इजता असारी वजारत दस्तगहा राऊ आजं रविस्लोजी राजे घोरपडे राईज अन्हा ऊकी पहिले तुम्हासी कौळ मरहामत करुनू पाठविले होते त्यावरी तुम्ही उंमाजी पंतासांघाते सागुनू पाठविले की आणखी फिरंगी व तुरा देणे व फरजंदानीमधे जमा करुनू सांभालणे व अपण आडोर रहणे येकी—खल देवे व अमचे भाऊ तुकोजी राजेसी येकसेहे घोडेसी मोकररु करुनू त्यासी मोकासा व बहुमान घोडे व तश्रीफ व सिरनावसीची तिनी सेहे होनू देणे म्हणोनू तरी तैसेची कौल मरहामत केले असे तुम्ही सांगितले प्रकारीने चालउनू कोण बाबे अदेशा न करणे सिताबीने यणे तुमचे भाऊसी समाधान करुनू सांघाते घेउनू येइजे (मजकुराच्या डाव्या अंगास समासात वाटोळा फारसी शिक्का).

ले. ७२४		श.
मू. दा. प.	श्री	इ.

(समासात मध्येच चौ. फ. शि.)

र्द चिरजीव गगांसमान बिंबाई ता निराईस प्रती अबाजी राजे घोरपडे आसिर्वाद येथील क्षेम ता छ १७ माहे रजब जाणौनू तुम्ही अपले क्षेम लिहिले पाहिजे उपरि बहुत दिवस जाले पर कागदीपत्री समाचार पाठविले नाही या करिता समाधान वाटत नाही आता तरी येणार समवेत मिनवान समाचार लेहून पाठविजे अम्ही कुणबिणीबदल आगा मियाजी बराबरी होन पचेवीस पाठविले आसे त्याचे कुणबिणी बऱ्या नीटस गोरिया जातिवंत पाहून चौघी पाच जणी घेऊन पाठविणे तुमचे मुकासे पावेतो दोघ स्वार देउनू पाठवणे तेथोन अमचे मुकामासे पावेतो पावितील येविसी बहुत लिहिणे नलगे हे आसीर्वाद तुमच्या सना आसतील त्यास लहानथोरास आमच्या आसीर्वाद सागणे बहुत शाहाणपणे असणे.

दा चिरजीव निराई बाईस आसीर्वाद तुमचे माता अपले तकसीमेचे पटेलगी नेरलियाची तुम्हास दिल्हे आहे तुम्हास येक दोनी वेला बोलाविले परंत तुम्ही आला नाही तिचे भेटी तुम्हास नव्हेती तुमची मातेस देवज्ञा होऊनू पाच सा महिने जाहाले तुम्हास समाचार कलला आसेल की नसेल ते न कले तुम्हास कलावे म्हणौनू लिहिले आहे मरत काली माहातारी आवाधियासी बोलली कि अपली तकसीम अपले लेकीचे लेकास दिल्ही आहे यास कोणही खलल आगर कुसूर करावया निसबत नाही आगर अपली फर्जद व मुरसाल त्यासही निसबत नाही यैसे बोलोन सीव जाली तरी तुम्ही धाकटा मूल सागाते घेउनू येणे अमची भेटी होईल प पाटिलगीचेही विल्हे होईल ये विसी बहुत लिहिण नलगे हे आसीर्वाद (षा. मो.)

ले. ७२५ | श्री | श.

मू. दा. प. | | इ.

(समासांत मध्येच चौ. फा. शि.)

" द सहस्त्रायु चिरंजीव विजईभव राजमान्य राजेश्री नेगोजी व मुकुंदजी व विठोजी व लखोजी घोरपडे गोसावी यासी प्रीतीपूर्वक संताजी (खंडोजीचा मुलगा) राजे घोरपडे अनेक आसीर्वाद येथील क्षेम जाणौऊन तुम्ही अपले क्षेम समाचार लिहले पाहिजे याउपरी तुम्ही कागद पाठविले होते ते उतम समई पाऊन बहुत संतोष पावतो लिहिला अभिप्राऊ कलो आला बहुत काही स्नेह उतरे लिहले त्यावरुन अमृतपान केले सारिखे जाहले लिहिले की पटेलगीचे तकसीम होत असे ते वेलेस अपले स्मरण असो देणे म्हणौऊन तरी तुम्हा विरहित काही होणार नाही जे वेलेस तकसीम होईल ते वेळे तुमचेही तकसीमेचे विले होईल त्या प्रा लिहून पाठऊन व मातुश्री फुंइजी आवास ठाणेचे तसवीस होत असे म्हणौऊन खबर आइकतो त्या बाबे कारकुनास खाने अजमाचे ताकीद कारविली पाहिजे म्हणौऊन तरी अम्ही येथे असता काही घडणार नाही हाली खाने अजमाचे पेसजी सारिखे येक मुखे चालत नाही हर येक गोस्टी -- अमचे वर्तमा ––– पन्हा बा वेगळूर तरफेस गेलो होतो तेथून फजलित पन्हा शाहरास आलेवरी अंम्ही चिरजीव खंडोजी (तानाजीचा मुलगा खंडोजी) व ब्रह्मजीचे वऱ्हाड मारुन हाली शाहरास येउन येक महिना जाहला कलले पाहिजे. विशेष लिहिणे नलगे घडी घडी अपले सविस्तर वर्तमान लिहून पाठवित गेले पाहिजे हे आसीवाद (ष. मो.)

–– सौभाग्यवती निराबाईस व बिबाबाईस अनेक आसीर्वाद.

ले. ७२६		श.
मू. दा. प.		इ.
	(पाठीवर राजारामाचा गोल शिक्का)	

अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य

प्रती राजश्री राजाराम छत्रपती - उपरि तुम्ही या देवाब्राम्हणाच्या राज्याची आभिवृद्धी करावी आपला नामोश करून घ्यावा या गोष्टीची उमेद धरिली आहे म्हणवून कितेक वर्तमान रा शामजी चिंतामणी यानी विदित केले त्यावरून बहुत संतोष वाटला याहून उत्तम काय हे राज्य तुम्हा लोकांचे आहे भागानगर प्रांतीचा राज्यधिप

(सदरचे पत्र कृष्णाजी अंबाजी अगर हणमंतराव कृष्णाजीस उद्देशून आहे.)

त्याचा कार्यभाग राजश्री प्रल्हाद पंडित प्रतिनिधी याचे स्वाधीन करून त्या प्रांतास रा आनंद गंभीरराऊ सरसुबेदार यास नामजाद पाठविले आहे यैसियास तुम्ही कोणे गोष्टीविसी शंका न धरिता यास सामील होऊन कार्येसिधी करणे आगर (जमावसहित) येथे आलिया तुमचे आतिशयसी ऊर्जित होईल यामधें तुम्हास आनकूल ते गोष्टी करणे तुम्ही आमच्या राज्यामधे आलियानंतर तुम्हास हत्फहजारी दौलत द्यावयाचा निर्वाहा केला आहे तुमचे गोमटे करून चालवायाचेविसी सहसा आतराये होणार नाही येविसी अपले समाधान आसो दीजे कितेक वर्तमान रा शामजी चिंतामणी सांगतील त्या प्रा भरोसा आसो देणे (नि) बहुत लिहिणे तरी सुदन असा. (शिक्का)

o o

मर्या
दयं विरा
(जते)

श्री धर्मप्र
द्योर्तीताशैषव
र्णा दाशरथेरिव
राजारामस्ये मुद्रे
यं विश्ववंद्या
विराजते

शिवकालीन पत्र सार संग्रह लेख नं ७०८

कालनामा म. मु.

श. १५७७

इ. १६५५

अजर. रा. शिवाजी राजे . . . . हैबतराऊ देशमुख ता गुंजणमावळ.

तुमचे बाबे हुजर खबर मालुम जाली जे कित्येक बडिया लोकांनी तुमचे पाठी शक घातला आहे की तुमची देशमुखी आम्ही घेऊ, तुम्हास वाईट करु ऐसा शक घातला आहे, व दळवी याचे कर्ज आहे, त्यास तुम्ही जमान आहात जमानती झाडे लावून आम्हास कष्टी करु ऐसा शक तुमचे पोटी बैसविला आहे व कित्येक तुमचिया घरी बियामध्ये एक प्रकार वर्तणूक जाली आहे, असे कित्येक लोक बोलताती तरी तेही गोष्टीच्यानिमित्या येऊन कष्टी करितील ऐसा शक बसविला आहे. या तिही गोष्टीकरिता व कित्येक गोष्टीकरिता तुम्ही शक जादे आहा. डावा डौल होता तरी तुम्हास साहेब घरिच्या लेकरासारिखे जाणीतो आणि तुमचे फार हेही गोष्टीचे वाईट करावे ऐसे मनावर कधी धरणार नाहीत. हे तुम्हास बित्तिम कळले असावे, कोणेही गोष्टीचा शक न धरणे, तुमचे हजार गुन्हे माफ आहे ती तुम्हासी आम्ही काहीही वाईट वर्तणूक करु, तरी आम्हास महादेवाची आण असे व आई साहेबांची आण असे कोणेही गोष्टीची चिंता न करणे अवांतरहि लोक भेडसविते. असेल ते भेटविणे आमच्या इमानावरी आपली मान ठेऊन आम्हापासी येणे कोणे गोष्टी चिंता न करणे. मोर्तब.

ले. ७२७		श.
भू. दा. प.		इ.

श्री

श्री तीर्थस्वरूप राजमान्ये राजश्री बीबजीबवा दादासाहेबचे सेवेसी सेवक राजे बाजीराऊ

घोरपडे दंडवत विनती उपर येथील क्षेम

ता छ७ जिल्हाद मा नजीक काळूर सगम भीमातीर सुखरूप असो विशेश आम्हास नवाबसाहेबी फार मेहेरवानगी करून जागिरा प्रा गने तीन दिधले प्रगने राजनी व प्रगने कंवसडी व प्रगने वाळूर ययेसया

सनदा दिधल्या ते घेऊन राजश्री वासुदेवपंत येत आहेत अन अम्हीही अनवरी जागिराचे परवाने घेऊन सत्वरच येतो अपले आसिर्वाद अनखी प्रगने चगलेच घेतो सेवेसी कलावे बहुत काये लेहेन विनति (एक शिक्का ०)

ऐ. फारसी साहित्य खंड १

ले. ६०	**१**	
	बिस्मिल्लह - अर - रहमन -	**श. १५७८ मार्गशीर्ष व. १०**
हि. १०६ सफर २४	**अर - रहीम अल्मुल्कुल्लिह**	**इ. १६५६ डिलेंबर १**

(फा. शि.)

सारांश

अलीबादशहा —— रोलोजी घोरपडे

रोलोजी घोरपडे यांनी जाणावे की, या वेळी दरबाराच्या भेटीस येण्याच्या हेतूविषयींचा त्याचा अर्ज सिंहासनाच्या पायापाशी उभे राहणाऱ्यांकडून येऊन पोहोचला. त्यात लिहिले आहे की, “स्वतः दरबारचा जुना सेवक आहे व बेरोझगार आहे. तसेच कोणत्याही ठिकाणचा मोकासा किंवा तालुकानाही.” हा अर्थ आम्हांस समजला तेव्हां तो फार पसंत पडला. आता तुम्ही सर्व बाजूंनी संतुष्ट राहून ताबडतोब कर्नाटकचा सुभेदार खान मुहम्मद याचा मुलगा मुहम्मद इख्लासखान [मी येथे मुहम्मद इस्लासखान हा खान मुहम्मदाचा मुलगा असा अर्थ केला आहे. पण त्याविषयी मला थोडी शंका आहे.] याजपाशी जाऊन बादशाही मसलतींत शरीक (सामील) व्हावे. तेथे पोहोचल्यावर जमेतीच्या अनुरुप अशा जागीरीच्या कृपेने उत्कर्ष होईल. ता. २४ सफर सन १०६७

---

१ येथून पुढे आलेली विशेषणे ले. ४९ प्रमाणे असल्यामुळे गाळले आहेत.

मुधोळ इतिहास १६६०

बादशहाने शिवाजीच्या बंदोबस्तासाठी ही तोड काढिली की, बाजीराजे घोरपडे यास त्याच्या प्रतिकारासाठी पाठवावे. हे काम त्याच्या शिवाय दुसरा कोणीहि करू शकणार नाही. त्यास मुख्य सेनापति करून पुष्कळ सैन्य देऊन तिकडे पाठविण्याचे त्याने योजिले. पुढे लष्कर पाठवून बाजीराजे स्वतः एकटाच आपल्या जहागिरीत म्हणजे मुधोळास आला व एकदोन दिवस विश्रांती घेऊन कामावर जावे असा त्याने बेत ठरविला. शिवाजीस ही खबर लागली असून तो आपल्या शोधात आहे, हे त्याने जाणिले नाही. शिवाजी रात्रीच्या रात्री आपल्या मंडळीसह काळाप्रमाणे मुधोळास आला. दरवाज्यावरील पहारेकऱ्यांस वाटले की, हे सैन्य बाजीराजे याचेच आहे. त्यांनी दरवाजा उघडला व शिवाजीच्या येण्यास प्रतिबंध केला नाही. बाजीराजे अंथरूणावर स्वस्थ झोपी गेला होता. हे लोक त्याठिकाणी गेले व त्यांनी तलवारीने त्यास जागे केले. तो वीर उठला व म्हणाला की, "मी अशास्थितीत असताना माझ्यावर तलवार उपसणे उचित नाही. व पौरुषास शोभत नाही. थोडा वेळ थांबा, मीहि सशस्त्र होऊन येतो व माझा पराक्रम दाखवितो." परंतू त्यादुष्टाने ऐकले नाही व बरेच वार मारून त्यांचे काम पूर्ण केले. शिवाजी इतक्यावरच थांबला नाही. त्याने त्या वाड्यास आग लाविली व त्याच्या आप्तेष्टांना व चार बायकांना मारून टाकिले व तो पळून गेला.

त्याची इच्छा होती की बाजीराजे याचा वंशच नष्ट करावा. परंतु ही गोष्ट सत्यसंकल्पाच्या विरूद्ध होती म्हणून तसे घडून आले नाही. कारण त्याची पट्टराणी आपल्या मालोजी व शंकराजी या दोन्ही मुलांसह हिंदुस्थानात मौजे दहीर येथे बापाच्या घरी होती म्हणून या प्रसंगी वाचली ही गोष्ट सन १०७० (सबैन व अलफ इ. स. १६६०) मध्ये घडली.

बाजीराजे याने सोळा वर्षे राजसेवा केली. आदिलशाही राज्यात त्याने मोठाली कार्ये केली होती. अल्ली आदिलशहा यास जेव्हा बाजीराजे याच्या मृत्युची वार्ता समजलीं तेव्हा त्यास फार वाईट वाटले त्यानं मोठ्या प्रेमाने त्याच्या पत्नीस व मुलांस हिंदुस्थानातून आणविले व मालोजी व जयसिंग उर्फ शंकराजी यास आपल्या कृपाछत्राखाली घेऊन त्याजवर प्रेम करु लागला. ते प्रौढ झाल्यानंतर पुर्वीच्या जहागिरीशिवाय आणखी परगणे व खेडी देऊन त्यांचा मानमरातब वाढविला. उभयतांबंधूनी शिवाजीच्या विरूद्ध पुष्कळ कामे केली. मोगलांनी विजापुरावर स्वारी केली, त्यावेळी दोन्ही मोहिमेत त्यांनी पुष्कळ नाव मिळविले व मोगल सैन्याचा पाठलाग करून त्याचा त्यांनी नाश केला. शिवाजीवर खुद्द आदिलशहाने स्वारी केली, त्यावेळी उभयता बंधूनी फारच पराक्रम करून यश संपादन केले. परंतु एका चकमकीत शंकराजी (जयसिंग) हा तासगावच्या लढाईत कामी आला. तसेच रायचूरच्या किल्लेदाराने बंड उभारले त्या मोहिमेत मालोजी यांनी अवर्णनीय पराक्रम केला व आपल्या वडिलार्जीत परंपरेस अनुसरून नावलौकिक मिळविला. रायचुरातील बंडखोर सरदार आसरा धरून बसले होते. त्यांना वेढा दिला गेला. तेव्हा रायचूरच्या किल्ल्यातील शिपायांनी किल्लेदारास पकडून बादशहासमोर आणिले, कारण हा सरदार बंड उपस्थित करण्याच्या बेतात होता. किल्ल्यातील लोकांनी बादशहाची सेवा मनोभावाने केली. पुढे बादशहा तेथे काही दिवस विश्रांतीसाठी राहिला व तेथून विजापूरास आला.

ऐ. फारसी साहित्य खं. २

ले. ११ मु. १०६०		**श. १५८१ माघ वद्य ३०**
	१	
हि. १०७० जवल २७		**इ. स. १६६० जानेवारी ३१**

(बहुदळी पिंपळपानी शिक्का)

बादशहा (अली अदिलशाह) -— मिन्जलह शाह हवालदार व कारकून मामले मुहम्मदपूर

पारथन्दी, [या गांवाचे नेमके उच्चार फारसीवरून समजत नसल्याने ओळखता आली नाहीत. पण बहुधा विजापूरच्या आसपास असावींत असा कयास आहे.] मुरगोर [या गांवाचे नेमके उच्चार फारसीवरून समजत नसल्याने ओळखता आली नाहीत. पण बहुधा विजापूरच्या आसपास असावींत असा कयास आहे.] व कोन्बनाकम [या गांवाचे नेमके उच्चार फारसीवरून समजत नसल्याने ओळखता आली नाहीत. पण बहुधा विजापूरच्या आसपास असावींत असा कयास आहे.] ही गांवे पूर्वी कृष्णाजी बिन अबाजी घोरफोडे आदिलशाही याजकडे पूर्वी होती. सध्यां ती सरसरे नौबत अ अतबारखान याजकडे अमानत आहेत आतां तीं मशारनिल्हेकडे पूर्वीप्रो चालूं करावी. ता. २७ जवल १०७० हि.

ऐ. फारसी साहित्य खं. १

१२ वाअी येथील थिटे व मालोजी घोरपडे.

प्रस्तुत कागद श्री. स. ग. जोशी यांनी वाअी येथील थिटे घराण्यातून आणला आहे.

ले. ६७		**श. १५८२ आषाढ वद्य २**
सु. १०६१ जिल्हाद १५	**(अलिफ)**	इ. १६६० जुलै, १४

(वा. शि.)

सारांश

सय्यद मरदूम शर्झाखान— कारकून व देशमूख पर्गणे, वाअी

वाअी येथील रायाजी नरसिंह थिटे यांच्या बाबतीत मालोजी राजे घोरपडे यांनी माहित केले की, हा जुना वतनदार असल्यामुळे यास या ठाण्याची हशमनवीसी द्यावी म्हणजे तो स्वतःचा निर्वाह करीत. तरी या

ठाण्याच्या पुर्वीच्या हशमन- वीसास दूर करून रायाजी नरसिंह थिटे यास मुकरर करावे हल्लीचे मिरासी नायकवाडी व हशमांची कचेरी यासह १० माणसे आणि एक मशालजी नेमून देऊन पुर्वीच्या हशमनवीसाची तैनात यास द्यावी. यापुढे नेहमी नोकरी करून घेऊन रोजमुरा देत जावा. तसेच तैनातीचे हशम नेमणे व त्यांच्या गरजा भागविणे हे करवून वंशपरंपरेने या ठाण्याची नौकरी घेत जावी. ता. १५ जिल्काद सन ११.

(८३२)

सा. ले. २६८.		**श. १५८२ भाद्र. व. ८**
मु. १०६१ मोहर २०	**खुर्दखत फा. मु. व सी.**	**इ. १६६० सप्टे. १६**

अजर खंडोजीराजे व बाजीराजे व हंसाजी राजे व कृष्णाजी राजे घोरपडे, वजा. कार. व देसाई परसिरवळ.

लिगोजी बापूजी देसकु यास मौ. नायगाऊ येथे एक चाबर जमीन इनाम चालवावी.

(शिक्का :– हसाजी बाजींनाईक घोरपडे आदिलशाही)

शिवचरित्र साहित्य खंड ५ पान १२७

ले. ८७६	श. १५८२ पुर्वी.
अ. नु.	इ. १६६०

राजाधिराजमान्य राजश्री कानोजी राजे जेध्ये गोसावी, यासी.

॥ छ. श्रीमतु प्रौढ प्रताप दिनकर खडेस्वरी येसवत महामेरू -—-—-—-
प्रती राजश्री बाजीराजे घोरपडे विनती येथील क्षेम जाणोन राजेगोसावी यानी अपुले क्षेम लिहिले पाहिजे. गोसावी यानी पंत पाठविले ते तेथे आले आहेती, तुम्ही लिहिल्याप्रमाणे विवेक पाहिला आसे थोरेची दिवसामध्ये इश्वर कृपेन सरजामी होईल अणी तेथील वर्तमान सविस्तर -------- पतानी लिहिल्या आसे त्यावरून गडके होईल आम्ही तेथील निर्गमकरुन घेऊन तुर्तचो येतो आम्हा बरा बरी तुमचे पंतहि येतील तुम्ही तेथे आहा हरयेक विसी दिवाण कामासी बहुत सावधान असिले पाहिजे. तुम्हास तरी इतुके लिहणे न लगे, परंतू लिहिले असे अखंडित कु. पा. आसो देणे हे विनंती.

बाजी बा	चौकोनी	
बजारत	मुद्रा	(पा. स. १२–५१)

मालोजी घोरपडे सन १६६१

हा मुधोळ संस्थानातील बाजीचा पुत्र होय. पुढे हा आदिलशहास जाऊन मिळाला तेव्हा शिवाजीने यास एक महत्वाचे पत्र लिहून आदिलशहास सोडून आपल्याकडे येण्यास व आपल्या कार्यास मदत करण्यास, आणि बाजीचा घेतलेला सूड विसरून जाण्यास लिहिले. (सरस्वती—मंदिर वर्ष ५, अं.५) परंतु हा शिवाजीस जाऊन मिळाला नाही. नंतर हा औरंगजेबाचा नोकर बनला. याला अकोजी नावाचा पुत्र होता. अकोजीचा पुत्र पिराजी व त्याचा पुत्र मालोजी वगैरे लोक याच्या मागून गादीवर आले.

२. (स. १७१६—१८०५) हा पिराजीचा पुत्र. हा पेशवाईमध्ये फार जुना व रणशूर योद्धा होता. याने कोणत्याही लढाईत शत्रूस पाठ दाखविली नाही. याच्या उजव्या बाजूस एकंदर ९६ जखमा झाल्या होत्या. हा प्रथम रघुनाथरावाचेकडे होता. पण पुरंदरचे तहानंतर हा बारभाईस मिळाला. हा बारभाईच्या पक्षास मिळाल्यानंतर लौकरच इंग्रजांशी सामना सुरू झाला (स. १७७९ तळेगाव लढाई). तीनचारशे इंग्रज व गारदी मिळोन जिवेच मारिले. तीनचारशे जखमी झाले. याने शिपाईगिरीची शर्थ केली. याचे बंधु राणोजी घोरपडे हेही सामन्यात ठार झाले. स्वतः यास पाच जखमा झाल्या. त्या बऱ्या होण्याकरिता यास दोन महिने विश्रांती घेणे भाग पडले. हा व मुलगा गोविंदराव यांचे वाकडे होते, व बापलेक खडर्याच्या लढाईत परस्पर विरुद्ध लढले (स. १७९५)

स.१७७८ ते १७८१ पर्यंतच्या पत्रव्यवहारावरून असे दिसते की, हैदराने मुधोळकडे दंगा केला, आणि इंडी, तांबे व अलमेले (जि. विजापूर) हे परगणे, हा १ लक्ष ७३ हजार ९ शे रुपयांचा सरंजाम १०० स्वरांच्या फौजेनिशी याला देण्यात आला. हा याजकडे याच्या हयातीपर्यंत चालला. त्याचप्रमाणे यांच्या फौजेच्या गोटासाठी शहर पुणे येथे जागा देण्यांत आली, व तेथे यांनी घोरपडे पेठ स. १७८२·८३ मध्ये वसविली. याला चार बायका होत्या. एक पोल संस्थानातली व दुसरी काठेवाडातील रजपूत होती. बाकीच्या दोघी दक्षिणेतील पवार व सोलकी या घराण्यांतील होत्या. पहिल्या बायकोपासून गोविंदराव व महाराव हे दोन मुलगे झाले. दुसऱ्या बायकोचा मुलगा बाजीराव हा बडोदे राज्यात राहिला. तिसरीचा मुलगा राणोजी हा इंग्रजाशी झालेल्या युद्धात मरण पावला.

राजवाडे खंड. १५

मराठ्याचे इतिहासाची साधने. लेखांक (९७) सदानंद.

१५८२ अश्विन पा. १४ **इ. स. १६६०**

छ. अजरख्तखान मरारूल अनाम राजश्री अंबाजी राजे घोरपडेसाहेब दाम दौलतहू ता॥ हुदेदारानी हाल व हस्त कबाल व मोक दमानी मौजे चिचणारे किले ताथोडे बिदानंद मु॥ इहिदे सितैन अलफ कमल नयन गिरी सन्यासी मठ मा॥ मौजे निंब हुजुर पेऊंन मालूम केले जे आपणास धर्मादाऊ गला गहू केली कुडीत पाच मौजे मा॥ प्रा॥ नख्त खरीद पैकी साल दरसाल देखीले होते. ते पावत गेले साल मजकुरा कारणे महाती कारकन ताजे खु॥ खताचे उजूर करितात म्हणोन मालूम केले तरी सन्यासी मजकुरास धर्मादाऊ देविले असे यास साल दरसाल ताजा खु॥ खताचे जरुर करणे काय याना आता बा॥ खु॥ धर्मादाऊ गहू कुडी पाच दो साला प्रा॥ ना॥ खरीप कि॥ पैकी देत जाणे दरसाल ताजा खु॥ खताचे उजूर न की जे तातिक तेहून घेऊन असल परतोन दीजे.

(सिका)

तेरीख २७ माहे सफर

ऐतिहासिक फारसी साहित्य खंड १

ले. २६ सु. १०६२ हि. १०७२ रजब १५	लेख क्रमांक २१	शके १५८३ फाल्गुन व २ इ. स. १६६२ फेब्रुवारी २५

अली अदिलशाह फाजल अफजलखान मुहंमदशाही हतासदार व मुहम्मद मुलकी ठाणेदार व कारकून किले परळी.

मौजे बोरगांव परगणे वाई येथील कुलकर्णी नारो विश्वनाथ याने दरबारात विनंती केली की मौजे कामेरी किल्ले परळी येथील अर्धाचावर जमिन आदिलशाही अबाजी घोरपडे याच्या खुर्द खताप्रमाणे इनाम चालू आहे. आपले फर्मान मिळावे तरी सदरहू जमिन ती वरील हक्कासुद्धा उपयुक्त गृहस्थास इनाम देण्याची कृपा केली आहे. तेव्हां ती जमिन ताब्यात देऊन त्याजकडे चालू ठेवावी.

ले. ९२१		श. १८५४ श्रावण वद्य १०
मू. दा. प.		इ. १६६२ जुलै ३०

श्री

श्री मगल मूर्त्यीयेनमा

मिरासीपत्र देसमूखी किले वदन व कर्याती अगापूर व किले परली शके १५८४ शुभकृतनाम संवत्छरे स्त्रावण मासे दशमी वधी पक्ष दक्षणायेणे छ २४ जिल्हेज बुधवार मुहुर सन सलास सितैन अलफ बहुजुर हाजीर मजालसीयानी

राजेश्री बाजीराजे घो ा

श्रीराम हंसा जी बीन बा जी घोरपडे आदिलशाही (चौ. मु.)

राजश्री रायाजी राजे घो ा

(फा. चौ. मु)

राजेश्री झुझारराऊ घांटीगे

देसमू का मलेवाडी व का

लौलगण (वा. फा, मु.)

नागोजीराजे देसमूख

खतागीर पाटण

(अष्टकोनी म. चार ओळी मुद्रा)

श्री . .

हीरोजीराव

. . . .

समुख

हकहमशाही

राजेश्री आबाजी राजे घो ा

(चार ओळी लहान चौ.

फा. मु.)

साबाजीराजे घाटगे देसाई

का मलवाडी

(वाटोा फा. सोळा बुरुजी मु.)

मुधोजी बिन तिमाजी

पटेल का आगापूर किले

वदन (नि. नांगर)

भिउजी पाटील बिन व

कृष्णाजी अनत मह्दले देसमुखी — नाजी पाटील मौजे गोजेगाऊ

का सेलगां — का आगापूर

(फारसी मुद्रा) — (नि. नागर)

सा कोरेगाऊ

बाजी बिन चादजी बारगे — बाजी बिन हरजी पटेल

पटेल मो मौजे कोरेगाऊ — कदम मो मौजे साप

(नि. नांगर) — (नि. नांगर)

जानोजी पटेल मौजे यक्सल — डोगरोजी पटेल मौजे बोरगाउ

सा कोरेगाउ

(नि. नांगर) — (नि. नांगर) फा. ना. दा. मु. अ. को.

या हुजूर राजेश्री कृष्णाजी राजे घोरपडे यासी अंतो कोडो देसाई देहाये किले वदन व कर्याती मजकूर लेहून दिल्हे मिरासीपत्र यैसे जे आपण आपली देसमुखी देहाये किले मजकूर व कर्या (ती) मजकूर देखील किले परली तमाम दहाये बरी तफसील.

का अंगापूर	किले वदन देहाये
६ किले वदन	५ पा वाई
१) कसबा	१ मेणोली
१ खेड	१ सिरबे
१ वाडे	१ जायेगाउ
१ पाडखल	१ येक्सील
१ मतापूर	१ त्रिपुटी
१ माहमदाबाद	—
————	————
६	५
६ किले परली	१ कामती
१ निगडी	१ सुरली
१ कामेरी	१ पारले
१ निसराले	१ बनेवाडी
१ चिचणारे	१ नाडे
१ गोजेगाऊ	१ ठोबसे
१ कोढीये	१ अपसिगे

१ वलसे

——

६ ८

————

१२ १ पाचवड

१ डोलेगाऊ सतार विलायेती

————

१५

येणेप्रमाणे देहाये मजकूर अपले मिरासी मात कदम सालाबाद पडी दरपिडी देसमुखी खात असता दरीवख्त सिवाजी राजे भोसले याने मुलुक कबज केला ते वख्ती गलबलेमधे रायाजी सिदा नाईकवाडी किले ताथोडे याने लायनी हुजूर गैरवाका मालूम करुन कयाती अगापूर अपले मिरासी देसमुखी अपली अहे म्हणउनु फर्मान करून माहलासी अला सदरहू फर्मान. पैकियाचे बले करुन माहलामधे मोबलगे लाच रुशवत देऊनु घर बदी केली खलल केले त्यावरी आपण हुजूर जाउनु अपले अहवाल सागोनु देसमुखीचे मात कदम चालिलेप्रमाणे दुबाले करणे यैसे मोकरुर फर्मान हुमायून घेउनु अली यावरी अपले मिरासी देहाये देकर्याती मजकूर सालाबादप्रमाणे खात होतो तैसेच कबज करून खाऊ लागलो त्यासी रायाजी सिदा ताथोडेकर याने नाइकवाडी यासी लाच रुशवत दिल्हे होते त्याकरिता नाइकवाडी किले मजकूर त्याचे हरयेक बाबे मदद करुन अपले काम अबरवा चालो नेदीता कुसूर करु लागले याबद्दल अपण अपले देसमुखी किले मजकूर व कर्याती मजकूर देखील किले परली निमे तक्सीम देउनु अपली पुस्तपन्हा होते म्हणउनु तुम्हासी दिल्हे असे यासी वडीलपण पानमान व तश्रीफ दिवाणातून हर दो जणानी बाराबरीच घेवे सिका दोघानी करावे येक पुढे येक माघे घेवयासी निसबत नाही हकलाजिमा व इनामकदीम व जदीद व पस्तर साधेल त्यासी निमेप्रमाणे तकसीम तुम्हासी देउनु निमे अपण घेउनु वृत्तीस दिवाणात जे पडेल ते तुम्ही अर्धा देउनु मिरासी राखावी त्याचे तक्सीम धर्मता जे निमे येईल ते अपण देउनु रायाजी सिदा व किले मजकूरकर बल्ल करितील तरी तुम्ही मजबुदी करुन ठाई ठेवावे यासी खर्च घोडियाचे पोटासी देवे व हशमास मुशाहिरा यैसे बिर्फमाल द्यावे जोवरी तह बैसे तोवरी द्यावे तह बैसलियावरी तकसीम बरहुकूम खावे अपण निमे मिरासी तुम्हासी जे दिल्ली असे ते मद्दगिरीसच दिल्हे असे पेस्तर अमचे बापभाऊ तकसीमदार अम्हासी कचाट करुन तुम्हासी अपले तकसीम देवयासी येतील तरी तुम्ही त्यासी असिरा नेदावा व अपले पाठी राखावी ते जाणे व आपण जाणेत व माहलामध्ये देसमुखी खेरीज नवे मरासी पटे (ल) गी अगर नाइकी अगर हरयेक मिरासी तुम्हाकरिता अगर अम्हाकरिता जे साधीन येईल त्या जे पडेल ते अम्ही तुम्ही निमेप्रमाणे देउनु निमेप्रमाणे वाटुनु घेउनु असावे अपणच साधिले अपणच घेईन यैसे म्हणावयासी समध नाही व रायाजी मजकूर वेव्हार लावील तरी त्यासी वेव्हार अपण सागोनु रायाजीने बल करुन वाटजोरी केलियाने तुम्ही मजबदी करावी त्यासी ठाई ठेवावे हे वृत्तीचे काम आहे माहलासी कारकून अगर नामजाद सुभेदार येतील व गाऊगाना मोकदम पाटील रयेता व मोकसाई यैसे येतील त्यासी तश्रिफा उलुफा व देणे घेणे लागेल ते दुतर्फा खर्च करावे येणेप्रमाणे निमे मिरासी दिल्ही असे यास अम्ही अगर अम्हा बादज जो होईल तो इस्कील करील त्यासी चुकलियाने अपले वडिलाचे सुकृत साक्ष व कासीस गोहत्या केलिया समान मिरासी पडी दरपडी अवलादी व अफलादी चालवावे हे अपले लेहून दिल्हे मिरासी पत्र सत्य.

ऐ. फारसी साहित्य खंड २

ले. १२ सु. १०६३ **हि. १०७३ जवल १५**	२	**श. १५८४ पौष वद्य २** **इ. १६६२ डिसेंबर १७**

(वाटोळा शिक्का)

बादशहा (अली आलिदशाह) —— फाजिल अफजलखान मुहम्मदशाही हवालदार, अहमदखान ठाणेदार व कारकून किल्ले चंदन

मौजे आखाडे व मौजे अनेवाडी किल्ले चंदन ही गांवे खंडोजी व बाजी व अंबाजी व कृष्णाजी घोरफोडे आदिलशाही यांचजकडे किल्ले मज्कूरच्या हशमांची व्यवस्था, डागडुजी व दारुगोळा यासाठी चालू होती. आता ती त्यांस इनाम दिली आहेत (१) चालवावी. ता. १५ जवल १०७३ हि.

मराठ्यांचे इतिहासाची साधने

ले. १०६	**खंड १५**	**१५८५ जेष्ठ वैद्य ६**

शिवकालीन पत्रव्यवहार

श्री. सदानंद गोसावी याचे मट इ. १६६३

(सिका) छ अजरखतखाने मा. अनाम राज श्री अंबाजी राजे घोरपडे साहेब दाम दौलत हू ता हुदेदारानी हाल व इस्तकबाल व मोकदमानी मौजे निगडी किले सातारे सुग अर्बा सितैन व अलफ दरी विला जोगीद्रतिरी सन्यासी नि ग हुझूर मालूम केले. आपणास मौजे मजकुरी इनाम विधे १५ आहे अनछेत्र चालीस पन्नास सन्यासी जेविताती त्यास पटेल व कुलकरणी इस्केल करिताती सुरतीत चालवीत नाही, त्यास साहेबी ताकीद देविले पाहिजे म्हणोन तरी याचे इनामास खलल करणे तुमचे काय अंदाज आहे आता त्याचे इनाम जैसे सालाबाद भोगवटा चालले तेणे प्रमाणे चालविणे इस्कील व खलेल न करणे सदरहु जमीन हद महदूद घालून दुमाला करणे त्या नीच तावणी करून घेतली, दुसरे यानी फिर्यादी येऊ ने देणे तालीक ते हून घेऊनु असल खुर्द खत परतोन देणे मोर्तब (सिका)

तेरीख १९ माहे जिलकाद

ले. ९२२	**श. १५८५ शोमन वैशाख शु. १०**
मू दा. प.	**इ. १६६३ मे ६ बुधवार**

श्री मोरेंस्वराचे अण

कृस्णाचे अण

मराठी चौकोनी शिका

श्री . . .
कृस्णाजी आबा
जी घोरपडे

स्वस्ति श्री शके –––– शोमक्रत नाव सवस्तसरे वैशाख मास सध दसमी उतरायेण छ (८) माहे शौवाल सुग सलास सितैन अलफ वार बुधवार तदिती जाहले मिरासीपत्र यैसे ज बिहुजूर हाजीर मजालसी रा खंडोजा राज व राजश्री बाजा राज राजश्री अंबाजा राज

(चौकोनी दोन शिक्के : एक फारसी व दुसरा मराठी)
नागोजी राजे देसमुख
दतागीर पाटण
(अष्टकोनी मराठी शिक्का)
: : जीवा : :
बिननागोजी
राव

(चौकोनी फारसी शिक्का)
रायजी राजे
(चौकोनी फारसी शिक्का)

राजाश्री साबाजी राजे
घाटीगे देसमुख का
मलवाडी

बिा तानाजी गोविंद
पेसवे रा घोरपडे
राजेश्री जुझारराऊ घांटिगे
देसमुख का मलवाडी व का
लौलगण
(फारसी शिक्का कलशाकार)

कोनेरी गिरमाजी
पारसनीस किले वंदन

तिमाजी राम कुलकर्णी मौजे
पाडली सा कोरेगाऊ पा
वाई.

या विदमाने राजश्री कृस्णाजी राजे (घोरपडे) यासी रखमाजी त्रिमल देसाई देहाये (शिक्का) ———— बीतफसील

मौजे कामेरी, मौजे चिचणोर मौजे गोजेगाऊ मौजे तिगडी मौजे नीसराले मौजे कोठ्ये किले परली लेहून दिल्ले पत्र यैसे जे रायाजी सीदा नाईकवाडी किले ताथोडा याने किल्यांत लाच लख्सुपत देऊनु किले वदनीचे देसमुखस उभा राहून फर्मान अणैाउनू देसमुखीस इस्कील केले त्यावरी अपले हिसा गावीचे खुर्दखते करून खलेल केले मग अतो कोडो देसाई किले वदन याने हुजूर जाऊनू फर्मान आपले अपले देशमुखचे घेऊनू दुबाल करुन घेतली रायाजी सीदा पैकेचे बले दखल करिता राहिला नाही अजी सबब अतो काडोने अपले देसमुख तुम्हास निमे देऊनू पाटी करून घेतली ते वख्ती अतो काडोने आपलेहि देहे सदरहू सहा तुम्हास देसमुखी निमे तुम्हास लेहून दिल्हे ते वख्ती अपणास बोलाउनू पुसिले नाही तुम्ही देसमुखी कबज करून घेतले आपणास दखल नव्हते याबद्दल आपण दिगीर होउनू परागदा जाहालो होतो त्यावरी तुम्ही आपणास हुजूर बोलाउनू समाधान केले त्यावरी आपण आपले आत्मसतेसै भावपूर्वक देहा मजकुरीचे देसमुखी निमे तुम्हास दिल्हे आहे तेथे जो हक वा श्राजिमा वा इनाम वा पालक वा बाजे जे काये हक्क आहे ते बरहुकूम तक्सीम निमे खावे वा पेस्तर तुम्ही काही मिरासीस जे उतपन कराल तेही अपण करीन ते बरहुकूम निमे तक्सीम प्रमाणे खावे अैसे आमण आपले आत्मसतोस बैलाकुसूर लेकराचे लेकरी दिल्हे आहे अवलाद वा अफवाद खाऊनु सुखे असावे आपले कोणी भाउबद दाईज गोतिया उभा राहिलियाने त्यास आपण समजाउनु वा परावा कोणहि मिरासीस उभा राहिलियाने आपण वेव्हार करून भाजन वा तुम्ही अपले पाटीशर्त मर्दीने राखावे यासी अपणापासुन वा अपले अवलादीचा होउनु इस्कील बेइमान करील त्यास श्री वा आपले वडिलाचे किर्या आसे हे लिहिले पत्र सही वा पेस्तर मिरासी समधे जे पडेल ते बिरदुमाल वा दावेदरपडे बदल घोडा राऊत मदतीस येईल तेचे पोटखर्च बिरफदुमाल हे लिहिले पत्र सही (फारसी अक्षरे) लिहिले सही व सिके दोघानी करावे हे पत्र सहि बिकलम खुद (मराठी वाटोळा शिक्का).

“Baji Ghorpade Wounded in Battle”

The body he (Shivaji) has got in capturing the little ships and surprising off the Ballagatta Captain Gorpora (Ghorpade) who was in charge of the King's cash for paying Chaveschan's (Khawaskhan's) army, is estimated at 8,00,000 gold rups (?) and the spoil taken by land is said to be 20,00,000 gold rupees. The victory gained by the rebel in taking Captain Gorpora by surprise was far from what Chaveschan expected, as that person was certainly one of the most excellent commanders. He got so severely wounded that he soon died and lost two hundred men besides all the cash. We wonder very much that the Moghal's army should not have done anything in particular, while that rebel (Shivaji) was so far from his home in the north, because Gorpora's men who escaped, though no more than 300 horsemen, made it so hot for Shivaji near Carrapatan and Wain above the Ballagatta, that the same is said to have hastend the breaking up of his camp from here (Wengurla). If was a matter of wonder that although everyday men from his armada were coming ashore, we could not ascertain where he was staying until the 11 th instant (of December 1664).

(Shivaji the Great Vol I, Part II p. 553)

वतनाचे पायी झालेले शिवकालीन हत्याकांड

—बा. बा. राजेघोरपडे

१) प्रस्तुत ऐतिहासिक लेखात विजापूरचे दरबारातील एक मुत्सदी व दिवाण दियानत राव व

२) मुधोलचे बाजीराजे घोरपडे व त्यांचे बंधू अंबाजी खंडोजी राजे घोरपडे यांची पत्रे पुढे दिलेली आहेत. आमचे पुर्वज सदर बाजीराजे घोरपडे हे मुधोलचे राजे होते. ते व त्यांचे बंधू तर्फ वाळवे प्रांत पन्हाळा या परगण्याचे देशमुख होते. ते झालेले हत्याकांड हे वाळव्याचे कुलकर्णी यांचे मधील आहे. या हत्याकांडाचा व त्यावेळच्या देशकालमान परिस्थितीचा व वतनाचा हव्यास या बाबतचा लेख दिला आहे. त्यावरून त्याकाळी वतनाची आसक्ती व ते मिळविण्याकरिता करीत असलेली कृत्ये ही किती भयानक होती हे कळून येईल.

शिवपुर्वकालापासून कऱ्हाडास [य. रा. गुप्तेकृत कऱ्हाड.] देशपांड्यांची तीन घराणी राहात होती.

१) कऱ्हाडकर देशपांडे.
२) वाईकर देशपांडे.
३) कडेगावकर देशपांडे.

ही वरील तिन्ही घराणी मुसलमान अंमलापासून प्रसिद्धीस आहेत. पुर्वी असलेले एम. एल. सी. लक्ष्मणराव देशपांडे याचा पूर्वज काशीपंत उर्फ द्यानतराव (दियानतराव) विजापूरच्या अदिलशाहीत प्रधान होता. त्यांचे आमच्या संग्रही असलेले अस्सल पत्र येथे चर्चेसाठी घेतले आहे.

श्री समर्थ शिष्या आक्काबाई या घराण्यातील रुद्राजी चंद्रोची कन्या होती. हे रूद्राजी चंद्रो याचा उल्लेख इतिहासाचार्य कै. राजवाडे यांचा मराठ्याचे इतिहासाची साधने खंड १५ मध्ये मसूर जगदाळे प्रकरणात पान १ वर आलेला आहे.

काशिपंत उर्फ दियानतराव याची अनेक पत्रे प्रसिद्ध झालेली आहेत.

१) ऐतिहासिक फारसी साहित्य खंड १ ले. ३० इ. स. १६७४ मार्च १ चे दियानतराव म जलसी म्हणून दुसरे पत्र शि. च. सा. खंड ८ ले. लेख ६२ सन १६६८ दियानतराव म्हणून म्हणत होते, त्यांनी व बाजीराजे घोरपडे यांनी श्रीसमर्थ रामदासस्वामी यांना चरेगाव, माजगाव वगैरे गावांना जमिनी दान दिल्याचे उल्लेख आहेत. उल्लेख केलेले दियानतराऊचे पत्र तर्फ वाळव्याचे देशकुलकर्णी महादो बल्लाळ याचेवर नागोजी देवजी येडेकर यानी वतनाचे पायी केलेल्या हत्याकांडाबद्दलचे आहे. त्यावेळी तर्फ वाळव्याचे देशमुखी बाजीराजे अंबाजीराजे व खंडोजी राजे घोरपडे हे तिघे बंधू करीत होते. ही तर्फ वाळव्याची १) देशमुखी १८ गावाची होती, त्या गावाचा उल्लेख व घोरपडे मंडळीच्या अनेक तर्फच्या देशमुख्या याचाही उल्लेख पुढील निबंधाचे कागदात येईल. कारण या प्रकरणात नागोजी देवजी येडेकर यानी केलेले अत्त्याचाराची माहिती व दुसरी पत्रे मी पुढे देत आहे. ती पत्रे तीन आहेत. पण ती पत्रे समकालीन व्यक्तींनी समकालीन घडलेल्या हकीकतीची व त्यावेळी घडत आलेल्या घटना त्या घटनेचा वृत्तांत दिलेला आहे व मूळ दियानतराऊचे अस्सल पत्र आहे. त्याच पत्राला पोषक असा पुरावा आला आहे. म्हणून तो तितकाच विश्वासपात्र आहे व त्यावेळी हे वाळव्याचे देशमुख म्हणून बाजी व अंबाजी खंडोजी हे इ. स. १६६६ नंतरही हयात होते. हा अस्सल कागदाचा पुरावा आहे. तो पुरावा बाजीराजे घोरपडे मुधोळकर याचा मृत्यूचा चुकीचा काळ हा निबध मी वाचला आहे. त्यात हे पत्र दिले आहे. परगणे वतनदाराची भांडणे वर्षोवर्षी चालत, वाळवे तर्फचे देशपांडे यांचे वतनाबाबतचे भांडण इ. स. १५९८–९९ सालापासून, त्याचा पुरावा मिळतो. (पहा शिवचरित्र खंड ४ था पान ६४ शिवपूर्वकालीन महजर) तद्नंतर या भांडणात अनेकवेळा दिव्य व निवाडे झाले आहेत. त्याप्रमाणे या वतनदार लोकात वतनाबद्दल व वतने मिळविणेसाठी राजे रजवाडे यांच्यात कशी चुरस होती हे मी सोदाहरण देत आहे.

या वतनात श्रेष्ठ वतन म्हणजे देशमुख [शिवकाल व शिवोत्तर कालीन वतने व जहागिरी–शं. ना. जोशी.] यांचे त्याप्रमाणे जहागिरदाराकडेही राजकारभारातील काम आहे. पण त्यात मोठे अंतर आहे व इतिहास कालाचा विचार करताना तर ते चांगले व पुरते लक्षात घेतले पाहिजे. तेथेच हे ध्यानात ध्यावयाचे की त्याकाळी देशामध्ये दोन सत्ता मिळून राज्यव्यवहार व लोकव्यवहार चाले म्हणजे हे दोन गट हे दोन पक्षच होते. त्यांच्या प्रतिनिधीद्वारा हा देश व्यवहार चालत असे. प्रतिनिधी स्वरुप मानावयाचेच झाल्यास ते राजसत्ता पक्षासंबंधी मुळीच मानता येणार नाही. त्यातल्या त्यात देशमुख व देशपांडे ह्या परगणे वतनदारानांच तसे मानल्यास चालेल.

या देशमुख संस्थेची मान्यता त्याकाळी फार मोठी होती. इतकी की छत्रपतीपद धारण करणारे राजे महाराजे जे शिवाजी संभाजी ह्यानाही आपण देशमुख नाही हे वैगुण्य वाटत होते व त्यांनी येनकेन प्रकारेण देशमुखी मिळविण्याचा प्रयत्न केला होता.

देशमुखाला, लोकदरबारात व राजदरबारातही मान असे. गाव संस्थेत पाटील आणि परगण्याचे सभेत देशमुख व देशपांडे असले म्हणजे तेथे इतर जहागिरदार इनामदार शिवकालाला अनुलक्षून सांगावयाचे झाल्यास मोकासदार म्हटले पाहिजे, असे जरी असले तरी त्यांना पाटील देशमुख आधी मानाचे पान मिळावयाचे नाही. मोकासदाराप्रमाणे देशमुखाचे पदरी सैन्य घोडदळ पायदळ त्यांचे वतनाचे वर्तनाप्रमाणे असे. मुकासदार जहागिरदाराचेहि गुमास्ते किंवा कमाविसदार असते तर देशमुखांचे पदरी देशपांडे यारदी कुलकर्णी सबनीस पेशवे इत्यादी अधिकारी मंडळ असे. पण परगण्यातील वतनदाराची जनता आपण

देशमुखांची रयत आहे, असे आदराने व मनापासून सांगेल तसे माकासदार जहागिरदाराच्या गावातील जनता स्वतः विषयी तसे सांगणार नाही.

एक स्वतःच्या नावाचे नाणे असणे ही गोष्ट सोडून प्रतिष्ठा प्रांत सत्ता फौज हाताखालील अधिकारी व रयत मोठ मोठे किल्ल्यासारखे संरक्षास असणारे किल्लेवजा गड हे सर्व मनुष्यापेक्षीत ऐहिक लक्षणे देशमुख संस्थेस चिकटून आहेत, व ती परंपरागत होती. जहागिरदार किंवा सरदार ह्यांना ह्या गोष्टी असल्या तरी त्यांना किंवा सुभेदार इत्यादी अधिकाऱ्यांना देशमुखाच्या तुलनेने स्थिरता कमी म्हणून देशमुख इत्यादी परगण्याच्या किंवा गावच्या ह्या वतनदारास शाश्वत अधिकारी असे संबोधिले आहे. व इतरांना अशाश्वत अधिकारी म्हटले आहे. तसेच आणखी हेही लक्षात घेतले पाहिजे की, देशमुखीच्या ह्या सुप्रतिष्ठेमुळे वतनी भूगोल म्हणून स्वतंत्र गणला गेला आहे.

प्रत्येक परगण्यात देशमुखासह त्याचे जोडीला हाताखाली देशमुखीचा कारभार करण्यास देशपांडे, नाडगौडा, देशचौगुले व नायकवाडी हे वतनदार असत व त्यांनी ही देशमुखाना ज्या गावी वतनी जमिनी असते, त्याच गावी या परगणे वतनदारांना त्यांचे वतनाचे दर्जाप्रमाणे जमिनी असत.

परगण्यात काही वाद निर्माण झाल्यास त्याचा निर्णय देण्याचा अधिकार परगणे वतनदार हे उपस्थित राहून देशमुख, देशपांडे, नाडगौडा, देशचौगुले व नायकवाडी भोवर गावचे पाटील कुलकर्णी वगैरेचे उपस्थित निर्णय होत व त्याप्रमाणे त्यावर त्या वतनदाराचे शिक्के व सह्या (नि—नांगर) केले जात असे. निवाडे (महजर) निर्वाद पत्र ऐनजिनसी खते वगैरे झालेले आहेत, त्यावरून दिसून येते. त्यामध्ये देशमुख देशपांडे यांचे स्वतंत्र शिक्के असत. ते कोणाचेही चरणी तत्पर नसत. उदाहरणार्थ—

शिवचरित्र साहित्य खंड ५, थिटे यांचे वाई देशपांडे यास निर्वाद पत्र पान २१८ यावर देशमुख व देशपांडे यांचे सिक्के देत आहे. ते येणेप्रमाणे. काही वेळेस देशमुखास, देसाई व देशपांड्यास देशकुलकर्णीही म्हणत होते.

देसाई देशपांडिये ता । सातारा.

देसाई
राघोजी बिन.
नावजी घोरपडे

(चौकोनी फारसी शिक्का)

रायाजी बिन
साबाजी व
आबाजी बिन.
कुसाजी ना । गाढवे.

(सिका अष्टकोनी व फारसी)

पान २१९ देशपांडिये
देशपांडिये भाऊ भाऊ
कानेर अनंत व विठल गोपालदेस

कुलकर्णी देशमुख व देशपांडे

प ग फलटण.

हे सिके पहाता दशमुख, देशपांडे यांचे शिक्क्यात कोठेही कोणाचे चरणी तत्पर नाही. परंतु देशमुख देशपांडे, विरहित मंत्री व अधिकारी होते त्याचे सिक्के पहाता कोणाचे चरणी तत्पर तर कोणाचा कृपानिधान तर कोणाचा हर्षनिधान असे सिक्के आहेत. उदाहरणार्थ—

शिवचरित्र साहित्य खंड ८ पान ३९—४२—४३ सिराळकर निकम देसाई या लेखातील सिक्के आहेत.

श्री शि	श्री
व न स्पति	श्री आई आदि पु
हर्ष निदान मो	रुष श्री राजा शि व छ
रेश्वर सुतनीळ	त्रपति स्वामि कृपानिधि
कंठ प्रधान	तस्य कृष्णाजी परशु
	राम प्रतिनिधी
बदामी शिक्का	गोल सिका
o श्री	o श्री
श्री शाहु छत्र	श्री राजा
पति चरणि तत्पर	शाहू चरणी
राणोजी सुत उदा	तत्पर येसाजी
जी चव्हाण हीम	भोसले नी
त बहादर	रंतर
(गोल सिका)	(अष्टकोनी सिका)

असे शिक्के असत.

वर सांगितल्याप्रमाणे सर्वश्रेष्ठ अशी ही देशमुखी संस्था आहे.

आता ह्या देशमुखीसाठी छत्रपती घराण्यातीलही इतर राजघराण्यातील पुरुष कसे यत्न करीत होते, असे जे वर प्रदर्शित केले. या विषयी थोडक्यात पाहू—

मसूर व कऱ्हाड या परगण्याची देशमुखी मूळची एकाची, म्हणजे मसूरचे जगदाळे याची. पण ती देशमुखी काही कारणानी आदिलशाहीकडे बराच कालपर्यंत जप्त होऊन पडली होती. अशा समयात शहाजीराजे भोसले हे निजामशाहीतून आदिलशाहीकडे आले व त्याचे पदरच्या सैन्यास खर्चाकरता म्हणून ही देशमुखी दिली. शहाजीला वाटले की ही देशमुखी मोकास बाब म्हणून आपलेकडे आलेलीच आहे, ती पुरती म्हणजे देशमुखी म्हणूनच हस्तगत करावी. त्याकाळी वतन गतकुळी झाले की ते मिळविण्यास सोपे

जाई. मग शहाजीने त्या देशमुखास ठार करून ते आपले नावे चढवून घेण्याचे साधले. शहाजी नंतर शिवाजीराजे आले. तेव्हा शिवाजीनेही देशमुखीवर स्वामित्व सांगणाऱ्या दोघा जगदाळ्यांना ठार केले. काही वर्षे गेल्यावर या देशमुखातील एका मुलास घेऊन त्याची आई जिजाबाईकडे राजगडावर आपले गाऱ्हाणे घेऊन गेली व तिने देशमुखीसाठी अभयपत्र मागितले. शिवाजीने "देशमुखी सोडून अभय आहे" असे सांगितले हे ऐकताच देशमुखी देण्याचा विचार नाही हे जाणून व जीव वाचवून परत जात आहो, हेच विशेष असे मानून ती बाई आपल्या मुलासह परत गेली.

पुढे संभाजी छत्रपतीची राजवट सुरू झाली. तेव्हा फिरून प्रयत्न करून पहावा, म्हणून ती बाई पुनरपी लेकरासह आली. ती येताच छत्रपती संभाजीने आपल्या प्रकृतीनुसार त्याजकडून लिहूनच घेतले की, आम्ही कऱ्हाडच्या देशमुखी विषयी पुन्हा गोष्ट काढणार नाही.

त्यानंतर छत्रपती राजारामाचेवेळी राजारामाने आपला दासी पुत्र कर्ण हा प्रयत्न देशमुखी करण्यासाठी सुंदर तुकदेव ह्या कारभाऱ्यासह पाठवून देंशमुखीचा कारभार चालविला. अशी ह्या देशमुखी विषयीची गोष्ट चार पिढ्यांपर्यंत चालली होती.

शाहू छत्रपतीची वाई परगण्याच्या देशमुखी संबंधीची गोष्ट याहून वेगळी व विशेष आहे. ती अशी की, वाईचे देशमुखीचें पिसाळ देशमुख घराण्यातील भांडण यापुर्वीपासूनच प्रसिद्धच आहे व ह्या कारणाने ती देशमुखी न्याहारखान गोरी ह्या वाईच्या मुसलमान अधिकाऱ्यानेच एकदा हस्तगत केली होती. शाहू आल्यानंतर ती त्याजकडून शाहूने स्वतःकडे घेतली आणि आपला देशमुख वाई असा शिक्का करवून तो उपयोगातही आणला आहे. तो मराठ्यांचे इतिहासाची साधने खंड २० पान नंबर २० वर आहे.

श्री शंकर
श्री शाहुजी रा
जे भोसले देश
मुख परा वाई
नि. नांगर
(अष्टकोणी)

वरील अष्टकोनी शिक्क्यात नि. नांगर म्हणजे त्याकाळी ज्यांना लिहिता वाचता येत नसत ते आपली निशाणी नांगर काढत असत, परंतु छत्रपतीचे ते देशमुख असताना त्यातही शेतीचे प्रतिक म्हणून नि. नांगर काढलेला आहे.

हे झाले छत्रपती घराण्यातील पुरुषांचे. त्याचप्रमाणे राजे घोरपडे घराण्यातील पुरुषांनीसुद्धा अनेक देशमुख वतने दुसऱ्याची मिळवली व घराण्यातील घराण्यात वाद निर्माण करुन देशमुख वतने मिळविली व तर्फ सातारामधील देशमुखी ही घोरपडे घराण्यातील माझे मुळच्या देशमुखी वतनाची वडिलकी कोणाची, याबाबत १५०–२०० वर्षात प्रत्येक पिढीत वाद निर्माण झाला आहे. प्रत्येक वेळी आम्ही खरे ठरलो. मुधोळकर राजे घोरपडे खोटे ठरले आहेत. (पहा शिव. च. सा. खंड ८) परंतु त्यात हत्याकांड झालेले नाही. हा वाद नांदगाव येथील घोरपडे देशमुख व मुधोळकर राजे घोरपडे यांचेमधील उदाहरण म्हणून पुढील दोन पत्रे त्यावेळच्या न्यायाचा नमुना म्हणून देत आहे.

पत्र इ. स. १७९७ **श्री**

ए

(सिका) **(इनाम कमिशस)**

सातारा ज. द. रू. नं. १७१२

लेख. नं. ७४९३

अज सुभा राजश्री दौलतराव शिंदे ता। मोकदमानी – देहाय मौजे माजगाव मौजे सोनापूर व मौजे सेलकेवाडी व मौजे करंजे व मौजे मांडवे व मौजे निमाम व मौजे पाडळी व मौजे कुसवडे मौजे आसनगाव ता। सातारा सु॥ समान सीतैन म या व अलफ रा पेदाजीराव घोरपडेदेश मुख प्रा। सातारा याजकडे दोनशे वर्ष देशमुखीचा हाक रूसुल वगैरे सुदामत चालत असता अलिकडे राजश्री मालोजी घोरपडे धटाईन देहाय मा। र चा हक रूसून वगैरे नेतात, म्हणोन विदित जाले. त्यावरुन हे ताकीद पत्र सादर केले आसे. तरी देहाये मजकुराचा देशमुखीचा हक रुसून वगैरे ईनाम फड फर्मास पेदाजी राव घोरपडे देशमुख याजकडे पैसजी चालत आल्याप्रमाणे चालवणे दिकत न करणे आणिजे २० जमावल मोर्तबखुद.

(नक्कल)

इ. स. **श्री.**

(सिका) (इनाम ए कमिशन)

आज्ञापत्र राजश्री चतरसिंग राज भोसले ता। मोकदमा नि (फाटले) ये ता। सातारा बी ता।

१	मौजे नांदगाव	१	मौजे माजगाव
१	मौजे सोनापुर	१	मौजे मांडवे
१	मौजे निनाम	१	मौजे पाडली
१	मौजे कुसवडे	१	मौजे आसनगाव
१	मौजे पिलाणी	१	मौजे सेलकेवाडी
१	मौजे करजे		
६		५	

११

सु॥ इसना मया तैन व अलफ दहाये मजकूर येथील देशमुखीचे हाक इनामाचा ऐवज मालोजी घोरपडे देशमुख ता। मजकूर याजकडे चालत आहे याचे सरकारात आगत्य जाणोन मनाई के (फाटले) आसे तरी याजकडील वतनास तगादा येकरन करणे जाणिजे छ (फाटले) साबान ता। हुजूर मोर्तब.

बार.

Name of applicant : Shri. B. B. Ghorpade of Nandgaon Tal. Satara.

Printing charges : I st copy Rs. 3/— Rupees three only

Copy applied on 26—6—52 Delivered on 29 July 52

Sd/—

P. A. to the Settlement Commissioner

in charge Alienation office Records.

True Copy.

छत्रपति शिवाजी महाराजाच्या वेळेपासून पाहता या वतनदारांत वाद वतना संबधी व अधिकाऱ्यांना वतन व जमिनी पाहिजेत हा होय.

उदाहरणार्थ:—

खेडेबारेकडील एकाचे कुलकर्णीपण मोरोपंत पिंगळे पेशवे व आणिक एक दोन अष्टप्रधानापैकी मंडळी ह्यांनी आपल्या हाताखाली घातले. पुढे हे भांडण शिवाजीपर्यंत गेले. शिवाजी राजांनी त्या मूळ कुलकर्ण्याची सर्व हकीकत ऐकून घेतली व म्हणाले. बाबा रे तू धर्मतेन बोलतोस म्हणजे तुझे म्हणणे बरहक न्यायास धरुन आहे, पण (मोरोपंतादिक हे) आपले कार्यभागी आहेत. त्याचे भिडेने मला बरहक करता येत नाही. तुझ्या निवडी करिता कुल. (सर्व) आपले कार्यभागी दुःखी होत आहेत. आपल्या कार्यास धका देत आहेत. आपल्या वरी ये प्रसंगी राजकारण पडले आहे तरी त्यास दुःखी करता येत नाही.

यावरुन जरी ह्या अधिकारी मंडळीना प्रसंगी सिद्ध संरक्षण व साध्य साधन इत्यादी सुविचार शिवाजीने ऐकविला असला तरी त्यांना वतन मोकासे इत्यादी व तनी जमिनी पाहिजेत व जर ती दिली नाहीत तर शिवाजी म्हणतात हे आपल्या कार्यास धका देत आहेत.

दुसरे उदाहरण ह्यातून लक्षात घेण्याजोगे व शिवराज निर्तावाचे आहे.

रामचंद्र अमात्य म्हणतात, “छत्रपतीनी सबनिसीपेक्षा जेष्ठ असलेला मुजूमचा हुद्दा दिला व जीर्णोद्धार केला, पण हुद्दा ही (बारगीर) वस्तु आहे. (बारगीर) म्हणजे हुद्दा दिला व जीर्णोद्धार केला, पण हुद्दा ही (बारगीर) वस्तु आहे. (बारगीर) म्हणजे सरकारी घोडे घेऊन त्यावर स्वार होणारा. ती वस्तू सरकार घेईलही. या करिता स्वामिनी त्याशिवाय आपली पहिली वतने व इनामती आपणास वंश परंपरेने चाले ऐसी आज्ञा केली पाहिजे.

पाटीलकी वगैरे मागितली व त्याप्रमाणे त्यास शिवाजीकडून मिळालेली अशी शिवकालातील उदारणे देता येतील. ही झाली दुसरे लोकांची वतने मागण्याची वृत्ती. परंतु यापुढे छत्रपती राजारामाचे कारकिर्दीत प्रत्यक्ष पिढ्यानपिढ्या एकमेकाची पाहुणेपचे नाते असलेली मंडळी कर्नाटकात जिंजीस शत्रूचा वेढा पडत चालला आहे, सैन्याची आपल्याला अत्यंत गरज आहे, तेव्हा आपण त्वरीत यावे. आपण आल्यानें राज्य रहाते वगैरे छत्रपती राजारामानी मुधोजी नाईक निंबाळकर यांना अनेक पत्रे पाठविली ते लौकर आले नाहीत. उलट छत्रपतीना पत्राने कळविले सरंजामाचा निर्वाह करून पाठविला नाही. तरी याउपरि फलटण

महाल साणक करुन सनद पाठविली पाहिजे वगैरे मागणीची पत्रे राजारामाना लिहिली आहेत. म्हणजे देश संकटात राज्य बुडते वगैरे राजारामाने लिहूनही संकटाचा फायदा घेऊन संरजाम झाला पाहिजे अशा मागण्या मुधोजी नाईक निंबाळकरांनी घातल्या आहेत. (पहा शिवचरित्र साहित्य खंड ४ था पान नं. ८०)

फलटणकर निंबाळकर

फलटणकर नाईक निंबाळकर हे मुळचे फलटण महालाचे देशमुख होतेच पण पुढे मोगली शत्रुच्याकडून होणाऱ्या युद्धाचा फायदा घेऊन संबंध फलटण महालाचीच सनद करुन मागितली आहे.

एकंदरीत शिवकाल, राजारामकाल व पेशवेकाल या कालातही अडचणीचा फायदा घेऊन मोरोपंत पिंगळे, रामचंद्र पंत आमात्य व मालोजीराजे घोरपडे यांनी आपला स्वार्थ साधलेला आहे व त्याचप्रमाणे त्यावेळचे असलेले राज्यकर्ते वतनाचे व सरंजामाचे व इनामतीचेविरुद्ध असलेले दिसत नाहीत. उलट त्याकाळी सगळेच या परिस्थितीचा फायदा उठवित होते हे वरील गोष्टीवरुन सिद्ध होते. यावरुन वाळव्याचे देशपांडे हत्याकांड्याचे बाबत दियानतराव व बाजी अंबाजी खंडोजी घोरपडे यांचे पत्रावरून पहाता त्यावेळी वतनाचा स्वार्थ हा प्रामुख्य हे त्यावेळचे मनोवृत्तीचे द्योतक आहे. यावरून राजे छ. शिवाजी, राजाराम वगैरे वतनाचे विरूद्ध नव्हते तर वतनदाराचे विरूद्ध होते हे सिद्ध होते.

---

१ दिवाण दियानतरावाचे पत्र (इ. स. १६६३ चे सुमारास)

श्री

अखंडीत लक्ष्मी प्रमाणे निगर्वी सिरोमणी
परोपकार मूर्ती राजमान्य राजश्री येमाजी
दत्तोपंत गोसावी यासि
सेवके दियानत राऊ नमस्कार विनंती येथील क्षेम
जाणोन स्वकीय कुशल लेखन के
ले पाहिजे उपरी साप्रत वर्तमान आईकिले की
नागोजी देवजी येडेकर यासि राऊली
आसरा देऊन ता वाळवे विलायतेचे गाव मौजे
बोहे येथे स्वार ५० व हशम २०० ॥ ३००
पाठवून गाव तमाम लुटोन जाळून तळपट केला
व तमाम बाईका नागऊन ब्राम्हणी बायकोची
पोटीची पाडिली व ब्राम्हणास जखमा केले
६रे ५०—६० जाळिली तमाम विसात
काडिनी गुणी लुटोन व नेले लोक नागवे करून घुडूती
घेऊन गेले माहादो बल्लाल
देस कुलकरानी ता वाळवे हा आमचा आणि तुमचा
स्थापित असे याचे व येडेकराचे
निवाडा होऊन भाग तुटला दिव्य जाहले दिव्यात
येणेकर खोटे जाहले महादो बल्लाल
पाक निघाला तेणे प्रमाणे चालत असता सन आर्बा
मध्ये नागोजी देकजी येणेकार या

ने ग्राहाणाचे दिवसी नदीतरी महादो बलाल मा
राविया आपला भाऊ द्रद्राजी देवजी
व आणिक ७ ॥ ५ दांडिगे देऊन नदीतिरी मारा केला
महादो दलालास जखमा केले इ.
तुकेमध्ये गलबला जाहला माहादो बलालाची लेक
म्हणोन देसाई याचा भट तोडिला सबब
महादो बलालाचे लेकाचे नाव व त्या भटाचे नाव येक
रातीजा वक्त न समजता हाच माहादो
बलालाचे लेक म्हणून तोडिले त्यावरी मोलेसी
जाऊन रा. शंकराजी दादाजी सुभेदाराचे
आसिरा करून वाळवे विलायतेची खता व ख्यान
ती मोबलग केले ते वर्तमान आम्ही राजश्री
राजे गोसावियास लिहून शंकराजी दादाझीस
ताकीद फर्माऊन हालसुद राहविला
होता हाली गोसावी यानी त्या नफरास आसिरा
देऊन तमाम गाव लुटिला व जाळिला व बाईका
चे पोटीची पाडिली व ब्राम्हणासी जिवे मारिले यैसे
तरी होऊ नये आता नागाजी देवजीस
ताकीद करुन हालसुद राहे यैसे केले पाहिजे गोसावी
देव ब्राम्हण भक्त आहा या मागे
होणे राहुलाचे योग्य नव्हे त्या न फरावरी जात नाही
बोल तुम्हास लागतो अतःपर नागोजी मजकुरास ताकीद
करुन बारदिगर यैसा आमल न करिता
हाल खुद राहे तो अर्थ केला पाहिजे.
गोसावी याचे बंधू राजश्री राजाजी पंत यांनी माहादो
वलालाचा सांभाळ केला होता ते
राऊनी आजीवरी सेवा कृष करित होते ते परस्परे
आम्ही यैकत असता अक
स्मात पिप्रित वर्तमान आईकिले यावरुन परम आश्चर्य
वाटले तरी पुर्वीचा मार्ग सह
सा सोडिला न पाहिजे माहादो बल्लाल आमचा व
गासावी याचा स्थापित याच्या का
मात पूर्ण मन घालोन आम्हा निमित्य हे चालविले
पाहिजे ये विषई सर्वथा आलस्य
होऊ न देणेविशेष लिहिने नलगे.

(सिका)

२ खंडोजी बाजी अंबाजी घोरपडे यांची पत्रे

दरबंदगी महाराव राजेश्री
जनार्दन नारायणपंत साहे
बाचे सेवेसी

आर्जदास आज बंदगी बंदे कमी न कमत
रीन बदगान सेरीकार भैरोजी शिंदे व
खंडोजी बाजी आंबाजी घोरपडे देसाई ता
वाळवे मु स अलफ बंदेकार
आर्ज
तारीख ६० माहे

साहेबाचे नेक नजरेकडून बखैर सलाबत असि
बा साहेब सलामत ता मजकुरीचे देसकु
लकरणी मिरासी पिडीदर पिडीहारी महादे
व याचे वडिल वडिलानी चालविले आसे दरि
वक्त नागोजी देवजीचे वडिलानीआपणास
निसबत नसता दिवाणबले कुसुर केला
होता हारी महादेवाचे वडिला
नी त्यास दूर करुन आपली मिरासी पुरात
न जैसी खात व्होते तैसे खाऊ लागले त्यावरी
हारी माहादेऊ त्याचे बाप महादो बलाल चा
लवित आसता नागोजी देवजीचा चुक
ता आप्पाजी माणे ये खलास खान हुकु
मत वजीर या पासी फिर्यादी वरून माहा
दो बलालासी तलब करुन हुजूर नेला दोघा
चे सनसुभी हुजर थोर थोर मजालजी बै
सून केली नागोजी देवजीचा चुलता आपा
जी प्राण को खोटा जाहला कागद पत्र गेरबाका
मालु मातीचे ते खोटे जाहाले व माहादो बला
लयाचे कागदपत्र भोगवटेते व निवाड प
त्रे रूजवार जाहाली महादो बलाल मिरासींस
खरा जाहला त्यावरी आप्पाजी माणको बोलिला
की आपण आग्रवाही आसे दिव्य रवने मि
राशी साधोन घेईन त्यावरी मजालसी बोलि
ले जे यातून काये बरे हकाचे राजी अैसे
आसे आगिते तोंडी जो खरा व्होईल तो

मिरासी खाईल यैसे तह दिल्हे ते दोघापा
सी नेम उतरे घेऊन कसबे तोवरे नवरसपु
र तेथे श्री. नरसिंह देवापासी दोचासी र
वा दिल्हा आप्पाजी माणकोचा हात जळून
न खोटा जाहाला माहादी बलाल रवा जिंतून
खरा जाहाला या प्रा महाअर फर्मान व्होऊन
बे कुसूर माहादो बलाले खादले त्यावरी
त्याचे फर्जंद हरि महादेवाने खादले हरि मा
हादेव खात असता हाली माहाराज राजेश्री
छेत्रपती साहेबाचे काबिजाती सन
सबाचे दिवपालीमध्ये बविजाती आली तर्फ
मजकुरचे कोटासी वेडा घालून भांडू लाग
ले ते. धाल्तीने गाव तमाम फुटला व हरि मा
हादेव देस कुलकर्णी हाराकजाद होऊ
न बाहीर गेला चांदो नारायण सुभेदार प्रांत
पनाला याने कोट घेतला त्यापासी नागाजी
उभा राहिला गैर बाका बोलिला त्यानी नागोजी दे
वजीस गावात ठेविले हरि महादेव यासि कोणा
चा आसिरा नाही देखून दोनी तीन साले परा
गदा जाहाला होता आता साहेबाचा कौल घेऊन
न हुजूर आला आसे साहेबी हारि महादेव दे
स कुलकर्णी यास हाती धरुन त्याचे मिरा
सी त्याचे हावाली करून चाकरी घेतली पाहिजे.
हरि महादेव याचे वडिल वडिलपणापासून
मिरासी खरे असती भोगवटा याचाची
आसे खा हाऊन धनास साले
होऊन ली बिकुसूर चालत असता साहेबाचे लोकी
जुलुमे करुन नागोजी देवजीस आसरा
दिल्हा आमे तरी साहेजी नागोजी गैर
मिरासी दारासि दूर करुन हसि माहादेव दसे
कुलकर्णी मिरासी दारासी हाती धरुन त्याच
मिरासी त्याचे दुमाला करून साहेबी आ
ऊसाफ घेतली पाहिजे नागोजी देवजीचे वडि
लाचे व हरि महादेवाचे वडिलाचे निवाडे प
हिले सात पाचवेळा जाहाले आसे ती नागो
जी देवजीचे वडिलासी देस कुलकर्णी सि
नि सबतगाही अैसे जाहाले हरि महादेवाचे
मिरासी वडिल वडिलापासून खरी जाहली
आणि भोगवटाही याचाही चालत आसे

ऐसे आसोन
कुसूर करितो त्यासि मिरासिक निस
बत नाही मिरासि पुरातन हरि महादेवाचे
वडिल वडिलापासून सही आसे यैसे आमचे
वडिल वडिल सांगत व्होते हाक जवारिही
जाणताती. रोशन होणे हे आर्दास

३. बाजी घोरपड्यावर दावा उगविला (नोव्हेंबर १६६४) –

शिवाजीने कुडाळ प्रांत हस्तगत केल्याचे वर्तमान ऐकून आदिलशहाने बेदनूरचे प्रकरण पुरे केले आणि लगेच बंकापुराहून परत विजापूरास प्रयाण केले. रस्त्यातूनच त्याने महंमद इख्लासखानास कुडाळ प्रांत परत घेण्याची आज्ञा करून सावंताचे साह्य करण्यासाठी रवाना केले. अल्पावधीत शहा विजापूरास पोचला आणि लगेच वजीर खवासखान व मुधोळचा बाजी घोरपडे यास त्याने आणखी फौजा घेऊन कुडाळवर जाण्याचा हुकूम केला. मुधोळकर घोरपडे हे आदिलशहाचे पुरातन, एकनिष्ट व शूर सरदार असून, मुसलमानांचे राज्य राखण्यास सदैव तत्पर असत. भोसल्यांशी तर त्याचा भऊबंदकीचाच दावा होता. शिवाजीची अशी चढती कळा पाहून त्याचा पाडाव करण्याची संधी बाजी घोरपडे फुकट जाऊ देत नसे, त्यांच्या संबंधाने खालील उल्लेख शकावलीत आहे. कार्तिक मासी इदलशहाचा व राजांचा बिघाड झाला. खवासखान कुडाळास आले. राजांनी जाऊन घोरपडे मारिले. खवासखानाशी झगडा केला. तो पळोन घाटावर गेला.

खवासखान व घोरपडे आपल्यावर चालून येणार ही बातमी शिवाजीस लागताच त्याने ताबडतोब परभारे मुधोळवर चाल केली. घोरपडे व खान यांची त्याने गाठच पडू दिली नाही. घोरपड्यांचा प्रांत लुटून तळपट करून ठाणे जेरदस्तीत आणिले. बाजी घोरपडे सर्व जमेतीनिशी लढाईस आले. युद्ध तरफेचे जाले. बाजी घोरपडे व कित्येक खासे लोक पडले. मुधोळ लुटून फस्त केले. मत्ता बहुत हाती लागली. मुधोळ पंचमहाल आपलासा करुन घोरपड्यांची स्थापना केली. त्यानतर खवासखान पुढे आला त्याजवर चाल केली. मारीत लुटीत गर्दी केली. खटा होऊन पळून विजापूरास गेले. त्यानंतर सावंताचा निशाच करावा म्हणोन त्या प्रांतात शिरलो. मुलूख तळपट करीत चालालो. ठाणी किल्ले तमाम घेतले. सावंत दमोन गेले. गोमंतकराचा आश्रय निघोन फोंड्याचा किल्ला मांडू लागला सुरुंग लावून बुरुज बळाने उडवून घेतला. त्यानंतर फिरंगी याजवर शह देऊन त्यांचा प्रांत मारीत चालला. त्यांनी तह करून तोफा नजराणा पाठविला. सावंत यास गोमांतकात दम न निघे. टोपीकर यास धीर न पडे. त्याजवरून पीतांबर शेणवई कारभारी पाठविले. आपण सावंत भोसले कुळीचे, आपले पुत्र आहो. प्रांताचा ठराव निमे ऐवज फौजेनिशी चाकरी करतो. ऐसा ठराव करून घेतला, असा मजकूर शिवाजीनेच खुद्द आपल्या पत्रात लिहून पाठविलेला आढळतो. वाई प्रांत घोरपड्यांच्या मूळच्या जागिरीत मोत होता तो आता शिवाजीने घेतला. इतउत्तर घोरपड्यांचे स्वामित्व मावळात राहिले नाही. [डॉ. बाळकृष्ण शिवाजी व्हॉल्युम १, पार्ट २ पी. ५३३. ता. ११–११–१६६४ च्या एका डच पत्रात हा मजकूर वेंगुर्ल्याहून लिहिलेला आहे. अर्थात कार्तिक मासी शिवाजीने मुधोळवर लढाई केली असे जेधे शकावली म्हणते ते खरे दिसते. जुन्या कागदात बाजी घोरपड्यांचे नाव स. १६२५ पासून पुढे आढळते. शि. च. सा. खंड ४ ले. ७१८–७२५ यात खंडोजी व बाजी हे घोरपडे बंधू जावयाचे पुत्र अशी नावे आढळतात.] (प. सा. १०४१)

बाजी घोरपडे, खवासखान व लखम सावंत यांचा शिवाजीने पराभव केल्याचा असंदिग्ध पुरावा डच दप्तरातील कागदात मिळतो. आदिलशहाने शिवाजीवर चढाई करुन खवासखानास कुडाळ प्रांतावर पाठविले. त्यांने साह्यास बाजी घोरपडे व लखम सावत येत होते बाजी येऊन खवासखानास मिळणार त्यापुर्वीच शिवाजीने मुधोळवर स्वारी केली. लढाई होऊन बाजीचे दोनशे लोक मेले, त्याला जखमा लागून तोही पुढे अल्पावधीने मरण पावला. शिवाजीस पुष्कळ लूट मिळाली. [डॉ. बाळकृष्ण शिवाजी व्हॉल्युम १, पार्ट २ पी. ५३३. ता. ११–११–१६६४ च्या एका डच पत्रात हा मजकूर वेंगुर्ल्याहून लिहिलेला आहे. अर्थात कार्तिक मासी शिवाजीने मुधोळवर लढाई केली असे जेधे

शकावली म्हणते ते खरे दिसते. जुन्या कागदात बाजी घोरपड्यांचे नाव स. १६२५ पासून पुढे आढळते. शि. च. सा. खंड ४ ले. ७१८—७२५ यात खंडोजी व बाजी हे घोरपडे बंधू जावयाचे पुत्र अशी नावे आढळतात.]

खवासखानाशी शिवाजीचे युद्ध झाले, या संबंधाने पुढील उतारा बखरकारांचे वर्णनातला जास्त खुलासेवार आहे. शिवाजीने सुरत वगैरे बादशहांची बलिष्ठ शहरे व मक्केचे यात्रेकरू लुटले. दक्षिण किनाऱ्यावरील व्यापारी बंदरावर हल्ले केले. आरमार वाढविले. शाएस्तेखान व जशवंतसिंह यांचा त्याजपुढे टिकाव लागला नाही. ही बातमी औरंगजेबास पोचून, तो फार चिंताक्रांत झाला. तेव्हा विजापूरच्या आदिलशहाकडे वकील पाठवून त्याजकरवी शिवाजीशी युद्ध सुरू करवून दोघांनी मिळून एकदम लढण्याची तयारी औरंगजेबाने केली. त्याचा एक हुशार वकील विजापूरास आला. आम्हा उभयता मुसलमान बादशहास या सर्व फंदफितुराचे व बंडाचे मूळ कारण जो शिवा त्याचा समूळ नाश करून गरीब रयतेस त्याच्या जाचातून सोडविणे प्राप्त आहे. इकडून पारिपत्यासाठी शूर योद्धे व शिपाई रवाना होत आहेत, तसे आपणाकडूनही व्हावे व त्या शिवरूपी सर्पाचे मस्तक फोडून त्याच्या गैरस्त्रहा वागणुकीचा सूड घ्यावा. एका बाजूने आम्ही व दुसऱ्या बाजूने तुम्ही, शिवाजीवर स्वारी करावी. आदिलशहाने ही गोष्ट कबूल केली आणि खवासखानास शिवाजीवर पाठविले. शिवाजीने खवासखानाच्या सर्व वाटा बंद केल्या. तरी तो गाफीलपणाने शिवाजीच्या मुलखात शिरला. शिवाजीची फौज दबा धरून बसलेली आहे हे त्यास ठाऊक नव्हते. खवासखानाचा समाचार घेऊन मग जयसिंहाच्या समाचारास जावे, असा शिवाजीचा मानस होता. त्याने एकदम येऊन खवासखानास कोंडिले. डावीउजवीकडे हलण्यास सुद्धा त्यास वाव ठेविला नाही. विजापूरच्या फौजेची गाळण उडाली. खवासखानाने हाताखालच्या अंमलदारास जवळ बोलावून निकराने लढण्याविषयी उत्तेजन दिले. लढाई मोठ्या निकराची झाली. सीदी सर्वर, शहा हजरत व शेख मिरान इत्यादी विजापूरचे सरदार रणांगणी पडले. तेव्हा स्वतः खवासखान तलवार घेऊन धावला. त्याबरोबर सर्व मुसलमान मराठी फौजेवर तुटून पडले. तेव्हा मराठे पराभव पावून पळून गेले. बाजी घोरपड्यास मारल्यानंतरचा हा प्रकार होय. या प्रसंगात शिवाजीचा सावत्र बंधू एकोजी आपल्या पथकासह विजापूरचे साह्यास आलेला असून, त्याच्या बहादुरीबद्दल त्यास आदिलशहाने दोन गावे इनाम दिले.

सावंतवाडी स.		**श. १५८६**
	अनु. २	
इतिहास पृ. ७		**इ. १६६४–६५**

वडिलांचे सेवेसी शिवाजी राजे याणी चरणावरी मस्तक ठेवून विज्ञापन ऐसी जे बाजी घोरपडे मुधोळकर याणी स्वधर्म साधनता सोडून यवन दुष्ट तुरूक ह्यांचे कृत्यास अनुकूल होऊन दगाबाजीचे हूनरे करुन विजापुरास येणे घडले तेथे गुजरला प्रकार निर्वाणचा तो तुम्ही समजलाच आहां तोही प्रसंग श्री. तुमचा मनोरथ सिद्धीस नेणे व स्वधर्म राज्यवृद्धी करणे म्हणोन पार पडला सांप्रत पुन्हा दुर्बुद्धी धरून खवासखान विजापूराहून फौजेसुद्धा रवाना जाहले त्याची हरोळी बाजी याणी व लखम सावंत व सेम सावंत याणी प्रतिज्ञापूर्वक जतन करुन सेनासमवेत निघाले ते तिकडे येत आहेत. तुम्हास श्रीसांब व अंबा यश देणार पूर्ण आहे ये समई त्यांचे वेढे घ्यावे आपण आमचे मनोदय सेवटास नेणार तुम्ही सुपुत्र निर्माण आहा म्हणोन आज्ञा केली त्यास बाजी घोरपडे पुढे मुधोळास घरी काही जमेतनसी आले हे कळताच फौजेनसी आम्ही तेच क्षणी स्वारी केली त्यांचा प्रांत लुटून तळपट जान करुन ठाणियास जेरदस्तीत आणिले हे जाणोन त्याणी सर्व जमेतनसी लढाईस निघाले युद्ध तारफेचे जाहाले बाजी मारिले व कित्येक खास लोक पडले याप्रकारे तो प्रसंग करुन लुटून फस्त केले भत्ता बहुत लागली पुन्हा आपलेचे करून मुधोळ पंचमहाल आपला करून स्थापिले. यानंतर खवासखान पुढे आला पाहून त्याजवर चाल केली ते मारित लुटीत गर्दी केली खटा होऊन पळू लागले ते विजापुरास पावविले त्यानंतर सावंतांचा निशाच करावा म्हणोन त्या प्रांतात शिरलो तेहि येऊन पावले मुलुख तळपट करित चालिलो ठाणी व किल्ले तमाम घेतले सावंत दमोन गेले गोमंतकराचा आश्रय निघोन फोंड्याचा किल्ला भांडू लागला त्यास सुरंग लावून बुरुज उडवून बळ्याने घेतला त्याप्रमाणे एकंदर ते सवस्थान घेतले यानंतर फिरंगी याजवर शह देऊन त्याचा प्रांत मारित चाललो त्याणी तह करुन तोफा नजराणा पाठविला सावंत यास तेथे दम न निघे टोपीकर यास धीर न पडे त्याजवरुन पितांबर शेणवी कारभारी वकील पाठविले आपण सावंत भोसले कुळीचे आपले पुत्र आहो सर्फराज करून देसगतीच्या वतनाची सेवा घेऊन प्रांताचा ठराव निमे ऐवज व निमे ऐवज सरकारात वसूल घ्यावा ऐसे करून घेतले त्याप्रमाणे स्वामीचे पुण्यप्रतापे करुन आज्ञेप्रमाणे घडोन आले ते कळावे म्हणोन लिा हे विज्ञापना मोर्तब.

शिवकालीन पत्रसार संग्रह (८९७) लेखांक

मराठ्यांचे इतिहासाची साधने.

राजवाडे खड १५ लेखांक १००

अज रखत खाने मो अनाम राजश्री रायाजी राजे घोरपडे साहेबु दाम दौलत ह ता हुदे दारानी मोकदमा नि मौजे एरोले पा कऱ्हड मुा सतास सितैन अलफ कमल नयन गोसावी मुठ सदानंद (मौजे) नींब यासी पेसजीचे इनाम दे जमीन विधे ५ आहेत. ते त्याचे दुमाला क्रण दरीबाब ताकीद असे मो (सिका)

शिवकालीन पत्रसार संग्रह

ले. १०८९

खंड २० ते ११८ रा. १५८७ कार्तिक व. १

सु. १०६६ जवळ १५ इ. १६६५ नोव्हें. १३

अजर रायाजी राजे घोरपडे ता हूदे व मोक मौजे येरोळ पर. करहाड सदानंद गोसावी याचा येरोळ येथील इनाम याचे हवाल करावा.

शिवकालीन पत्रसार संग्रह

ड २० ते ११९		रा. १५८७ का. प. २
	खुर्दखत फा. मु. व सिंका	
सु. १०६६ जवळ १६		
		इ. १६६५ नोव्हें. १४

अजर खंडोजी अंबाजी राजे घोरपडे हुदे मोक मौजे निगडी किले, सातारा कमल नयन मानबा व यास निगडी येथे १५ बिघे इनाम दिले असता, इस्कीत करिता इनामतीस वाठे न जाणे व साल गुदस्त घेतलेले पैके फिराऊन दीजे.

राजवाडे खंड १५

मराठ्यांचे इतिहासाची साधने

लेखांक ११४ १५८७ कार्तिक वद्य ३

इ. स. १६६५

छ. अजरखत खाने मा अनाम राजश्री नरसोजी अंबाजी राजे घोरपडे साहेबु दाम दौलतहू ता हुदेदारानी व मोकादमानि मौजे चिंचणी किले ताथोडा बिदानद सुा सीत सितैन अलफ दरवज बदल धर्मादाउ कमल नयन गिरीसन्यासी मठ मुकाम मौजे नींब पा वाआी यासी गहू कैली । पाच कुडी देविले असे ती आखा कीजे पेस्तर दर हर सालास ताज खुर्द खताचे उजुर न कीजे तालीक लेहून घेउनु असल परतून दीजे माजी खुदद खत सन समान छ. २३ जिल्हेजी दुमाले केले असे त्या प्रमाणे दुमाले कीजे मो (सिका) तेरीख १६ माचे जमा दिलोवल जमा चितोवन.
(सिका)

भा. इ. सं. मंडळ, पुणे.

मराठ्यांचे इतिहासाची साधने खंड २०

शिवकालीन घराणी.

संशोधक वि. का. राजवाडे

लेखांक ११९ — १५८७ कार्तिक वद्य ३

इ. स. १६६५

छ. अजरखत खाने मा अनाम राजश्री खंडोजी अंबाजी राजे घोरपडेसाहेब दाम दौलत तो हुदे दारानि व मोकदमा नि. मौजे निगडी किले सातारे मु सीत सितैन अलफ बो कमल

नयन मानभाव सो समत निंब पा वाई यासि इनाम जमिन बिघे ८१५ पंधरा मौजे मजकुरी महामेत करून दिल्हे असता, बरहुकुम खुर्रखत प्रमाणे भोगवटा होऊ देत नाही. दरम्याने इस्कील करून गोसावी मजकूर यासि रंजीस करिता म्हणोन हजर

मालूमे जाहाले. तुमचे खर्दखत काय असे आता रसीदने खुर्दखत देखता चि. गोसावी मजकुराचे वारे न जाणे बर हुकुम खुर्द खत प्रमाणे बिला कुसूर चालविणे दुसरेने हुजूर फिर्याद हुजरु आलिया बवाजीब बंरजोर ताकीद होईल साळगुदस्ता कुलकर्णी मौजे मजकूर यानी गोसाविया पासून इनामतीचे पैसे घेतले आहे. म्हणे तरी हे खुर्दखत देखता दरसाल पैसे फिराऊन दीजे ये बाबे दराज लिहिणे नलगे. तालीक लिहून घेऊन असल खुर्दखत गोसावी मजकुरा जवळी फिराऊन दीजे गोसावी आपले इनाम ज्या कुलास लावितो, त्यास तुम्ही पेके बद्दल तगादा करिता म्हणे हे हे काय माना आहे, आता गोसावियांचे कुलाचे वाटे गोरिया तुम्ही जाणे मागती हुजूर फिरियाद येऊन दीजे मो

तेरीख १६ माहे जमा दिवस

शिक्का

१७ मार्च १६६७

आरंभी अस्पस्ट गोल शिक्का व षटकोनी शिक्का
व फारशी मजकूर.

(बा. ईस्म) बापोजी कामाजी स
बनीस व खंडोजी बाजी व अबाजी
डे देशमुख व मा
यणा सगा नाडगोंडा व माहा
दो बल्लाल देस कुलकर्णी व अ
बाजी नाईक नाईकवडी व मोक
दमानी कसबे ता। वाळवे सु
सन सबा सीतैन अलफ कारणे
(१ माहे शोबाल १७ मार्च १६६७)
लेहून दिल्हे कबूल कतबा
यैसा जे आपण दिवाण कामास
खलेल करून बाहेर गेलो होतो
म्हणोऊन हुकूम फर्मावि
ला वरी आपण बद्दल गुन्हा
गारी देखील सदरहू मिरा
सदार होनची बाकी दाहा
हजार १०००० बी ॥
जी खंडोजी बाजी
......................देसाई

२१३३—T—	२१३३—T—
महादो बलाल दे	मायणा स.
स कुलकर्णी	गा नाडगौडा
२१३३ T—	१२०० ०
आबाजी नाईक माकेदमानी	
नाईकवाडी	कसबा
३०० ०	३००

येणेप्रमाणे कबूल केले.
असे नी घा करून देऊन सदर
भरीस गा
ना पटेल व कुलकर्णी व मो
यास खुसीने जे देती
ल ते मागोन घेऊन स ा
बेरीन निघा करून देऊ
त्याने फिर्यादी हुजूर येऊ
हिला हरगत न करि
ता किर्दी नामुरी करून बालसुद
असोन विलायतेचे व अ
अहवाल आसलिया
साहेबाचे बदगीस येऊन
मालुक करुन सरंजामी करुन
न घेऊन बाहीर जाऊन हर
कत केलिया दिवाणीचे
गुन्हेगार मिरासीस निस
बत नाही हा कतबा सही

फारशी लंबगाले
शिक्का

बापूजी कामाजी
सबनीस
मायणा सगो
नाडगौडा

खंडोजी बाजी
अंबाजी
घोरपडे देशमुख.

महादो बल्लाल
दसे कुलकर्णी

मोहदमानी
कसबा.

तारीख १ माहे शौबाल


। गोल शिक्का ।   । अष्टकोणी शिक्का ।   । गोल शिक्का ।

। चौकोनी शिक्का ।   महादो
बल्लाल
दसे कुल
कर्णी

मुधोळ घोरपडे घराण्याचा इतिहास
फर्मान नं. १४

इ. स. १६७० आक्टोबर २०

मालोजी राजे बहादूर घोरपडे आदिलशाही यांस फर्मान सादर होतो कीं, यावेळी दरबारास माहीत झाले कीं, तुमचे वडील बाजी राजा घोरपडे आदिलशाही यांनी फार दिवसपर्यंत उत्तम तऱ्हेने सर्कार चाकरी केली. राव सिवाजी राजा भोसले याशी युद्ध झाले त्यात तुमच्या वडिलांनी शौर्य दाखवून ते सर्कार कामास आले. यासाठीं तुम्हांवर उत्कृष्ठ कृपा करून व पूर्वीच्या चाकरीवर नजर देवून तुम्हांस नोकरी माफ करून इनाम म्हणून मुधोळ, जमगह, ढवलेश्वर, माचकनूर व लोकापूर पांच पर्गणे हे देत आहोत.पूर्वीच्या हक्कदाराचे हक्क शिल्लक ठेविले आहेत. तुम्ही हे वतन पिढ्यानुपिढ्या भोगत रहावे.
ता. १५ जखर हि. १०८१.



कबूल कतबा— १७ मार्च १६६७

ऐ. फारसी साहित्य खं. १

ले ६१		श. १५९२ मार्गशिर्ष शुद्ध १२
हि १०८१ रजब १०	(फा. शि.)	इ. १६७० डिसेंबर १४

सारांश.

विठोजी तुकोजी घोरपडे याने जाणावे की, मुहम्मदानगर समतेपैकी चरपवेली हा गाव देशमुखीच्या पेशकशीसह............तुमच्या स्वारांचा तनखा म्हणून ४५५ होनास तुम्हाकडे चालू होता तो अमानत करुन त्याऐवजी कतेकुंदा परगण्यापैकी बेलेर हा गाव दिला आहे. या गावच्या उत्पन्नापैकी खासखैलीची तक्सीम, दिवाणीची तलब दबाबी याबद्दलची एक दर रक्कम ३६६ होन ३ दुगल इतकी तुम्हाकडून दरसाल यावयाची बाकी ८८ होन व पाऊण दुगल येवढी राहिली. तसेच तुमच्या गावातून मीठ, पान व तंबाकू या हक्काबद्दल तुमच्याकडून यावयाची रक्कम ११५ होन व .... इतकी आहे. पैकी दरसाल ८८ होन ३/४ दुगल याप्रमाणे हि १०७१ पासून जमलेली रक्कम दप्तरी चालू केली आहे. दाखल केली आहे ? तरी लिहिल्याप्रमाणे अमल करावा. ता. १० रजब हि १०८१.

हे फर्मान सय्द मुजफ्फर शाही सरखेल याच्या पर्वानगीने निघाले.

ऐ. फारसी साहित्य खं. १

३

ले. ६२	हुव अल्लह सुब्हानहु	श. १५९२ मार्गशिर्ष शु.१२
हि. १०८१ रजब १०	तआल	ह. १६७० डिसेंबर १४
	(फा. शि.)	

सारांश.

कतेकुंदा परगण्यापैकी मौजे बेलेर येथील पुढाणी, रयत व कुलकर्णी यांनी जाणावे की, १३६६ होन ३ दुगड उत्पन्नाचा हा गाव विठोजी तुकोजी घोरपडे याजकडे पगाराबद्दल चालू आहे. पैकी १००० होन पगार बाकी राहिले ३६६ होन दुगल पैकी ११९ होन ३ ा दुगल हा खासखैलीचा वाटा ९३ ा होन दिवाण तलब बाकी १५३ खैरूद्दीन मुहम्मद घेतो. ४५५ होनांच्या अटीवर विठोजीस कामाबद्दल दिलेला गाव चरपवेली संमत मुहम्मदानगर अमानत करुन त्याऐवजी वेलेर हा गाव दि. १०७१ पासून दप्तरी त्याजकडे चालू केला आहे. तरी गाव त्याचे ताब्यात आहे, असे जाणून फर्मानाप्रमाणे वागावे. ता. १० रजब हि १०८१

खंडोजी बाजी आंबाजी घोरपडे देसाई ता। वाळवे

यांचे पत्र

दरबंदगी महाराज राजेश्री
जनार्दन नारायेणपंत साहे
बाचे सेवेसी
आर्जदास आज बंदगी बंदे कमीन कमत
रीन बदेमान सेरीकार मैरौजी शिंदे व
खंडोजी बाजी आंबाजी घोरपडे देसाई ता ो
वाळवे मु ग स अलफ बंदेकार
आर्ज
तारीख ६० माहे
साहेबाचे नेकनजरेकडून बखैर सलाबत असि
बा ो साहेब सलामत तो मजकुरीचे देसकु
लवकरणी मिरासी पीडीदर पिडीहारी महादे
व याचे वडिल वडिलानी चालविले आसे दरि
वक्त नागोजी देवजीचे वडिलानी आपणास
निसबत नसता दिवाणभले कुसूर केला
होता हारि माहादेवाचे वडिला
नी त्यास दूर करून आपली मिरासी पुरात
न जैसी खात व्होते तैसे खाऊ लागले त्यावरी
हारी माहादेऊ त्याचे बाप माहादो बलालचा
लवित आसता नागोजी देवजीचा चुल
ता आप्पाजी माणको ये खलास खान हुकु
मत वजीर या पासी फिर्यादी करून माहा
दो बलालासी तबल करुन हुजूर नेला दोघा
चे मनसुभी हुजुर थोर थोर मजालसी बै
सून केली नागोजी देवजीचा चुलता आपा
जी प्राणको खोटा जाहला कागदपत्र गेरवाका
मालु मातीचे ते खोटे जाहाले व महादो बला
लयाचे कागदपत्र भोगवटेचे व निवाडा व
त्रे रूजबार जाहाली माहादो बलाल मिरासीस
खरा जाहाला त्यावरी आप्पाजी माणको बोलिला

की आपण आग्रवादी आसे दिव्य खने मि
राशी साधोन घेईन त्यावरी मजालसी बोलि
ले जे यातून काय बरे हकाचे राजी अैसे
आसे—आगिचे तोंडी जो खरा व्होईल तो
मिरासी खाईल यैसे तह दिल्हे ते दोघापा
सी नेम उतरे घऊन कसबे तोखे नवरसपु
र तेथे श्री. नरसिंह देवापासी दोघासी र
वा दिल्हा आप्पाजी माणकोचा हात जळुन
न खोटा जाहला माहादो बलाल खा जिंतून
खरा जाहला या प्रा महाअर फर्मान व्होऊन
बे कुसूर महादो बलाले खादले त्यावरी
त्याचे फर्जंद हरि महादेवाने खादले हरि मा
हादेव खात असता हाली माहाराजा राजेश्री
छेत्रपती साहेबाचे काबिजाती सन
सबाचे दिपवालीमध्ये कविजाती आली तर्फ
मजकुरचे कोटासी वेडा घालून भाडू लाग
ले ते. धास्तीने गाव तमाम फुटला व हरि मा
हादेव देस कुलकर्णी हाका कजाद होऊ
न बाहीर गेला चांदो नारायण सुभेदार प्रांत
पनाला याने कोट घेतला त्यापासी नागोजी
उभा राहिला गैर बाका बोलिला त्यानी नागोजी दे
वजिचा पाटी राखून जुलमेसी नागोजी दे
वजिस गावात ठेविले हरि महादेव यासि कोणा
चा आसिरा नाही देखून दोनी तीन साले परा
गदा जाहला होता आता साहेबाचा कौल घेऊन
न हुजूर आला आसे साहेबी हारि माहादेव दे
स कुलकर्णी यास हाती धरून त्याचे मिरा
सी त्याचे हवाली करुन चाकरी घेतली पाहिजे
हरि महादेव याचे वडिल वडिलपणा पासून
मिरासी खरे आसेती भोगवटाही याचाची
आसे खा हाऊन धनास साले
होऊन ली बिकुसूर चालत आसता साहेबाचे लोकी

जुलमे करुन नागोजी देवजीस आसरा
दिल्हा आमे तरी साहेजी नागोवी गैर
मिरासी दारासि दूर करून हासि महादेव दसे
कुलकर्णी मिरासी दारासि हाती धरुन त्याच
मिरासी त्याचे दुमला करुन साहेबी आ
ऊसाफ घेतली पाहिजे नागोजी देवजीचे वडि
लाचे व हरि महादेवाचे वडिलाचे निवाडे प
हिले सात पाच वेळा जाहाले आसे ती नागो
जी देवजीचे वडिलासी देस कुलकर्णि सी
नि सबतगाही अैसे जाहले हरि महादेवचे
मिरासी वडील वडिलापासून खरी जाहली
आणि भोगवटाही याचाची चालत असे
ऐसे आसोन
कुसूर करितो त्यासि मिरासिल निस
बत नाही मिरासी पुरातन हरि महादेवाचे
वडिल वडिलापासून सही आसे ऐसे आमचे
वडिल वडिल सांगत व्होते हाक जावारिही
जाणताती. रोशण होणे हे आर्दीस

ऐ. फारसी साहित्य खं. १.

ले. ६३ | ४ | श, १५९५ आषाढ वद्य १०

हि. १०८४ रवल २३ | इ. १६७३ जून २९

(फा. शि.)
सारांश

मुकुंदजी घोरपडे याने जाणावे की, यावेळी कर्नाटकचा सुभा व सरलश्करी मूसाखान[1] [१ व गाळावा २ थोड्या शब्दभेदाने याच मजकुराचे व तारखेचे एक फर्मान नेगोजी घोरपडे यास धाडलेले आहे.] याजकडून दूर करुन मिया मुश्क यास दिली आहे. तरी त्याच्या हुकुमांच्या बाहेर न जाता पाठविलेल्या त्याची चाकरी व दिवाणची सदिच्छा यासाठी प्रयत्न करावा व फर्मानाप्रमाणे अमल करावा.
ता. २३ रबिलावल सन १०८४

१ तारीख इ अली (अप्रकाशित) मध्ये सलाबतखान उर्फ सिद्दी जोहर याने बंड केल्यामुळे अली अदिलशहाने त्यावर केलेल्या स्वारिचे वर्णन आहे. त्यात बादशहा सिद्दी जोहरच्या मित्राच्या ताब्यात असलेलारायचूर किल्ला हस्तगत करुन तुंगभद्रेच्या तीरावर असलेल्या पचाल गावी मुक्कामास आला असता, तेथून त्यानेमूसाखान अफगाण, झुझरराव नायकजी व इतर उमराव यास तुंगभद्रेच्या पलीकडे असलेल्या बंडखोरास शासन करण्याबद्दल हुकूम केला आहे. हे लोन व जोहरतर्फे ३००० लोकासह मसऊद खान यांची लढाई झाली व तीत मूसाखानने मोठा पराक्रम केला. याप्रसंगातील मूसाखान व फर्मानातील मूसाखान एक असल्यास या त्याच्या पराक्रमामुळे त्यास कर्नाटकची सरलश्करी व सुभेदारी मिळाली असल्याचा संभव आहे.

ऐ. फारसी साहित्य खं. २

ले. १३ सु. १०७४ | श. १५९६ ज्येष्ठ शुद्ध १४

हि. १०८५ रवल १२ | इ. १६७४ जून ७

(नादअलीचा शिक्का)

(पाठीवर अस्पष्ट वाटोळा शिक्का)

बादशहा (सिकंदर आदिलशाह) —— शाह हज्यत हवालदार व कारकून मामले मुहम्मदपूर.

अलीखान दाऊदखान याजकडे असलेली, मामले मजकूरमधील समता व पेठ मुबारकपूर यांच्या पटेलगीची मिरास सिद्दी अब्दुल अझीझ यास दिली आहे तरी ती त्याजकडे वंशपरंपरेनें चालवावी.
ता. १२. रवल १०८५ हि.

ऐ. फारसी साहित्य खंड १

ले. ६४	**५**	**श. १५९६ अश्विन वद्य १**
हि. १०८५ रजब १४	**फा. शि.**	**इ. १६७४ आक्टोबर ५**

सारांश.

खैरूद्दीन मुहम्मद याने जाणावे की, विठोजी तुकोजी घोरपडे याने गादीचा भार वाहणाऱ्याकडून अर्ज केला की, पुर्वीपासून परगणे कतकुंद्यापैकी वेलेर हा गाव स्वतःच्या कामाचा पगार १००० होन, खासखैलीचा वाटा ११९ होन ३॥ दुगल दिवाणची तलब ९३॥ होन व वरंगळच्या बाकी १५३ होन एकूण १३६६ होन ३ दुगल इतक्या पैशाबद्दल चालू होता व पूर्वी मुहम्मदानगर समतेपैकी चरोपली हा गाव ४५५ होनाबद्दल चालू होता सध्या चरोपली गाव अमानत केला आहे. बेलेर हा गाव हि १०७१ पासून त्याच्या कामाबद्दल त्याजकडे चालू असल्याचे फर्मान सादर झाले होते. असे असता खैरूद्दीन मुहम्मदाच्या मुतालीकांनी संबंध नसता गेल्या साली शिरजोरीने वेलेरच्या रयतेस पकडून नेऊन जबरदस्तीने १५३ होन घेतले आहेत व यंदाही तोच क्रम चालू आहे. म्हणून हुकूम होत आहे की, वरील गाव दिवाण तलब व सर्व बाकी यासह विठोजीकडे कामाचा पगार म्हणून चालू झालेला आहे. तुमच्या मुतालिकांनी असा उर्मटपणा करावा हे केवढे धाष्टर्य. आता हे फर्मान पोहोचताच स्वतःच्या मुतालिकांना ताकीद करून मागील साली व यंदा वेलेर गावापासून जे काही घेतले असेल ते त्या लोकांस समक्ष परत द्यावे व कैदेतील लोकांना सोडून देऊन अशी ताकीद करावी की, पुढे त्या गावास कोणत्याही गोष्टीची तसदी न लागता तो गाव सुखात राहिल. या बाबतीत ताकीद जाणून फर्माना प्रमाणे चालावे. ता. १४ रजब हि १०८५

हे फर्मान मादो भानजी मुजुमदार याच्या परवानगीने निघाले.

लखम सावंत— **शिवाजी सोव्हिनर** १९२७

कुडाळ प्रांताचा शूर सरदेसाई व आदिलशाहीचा कोकणप्रांताचा अधिकारी. पूर्वी विजयनगरच्या अमलाखाली हा मुलूख मोडत असून पुढे आदिलशाहीकडे आला. खेमसावंत नावाच्या पुरुषाने विजापुरकरांकडून काही प्रांतांची देशमुखी मिळविली, व इ. स. १६१२—१३ च्या सुमारास कुडाळ हे आपले संस्थान केले. या खेमसावंताचा पुतण्या लखम सावंत. याने शिवाजीची वाढती शक्ति पाहून त्यास मिळण्याचे ठरविले व आपला वकील पीतांबर शेणवा यास शिवाजीकडे पाठविले. उभयतांत पाच कलमांचा तह झाला. त्यांमध्ये प्रांतांचा निम्मा ऐवज शिवाजीस द्यावा व तीन हजार फौज ठेवून शिवाजीस गरज पडेल तेव्हा मदत करावी असे ठरले. हा करार ता. ५—३—१६५९ रोजी झाला, (का. सं. प. या. ४११). परंतु सावंतांकडून हा करार पाळला गेला नाही. म्हणून शिवाजीने त्यांजवर स. १६६ त स्वारी केली. तत्पूर्वी लखम सावंताने "फौज घोडा—राउत हशम मेळवून आपण राजियावरी चालोन जातो आणि कोकण

सोडवितो," (समा. पृ. ६८) असा निरोप विजापुरकरांकडे पाठविला. त्या अन्वये खवासखान व बाजी घोरपडे हे त्याचे मदतीस आले. परंतु ते येण्यापूर्वीच शिवाजीने सावंतास पिटून लाविले. तेव्हा तो फिरंग्यांच्या आश्रयास गेला. स. १६६७ त फिरंग्यांनी शिवाजीशी स्वतंत्र तह केला. त्यामुळे लखम सावंतास बाहेर पडणे भाग पडले. त्याने "आपण सावंत म्हणजे भोसले यांचा गोत्रज. आपले तुम्ही चालविणे उचित आहे," अशी दयेची याचना शिवाजीकडे केली. त्यावरून शिवाजीने कुडाळची देशमुखी त्याजकडे कायम केली. शिवाय, दरसाल ६ हजार होन द्यावे. वाडा—हुडा बुरूजांचा बांधू नये. कुडाळी रहावे. जमाज करू नये. अशाही अटी घातल्या. सावंतांनी यानंतर शिवाजींशी दगलबाजी केली नाही. लखम सावंताची कारकीर्द स. १६५१—७५ पर्यंत झाली. शिवाजीने बाजी घोरपडे यास मारल्याचे वर्तमान बापास ज्या पत्राने कळविले, त्यांत सावंत पोर्तुगीझ, खवासखान वगैरेंचा उल्लेख आहे. हे पत्र पिंगुळकरकृत सावंतवाडीचे इतिहासात छापले आहे.

ऐ. फारसी साहित्य खं. १

६

ले. ६५ | श. १५९७ कार्तिक वद्य १२

हि. १०८६ साबान २५ | इ. १६७५ नोव्हें. ४

(फा. शि.)

सारांश.

नगोजी व मुकुंदजी घोरपडे यांनी जाणावे की, आमच्या कानावर आले की, तुम्ही आपल्या स्वारांच्या जमेतीसह लतीफ शाह याच्या बरोबर जाऊन शत्रुच्या अलर पालमपेठ या गढीवर घसरुन तेथील हरामखोरांना योग्य शिक्षा केली. गनीम मोड होऊन पळून गेला व शत्रुची ती जागा काबिज झाली. विजयी लष्करापासून २ गाव अंतरावर असलेल्या एका गढीत हरामखोरांनी तळ दिला आहे. ती गढी (ती वर जाऊन) तुम्ही घेऊ इच्छितो. तरी लतीफ शाहशी संगनमत करून त्या गढीवर जावे, प्रयत्न करून ती ताब्यात आणावी आणि शत्रूला नेस्तनाबूद करुन सदिच्छा व्यक्त करावी म्हणजे उत्कर्ष केला जाईल. ता.२५ साबान हि १०८६

हे फर्मान मादो भानजी मुजुमदार यांच्या परवानगीने निघाले.

सरस्वती मंदिर	अनु. ३	श. १५९९ इ. १६७७

राजश्री मालोजी राजे घोरपडे यासी :—

अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य प्रति राजश्री शिवाजी राजे जोहार उपरि पूर्वी निजामशाहीतून आमचे बाप कैलासवासी महाराज (—शहाजी) इभराईम अदिलशाहा पादशहाचे कारकिर्दीस इकडे आले, त्यास इभराईम अदिलशाने पादशाही कारभाराचा मदार महाराजाचे सिरी टाकिला तेव्हा महाराजाने हा विचार केला की, पादशाही मदार आपले हातास आला असता आधी तो आपले जातीचे लोक मराठे याला हाती धरुन सरदारकी करुन पोटे भरितात ते पादशाही वजीर करावे पादशाही कामे याजकडून करऊन नामोश होय इजती थोर पावेत ते करावे म्हणून तुमचे बाप बाजी घोरपडे सरदारकी करून होते ते आणून (इभराईम) पादशाहास भेटऊन पादशाही वजीर केले त्या दिवसापासून तुमच्या बापाच्या हाते व तुमच्या हाते पादशाहीची कामे होत आली. पादशाहानी तुमचे चालविले ऐशा तीन पिढ्या पादशाहाच्या दोनी पिढ्या तुमच्या जाल्या ऐशियास महाराजाने (शहाजीने) तुमच्या बापास (बाजीराजास) इतके बरे केले हे स्मरण न धरून जेव्हा काही मुस्तफाखानाने महाराजास दस्त करविले तेव्हा तुमचे बाप बाजी घोरपडे हमी होऊन महाराजास दस्त करून मुस्तफाखाचे हाती दिल्हे त्या दिवसापासून तुमच्या घराणियाचा व आमच्या घराणियाचा दावा वाढत चालिला तो कित्येक झगडियात तुम्ही आमचे लोक मारिले व आम्ही तुमचे लोक मारिले आदिकरुन तुमचे बाप बाजी घोरपडे याचा आमचे लोकी झगडियात मारले ऐसा परस्पर दावा चालिला होता ऐशियास सांप्रति राजकारण वर्तमान तरी दक्षणेचे पादशाहा तीन निजामशहा आदिलशाहा कुतुबशाहा त्यामध्ये निजामशाही पादशाही बुडाली ते समई निजामशाही उमेद वजीर होते त्याणी आदिलशाही दरगाशाही रुजूवाती करुन आपणास रोजगारास जागा केली हाली आदिलशाही बहलोलखान पठाणी घेतली पादशाहा लहान लेकरु नाम मात्र ते आपले कैदेत ठेवले आहेत आणि तख्त व छत्र विजापूरचा कोट पठाणाने कबज केला आहे काही गुबारुन मिळाला नाही ऐशियास दक्षणेचे पादशाहीस पठाण जादा हे गोष्टी बरी नव्हे पठाण बळावला म्हणजे एका उपरि एक कुली दक्षिणियांची घरे बुडवील कोण्हास तगो देणार नाही एसे आम्ही समजोन हजरत कुतुबशाहा पादशाहा यासी पहिले पासून रुजुवात राखिली होती त्यावरुन सांप्रत हजरत कुतुबशाहानी मेहरबानी करुन भेटीस येणे म्हणून दस्तखत मुबारक व दस्तपजियानसी फर्मान सादर केला त्यावरुन आम्ही येऊन हजरत कुतुबशाहाची भेटी घेतली ते समई पादशाही आदब आहे की शिरभोई धराबी तसलीम करावी परंतु आम्ही आपणावरी छत्र धरिले असे ही गोष्ट कुतुबशाहास मान्य होऊन शिरभोई धरणे व तसलीम करणे हे माफ केले पादशाहा तिकडून आले आम्ही इकडील गेलो पादशाहानीबहुतच इजती होऊन गळ्यास गळा लाऊन भेटले आम्हास हाती धरून नेऊन जवळी बैसविले कितीएक मेहरबानी जाहिर केली आणि कुतुबशाहाचा व आपला घटी बरेपणा करून घेतला याउपरि राजकारण विषई हजरत कुतुबशाहानी माद्दणापंतास व आम्हास एकचित करुन ऐसा तह केला की जो काय उभयवर्गी तह यावा तो आपण कबूल करावयाचा ऐसा कुल मनसबा व मदार आम्हावरी टाकिला आहे की, आपली पादशाही जितकी वाढू ये तितकी वाढवणे पठाणाची नेस्तनाबूद करणे दक्षणची पादशाही आम्हा दक्षणीयांच्या हाती राहे ते करावे म्हणून त्यास हा मनसुबा ये प्रसंगौ आमचे हातास आलियाउपरि आम्ही हाच विचार केला की जे काही आपले जातीचे मराठे लोक आहेती ते आपले कटात घेऊन कुतुबशाहासी त्याची रुजूवात करावी दौलत देवावी त्याचे हाते पादशाही काम घेऊन पादशाहाची पादशाही दराज करावी आणि तुम्हा लोकांच्या दौलताहि चालत घरे राहते ते करावे आपल्या जातीच्या मराठिया लोकाचे बरे करावे हे आपणास उचित आहे. ऐसे मनावरी आणून तुमचा आमचा वडिलापासून दावा वाढत आला तो आम्ही मनातून टाकून निःकपट होऊन तुम्ही मराठे लोक कामाचे तुमचे बरे करावे ऐसे मनी धरुन हजरत कुतुबशाहासी बहुत रीती बोलोन तुम्हास हजरत कुतुबशाहाचा कौलाचा फर्माना घेऊन पाठविला आहे तरी तुम्ही कुलीन आमचा भरोसा मानून देखत पत्र हरएक उयाये पठाणापासून निघून मजलदरमजल भागानगरीस आम्हापासी येणे त्यास तुम्ही तरी स्वार होऊन व मजल दरमजल यालाच परंतु आपला खुलासा नेमस्त मुद्दा व इतबारी हेजीब बहुत सत्वर पुढे पाठवून देणे की, तुम्हाहुन पुढे चार दिवस

आम्हापासी यावे ऐसा पाठवून देणे म्हणजे हजरत कुतुबशहास अर्ज करुन दौलतचे नेमस्त करुन कौलाचा फर्माना दस्तपंजे मुबारक घेऊन फर्मान व लुगडी मोहताप तुम्हास पाठऊन देऊन ते घेऊन येऊन आमचे हाते हजरत कुतुबशहाचे भेटणे ए प्रसंगी ऐसे तुमचे दौलतीचे काम मजबूत करुन देतो की, पुढे बहूत बरे केले ऐसे तुम्ही आठवावे तुमचे पुत्रपौत्र आठवीत व दौलत थोर होए व हजरत कुतुबशहाचे काम तुमचे हाते होऊन ये यैसा समय आहे ऐशियास तुम्ही कदाचित ऐसा विचार कराल की आदिलशाहाचे आपण दो चौ पिढीचे वजीर आणि आता विजापुराकडून कुतुबशाहीत (शिवाजी) राजे यांचे बोले कैसे जावे तरी जे समई खवासखान धरिला विजापुराचा कोट पठाणे घेतला विजापूरचा पादशहा धाकटा आहे त्याला कैदेत ठेविले तेच समई पादशाही बुडाली विजापूर पठाणाचे हातांस गेले आता आदिलशाही कैची आणि उगीच तुम्ही तेथे आपली आदिलशाही आहे म्हणून गुंतून राहिले आहा जरी पठाणाचीच चाकरी करोन राहो म्हणाल तरी पठाण काही तुम्हास थोर दौलत देणार नाही आणि पठाणास तरी हजरती कुतुबशाहा व आम्ही तमाम दखणी मिळोन चालोन घेऊन वुडवीतच आहो तुम्ही मराठी लोक आपले आहा तुमचे गोमटे व्हावे म्हणून पष्टच तुम्हास लिहिले असे जे काय तुम्हास पठाण देतो त्याची दुगुणी आम्ही कुतुबशाहापासून तुम्हास देवीतच असो किंवा ह्याहून अधिकहि होऊन येईल तरी करुन देऊच सर्व प्रकारे तुमचे गोमटे करुन एविसी आम्हापासून अंतर पडे तरी व मागील दावियाचा किंतु मनातून टाकिला एविसी आम्हास श्री देवीची आण असे तुम्ही निःसंदेह होऊन येणे हेबीज आपला पुढे पाठविणे त्या हाती आम्हासी घरोबियाचे बरे वर्तावे मागील दावियाचा किंतु मनातून टाकिला ऐसे आपला आराध्य व कुळस्वामी असेल त्याची शपथ लिहून पत्र हैजिबा हाती पाठवून देणे आम्ही सर्वप्रकारे तुमचे गोमटे करावयासी अंतर पडो न देऊन बहुत काय लिहिणे.

शिवाजी सोव्हिनर

आकण्णा व मादण्णा.

कुत्बशाहींतील प्रख्यात ब्राम्हण मुत्सद्दी. हे दोघे सख्खे बधु असून, यांची अकरस भानजी व माधो भानजी अशी नावे होती. यांचे आडनांव पिंगळी. स. १६६६ त अब्दुल कुत्बशहाच्या कारकीर्दीत हे दोघे गरीब ब्राम्हण गोवळकोंड्यास आले, व सय्यद मुस्तफा नांवाच्या मोठ्या सरदाराकडे चाकरीस राहिले. आकण्णा धूर्त व पुरा व्यवहारी माणूस होता. मादण्णा विद्वान असुन फारसी व हिंदस्थानी या भाषा उत्कृष्ट जाणत होता. मुस्तफाच्या वजनामुळे या दोघा बंधूंची दरबारीही वग होती. स. १६७२ त अब्दुल कुत्बशहा मेला आणि त्याचा जावई अबुलहसन ऊ. तानशहा गादीवर आला. तानशहा स्वभावतःच छंदीफदी आणि विलासी होता. आकण्णा–मादण्णाचे दरबारचे वाढते वजन पाहून तानशहाने मादण्णास आपली वजिरी दिली. स. १६७७ त शिवाजीची व तानशहाची भेट करवून दोघांचे हितसंबंध मादण्णानेच दृढ करण्याचा प्रयत्न केला. शिवाजीबद्दल त्यास फार प्रेम वाटत असे. म्हणून त्याने शिवाजीस आपल्या घरी बोलावून मेजवानी दिली. आणि आपले मातोश्रीचे हाती पाक सिद्ध करून मादण्णापंत व आकण्णापंत जवळ बसून राजियास भोजन घातले. (सभा. ८८).तथापि दरबारी ब्राम्हण कारभारी व शिवाजीशी दोस्ती या दोन भयंकर गोष्टी तानशहाने केल्या व चालू ठेवल्या, म्हणून औरंगजेबाचा तिळपापड झाला.मरहूम सुलतानाच्या बायका सरूमा व जानी साहिबा या आकण्णा व मादण्णा यांच्या विरुद्ध होत्या. तथापि त्यांजविरुद्ध प्रत्यक्ष या बायांस काहीच करता येण्याजोगे नव्हते. औरंगजेबाचा वकील मीर्झा महंमद हा गोवळकोंड्यास होता. तो वेळी अवेळी तानशहास टाकून बोलण्यास चुकत नसे. खुद्द मादण्णा स्वतः कितीही हुषार असला तरी एकंदर कुत्बशाहीच इतकी डबघाईस आली होती की, ती फिरुन जोमदार करण्यास मादण्णाच्या जोडीला एखादा तलवारबहादरच पाहिजे होता. स. १६८३ त औरंगजेब दक्षिण जिंकण्याकरिता आला. तेव्हा मादण्णास प्रधानपदावरून दूर

करण्यास तानशाहास त्याने फर्माविले. तानशहाने हा बादशाही हुकूम कागदावरच ठेविला. अखेरीस स १६८६ त खुद्द गोवळकोंड्यावरच औरंगजेबाचा मुलगा शहा आलम चालून आला. या स्वारीस सर्वस्वी आकण्णा व मादण्णा हे कारणीभूत आहेत, अशा समजुतीने क्रोधाविष्ट झालेल्या काही मुसलमानांनी या बंधूस मारण्याचा कट केला. शेख मिनहाज नांवाचा कटवाल्यांचा पुढारी होता, आणि सरुमा व जानी साहिबा यांचीही त्यास अनुमति होती. स. १६८६ मार्च महिन्यात एके दिवशी तानशहाशी मादण्णापंत व आकण्णापंत खलबत करीत होते. तो रात्र झाली. खलबत संपवून घरी येण्यास निघाले. मारेकऱ्यानी पाळत ठेविलीच होती. संधी साधून मारेकऱ्यांचा म्होरक्या जमशीद याने दोघावर भर रस्त्यात वार केले. इतर मारेकऱ्यांनीही तलवारी चालविल्या. त्या बंधूंचा पुतण्या रुस्तुमराव नावाचा होता. त्याचा घरापर्यन्त पाठलाग करुन त्यासही त्यांनी ठार मारिले. शहरांतील ब्राम्हणांच्या मोहल्यावरही असाच हल्ला करुन कित्येक घरादारांची धूळधाण केली. आकण्णा व मादण्णा यांच्या मृत्यूने औरंगजेब प्रसन्न होईल आणि कुत्बशाही वाचेल, असे जमशीदला वाटले असावे. पण औरंगजेब तर प्रसन्न झाला नाहीच आणि बिचाऱ्या कुत्बशाहीचे मात्र त्याच साली निर्मूलन झाले. (सरकार, औरंगजेब, ग्रंथांक—४).

आदिलशाहीत मुरार जगदेव द्यानतराव, निजामशाहीत साबाजी अनंत ऊ. चतुर साबाजी आणि कुत्बशाहीत आकण्णा—मादण्णा हे सतराव्या शतकात दक्षिणेतील नामांकित मुत्सद्दी होऊन गेले. या तिघांचेही शेवटी खूनच झाले, ही विशेष दुःखाची पण लक्षात घेण्यासारखी गोष्ट आहे. तथापि त्या काळी प्रसिद्ध पुरुषांचे खून होणे ही आश्चर्याची गोष्ट नव्हती. ते एक लौकिकाचे पर्यवसान होते.

१९२७ शिवाजी सोव्हिनर

अब्दुल करीम ऊ. बुहलोल खान.

हा मूळचा अफगाणिस्थानचा पठाण फिरत फिरत हिंदूस्थानात आला. मोगल सरकार खान जहान याजकडे तो आश्रयार्थ गेला, तेव्हा त्याने त्यास आपल्याजवळ ठेवून घेतले. खान जहानची दक्षिणच्या सुभेदारीवर शहाजादा पर्वीझचा मदतनीस या नात्याने स. १६०९ त नेमणूक झाली. त्याच वेळी अब्दुल करीम आपल्या धन्याबरोबर दक्षिणेत आला. खानजहानने पुढे बादशहा शहाजहान विरुद्ध बंड केले. परंतु शहाजहानच्या सैन्यापुढे त्याचा टिकाव लागला नाही. तेव्हा तो विजापुरास आश्रयास गेला. तेथे आश्रय न मिळाल्यामुळे खानजहान इकडून तिकडे पळत सुटला व अखेरीस उत्तरेत कलिंजर येथे तो स.१६२९ त मारला गेला. खान जहानची उरली सरली संपत्ति अब्दुल करिमला मिळाली आणि तो तडक विजापूर दरबारी गेला. पूर्वी खानाबरोबर तो तेथे एकदा गेला होताच. दरबारने त्याला बकापूरचा नबाब नेमून त्याची कर्नाटकात रवानगी केली. विजापूरच्या इतिहासात तीन क्रांतिकारक प्रसंग आले. एक, स. १६३६ चा. यात शहाजहान व विजापुरकर यांच्या प्रदेशाच्या मर्यादा ठरल्या. दुसरा स. १६५६ चा. या साली १८ वर्षाचा अली अदिलशहा गादीवर आला, आणि कानडा, धारवाड कर्णूल आणि बल्लारी येथील संस्थानिकांनी याच वेळी बंडाचा उठाव केला. पण वेळीच अब्दुल महंमद हा कर्ता वजीर लाभल्यामुळे पुनश्च स्थिरस्थावर झाले. तिसरा प्रसंग स. १६७२ चा. या वेळी पठाण व दक्षिणी मुसलमान यांचा बेबनाव झाला, तरी आणखी पंधरा वर्षे आदिलशाहीचे आयुष्य शिल्लक होते. असो. बहुधा या तीनही प्रसंगी बहलोल खान हजर होता. तथापि पहिल्या वेळी अगदी नवशिका म्हणून व दुसऱ्या वेळी असमर्थ म्हणून. दोन्ही वेळी बुहलोल खानास पुढ येण्यास वाव मिळाला नाही. मात्र शिवाजीच्या वाढत्या सत्तेस तोंड देण्यासाठी अली आदिलशहाच्या कारकीर्दीत मिरज, पन्हाळा व कोकणच्या सुभेदारीवर त्याची नेमणूक झाली, आणि त्याच वेळी दरबारी

याचा चंचुप्रवेश झाला. दरबारात मुसलमानांची दुफळी झाली होता. एक पठाण पक्ष व दुसरा दक्षिणी मुसलमानांचा पक्ष. मुख्य वजीर अब्दुल महंमद खंबीर होता, तोपर्यन्त या पक्षांनी आपली डोकी वर काढली नव्हती.

शिवाय, जयसिंगाची मोहीम हे एक मोठेच गडांतर आल्यामुळे काही काल या पक्षभेदास पख फुटले नाहीत. स. १६७२ त अली आदिलशहा मेला व चार वर्षाचा सिकंदर गादीवर आला. अब्दुल महंमद या जुन्या व कर्त्या वजीराने पूर्वीप्रमाणे कारभार करण्याचे नाकारले. मात्र राज्याचे चार विभाग करून खवासखान, बुहलोलखान, मुजफरखान व खुद्द अब्दुल महंमद यांनी एकेक विभाग सांभाळावा असे ठरविले. परंतु खवासखानाने सारी सत्ता आपणाकडे घेतली आणि खुद्द अब्दुल महंमदासही धाब्यावर बसविले. पक्षभेदास तोंड फुटले. बुहलोल हा पठाण पक्षाचा आणि खवासखान दक्षिणी पक्षाचा पुढारी होता. परंतु खवासखानाच्या हाती अधिकार होता. खेरीज त्याने दक्षिणचा मोगल सुभेदार बहादूरखान याच्याशी सलोखा केला होता. स. १६७४ त शिवाजी कर्नाटकच्या स्वारीवर निघाला, तेव्हा दरबारच्या उचापती टाकून बुहलोलखानास सैन्य घेऊन बाहेर पडावे लागले. त्या अवकाशात शिवाजी मिरज प्रांत ओलांडून हुबळी लुटत होता. शिवाजीचा सेनापति प्रतापराव बुहलोलखानास अडविण्यास मागे होताच. त्याने बुहलोलखानास मिरज विजापुरच्या उंबराणी येथे गाठले. लढाई सूर्योदयापासून अस्तमानापर्यंत जहाली. दोहीकडील लष्कर बहुत जाय जखमी जहाले. नबाब (बुहलोल खान) याची शिकस्त होऊन तिकोट्यास राहिले, (का. सं. प. या. ४३८) पाण्यावाचून तर बुहलोलचा जीव टकीस आला, म्हणून प्रतापरावाशी सलोख्याची बोलणी बोलून शिवाजीच्या प्रांतास हात लावणार नाही असे वचन देऊन, तिकोट्यास माघारी गेला. तेथे त्यास विजापुराहून ताज्या दमाचे काही सैन्य येऊन मिळाले. तो फिरुन प्रतापरावावर चालून आला. फिरून दोघांची नेसरी येथे गाठ पडली. याच लढाईत प्रतापराव मारला गेला, (तारीख २४ फेब्रुवारी स. १६७४). या विजयाने धुंद होऊन बुहलोल विजापुरी दाखल झाला. आपल्या पराक्रमी सेनेची चढलेली तलब तत्काळ मागविण्याची त्याने खवासखानाजवळ मागणी केली. ही तलबेची भाषा ऐकताच खवासने बहादूरखानास मदतीस बोलाविले. बुहलोलही तितकाच धुर्त होता. पुढील अतिप्रसंग टाळण्यासाठी त्यानेही चटकन आपली पगडी फिरविली व तलब चढली आहे खरी, पण ती सावकाशीने मागविली तरी चालेल, अशी नरमाईची भाषा सुरु केली. खवासखान भाबडा, त्याला ही बतावणी खरी वाटली, आणि बुहलोलच्या बोलण्यावर विश्वास ठेवून तो स्वस्थ बसला. पण बुहलोल टपून बसला होता. बातमी राखून त्याने खवासखानास ता. ११ नोव्हेंबर स. १६७५ रोजी दारुच्या निशेत पकडून बंकापूर येथे कैदेत ठेविले. अशारीतीने बुहलोलचा म्हणजे पठाण पक्ष विजयी झाला खरा, पण मोगलांचे अरिष्ट टळले नव्हते, आणि शिवाजीची चढाई थांबली नव्हती. शिवाय खवासखानानंतर सय्यद मकदम सर्जाखान हा दक्षिणी मुसलमानांचा पुढारी झाला. परंतु सेनापति व वजीर हे दोन्ही अधिकार बुहलोलखानकडेच होते. याने भराभर नवीन पठाण अधिकारावर नेमिले व खिजरखान पन्नी यास सल्लागार केले. हा पन्नी स. १६७६ त दक्षिणी मुसलमान पक्षाकडून मारला गेला. त्यामुळे चिडून जाऊन बुहलोलने खवासखानाचा वध केला.

खवासखानची बाजू घेऊन सर्जाखान उघडपणेच युद्धास तयार झाला. मरहुम पत्नीचे दोन पुत्र व बहुलोल यांनी लढाई दिली. सर्जाखानाचा मोड होऊन तो बहादुरखानाकडे गेला. बहादुरखानाने जंगी फौज घेऊन सर्जाखानास पाठीशी घातले व बहुलोलखानास झुंजीची सलामी दिली. तथापि या युद्धाचे पर्यवसान आदिलशाही पूर्णपणे मोगल सत्तेच्या अंकित होण्यात झाले, आणि सीदी मसाऊद यास बादशाही मान्यतेने वजिरीचे अधिकार देण्यात आले. मात्र बहुलोलखानाची महत्वाकांक्षा जागच्या जागीच राहिली.

तह पक्का होऊन मसाऊद वजिराच्या पदावर आरुढ होण्यापूर्वीच बहलोलखान २३ डिसेंबर १६७७ रोजी हिरापूर येथे मृत्यू पावला.

(अ.घ. इ. का. सं. पाया. ४३८ सरकार औरंगजेब ग्रंथांक– ४)

अली कुली.

शिवाजी आग्र्याहून पळून गेल्याची बातमी बादशहाने आपल्या राज्यातील अधिकाऱ्यास कळविली व तो सापडेल तेथे त्याला पकडण्याचा हुकूम फर्माविला एके दिवशी रात्री काही बैरागी अली कुलीच्या अधिकाराखालील एका गावी आले. तेथील फौजदार या नात्याने संशयावरुन अलीने त्या बैराग्यांस पकडले. हे बैरागी म्हणजे शिवाजी व त्याचे लोक होते. अटकेत असताना शिवाजीने अलीच्या समोर जाऊन, "मीच तो शिवाजी असे बिनधोकपणे सांगितले, आणि लगेच आपल्या जवळचा एक मौल्यवान हिरा त्यास दिला. तेवढ्याने त्याचे समाधान झाले, आणि शिवाजी सुरक्षितपणे तेथून सुटून पुढे निघाला. अली कलीच्या वरील गावाचे नाव आढळत नाही. (सरकारकृत शिवाजी).

सनदपत्रातील माहिती – प्रकरण २ रे.

मुसलमानी राज्यातील सनदापत्रे

२९ मालोजीराय घोरपडे यांची सनद

(पान नं. २९ ते ३०)

श्री इ. स. १६८०

अजरष्टखाने मशुरूल अनाम राजश्री मालोजीराय घोरपडे साहेब. दामदौलतहु बजानेबु कारकुनानी व देसाई यांनी परगणे केळूर ममदाबाद, सुरूसन इहिदे समानीन अलफ दरिविला. श्रीनिवासभट बिन वेंकटभट दुनारदार साकीन मुद्रल हुजर येऊन मालूम केले जे, आपणास इनाम व राजेमरा दरसवाद.
कसबे मजकूर वगैरे.

जमीन रेगडी.
१ कसबे होनगुंदे.
१ तिमापूर.
१ कलदेवनहाल.
१ बेवीन मोठी
४

राजेमरा जकाईत पैकी रोजीना रूक्के बारा

यासी दुतर्फा दरवाद कसबे मजकूर.

कार्तिकमास. माधमास.

वैशाखमास.

दरमाहे शेला १ एकूण

=एकूण—प =सादिलवार—मि भोगवटा.

दरसवाद मौजे रामवाडिगी जमीन कुडो =.

येणेप्रमाणे बहहुकुम खुर्दखताने मा मुकासा ईखानी कारकीर्दी दरकारकीर्दी महाल नख्त याती व बाजे उडबती व पायपोसा व मेजवानीपटी व बेलेकटी व कबुलायती व मोहिमखर्च कुलबाब, कुलकानू भोगवटा तसरुफाती तागाईत सालगुदस्त चालत आहे. हल्ली साहेबास मुकासा अर्जानी जाला आहे. महालीचे कारकून खुर्दखताचा उजूर करितात हाणून मालूम केले, तरी भोगवटा व तसरूफाती तागाईत सालगुदस्त चालिले असेल त्याप्रमाणे चालवावे. तालिक घेऊन अस्सल परतोन दीजे.

तारीख २८ माहे रमजान. रुजू सुरनीस

सनदापत्रातील माहिती— प्रकरण २ रे.

मुसलमानी राज्यातील सनदा पत्रे.

३० खंडोजी घोरपडे यास मिळालेली सनद.

(पान नं. ३० ते ३१)

इ. स. १६८१

(बिस्मिल्लाह आर रहिमान नीर रहीम सर्व मुलूख ईश्वराचा आहे.)

सामर्थ्य व श्रेष्ठतेस आहे आधार ज्याचा, व शूरत्व व पराक्रमास आहे आश्रय ज्याचा, व अति संभावित वजिरांतील जे प्रमुख व यशाचे चिन्हाचे मान्यतेस वाढविणार, व पराक्रमाचे अरण्यांतील पंचानन व बुद्धिमानपणाचे समुद्रांतील सुसर व श्रेष्ठ आहे राहणी ज्याची, व सांप्रतचे काळांतील सर्व शिपाई मंडळीचे सरदार व उत्तम मित्रतेचे मित्र व स्वामीकार्यार्थी प्राण अर्पण करणार असे जे नबाब बहलुलखान सर हवालदार व सामर्थ्य व श्रेष्ठतेस आहे आधार ज्याचा, असे जे मखदुमखान मिरानखान हवालदार व कारकुनास मामले मूर्तजाबाद उर्फ मिरज यास हा अति कल्याणकारक फरमान सादर केला जातो जे :— सुरसन समानीन व अलफ पासून पादशाही कृपेच्या मार्गाने व पादशाही अतिकृपेचे रीतीने मौजे तादुळवाडी व मौजे कुंडलवाडी व मौजे ढवळी उर्फ टाकळी व मौजे मालेवाडी व मौजे इटकरे व कसबे अष्टे, कर्यात मजकूर व मामले मजकूर मलिक चांदमहंमद याजकडे होते ते, हे सदरहू गांव साम्यतेचे मंडळीचे उपमेहून जे अधिक असे जे खंडोजी घोरपडे यांस् कुलबाब व कुलकानूसुद्धा व खेरीज तंबाकू वेटबेगार व जकात सहित स्वामींनी कृपाळू होऊन इनाम दिल्हे असे. तर मौजे व कसबे मजकूर हे गांव घोरपडे यांचे दुमाला करावे व मशारनिल्हेचे इलाखेदार म्हणजे कुटुंबातील घरमंडळीचे खर्चाकडे द्यावे. म्हणजे ते जाणोन वहिवाट करितील. तारीख १ सन १०९१.

ऐ. फारसी साहित्य खं. १

ले. ६६ श. १६०८ श्रावण शुद्ध १३

हि. १०९७ रमजान ११ इ. १६८६ जुलै, २३

(फा. शि.)

सारांश.

नेगोजी, मुकुंदजी, विठोजी, रौलोजी व तुकोजी यशवंतराव घोरपडे यांनी जाणावे की, तुम्ही पाठविलेला अर्ज पोहचला व त्यातील मजकूर स्पष्ट झाला तुमच्या शिपाईगिरीची व प्राणार्पणाची हकीकत वाकेनवीसांच्या अख्बारावरून सुव्यक्त झाली. यावेळी व्यंकटी हगरस (जगरस) सर्व कर्नाटकच्या हाकिमांचा सरशुरअ याने तुमची जी हकीगत हुजूर लिहिली ती सुष्ट झाली. आता तुम्ही उत्तम परिणामाची आशा करीत आहात. तरी उपर्यूक्त व्यंकटी तुम्हास जो काही दिलासा देईल तो हुजूरचा दिलासा जाणून त्याच्या म्हणण्याप्रमाणे पादशाही चाकरी व काम यात प्राणार्पण करावे म्हणजे उत्कर्ष होईल, ता. ११ माहे रमजान सन १०९७.

राजारामाची दिल्लीन्द्रपद प्राप्रिची इच्छाव योजना

ले. ७६७		श. १६१३ जेष्ठ व ॥ ४ गुरूवार
सु १०९२ रमजान १६		इ. १६९१ जून ४

मुसनादर होये श्री वजारतमाब राजेश्री हणमंत

(रक) म मजुरा घोरपडे गोसावी

अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य राजश्री प्रती राजाराम छत्रपची उपरी तुमचे विशई राजश्री नागोजी माने येही विनंती केली की तुमचा मुदा स्वामीच्या राज्यात यावयाचा आहे. स्वामीने त्याज योग्य भाग्य दिधतिया त्या प्रती राजश्री रामचंद्र पंडित अमात्य याचकडे येतील म्हणौन विदित केले त्यावरुन तुमचा मनोदेये कलला की महाराष्ट्र धर्म पूर्ण रक्षावा दैसा (स) कलप (कलप) स्वामीनी जानून तुम्हावरी (कृपाळू होऊन) राजश्री कृष्णाजी घोरपडे उभयतास भाग्ये होन ५ ॥ ६००००० दिल्हे आहे बि॥ खा॥ तुम्हास भाग्य होन ५०००००

राजश्री कृष्णाजी घोरपडे यास

भाग्य पा॥ होन १०००००

३५००० खा॥ जातीस	५००० खा॥ जातीस
४६५०० स्वार ३८७५	९५०० स्वार ७९२
तेजी तुरवी	तेजी तुरकी
३४८८, ३८७	७१३ ७९

ता	यैन मजूरास्त
यैन मजूरादास्त	७८०
३८६३	
१० हती हतीण	१० हस्ती हति
चालविली तरी ५ मजूरा	गीस ५ मजूरा
	२/१२ उट दभापा
२ उट दयाया	बारा हजारी प्रमाणे
१२ हजारी	पा होन
पाहोन	
५०००००	१०००००

येणेप्रमाणे चालवावयाचा निश्चय करुन (दिध) ला असे धरघोड धडमाणूस जमाव ठेवऊन स्वामिसेवा करावी. यास सरजाम द्यावयाचा तह

	ख ा ा तुम्हास होन ५ ा ा
६२५००	रायेगड प्रात कबज जालिया उपरी सरजाम
६२५००	विजापूर हस्तगत जाल्यानंतर द्यावे
६२५००	भागानगर घेतल्यास
६२५००	औरंगाबाद घेतल्यावर
२५००००	दिली घेतलेवरी
५०००००	

राजश्री कृष्णाजी घोरपडे

१२५००	(रायग) ड प्रांत कबज (केल्यावरी)
१२५००	विजापूर हस्तगत झाल्यावरी
१२५००	भागानगर घेतल्यावर
१२५००	औरंगाबाद घेतल्यावर
५००००	दिली घेतलेवरी
१०००००	

येणेप्रमाणे सहा लक्ष होन पत सरंजाम करुन द्यावयाची निश्चय केला आहे नवेस्वाराचा जमाव माफिक सरंजाम करुन देऊ येकनिष्ठपणे सेवा करावी स्वामितुमचे बहुत प्रकारे चालवितील. गनिमाकडील लुटीचाजो जिनस येईल त्यापैकी निमे द्रव्य वहती व निशाण व दमामा यैसे स्वामिचे वरकड घोडी सहित तुम्हास माफ असे १६ रमजान सुम इसने तिसैन अलफ (नि) बहुत काय लिहिणे तरी सुज्ञ असो (१) पत्रात राजारामाचा शिक्का मोर्तब नेहमीप्रमाणे
पा. स. ५ / १८५१

ले. ९२३	श्री.	श. १६१४
मू. दा. प.		इ. १६९२

अखंडित लक्ष्मी अलंकृत राज्यमान्य राजेश्री अताजी उधव गो ———

श्री धर्म प्र
द्योतिताशेष व
र्णा दाशरथे रिव
राजारामस्य मुद्रे
यं विश्ववंद्या
विराजते
(वर्तुळाकार)

प्रती राजेश्री राजाराम छत्रपती उपरी सांप्रत तुम्ही या राज्यामधे येऊन अपले उर्जित करुन घ्यावे यैसी उमेद धरिली अहे म्हणून राजेश्री हणमतराव घोरपडे येही विदित केले त्यावरुन स्वामी सतोसी जाले तुम्ही घराणदार व कार्यकर्ते लोक तुमचे चालवणे स्वामीस अगत्यच आहे यैसियास प्रस्तुत स्वामी तुम्हावरी कृपाळु होऊन तुम्हास २०००००ा— दोनी लक्षा होनाची दौलत दिल्ही आहे तरी तुम्ही अपल्या जमावानसी रो रामचंद्र पंडित आमात्य याजकडे येणे तुमच्या सरंजामाचे विशी स्वामीनी पंडित मारनुलैस आज्ञा केली असे अज्ञे प्रा मारनुले तुमचा सरजाम करुन देती तुम्ही कोणेविशी अनमान न करिता अपल्या जमावानसी पंतमारनुलेस शामील होणे तुमचे चालवण्यास व उर्जित करावयास स्वामी कडून अतर पडणार नाही. जाणिजे बहुत काये लिहिणे (मर्यादेचं विराजते हा मोर्तब).

ले. ९२४	श्री	श. १६१४ ज्येष्ठ शु. १३
मू. दा. प.		इ. १६९२ मे १८

स्वस्ति श्री राज्याभिषेक शक १९ आगिरा नाम संवसरे जेष्ठ श्रुध त्रयोदसी सौन्यवासरे क्षत्रिय कुलावंतस श्री राजाराम छत्रपती याणी समस्त सेनाधुरंधर राज्यमान्य राजश्री संताजी घोरपडे यांसि आज्ञा केली अैसी जे राजश्री हणमंतराऊ घोरपडे वजारतमाब हे स्वामीच्या पायासी यकनिष्ट होऊन त्या प्रांती जमावानसी सेवा करिताती त्याचा सरंजाम पोख्ता जाहला नाही तरी सरंजाम क न देविला पाहिजे म्हणोन राजश्री नागोजी माने याणी विनती केली त्यावरून सरंजाम करून दिल्हा असे बिता स्थूलमानाने म्हणण्यास हरकत दिसत नाही. ह्या हिशेबाच्या मांडणीत अर्थातच गणिती काटेकोरपणा असणे शक्य नाही. विशिष्ट

आर्थिक परिस्थितीत अनुसरून हक्कदारांच्या मुशाहिऱ्यात फरक केला जाई हे लक्षात ठेविले पाहिजे. शिवाय, चर्चेच्या आधारास आवश्यक असलेले कागद थोडे व असमाधानकारक असल्या अडचणीतून अनुमानाचा मार्ग काढावयाचा असल्यामुळे कोणताहि सिद्धांत ठासून पुढे मांडता येत नाही. तथापि नवीन उपलब्ध झालेल्या माहितीचाच प्रकाश पूर्व प्रकाशित कागदावर पाडून त्यात वर्णिलेल्या वस्तुस्थितीचे आकलन अधिक सुक्ष्म रीतीने करण्याचा हा प्रयत्न आहे. जास्त व विश्वसनीय माहिती मिळाल्यास सध्याचे अनुमान जरूर तरदुरूस्त करण्यास मुळीच हरकत नाही.

हणमंतराव बिन कृष्णाजी घोरपडे देशमुख यांस इनाम गावे दिल्याचे वृत्तीपत्र

रा. भि. २३		**श. १६१८, पौष शु. ११**
	क्र ४४	
पौष शु. ११	**श्री**	**इ. १६९६, डिसेंबर २४**

[पुणे जमाव २२९.] स्वस्ति श्री राज्यभिषेक शके २३ धातृनाम संवत्सरे पौष शुध येकादसी गुरूवासर क्षत्रिये कुलावंतंस श्री राजाराम छत्रपती स्वामी याणी राजश्री हणमंतराव बिन कृष्णाजी घोरपडे देशमुख किले वंदन कर्यात अंगापूर यासि दिधले वृत्तीपत्र यैसे जे तुम्ही चंदीचे मोकामी स्वामीसमीप विदीत केले की आपणास किले वंदन (मो. जा.)

कर्यात अंगापूर प्रांत
सातारा व सा कऱ्हाड
देखील परली याचे
देशमुखीचे
वतन आदलशाहाचे
कारकीर्दीस
चालिले आहे या वतनास
आपणास हक लाजिमा व
इनाम बा फर्मान गावगना
बिा

गला कैली दर		
चावरास कुडो	दर चावरास	
सालिना	१ येकून	नख्त होन
कमल १	सालिना	। ।
दर मागास सालिना प्रताप या ।		
पा टके येकून	कलम १	
कलम १	दर गावास	
दर घाणियास	सालिना बकरा १	
तेल गांवगना		

नूतन इनाम गांव कर्याती
अंगापूर प्रांत सातारा पैकी
देशमुखीचे गाव वतनाचे
आहेत यैसियासि स्वामीच्या
पायापासी येकनिष्ठता
धरून कर्नाटक प्रांतास
स्वामीसनिध अलो त्यावरी
अयेवार कुटियाच्या
मुकाजी संताजी घोरपडे
व राजश्री धनाजी जाधवराव
या उभयेतामध्ये जुझ जाले[२]
त्यासमई आपण कस्त मेहनत
बहुत केली ते स्वामीस
विदीतच आहे तरी स्वामीनी
कृपाळू होऊन आपणास
नूतन इनाम देविले पाहिजे
देहाये २ दोनी बितो ।

अशाच प्रकारचे आज्ञापत्र थोड्याफार फरकाने सनदापत्रातील माहिती (संपा. मावजी व पारसनास, मुंबई, १९१३) पृ. १७७ ते १७९ मध्ये प्रसिद्ध झालेले आहे. त्या पत्राहून प्रस्तुत पत्रातील तपशील अधिक आहे.

२ मे १६९६ त संताजी घोरपडे व धनाजी जाधव याच्यांत कांची अलीकडे भांडण झाले. त्यांत अमृतराव निंबाळकर पडला. धनाजी पळून देशास आला. जेधे शकावली (शिचप्र), पृ. ३८.

दररोज
नौटाक कलम १
आंबराईस आंबे
गावगना दरसदे ५
प्रा येकून कलम १
वेंदरा (स) सणास
तेल गूल गावगना
सेब येकून कलम १

येकून कलम १
तूप गांगवना
दर बिघा १
येक टाक गेकून
कलम १
केले दरसदे ५
गावगना येकून
कलम १
इनाम गावगना
जिरादेतचा वर
१७ाा साडे सतरा
कलम १

मौजे गोजेगाव व मौजे कांबेरी
१ १
प्रांत वाई सा कोरेगाव पैकी
मौजे येकंबे हा आपले
पाटिलकीचा वतनी गाव आहे
या गांव पैकी आपणास इनाम
भूमी देविली पाहिजे बिता

कदिम मौजे
मजकूरी भूमी
चावर जिरायेत
येक चावर
अदलशाहाचे
कारकीर्दीस

हली नूतन इनाम
मौजे मजकूरी
आंबराई अपल्या
मिरासीच्या
सेतामध्ये अहे
ते जमीन बिघे

येकून कलमे १२ बारा रास
येणे प्रा आहे त्या उपरी
हा देश राजश्री स्वामीस
हस्तगत जाल्यावरी संपूर्ण
स्वामीच्या राज्यातील
वतनदाराचा हक लाजिमा
दिवाणांत अमानत केला
त्याबरोबर आपलाही हक
लाजिमा दिवाणात अनामत
केला आणि जुजूबी
करुन दिल्हा
तेणे प्रा चालत असे
आपण वतनदार स्वामीचे

चालत होता
त्या उपरी
हा देश राजश्री
स्वामीस हस्तगत
जाल्यावरी
इनाम दिवानात
आमानत करुन
सेंभर खंडीस
गला कैली ५
पाच खंडी
प्रा देत होते
तेणे प्रा चालत
असे हली स्वामीनी

५ पांच स्वामीनी
कृपाळू होऊन नूतन
इनाम देविला
पाहिजे

सेवक सन सितामध्ये	कृपाळू होऊन
देसीहून कर्नाटक प्रांतास	अदिलशाहाचे
स्वामीसनिध आलो त्यावरी	कारकीर्दीस चालिल्या
राजश्री धनाजी जाधवराव	प्रा देविले पाहिजे

व संताजी घोरपडे या उभयेतामध्ये अयेवारकुटियाच्या मुकामी भांडण जाले त्या समई आपण व अमृतराव निंबालकर येक ठाई होतो अमृतरायानी उडी टाकिली त्या समई आपण उडी टाकून मारामारी केली हे वर्तमान स्वामीस विदीतच आहे तरी स्वामिनी कृपाळू होऊन आप (ला हक ला) जिमा इनाम चालविला पाहिजे व येणे प्रा हकलाजिमा देविला पाहिजे म्हणोन विनंती केली त्यावरुन मनास आणिता तुम्ही देशीहून कर्नाटक प्रांतास स्वामीच्या पायांपासी येकनिष्ठता धरुन स्वामीसनिध अलेत त्यावरी अयेवारकुटियाच्या भांडणी अमृतराव निंबालकर याही उडी टाकिली त्याबराबरी तुम्ही शरीक होऊन ते प्रसंगी उडी टाकून तुम्ही शूरत्वाची सीमा केली येकनिष्ट सेवक तुमचे चालवणे स्वामीस अगत्य यावरुन स्वामी तुम्हावरी कृपाळू होऊन तुम्हास येणे प्रा करुन दिल्हे असे सदरहू प्रा किले वंदन कर्यात अंगापूरपैकी व पाटिलकीच्या गावपैकी इनाम अदलशहाचे कारकीर्दीस बर्गी फर्मान प्रा व नूतन इनाम देहाये २ प्रांती अंगापूरपैकी व पाटिलकीच्या गांवपैकी इनाम भूमी अदलशाहाचे कारकीर्दीस चालिल्या प्रा १ येक चावर जिरायेत व नूतन आंबराई बिघे ५ पांच रास दिल्हे असे तरी किले वंदनची देशमुखीस हकलाजिमाइनाम बर हुकूम फरमान अदलशाहा व देहाये २ दोनी तुम्हांस कुल बाब कुल कानू देखील हली पटी व पेस्तर पटी व पेस्तर पटी झाडझडोरा पडले पानसहित खेरीज हकदार व इनामदार करून आपले स्वाधीन करुन घेऊन तुम्ही व तुमचे पुत्रपौत्रादि बौश (परं) परे दे खील हलीपटी व पेस्तर पेटी खेरीज हकदारकरुन आपले स्वाधीन करुन तुम्ही व तुमचे पुत्रपौत्राची वौंशंपरंपरेने अनभऊन सुखरुप असणे यासी हिंदु कोणी कथला करील त्यासी वाराणसीमध्ये गोहत्या केल्याचे पातक लागेल व मुसलमान होता कोणी इस्कील करील त्यासी मकेमध्ये सोर मारिल्याचे पातक लागल यैसे जाणोन तुम्हास चालवितील जाणिजे निदेश सक्षम

Maratha Chiefs

The principal Maratha Chiefs in Satara under the Bijapur government were Chandrarav More of Javli, about thirty-five miles north-west of Satara, Rav Naik Nimbalkar of Phaltan about thirty-five miles north-east of Satara, Junjharrav Ghatge of Malavadi about twenty seven miles east of Satara, Daphale of Jath about ninety miles south east of Satara, Mane of Mhasvad about sixty miles east of Satara, and the Ghorpade of Kapshi on the Varna about thirty miles south of Karad. A person named More, originally a Karnatak chief was appointed in the reign of Yusuf Adil Shah (1490-1510) to the command of a body of 12,000 Hindu infantry sent to reduce the strong tract between the Nira and the Varna. More was successful. He dispossessed the Shirkes and completely suppressed the depredtions, of their abettors, the chiefs of whom were Gujar, Mahulkar, Mohite and Mahadik. More was dignified with the title of Chandrarav and his son Yeshvantrav, having distinguished himself in a battle fought with the troops of Burhan Nizam Shah (1508-1553), in which he captured a green flag, was confirmed in succession to his father as Raja of Javli and had permission to use the banner he had won. Thier descendants ruled in the same tract of country for seven generations and under their mild and just management that barren tract became populous. All the succcssors of the first More assumed the title of Chandrav. The unswerving loyalty of this family induced the Bijapur government to exact little more than a nominal tribute from districts producing so little, and which had always been in disorder under Muhammedan governors, Rav Naik Nimbalkar or Phaltanrav was the Naik of Phaltan. His original surname was Pavar, he had taken the name of Nimbalkar from Nimbalik or Nimbalkar where the first Nimbalkar lived. The famaily is considered one of the most ancient in Maharashtra as the Nimbalkar was made sard-eshmukh of Phaltan before the middle of the seventeenth century by one of the Bijapur kings. The deshmukh of Phaltan is said to have become a polygar or independent chief and to have repeatedly withheld the revenues of the district. Vangoji or Jagpalrao Naik Nimbalkar who lived in the early part of the seventeenth century was notorious for his restless and predatory habits. Dipabai the sister of Jagpalrav was married to Maloji Bhonsle, Shivaji's grandfather who was one of the principle chiefs under the Ahmadnagar kingdom. Jagpalrav Naik Seems to have been a man of great influence. It is said that it was through his exertions that the marriage of Maloji's on Shahaji and Jijaabai, Lukhdev Jadhavrav's daughter, was brought about against the wisheh of the girl's parents. One of the phaltan Naiks was killed in 1620 a battle between Malik Ambar and the Moghals. Nimbalkar never exchanged his anci nt title of naik for that of Raja.

---

1 Grant Duff's Marathas, Vol. I, pp. 64-65

Junjharrav Ghatge, the deshmukh of Malavdi was the head of a powerful family whose founder Kam Raje Ghatge had a small command under the Bahamani Kings. His native Country Khatav wos seperated from that of the Nimbalkar by the Mahadev Hills. The Agatges were deshmukhs and sardeshmukh of the pargand of Man In 1626 Nagoji Ghatge was given the title of Sardeshmukh as an unconditional favour by Ibrahim Adil Shah II, together with the title of Jhunjarrav. The head of Mane family was deshmukh of Mhasvad, adjoing the district of the Ghatges. The Manes were distinguished shiledars or self—horsed cavaliers under Bijapur, but were nearly as notorious for their revengeful character as the Shirkes.

The Ghorpades, who were originally Bhonsles, according to their family legend acquired their present surname during the Bahamani times from having been the first to scale a fort in the Konkan which was deemed impregnable by fastering a cord round the body of a ghorpad or iguna. They were deshmukhs under the Bijapur government and were divided into two district famalies, one of Kapshi near the Varna river and the other of Mudhol near the Ghatprabha in the Karnatak. Under Bijapur the Kapshikar Ghorpades were known as the navkas or nine—touch Ghorpades and the Mudholkars as the satkas or seven-touch Ghorpades, a distinction which the two families maintain. The head of the Mudholkar Ghorpades was the patil of a village near Satara. The Ghorpades seem to have signalized themselves at a very early period. The high Musalman titles of Amir-ul-umra or Chief of the Nobles was conferred on one of the members of the kapshi family by the Bijapur kings.

The first Ghorpade that joined Shivaji was one of the Kapshikars while the Mudholkars were his bitter enemies. The Daphles were deshmukhs of the pargand of Jath. Thier original name was Chavhan and they took the Surname of Daphle from their village of Daphalapur of which they were hereditery patils. They held a command from the Bijapur Kings.

In 1636 the Nizam Shahi dynasty came to an end. In 1637 Shahaji Bhonsle, the son of Maloji Bhonsle, who had taken a considerable part in Nizam Shahi affairs during the last years of the dynasty was allowed to retire into the service of Mahmud Adil Shah of Bijapur(1636-1656). In 1637, besides giving Shahaji's his Jagir districts in Poona, Mahmud Adil Shah conferred on Shahaji a royal grant for the deshmukhi of twenty-two Villages including Masur [Patrasar Sangraha No. 885] in the district of Karad, the right to which had by some means devolved on government. [Grant Daff's Marathas, Vol, I, P. 96] Before the middle of the 17th century Shahaji's son Shivaji, the founder of the Maratha empire, had begun to establish himself in the hilly parts of poona in the north where he had been put in possession of hif father's estate of poona and

---

1. Khelna or Vishalgad in1471. See Sherwani H. K. Bahamanis of Deccan, P. 298
2. Grant Daff's Marathas, Vol.I, pp. 69—71.
5. Some recent sources assert that he was born on 19th February, 1630

Supa. By 1648 he obtained control over the forts of Torna [According to Jadunath sarkar the fort of Torna was captured in 1946 and Raigad was a new fort built by Shivaji in the same Year (Jadunath Sarkar Shivaj,i P 34) The date of acquisition of Kondana is not know. Shivapur Deshpande Bahi gives the year 1647. This year is indicated by Mohammednama (Jadunath Sarkar—Shivaji, P 35)] Bhor about thirty-five miles and Kondana or Sinhgad about twelve miles south west of Poona, of purandhar about twenty miles south of poona, and of Rajgad in Bhor about five miles east of Torna. At this time the south of the Nira, as far east as Shirval and as far south as the range of hills north of the Krishna, was framed by the here-ditary deshmukh of Hirdas Maval a maratha named Bandal, and the ort a maratha of Rohida was committed to his care. He early entertained a jealousy of Shivaji and kept a strong garrison and carefully watched the country round Purandhar. The deshpande of the place was a prabhu. Wai was the station of a Bijapur Mokasadar or manager who had charge of Pandugad, Kamlgad and several other forts in the neighbourhood. Chandrarav More, Raja of Javli, was in possession of the Ghatmatha from the Krisna to the Varna. [Grant Duff's Marathar Vol. I, P 109.] The Bijapur Government being impressed with the idea that it was incited by Shahaji, caused him to be improsoned, and at same time sent an army under Fateh Khan to attack Shivaji, but Shivaji proved more than a math for him and killed him in the battle of Belsar near purandhar.

Shahaji was Subsequently realased in the same year, and an effort was made to bring about reconciliation between him and Baji Ghorpade, the Mudhol

Chief who had been instrumental in his capture. To include both parties to forget what had passed, Mahmud Adil Shah made them exchange their hereditary rights and inams as deshmukhs. Baji Ghorpade thus obtained from Shahaji the deshmuki rights of twenty-two Villages in Karad which Shahaji had acquired in 1637 form Bijapur. [Grant Duff's Marathas Vol. I. P, 115.] This agreement however was not acted upon. In the mean-while another attempt was made to seize Shivaji and this time Baji Shamraj was sent for the purpose. Shivaji frequently lived at the town of Mahad in Kolaba and the party of Shamraj, passing through the territory of chandrarav More, lurked about the par pass until an opportunity should offer. Shivaji anticipate the surprise, attacked the party near the bottom of the pass and drove them in great panic to the forests Disturbances in the Karnatak prevented the Bijapur government any further from taking active steps against Shivaji, who was finding that his father had been sent far away from the capital on a military campaign in Karnatak began to divise new schemes for possesing himself of the whole Ghatmatha or hilly west Deccan. With this object in view Shivaji turned his attention to the Mores ofJavli who were very powerfull in that region. The ruling prince [Shiv Bharat Canto 13 shoka 43.] Yeshvantrav was however none too friendly towards Shivaji and would not fall in a life with the designs of Shivaji.

कोल्हापूर जिल्ह्यामध्ये कापसी नावाची २ गावे आहेत. एक वारणा नदीच्या काठी असणारी. कापसी व दुसरी चिकोत्रा नदीच्या काठी असणारी कापसी (ता. कागल) ही कापसी सेनापती संताजी घोरपडे यांची होय. वारणा नदीच्या काठी असणारी कापसी ही संताजी घोरपडे यांची कापसी नव्हे.

भारत इतिहास संशोधन मंडळ पुणे शिवचरित्र साहित्य खंड ८ पान ८३

(२६) राजे घोरपडे देशमुख

नांदगांव व तासगांव (ता. सातारा)

(श्री. ब. बा. राजे घोरपडे देशमुख. नांदगांव ता. सातारा.)

भोसले घोरपडे या घराण्यांतील भाऊबंदीचे तीव्र तंटे अपवादात्मक स्वरुपाचे नसून महाराष्ट्रीय मनः प्रवृत्तीचे द्योतक होत. भोसले व घोरपडे यांचे भाऊबंदी कलहास बाजीराजे घोरपडे यांजकरवी शहाजीराजे भोसले हे इ. १६४८ मध्ये कैद झाल्यापासून पुष्कळच रंग आलेला दिसतो. या कलहाचा परिणाम विकोपास जाऊन तो आपले आदिलशाहीस भोगावा लागणार असे विजापूरचे हाजरतसाहेब यांना वाटले वरुन त्यांनी शहाजीराजे व बाजीराजे या उभयतांमध्ये एकी करणेचे प्रयत्न केले व ते लेखांक १ मधील शर्तनाम्यावरुन दिसतात. म्हणजे एकमेकांमध्ये कांही कुसूर पडला होता, तो एकमेकानी एकमेकास आपले तर्फेने आपआपले मिराशी देशमुखी वतन देऊन, तंटा विसरून, पूर्वीप्रमाणे पादशाही कामावर रुजू असावे असा तो प्रयत्न दिसतो.

प्रस्तुत शर्तनाम्याच्या दोन प्रती असून पैकी एक तत्कालीन असली तरी तिचा शेवटचा भाग नसल्यामुळे नक्की व पुरता सन सापडत नाही. दुसऱ्या प्रतीत शक १५७४ नंदनाम संवत्सर आहे. पण या वर्षी सुहू र सन इसने खमसैन असा पाहिजे होता. परंतु या ठिकाणी “आर्बा खमसैन आहे,” व ही नक्कलकाराची चूक असावी. कागदाची रुजवात श्री. द. वि. आपटे व श्री. पुरंदरे व श्री. य. रा. गुप्ते, बी. ए., एम्. आर. ए. एस्., रि. रे. इ. वडवाथकर, यांनी घेतली आहे.

शर्तनाम्याप्रमाणे शहाजी—बाजी हयांचा हा एकोपा फार दिवस न टिकता बाजीराजे घोरपडे यांना शिवाजी राजे यांनी ठार मारल्यावर या एकाच घोरपडे व भोसले या शाखेचे दोन परस्पर विरोधी पक्ष उघडपणे निर्माण झाले. छत्रपती शिवाजी राजे यांचे मनात बाजी घोरपडे यांचा वंशच नष्ट करावयाचा होता. परंतु ही गोष्ट पार न पडता बाजीचा वडील मुलगा मालोजी राजे जिवंत राहिला व त्यास विजापूरचे आदिलशाहाने आणून सरदारकी दिली, असे मालोजी घोरपडे यांचे पदरी असलेला पर्शियन इतिहास (बखर) कार म्हणतो. या ठिकाणी इतिहास लेखक व लिहून घेणारे मालोजी राजे घोरपडे यांची माहिती एकांगी दिसते. कारण त्यांना बाजीचा वडील मुलगा नावजी राजे घोरपडे हा जिवंत आहे, हे माहित असूनही तो स्वराज्यशाखेस मिळाला एवढ्यावरुन त्याचा नामनिर्देश इतिहासात केलेला दिसत नाही. खाली लागू पुरता विश्वासनीय वंशवृक्ष क्र. २-३-५ इं. कागद दिले आहेत. त्यांतील व सनदेतील वडिलपणा निवाडा व क्रमांक पाच या कैफियतेतील मजकूर पाहाता बाजीराजे यांना मालोजीहून वडील मुलगा नावजी राजे घोरपडे या नावाचा होता आणि त्यास तासगाव नांदगावची पाटलिकी व सातारा तालुक्याची देशमुखी सांभाळून रहाणेस बाजीराजे यांनी सांगितले असता तो स्वराज्यशाखेस मिळाला, म्हणूनच आदिलशहाने

मालोजीस सरदारकी दिली असे दिसते. शिवाय शि. च.सा. खं. ५ ले. ४८ भाडळे घोरपडे या प्रकरणातूनही हाच निष्कर्ष निघतो. त्याना मुसलमानाच्या नोकरीचा पुरा वीट आलेला दिसतो म्हणून ते आपले वडिलकीचे पाटीलकी व देशमुखी वतन सांभाळत स्वराज्यसेवा करीत राहिलेले दिसतात. हे २-३ वर्षापूर्वी प्रसिद्ध झालेल्या कागदावरुन दिसते. बाजीराजे घोरपडे यांचे पश्चात् बाजीचा वडिल पुत्र नावजी हा मुधोळ जहागिरीचा खरा वारस असूनही त्याचे स्वराज्यप्रेमामुळे मुधोळ जहागिरीचा स्वार्थत्याग करुन स्वराज्यसेवा केली. नावजीचे पश्चात राघोजी व संताजी हेही स्वराज्य सेवा करीत होते, व राघोजीपुत्र मानाजी हे स्वराज्यसेवा करीत असतानाच “भांडणी ठार झाले” असा सनदेतून उल्लेख आहे. वडिलकीचे व पाटीलदेशमुखीचे वतन यात वाद उत्पन्न झाला त्याचे पूर्वीपासून, वतन वडिल नावजी घोरपडे यांचे घराण्याकडे चालत होते. हे हमशाही गोताचे निवाड्यावरुन व अकोजी घोरपडे मुधोळकर हे वडिलकीचे पाटीलकी व देशमुखीचे खरे मालक नसलेमुळे हजर जहाले नाहीत यावरुन सिद्ध झाले नावजी घोरपडे यांची शाखा थोरले माधवराव प्रधान अखेर स्वराज्य पक्षाकडे चालत आली. सदर शाखेकडे सनदेत नमूद केलेल्या काही गावांची देशमुखी व पाटीलकी अद्यापपर्यंत याच शाखेकडे चालत आहे. नावजी घोरपडे यांचे शाखेचा व मुधोळकर घोरपडे यांचे शाखेचे पत्रव्यवहार पहिले व्यंकटराव राजे घोरपडे मुधोळ स्टेट यांचे वेळचा असून तो पुढे प्रसिद्ध होईल, त्यावरुन हे कळून येईल. तात्पर्य, ह्या प्रकारे या वडिल शाखेची माहिती अप्रसिद्ध अशीच राहिली. फक्त शि. च. सा. खं. ५ ले. ७२ “थिटे यांचे वाई देशपांडे यांस निर्वाद पत्र” ह्यावर राघोजी बिन नावजी घोरपडे देशमुख ता। सातारा म्हणून सिका आहे. त्यावरून राघोजी घोरपडे वडील घराण्यांतील असून त्यांना सिक्का वापरण्याचा अधिकार होता, हे दिसते. नावजी घोरपडे यांची समाधी तासगाव ता. सातारा येथे आहे. लागूपुरता घोरपडे यांचा वंशवृक्ष दिलेला आहे.

शिवचरित्र साहित्य खंड ८


लें. ७४		**श. १६४० चैत्र वद्य १४**
	श्री	
मू. दा. प.		**इ. १७१८ एप्रिल १८**

(अस्सल)

श्री
श्री आई आदि पुरु
ष श्री राजा शाहू छत्रप
ति स्वामि कृपानिधी त (षटकोनी)
स्व श्रीनिवास परश
राम प्रतिनिधि

आज्ञापत्र समस्त राजकार्य धुरधुर विश्वासनिधी राज्यमान्य राजश्री श्रीनिवास परशराम प्रतिनिधि ता. मोकदम देहाये व सेटिये माहाजन माहानाड पेटानिहाये व धनगर सहा व डागे पतकी (बा) जे खुमानी ता। सातारा मुहूर सन समान अशर मया अलफ रो। वाजोजी बिन सताजी घोरपडे देशमुख निमे ता।

मजकूर याणी हुजूर येऊन राजश्री स्वामि सनिध विनंती केली की **आपले वडिल** सो **बाजी घोरपडे निमे देशमूख** ता मा**र व पटेलकी निमे मौजे नादगाऊ व निमे मौजे तासगाउ हे वतन याणि अनभविले यांचे वडिलपुत्र थोरले बाईकोचे पोटीचे नावजी घोरपडे व धाकटे पुत्र आणि धाकटे बाईकोचे मालोजी घोरपडे नावजीचे पोटी दोघे पुत्र जाले वडिल राघोजी घोरपडे आणि धाकटे सताजी घोरपडे हे वडिल बायकोचे व धाकटे बाईकोचे म्हालोजी घोरपडे येकूण तिघे जाले त्यास राघोजी घोरपडे याचे पोटीचे मानाजी घोरपडे व सताजीचे घोरपड्यांचे पोटीचे आपण त्यास राघोजीचे (पो) टीचेमानाजी घोरपडें होते ते भांडणी ठार जाले. याकरिता राघोजी (चे न) कल जाले सताजीचे पोटी चे आपण आहो आपले** बापाने मतालिक ठेविला होता आणि वतन चालवीत होते त्या उपरी हा प्रांत हाजरत अलमगीर पादशाह यास कबज जादा गडकोट घेतले तेव्हा आकोजी घोरपडे म्हणजे मालोजी घोरपडे याचे पुत्र आता मुघोली असतात त्यास मोगलाईन (चाकरी) आहे त्याची चाल होती या प्रात आसीनखान फौजदार मोगलाकडील कराडी होते, त्यास येऊन भेटोन मुतालिक आपले निसबतीने तरसो त्रिमल ठेविले त्याणी मुतालकी मोगलाचे कारकिर्दीमध्ये केली त्या उपरी मागुती स्वामिस (हा प्रात) अर्जानी जाला गडकोट मोगलाकडून परतोन घेतले तेव्हाही काही दिवस नरसो त्रिमल होता त्या उपरी मृत्यू पावला आकोजीने नरसो त्रिमल याच्याच लेकास गोविंद नरसिंह यास मुतालकी करार (करुन) ठेविला अैसियास आकोजी घोरपडे [तेव्हाच पण ओळीचे वर लिहिलेला.] यांचे बाप म्हणजे नावजी घोरपडे बीन बाजी घोरपडे यांचे सावत्र भाऊ आणि धाकटे त्यास काही देशमुखीचे वडिलपण चालवयाचा अधिकार नाही नावजी घोरपडे वडिल त्याचे घराणियातील आपण तरी आपले वतन आपणास बहाल करुन दिल्हे पाहिजे म्हणऊन विनंती केली त्यावरुन देशमुखीचे वतन व दोही गावीच्या निमे निमे प्रा पाटीलगीया अनामत करुन पाजोजी बीन संताजी घोरपडे आपण वडिल म्हणऊन उभे राहिले आहेत वतन अमानत केले आहे तरी तुम्ही आपले निसबतीचा कोण वादास पाटवणे आसेल त्यास पाटऊन देणे यैसे पत्र पाठविले परंतु त्याणी कोणी वादास पाठविला नाही वरीसभर वाट पाहिली या उपरी हे मागुती उभे राहिले आणि आर्ज केला की आकोजी घोरपडे याचे कोणी वादास न ये आपण वाट किती दिवस पाहावी या उपरी स्वामीने हमशाही वतनदार गोत आहे मनास आणून आपले वतन आपले स्वाधिन केले पाहिजे त्यावरुन मनास आणिता वाजोजी बीन संताजी घोरपडे हे वडिल घराणियातील हे खरे यैसे समस्त वतनदार हमशाही गोताचे मते जाले या करिता याजवर कृपाळू होऊन निमे देशमुखी ता म मार राव पाटीलगी निमे मौजे नादगाऊ व निमे पाटीलगी मौजे तासगाऊ करार केले असे बि ता



(सनदेच्या गावांबद्दल आज्ञापत्र पृ. क्र. ६६, ७८)

देशमुखी निमे त्यास ता मारचे देहाये पैकी निसबत मानिले

मीजे माडवे, मौजे सोनापूर, मौजे निमाम, माजगाऊ, आसणगाऊ, कुसवडे,

१ १ १ १ १ १

सेंदरे, शेलकेवाडी, शाहापूर, यवतेश्वर, साखरल, वरये, गोडोली, देगाऊ, जैतापूर,

१ १ १ १ १ १ १ १ १

निगडी, तासगाऊ, मौजे नांदगाऊ निमे, मौजे पाडली निमे, मौजे करजीये निमे

१ १ १ .II. .II.

षेटानिहाये धनगर सडा जकायेती हक निमे बाजे खुम समाईक असतील ते निमे.

१ १

ठरऊन घेणे.

पाटीलगी

मौजे नांदगाऊ निमे .II.

मौजे तासगाऊ निमे १

यणेप्रो साडे अठरागाव व पेटा व धनगर सडा व बाजे खुम व जकायती हे देसमुखीच्या वतनासमध्ये व पाटीलकी निमे मौजे नादगाऊ व निमे मौजे तासगाऊ येणेप्रमाणे वतन बहाल करुन दिल्हे आसे या वतनास हक लाजिमा ईनाम पान मान तश्रिफ सीका पहिलेपासून वडिलपणास चालिले आहे. त्याप्रो चालऊन वतनदारीच्या पैशाने रुजूवात असणे आणि प्रा यास व यांचे पुत्रपौत्रादी वंशपरंपरेने चालवणे प्रतिवर्षी नवीन पत्राचा अक्षेप न करणे या पत्राची प्रती लेहून घेऊन मुख्यपत्र मानिलेकडे भोगवटियास देणे छ २७ जमादिलावल निदेश समक्ष. [असले दुसरे एक पत्र प्रांरभीचा भाग फाटलेले असे आहे. त्यात ह्याप्रमाणेच मजकूर आहे. फक्त सेरणीबद्दल रु. ९०० रास ठेविले त्याची उगवणी हुजूर करून देतील, एवढा मजकूर विशेष आहे. ते पत्र स्थलाभावी येथे घेतले नाही.] राजत [जोडावर मोर्तबाचा हा सिका आहे]

लेखना

वार सुरु मुद बार

वधी

---

१ अक्षराचे वळण निराळे

इ. स. १७१८

(सनदेचा वरील भाग फाटण्यात गेला आहे)


सीका चालत होता त्यास वडिल पुत्र रा नाव
जी बीनबाजी घोरपडे याचे दोघे पुत्र वडिल
राघोजी घोरपडे धाकटे संताजी घोरपडे
त्यास राघोजी घोरपडे याचे पोटी पुत्र मानाजी
घोरपडे होते ते भांडणी पडले संताजी घोर
पडे याचे पुत्र आपण यैसास राघोजी घोर
पडे होते तोवरी त्याणि वडिल पण सिका याचा
मान तश्रीफ वतन देसमुखीचे अनभवित होते
मुतालिक ठेवून चालवित होते राघोजी घोर
पडे असतांच मानाजी घोरपडे त्याचे पुत्र मां
डणी ठार जाले त्यावरी राघोजी घोरपडे मृत्यू
पावले राघोजीचे नकल जाले राघोजीचे धाक
टे भाऊ संताजी घोरपडे याणि देसमुखीस
मुतालिक ठेऊन वतन चालवित असता हजर
तं पादशाहा आवरंगजेब या प्राते येऊन किले
घेतले तेव्हा असिनखान कऱ्हाडी फौजदार ठेविले




(आज्ञापत्र सनद पृ. क्र. ७८, ७९, ८०)


सातारा माहाली त्याचे आमल चालिला
गी आपले बाप संताजी घोरपडे सेवा करित होते
मुतालिक वतनावरी होता तो कारभार करित
होता कसाला न वाढे म्हणऊन राजश्री आकोजी
घोरपडे आसिन खानाचे भेटीस येऊन आपले
निसबतीचे नससो त्रिमल ब्राह्मण मुतालिकीस
ठेविला मोगलाचे आमलामध्ये देसमुखींचे वतन
चालवित होता त्यावरी मोगलाचे तफेचा अमल
उठला गडकीचे महाराज राजश्री स्वामिच
अर्जानी जाले या उपरीही काही दिवस नरसो त्रि
मल मुतालकी देशमुखीची करित होता
आपले बाप संताजी घोरपडे दिवाणात उभे रा
होन देशमुखीचे वतन बाहान करुन घ्यावे या
करिता उपक्रम करित होते त्यास दुखणें
होऊन मृत्यु पावले याउपरी नरसो त्रिमलही
आकोजी घोरपडे. यानी मुतालिक
मृत्यू पावले त्याजवरी आकोजी घोरपडे
नरसो त्रिमल याचे पुत्र यास मु
तालिकी करार करून ठेविले अैसास आकोजी घोर
पडे म्हणजे नावजी घोरपडे बीनबाजी घोरपडे या
चा घोरपडे धाकटे याचे पुत्र
यासि काही मुतालिक ठेऊन देशमुखीचे वतन चाल
वाया अधिकार नाही नावजी बिनबाजी घोरपडे हे वडिल
ल घराणि याचे आपण आहो हे समस्त हम
शाही वतनदार जे आहे ती त्यास ठावके आहे तरी
स्वामीने हकिकत मनास आणून आपले वतन
बाहाल करुन दिल्हे पाहिजे म्हणऊन विदित केले
त्यावरी स्वामीने निमे देसमुखी व निमे पटेल
की मौजे नांदगांव व निमे पटेलगी मौजे तासगांव
ता सातारा हे वतन अमान करून राजश्री आ
कोजी घोरपडे मुधोलास होते त्यास पत्र पाठ
विले की वाजोजा बिन संताजी घोरपडे आपण
वडिल घराणि याचे नीमे देसमुखी
सदरहू गाव निमे निमे पाटिलगी वतन आपले
म्हणऊन उभे राहिले आहेत तरी तुम्ही
निसबतीचा कोण जो पाठविणे आसेल तो पाठऊन

मनशुभि करून यैसी पत्र पाठविले
ली त्याचे निसबतीचा वाद सागायासि
येईल म्हणऊन वरीस येक पर्यंत समग्रवाट
पाहिली परतु कोणी पाठविले नाही याउपरी आ
पण किती दिवस वाट पाहावी स्वामिने मनास
आणून आपले वतन ता साताराची निमे देस
मुखी व निमे पाटिलगी मौजे नांदगाव व निमे
पाटिलगी मौजे तासगाव ता मार हे स्वादिने
करून स्थापना केली पाहिजे म्हणऊन विनंती केली.
त्यास मनास आणिता आकोजी घोरपडे जरी काही
वडिल घराणि याचे खरे असते आपला बाप भाऊ
अथवा हरकोणी मुतालिक वादास पाठविते
वरिसभर वाट पाहिली कोणी न ये याकरिता तो हमशा
ही वतनदारास करिना पुसिला त्याणिही सा
गितले की बाजोजी बिन संताजी घोरपडे हे वडिल
घराणि याचे खरे बाजी घोरपडे याचे दोघे पुत्र
वडिल बाईकोचे नावजी घोरपडे धाकटे बायकोचे
मालोजी घोरपडे त्यास नावजी याचे घराणि
यातील वाजोजी बिन संताजी घोरपडे खरे यैसे
निश्चयात्मक सांगितले त्यावरून
सिका पानमान तश्रीफ तुमच्या वडिल घराणि
याची जाणून ता मा ची देसमुखी नीमे व
पाटिलगी नांदगावची निमे व तासगावीची
निमे हे वतन तुमचे तुम्हास बाहाल करुन दिल्हे
आहे महाराज राजश्री स्वामिने सनद
करून द्यावया आज्ञा केली त्यावरून हे सनद तुम्हास
करून दिल्ही आहे असिजे या वतनास तुमचे
सेरणी रुपये ९०० रास ठेविले आहेत
याची उगवणी करुन देऊन सातारा माहालिचे
निमे देशमुखीचे वतन मौजे नांदगावीची निमे पाटि
लगी न निमे तासगाविची पाटिलगीचे वतन
तुम्ही व तुमचे पुत्र पौत्रादि वंशपरंपरेने
अनभऊन सुखे राहाणे भाऊबंध तुमचे
जे आहेत त्यास यथाविभागे समजाविणे त्यासि
वडिल पणासि समध नाही जाणिजे छ २१ जमा
दिलावल निदेश समक्ष् (मोर्तब)




(आज्ञापत्र सनद पृ. क्र. ८१, ८२)





(इनाम कमिशन सनद पृ. क्र. ८२)



(इनाम कमिशन सनद पृ. क्र. ८२)

इमान कमिशन	सीका ६९९४	नक्ल

आजसूमा राजेश्री कृष्णाजी बल्हाल सु
भेदार व कारकून प्रांत सातारा ताहा
मोकदमानी देहाये ता सातारा सुा
समान आशरमया व आलफे ता मजकूर
ची नीमे देशमुखी घोरपडे यांचि आहे.
त्यास राजेश्री आकोजी घोरपडे यांचे
तर्फेन नरसु त्रिमल मुतालकी करित हो
ता अैसियास तो मृत्यु पावला त्याजवरी
राजश्री वाजोजी बीन संताजी घोरपडे वडि
ल घराणे हे हुजर राजेश्री स्वामी
सनिध उभे राहून हाकिकत सांगितली
त्यावरुन देखमुखी अनामत करोन
आकोजी घोरपडे यास पत्रे पाठविले
की तुमचाकजिया असेल तरी हाजीर
होणे म्हणऊन पत्र पाठविले त्यास ये
क वर्ष जाहाले परंतु आकोजी घोरपडे
न आले याकरिता हुजुर राजेश्री – स्वा
मीनी कीले साताऱ्याचे मुकामी वतन
दार मिलोन मनास आणीन वाजोजी घोर
पडे वडिल देशमुखीचे हे
च खरे यैसे आणोन देशमुखीचे पानमान
तश्रिफ सीका याचे स्वाधिन करा
न राजेश्री पंत प्रतिनिधी याचे
पत्र सादर केले आहे तरी तुम्ही सनदे
प्रो ा देहाये वगैरे

(१) मौजें करंजे निमे मौज गोडोली

१ मीजे देगाव	१ मौजे निगडी
१ जयतापूर	१ मौजे तासगाव
१ मौजे शहापूर	१ मौजे सेलकेवाडी
१ मौजे यवतेश्वर	१ मौजे सारखल
१ वरये	१ मौजे सेंद्रे

१ मौजे आसनगाव
१ मौजे मांडवे
१ मौजे सोनापूर
१ मौजे मायगाव
येकुन साडेआठरा

१ मौजे कुसवडे
१ मौजे निनाम
१ मौजे पाडली निमे
१ मौजे नादगाव निमे
व सडा धनगर व

जकाती ता मजकूरचा नीमे हिस्सा
याखेरीज मौजे तासगाव व मौजे नांद
गाव येथील दोई गावची नामे पाटि
लकी पुरवापार आहे त्याप्रमाणे वाजोजी
घोरपड्याचे दुमाते देखमुखीचे व
पाटेलकी वतन केले आसे तुम्ही या
चा हाक दाजिमा सालाबाद पावित
जाणे प्रतिवर्षी नवीन पत्राचा आक्षे
प न कर्णे प्रति लेहून घेऊन आसल प
त्र भोगवट्यास परतुन देणे ६०१७
जमा दिलाखर मोर्तब सुद
६९१४

(अमान कमिशन) **श्री.** **नकल सीका**

कागदाचा नंबर **सन १७१९**

७३१६

मशरुल देशमुख व देशपांडे ता सातारा यासि श्रीनिवास परशराम प्रतिनिधी सुहूरसन सवा आसर मया व अलफे तुम्ही किले साताराचे मुकामी हूजूर येऊन विनंती केली की आपण वतनदार सेवक हकाची मोहिन पहिली तुरकाचे कारकीर्दीत हक नेमून दिला होता अलिकडे माहाराज राजश्री थोरले कैलासवासी छत्रपती स्वामिस देशहस्त गत जालियावर कार्दीवरुन आकार होईल त्यावरी दरसंदे मोईन भरून दिल्ही. त्याप्रमाणे औरंगजेब पातशाहा याप्रांते येऊन कीले मजकुरास परिघ पडे तोवर चोलिले मोगलास प्रांत जाहलावर ह ची मोईन ला (गा) वगना वरून आकार होईल सरसदे देशमुख रुपये ५ पाच व देशपाडेचे रुा. या उडीच येकूअ रुा. ७ा साडेसात योईन धरुन लिल्हीत्या प्रो आजवर चालत आले आपण वतनदार सेवक मोगलाची आमल याप्राते होता तेव्हा स्वामिनी रुजवात राहुन महालीचा वसूल देत होतो स्वामीनी सदरहु साडेसात रुपयेप्रमाणे हक करार करून सनद सादर केली तरी त्याप्रमाणे हक्क घेऊन वतनदारीची सेवा येक निस्टेने करुन कृपाळू होऊन सनद सादर करावी म्हणून विनती केली त्यावरुन मनास आणून कीर्दीप्रमाणे आकार होईल त्यासि मोईन येणेप्रमाणे दर सदे रुपये हक देशमुख ५ हक देशपाडे २ा येकून दरसदे रु. ७ा साडेसात हक योईन करून दिल्ही आसे तरी तुम्ही आपले वोशेपरपरेन आन भरुन दिवाणची चाकरी भरुन सुखरूप राहाणे तुम्हाकडे शेरणी रुपये ३०० तीनशे करार केली आसे याचा वसूल घेऊन वतन अनुभवणे छ. २ जमादिलाखर निदेश समक्ष मोर्तब.

सुरू सुदबार

हे तर्फ सातान्याचे देशमुख घोरपडे आहेत व देशपांडे याना उद्देशून आहे अवरंगजेब (मोगलाचा) अम्मल यापाते होतो तरी मोगलाना न जुमानता या भागाचा वसूल छत्रपतीनाच दिला आहे.

ले. ७९ (८)
भू. दा. प.

१ घोरपडे देशमुख यांच्या गावचा आकार कर्जपटीस सरकारातून वसूल करणे यैसी आज्ञा त्यास तुम्ही म्हणता की मालोजीराजे देशमुख याचा निमे यैवज देऊ त्यास त्या गावचा आकार दोन हिसे रुा ४५६ होतात व वाजोजी देशमुख याजकडे तासगाव नांदगाव वजा करून रू. दोनशे होतात या प्रमाणे आहे तरी तुम्ही आकार प्रमाणे पाठवणे म्हणजे बाजोजी देशमुखाकडे T T T T त्याजवर रोखे केले जातील.

श्री ता ले का सा. जि. द. रु. नं. १४९९

राजश्री संताजी घोरपडे देशमुख का वाळवे
गोसावि

वारि अखंडित लक्ष्मी अलकृत राजमान्य राजश्री श्रीनिवास परडराम प्रतिनिधी असिर्वाद सुा सीत आसरीन मया अलफ तुमचे विसी कित्येक वृत्त राजश्री बापूजी रायाजी यानी विदित केले त्यावरूनी निवेदन जाले यैसियासि तुम्ही पूर्वी पासूनी पदरीचेची आहा सर्व प्रकारे अवश्यक आहे तुम्ही जाणतची आहा ते गोष्ठीविसी तुम्ही मनात विपर्यासी सर्वथी न आपण विपर्यासि न आणिता मा हालेची लावणी संचणी करण देशमुखीचा कार्यभाग करिता तैसे करित जाणे ये विसी कितेक सुखातरे मा र नुले जवळी सांगितले आहे तैसे विस्सार सागतील ती आमची वचने जाणूनी आपले समाधान आसो देणे जाणिजे छ २७ रमजान

इनाम कमिशन
ए

नकल
श्री तालीक.

मा आनाम संताजी घोरपडे देशमूख तर्फ वाळवे यास श्रीनिवास शंकरराव प्रतिनिधी असीरवाद सुा सबा आशरीन मया आलफ मौजे बाहादुरवाडी प्रा मजकूर ह गाव तुम्हास इनामपूर्वी दिल्ह आहे त्याची इनामति जाई तुम्हास माफ करोली आहे वसुलाचा तगादा गावास लागणार नाही गावास कौल देऊन गाव आबादानी करणे जाणिजे छ ५ सवाल पत्र हुजूर लखण सीमा मोतर्ब आसे.

सिका

Compared by:—
Shri. Pansare, Clerk,

20—12—39

Name of the applicant Mr. Mahipatrao Khanderao Ghorpade,
Copy applied on 7—12—1—939 Delievered on 21—12—39
Printing. charges Rs. Two only.

True copy.
Sd/—
Revenue Assistant Commissioner, C. D.,
Only in charge Alienation Office Records.
21.12.39

शाहू दप्तर सनदा पत्रे रु. नं. ४०

इनाम कमिशन
ए

नक्कल **इ. स. १७३६**

श्री

स्वस्तीश्री. राज्याभिशेक शके ५४ प्लवंगनाम सवत्सरे कार्तिक बहूस अष्टमी भृगू वासर क्षत्रीय कुला वसंत श्री राजारामू छत्रपती स्वामियाणि देशमुख व देशपांडे विजापूर यासि अग्ता केली अैसिजे सर देशमुखीचे वतन पूर्वी तिथरुप राजश्री कैलासवासी स्वामिनी राजश्री हिदूराव घोरपडे ममलकतमदार यासि दिल्हा आहे देव ब्राह्मणाची ईनाम सर्वमान्य वजा करुन हक लवाजिमा याची मोहित करुन दिल्ही आहे. तेणेप्रमाणे स्वामिनी करार केले असे. या वतनाचा अमल रा. मशार निलेकडे देण.

मयीदेय
विराजत

स्वस्तिश्री राज्यभिषेक शके ६२ राक्षसनाम संवत्सरे कार्तीक बहुल सप्तमी इंदुवासरे क्षत्रीये कुलवतंस-

श्री राजा शाहू छत्रपती स्वामी याणी मोकदमानी देहाये ता वाळक सुभा प्रा पनाव्व यासी अज्ञा केली ऐसीजे ता मारचे देशमुखीचे वतन वीरोजी बिन बुकाजी माने याचे पुरातन आहे त्यास यांचे पुत्र रायाजी माने व हेगोजी माने हे हरदो जण वतनसमधे भांडत हुजूर आले याकरिता हरदो जणाचा करिता मनास आणून वतनाची वाटणी दोघास करुन दिल्ही ता मार अज देह १७ सतरा याची वाटणी बीता—

रायाजी माने याकडे जमीन चावर		यो रकम होन पाा	हेगोजी माने याकडे जमीन चावर		यो रकम होन पा
कसबा वाळवे	९५॥ १९	२९९५॥	मौजे उरुण	८९। १४।.	२४४५
मौजे गोटखिंड	५६॥८	१६८८	मौजे नागठाणे	३९॥६॥.	१०९६
मौजे कुंडल	५४॥१४'।॥.	१४२४ ।—।—	मौजे नागावे	१५।७॥.	४४६
मौजे बहे	३५। १९	११५०'।॥.	मौजे कामेरी	४९ १७'।॥.	१५३३
मौजे कनेगाव	११। १८'।॥.	३४२	मौजे येलूर	१९—२७॥	६०९
मौजे पुणदी	१५ १६॥.	४९२	मौजे खेड	२५॥.	७५३
मौजे सिरगाव	१५'।॥.१५	१४६ '।॥. ।—	मौजे येडे	३९ २२	११९८
			मौजे देवडी	४'।॥.१॥.	१४९'।॥.
	२७४॥२१	८२३९'।॥.—।		२८ २।७	८२३१।

मौजे पस दरोबस्त इसाफत देह येक १. यकून देह आठ.

मौजे बाहादुरवाडी दरोबस्त इसाफत देह अेक १ येकून देह नव.

येणेप्रमाणे वाटणी करुन दिल्ही आहे ज्याचे तक्षीमेत त्याणे आपला देशमुखीचा सिका कारभार करावा हकलाजीमा कानूकाइदा पानमान तश्रीफ आपलाले तर्फेत अनभवावी ऐसा निवाडा करुन दिल्हा आहे. तरी तुम्ही सदरहू वाटणीप्रमाणे हरदी जणाचे विचरि वर्तत जाणे हे आपलाले तर्फेचा कारभार सिका हकलाजीमा कानूकाईदा मानपान तश्रीफ सुदामत सिरत्याप्रमाणे आपलाले वशपरंपरेने अनभवतील या पत्राची नकल लेहुन घेऊन हे असल पत्र हेगोजी माने याजवळ परतोन देणे जाणिजे लेखनालंकार—

Sd/—

15—6—42

Name of the Applicant Mr. Mahipatrao Khanderao Ghorpade.

Printing charges : 3 Rs. Three only.

Copy applied on 28—4—42 Delievered on 1—7—42

True copy.

Sd/—

Revenue Assistant Cemmissioner, C. D. Rs

incharge Alienation Office Records.

इनाम कमिशन
ए

नक्कल

श्री

२५ सप्टेंबर १७५३

नकल

राजेश्री खंडोजी घोरपडे व मालोजी घोरपडे यासी.

अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्ये — श्रेहकित बालाजी बाजीराऊ प्रधान अशीर्वाद सुा इसने खमसैन मया आलफ मलजी माने व कोंडाजी माने देशमुख तेाावाळवे यानी हुजूर येऊन विदित केले की उभयेता मारनुले देशमुखीच्या हकावरी रोखेपत्र करुन गानना उपद्रव देता ती मनासी आणून ताकिदी करावी म्हणौऊन ऐसीयासी याचे हकावरी रोखपत्र करुन गावासी उपद्रव देवावयाची प्रयोजन काये याजउपरी गैरसनदी रोखपत्र करावीयासी प्रयोजन नाही गैरवाजीब वर्तणूक करुन येविसी फिरोन बोभाट आलिया कार्यासी येणार नाही ऐसे समजणे जाणिजे छ १४ माहे जिलकाद.

Name of the applicant Mr. Mahipatrao Khanderao Ghorpade.

Printing charges Rs. 2/—only. Rupees two only

Copy applied on 28—4—42 Delivered on 1—7—42

True copy.

Sd/—

Revenue Assistant Commissioner, C. D.,

incharge Alienation Office Records.

26—6—42.

श्रीमत महाराज मातुश्री
आईसाहेब
यासी

इ. स. १७५१

खंडोजी घोरपडे व मालोजी घोरपडे सु ा ईसने खमसैन मयाव अलफ

मलापा माने व कोडापा माने देशमुख ता ग वाळवे प्रात पनाला यानी येतील सातारा याचे मुकामी विदित केलेजे तुम्ही आपले देशमुखीच्या हकावरी रोखेपत्र करुन गावगना उपद्रव देताती वारणे नदी पलिकडे राहावून खेडियासी धामधूम करिता म्हणोऊन हुजूर विदीत केले. तरी हे गोष्टी कार्याची नाही तुम्हासी गैरसनदी याच्या गाववारी रोखेपत्र करावियासी प्रयोजन काये या उपरी गावासी तोसिस केली-या पारपत्य केले जाईल यैसे पस्ट समजणे पिरोन बोभाट येऊ न देणे जाणिजे ६०·११ जिल्हेज लेखना वधि.

इनाम कमिशन ए

नक्कल.

श्री

तालीक

श्रीमंत माहाराज मातुश्री–आईसाहेब याणी ता मोकदमानी ता वाळवे सुभा प्रांत पनाळा गावगना बीतपसील–

१ का वाळवे	१ मौजे गोटखिडी
१ मौजे उरूण पठ इसलांपूर	१ मौजे नागठाणे
१ मौजे कामेरी	१ मौजे पलूस
१ मौजे येड	१ मौजे कुडल
१ मौज येलूर	१ मौजे खेड
१ मौजे नागाव	१ मौजे पुणदी
१ मौजे बाहदुरवाडी	१ मौजे सिरगाव
१ मौजे कनेगाव	१ मौजे थानपडे
१ मौजे दंवर्ड	१ मौजे बहे
९	९

१८

येकूण देहाय आठरा सुा इसने खमसैन मया व अलफ देहाय मा रचे वतनदेशमुखी मलापा बिन हेगाजी मान्ये व कोंडापा बिन सिवाजी मान्ये याचे पुरातन आहे हे वतन वौशपरंपरेन असता दरम्यान सिंदे याचे पाठिराखे घोरपडे सातकस याणी आपल्या वडिलाचे तीन खूण करून कलात्करे वतन करीत होत त्यास त्याचा व आमचा इनसाफ निवाडा शाहू माहराज याचे कारकीर्दीस होऊन निवाडपत्र आहेत हे माहाराजाही मनास आणून आज्ञापत्रे ताकीद द्यावी म्हणोन विनती केली त्याजवरून चिरजीव राजश्री कैलासवासी याचे कारकीर्दीस सिंदे व घोरपडे हे खोट म्हणोन निवाडपत्र व दुमालपत्र मान्ये देशमूख यापासी आहेत ती मनास आणून साहेब कृपाळू होऊन सुदामतप्रमाणे वतन देशमुखीचे मारनिलंच्या दुमाला केले असे तर तुम्ही देशमुख मान्ये याचे आज्ञेत वर्तोन गावगनाचा हकलाजीमा व इनाम सेवाधार व तश्रीफ पानमान पूर्ववतप्रमाणे

कुलबाबकुलकानू चालत आले आहे त्याप्रमाणे देत जाणे प्रतिवर्षि नूतन पत्राचा हुजूर न कर्णे या पत्राची तालीक घेऊन हे पत्र परतोन मारनिलेपासी भोगवटीयास देणे जाणिजे छ ११ जिल्हेज लेखनावधी मोर्तब.

Sd/—
15.6.42
Name of the applicant Mr. Mahipatrao Khanderao Ghorpade.
Printing charges Rs. 3/—Three only.
Copy applied on 28—4—1944.   Delieverd on 1—7—42.

True copy.

Revenue Assistant Commissioner, C. D.,
in charge Alienation Office Records.

इनाम कमिशन ए

नक्कल

श्री

तालीक

राजेश्री खंडोजी घोरपडे व मालोजी घोरपडे गो.

अखडित लक्षुमी आलकृत राजमान्ये— श्रेहकित श्रीनिवास गंगाधर प्रतिनिधी असीर्वाद सुा आर्बा खमसैन मया आलफ मलजी माने व कोंडाजी माने देशमुख ता वाळवे याचा व तुमचा व सिद्याचा पेशजी कजिया जाहला होता त्यास कैलात्सवासी श्रीमंत— माहाराजच्या कारकिर्दीस इन्साफ होऊन माने खरे जाहाले वतन आनुभवीत असता हाली तुम्ही गावगना गैरसनदे रोखे करिता म्हणून हुजूर विदित जाहाले तरी हे गोष्टी काये कार्याची इनसाफ होणे तो जाहाला आहे याजउपरी उपद्रव गावगना करावयास प्रयोजन नाही फिरोन बोभाट येऊ न देणे जाणिजे छ १ रजब निर्देश समक्ष.

Sd/—
15.6.42
Name of the applicant Mr. Mahipatrao Khanderao Ghorpade.
Printing charges Rs.   2/—Two only.
Copy applied on 28—4—42   Delievered on 1—7—42.

True copy.

Sd/-

Revenue Assistant Commissioner, C. D.
in charge Alienation Office Records.

श्री

नकल इ. स. १७५६

सातारा ज. द. रु. नं. १७१२

राजेश्री देशमुख व खंडो श्रीनिवास देशपाडे प्रा

सातारा ______________________ ता. हा.

(	वाजोजी बिन सं	) (	शिवाजी बिन जोत्या	)	आलेमोजी बिन
(	ताजी घोरपडे दे	) (	जी व कृष्णाजी	)	मेताजी व कुसाजी
(	रामुख	) (	बिन रामोजी देश	)	बिन भिवजी कुंभार
(	शिका	) (	मुख	)	म्हेत्रे मौजे कोडोली
		(	सिका	)	वरेगाव प्रा मगर

सुा सबा खमसैन मयाअलफ तुम्ही शाहुनगर नजीक किले सातारा येथील मुकामी येऊन विदित केलेजे आपणाकध्य ब शेटियाजी बिन रंभाजी व मालोजी बिन राघोजी कुंभार मौजे शाहापूर ता मगर यामध्ये तीन माहालाचे म्हेत्रकिच्या वतनाचा कजिया आहे त्यास ते वतन जबर रस्तोने खात आहेत अैशास तुम्हा हार दू जणाची कजिया लागोन श्रीमंत महाराज मातोश्री —————— आऊसाहेब या सनिध उभे राहिलेत त्या वरून तीन महाल परळी व वासोढा व प्रात मजकुरचे गोत व देशमुख व देशपांडे व गावगानचे मोकद मव सिवधडे व समस्त जमा करुन ईनसाफा करिता तुम्हा सदरहु जणापासून राजिनामे व जमान कतबे सरकारात घेतले येणेप्रमाणें ——————

बि. तपसिल

तुम्हास जमान खंडोजीबिन	शाहापूरकर यास जमान
संभाजी कुंभार म्हेत्रे प्रा	मालोजी बिन सटबोजी
वाई. १	कुंभार मौजे कुमठे ता
	मार १

येणेप्रमाणे तुम्ही जमान दिल्हे व तकरीरा लेहून दिल्या पूर्वील कागदपत्र तुम्हा हरदू जणावासि होत ते हुजूर साहेबापासी आणून दाखविले आणि तुम्ही तकरीर केली शहापूरकर बैजनाथचे परळीचे म्हणून तकरीरेत लेहुन दिल्हे व तुम्ही आपले घर किले परलीचे पूवील म्हणून तकरीर केली त्याज वरून तुम्हा हरदुजनाची पूर्वील विड्यापूरचे पत्रे मनास आणिता दोघोजवळही पत्रे आहेत यैसियास हर दुजनास मनसुबी विसी श्रीमत मातोश्री ————— साहेबांनी आज्ञा केली त्याजवरुन गोतानी इनसाफ मनास आणिता तुम्ही साहेबास विनंती केली की आपले वतन तीन महालचे पुरातन खरे आपणास त्यास श्रीचे दिव्य नेमून घ्यावे जो खरा

होईल तो तो तीन महालचे वतन अनभविल अैसे बोलिसा व तकरिरेत लेहून दिल्हे त्याजवरुन मनास आणून तुम्हा हरदूजणास श्रीचे दिव्य नेमून बरोबर सरकारचे हुजरे व गावगनाचे मोकदम बरोबर देऊन मौजे खेड ता वंदन येथे पाठविले तेथे श्री ------ चे संगमी प्रयाग व गरवाली क्षेत्र माहुलीचे ब्राह्मण व पाटिल कुलकर्णी व मौजे मजकूरचे आग मोकदम यांचे साक्षीने श्रीची पूजा करुन तुमचा भाऊ सयाजी बिन नाईकजी कुंभार याने उच्चार केला की आपली मुळपाटी परलीची वतन तीन महालाचे आपले वस्तीस तुमचा संबध नाही. तुमचे घर वैजनाथचे परळीचे म्हणोन तीन वेळा शाहापूरकर आबाजी विन धोडिजी कुंभार याच्या हातावर पाणी घातले त्याजवर आंबाजी कुंभार याने उच्चार केला की आपलेतिन माहालाचे वतन खर तुम्हास आपले वडिलानी मौजे कोडोली व देगांत येथे सुखवस्तूपणे ठेविले म्हणोन उच्चार करून तीन वेळ पाणी घातले येणेप्रमाणे क्रिया केली त्याजवर दशरात्र पंचरात्र तुम्हा हरदू जणाचे घरी सरकारचे हुजरे रक्षण ठेविले तुमचा भाऊ सयाजीबिन नाईकजी कुंभार याचे घरी चौकी ती शाहापूरकर आबाजी बिन धोंडजी कुंभार याचे घरीही चौकीस हुजरे होते त्यास दशरात्र पचे रात्रीचा करार असते तेरावे दिवशी जानोजी बिन नागोजी शहापूरकर याने कुसाजी जिनकर सातारकर याचे घरी जाऊन क्रत्रिय गोष्ट मुठीचा प्रयोग करीत होता पाच पंचवीस रुपये देऊ करून तुमची खूण खराबी व्हावी म्हणून विचार करित होता त्यास तुमचा पुतणे मादेवजीबिन कोयाजी व निंबाजी बिन सुभानजी कुंभार यास कुसाजी जिनगर याचे बायकोने सांगितले त्याज वरून हे वर्तमान हुजूर निवेदन जाहाले नंतर जिनगरास हुजूर आणून बाजपुसी करिता जिनगर कबूल जाहाला जे आपणास शाहापूरकर कुंभार याने कांही रूपये देऊ करून मुठीचा प्रसंग करविला होता त्याज वरून शाहापूरकर आबाजी बिन धोंडजी कुंभार याने क्रिया केली दशरात्र पचेरात्र हरदु जणाचे घरी रक्षण असता त्याजकडील भावाने तेरावे दिवसी मुठीचा प्रयोग करित होता त्याजमुळे क्रिया लागली हे सर्वाचे मते जाहले त्याजवरून निवाडी प्रमाणे येजीत खत लेहून देणे म्हणून श्रीमत महाराज मातश्री ------ आऊसाहेब यानी आज्ञा केली त्यावरून शाहापूरकर कुंभार यानी येजदिखत लेहून दिल्हे यैसियास तुम्ही दिव्य करून खरे जाहालेसे असेजाणून साहेब कृपाळू होऊन तीन माहालचे कुंभार पणाचे म्हेतरकीचे वतन तुम्हास करार करून देऊन आलहिदा पत्रे करून दिल्हे असत त्याप्रमाणे तुम्ही श्रीचे कृपेस खरे जाहालेस शाहापूरकर याचे वतनास सबंध नाही तुम्ही आपले म्हेत्रकीचे कानु कायदे पान मान तश्रिफ पूर्वीपासून चालत आले त्याप्रमाणे आनभऊन पुत्र पौत्रादि वशपरंपरेन सुखरूप राहाणे शाहापूर यासपासी पुर्वील कागदपत्र असतील ते रदअसत जाणिजे छ २५ रजेब मोर्तब

(X) मोर्तब

साक्षे देहाये गावगना

मौजे कोडाली कोकदम	बाजी जेनार्दन व
पाटील कापले जाधव	जोना शामजी उपनाम
नांगर	भिसे जोसी कुलकणी

मालाजी बिन सुभानजी

जाधव चौगुले

अनेक जनाच्या साक्षी आहेत विस्तार भया

स्तब घेतल्या नाहीत.

ले. ८२	(११)	श. १६८४ चैत्र शु. १३
मू. दा. प.	**श्री सेकर प्रसन्न**	इ. १७६२ एप्रिल ६

(असल)
श्री
राजा शाहु च
रणी तप्तर सदा
शीव शामराज निरंतर [वाटोळा व तीन कड्यांचा.]

अजस्वारी राजश्री. सदासीव शामराव ता मोकदमानी मौजे तासगाव ता (साता) रा सुा इसने सीतैन मया व (अलफ) जी घोरपडे (देश) मुख ता मजकूर (यां) जे शाहपूर (चे) ईनामाचे जम बदला श्रीमंत माहाराज छत्र (प) ती स्वामी कैलासवासी याणी मौजे मजकूर पैकी पड जमीन बि आठ

इनाम कमिशन
ए

नक्कल

श्री

नकल

राजश्रीया विराजित राजमान्य राजश्री बाळाजी जनार्दन स्वामी गोसावी यांस.

पो माधवराव बलाळ प्रधान नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिहिणे विशेष नाईकजी व मालोजी व महिपतराव घोरपडे याची ता वाळवे येथील देशमुखी पुरातन आहे तिचे भांडण रायाजी व हेगोजी माने वाणी भांडत होते त्याचा इनसाफ राजश्री घनःशाम नारायेण मंत्री याणी केला घोरपडे देशमुख खरे जाहले माने खोटे जाहले त्याजवळून बेदावा लिहून घेऊन या वा त्यास ते गैरहाजीर जाहले त्यावरी रायाजी व हेगोजी मृत्यू पावले त्याचे संतान भाऊबंद कोणी आहेत नाहीत त्याचा ठिकाण लागत नाही घोरपडे याचे वतन सरकारात जप्त आहे ते मोकळे करुन त्यास वतनाची करून द्यावी म्हणून मंत्री याणी सांगितले त्याजवरुन घोरपडे याचे देशमुखीचे वतन मोकळे आसे तरी मंत्री याणी मनसुबी केली ते कागदपत्र तुम्ही पाहून निवाडपत्र करुन देणे वतन मोकळे केले त्याची नजर रुो —

२०००० सरकारची—
१०००० जेष्ठ आखर साल मजकूर.
१०००० चैत्रमास सन खमस चैत्रमास पेस्तरसाल.
२००००

२००० सखाराम भगवंत चैत्रमास सन खमस.

२२००० ।—

येकून बावीसहाजार केले पैकी जेष्ठमासचे हाप्तेवारी सातारेयाची खर्चाची वरात लस्करातून जाहली आहे बाकी ऐवज तुम्ही वसूल घेणे रा छ १४ सवाल सुा आर्बा सितैन मया व आलफ बहुत काय लिा हे विनंती पेस्तरसालचा दाहाहाजार ऐन व दोनहाजार सखारामपंताचे येकून बारा येण त्याची मुदती—

प्रमाणे निशा करून घेऊन मग निवडपत्रे करून देणे छ मजकूर हे विनंती.
सूचना— ...हे चिन्ह ज्या अक्षराखाली आहे त्या अक्षरास असलेत शोध आहे असे समजा
——हे चिन्ह ज्या अक्षराखाली आहे त्या अक्षरास असलेत काट आहे असे समजावे

Sd/—
10—8—42
Name of the applicant Mr. Mahipatrao Khanderao Ghorpade.
In 1844 Laximon Row, at the instance, it Is said, of a dissatisfied carclln of his brother's laid claim to a share of the jagheer, and the superiority due to him as elder of the two brothers Owing to certain delays in getting the necessary papers, the final report on the case was not sent to Government till four years after. In it Mr. Anderson detailed the circumstances of the case very clearly, and gave it as his opinion that, looked as bastractedly, the merits of the case were in favour of Laximon Row's claim, as, in default of Govind Row, who fell at Ashteh, he was unquestionably the eldest son of Narayan Row Raja. Venkut Row denied his brother's seniority on the ground that he himself (Venkut Row.). was the son of senioa wife. The shastree's opinion, however, was clear that "the child who who first sees the light, is the eldest, whether he be the son of a senior or junior wife." and his opinion was confirmed by precedents. Notwithstanding this Mr Anderson submitted that after the lapse of so many years, Laximon Row's claim could not be heard. The Government concurred in this view, and their decision was subsquently fully approved by the Court of Directors, which observed that it was "impossible, especially at this distance, of time, to supersode the rights held by the present Raja under an express grant for Mr Elphinstone." Laximon Row appealed vehemently against this decision, but shortly afterwards died. In the course of his inquiry a discovery was made that reflected considerable discredit on Venkut Row Raja. A couple of years before the date of the report above referred to Mr Anderson and investigated a dispute of very long standing between Venkut Row and the Dessainee of Lokapoor. The letter had been for years claiming the district of Lokapoor as being her's on inam tenure, whereas the Raja asserted that she held it only on a lease. So long ago as 1834 the case had been submitted to a panchayat which decided in the Raja's favour, but the dispute still cootinued, and was finally settled by Mr Anderson in 1846. During the investigation into the case the Raja produced a sunnud purporting to be a grant of the five Mahals from the Badshah. When Laximon Row's claim had to be inquired into Mr Anderson remembered this document and called for its production. To this Raja replied that it was lost and had never been in his possession. The fact

appears to have been that, as was generally supposed, the sunnud that had been produced was a forgery.

There were other matters which at this period brought down the displeasure of Government on Venkut Row Rajay ;- During the year 1839, 1840 and 1841 a number of serious gang-robberies were committed in the neighbourhood of Moodhole by men belonging to that place. In one of these cases the Magistrate traced a quantity of the stolen property to a village in Moodhole, and found reason to suspect that Venkut Row Rajay had harboured the offenders generally and was in league with them. The matter was formally inquired into, and reported to Government, which recorded its opinion that "there exists the strongest possible grounds for suspecting that the Raja of Moodhole has connived at the several gang-robberies which have been traced to persons in his district;" that however, "he can nit be accused directly of such connivance but his administration can be charged with a total want of cooperation in detecting and apprehending robbers traced into the territory and taking refuge there." The resolution went on to express extreme regret at the lax and unsatisfactory manner in which the administration of the state was conducted, which Government remarked "was entirely attributable to the" suspinencess and culpable indifference" of the Raja, who was warned that he could not be permitted to continue such a course of conduct when the effect was so injurious to British subjects. It was pointed out to Venkut Row that he held his jagheer on terms requiring him to do justice, and he was informed that, as the paramount power, a responsiblity rested with the Government of seeing justice done. Finally on intimation was given to him that, unless a change for the better look place, it might, "be necessary to take steps that would in a great measure diminish an authority which he seemed to little inclined to use for the benefit of the public interest."

The warning was not altogether without its due effect, and sometime afterwards Mr. H. L. Anderson reported that the administration of Moodhole had improved. On more than one occasion, however, subsquently the chief's conduct was brought unfavourably to the notice of Government for oppression and injustice, and at last when, in April 1850, the Raja released a man who had been apprehended with stolen property, the Political Agent reported that in his opinion "the time had arrived for the adoption of some measures for securing a better police administration." of the jagheer. In reply to this Government observed that by the 7th article of the terms granted to the Raja in 1819 it had a clear right to make such arrangements as it deemed proper under the circumstances, but that it would only impose a fine at first as warning to the Raja, and the Political Agent was requested to state his opinion as to the amount of fine to be levied. On the matter being referred to Mr. Manson, the Assistant Political Agent, he suggested that Rs. 5,529-5-6 should be exacted from the Raja, being the amount of unrecovered stolen property in the case in question. Mr. Reeves, the Political Agent, however, thought this amount insufficient. He submitted to Government a report commenting

most unfavourably on the Raja's charactor; and suggested that the fine should be fixed at Rs. 11,000

Fortunately for the Raja at this juncture a change took place in the agency' and Mr Reeves was succeeded by Mr. J. D. Inverarity. The latter gentleman' on being referred to by Government, gave an opinion widely differing from that of his predecessor; and reported that the chief had not received that countenance and support from the agency to which he was entitled, as the akbarnuwees of Government new writter at Moodhole had been allowed to an extent that destroyed the chif's authority, and was in the habit even of addressing the Raja officiallally on terms of equality. Mr Inverarity then commented on the specific charges against the Raja, explaining them in a manner favourable to the latter, He protested against the power given to the newswritter, and urged that due support should be given to the Raja. These views were fully approved by Government and the Court of Directors, who expressed themselves willing to give the Moodholekur another chance.

Not long after this, in December 1854, Venkut Row died. Notwithstanding the bad name he bore at one time with the authorities in consequence of the defectiveness of the police arrangements, and grave suspicious that attached to him of not only harbouring robbers, but actually conniving at their lawless deeds, he seems in many respects to have been a fair sample of a Maratha ruler and he was considered by the natives the best ruler in the Southern Maratha Country. He was on the whole, Captain (now Lieutenant colonel) G. S. A. Anderson reported in 1861, a liberal landlord, and his ryots were generally better of than those of the other jagheer states. The assesment was light, and Brahmin influence was not so strong as in the Putwurdhun surinjams. He was unfortunately served by bad officials, and certain evil-disposed persons made it their study to give an unfavourable colouring to his administration. His personal character was such as to make him popular among his countrymen. He was an expert horseman and fond of field sports, and in conversation he showed great readiness of repartee. His character was however marked by a not uncommon Maratha failing-that of extreme credulity, and during the latter years of his life he was much victimized by impostors, who undertook to cure by charms a stiff arm he had, and to find buried treasure.

Venkut Row was succeded by his son Bulwunt Row Baba Sahib, who at the time of his father's death was thirteen years of age. After Venkut Row's death a document was found purporting to be a sort of will in which he expressed his wish that the work of the state should be carried on by his son with the assistance of the Karbharees. Some doubt arose as to the genuiness of this document, and it was decided finally that the appointment of a servant of Government as Karbharee of the Moodhole estate during the minority of the young chief was imperatively demanded, as the Government, bearing in mind the character of the Raja's

administration, could place no confidence in any officer subordinately connected with it, and also remembered the fact that the history of the agency in the Southern Maratha Country was "fertil in instances of gross peculation and mismanagement by relations and karbharees when entrusted with the administration during minorities." This decision was of coures extremely distasteful to those who had expected to hold the reins of power, and a letter was sent to Government in which the young chief applied to have the provisions of his father's will carried into effect. The application, however, was without effect, as the Governor in Council considered that the Raja in making it was only an in strument in the hands of others. and the authorities felt assured that it was for the minor's own interests that the arrangements for the administration of the estate should be carried out as ordered. Accordingly a government karbnaree was appointed and arrangements were made for the Raja's education. A tutor was procured for him from Bombay and he was carefully educated, receiving insuuction in English among other subjects.

In 1856,during the Huk inquiry, conducted by Mr. Chapman, which has been so frequently referred to in these pages, forged accounts were submitted from Moodhole as had been the case during the previous inquiry in 1844. The Chief being dead under whose administration thess discreditable proceedings had taken place, the Government merely prohibited the payment of further compensation and directed the refund of Rs.8,497-4-1, the amount shown to have been fraudulently obtained.

During the minority of the young Raja several improvements were effected in his estate. The current coin of the district has been the Peerkhanee rupee. (According to the mint valuation standard the value of the Peerkhanee rupee is 13.605 per cent, below that of the new Bombay currency.) but the late Raja two years before his death had given orders that the revenue should be levied in Government currency. The preliminary steps towards this desirable result had been taken when the chief died, but all the arrangements had to be completed and the change of currency had to be introduced by the karbharee, Kristnajee Bullal. This delicate operation he managed sucessfully, though at first many complaints arose. He also made a revenue settlement which increased the revenue of the state by Rs 2,000 per annum, without, harassing the ruots. In his administration of justice and police arrangements the kerbharee did not give so much satisfation. The Political Agent reported unfavourably on his conduct in connection with a most arrocious murder that took place near Moodhole, and his unfavourable rcmarks were endorsed by Government. The elaborate investigation, howevr, into the case referred to and the karbharee's administration generally, by Captain G. S. Anderson, showed that due allowance had not been made for the position in which Kristnajee Bullal was placed at Moodhole with incompetent officials wedded to a loose and defective style of work, and disposed to combine strongly against the Government karbharee. In consequence of Captain Anderson's report the Government modified the opinion formarly

expressed on the subject and agreed with the acting political agent in thinking that, all things considered. Kristnajee Bullal's administration of the estate was creditable to him, though it was still held that his proceedings in connection with the murder case were not satisfactory.

It should be mentioned that during the eventful period of the Indian mutiny the state of Moodhole remained quiet with the exception of an attempt made by the Beruds of the village of Hulgullee to resist the operation of the Disarming Act. The instruction, which extended no further, was promptly quelled by a paity of the Southern Maratha Horse and a company of the 28 th Regiment N. I. The cost of suppressing the rising was afterwards recorded from the state.

In the begining of 1861 the young chief was entrusted with the management of his estate. At the time of his father's death the treasury contained a cash balance of Rs 45,642-13-2, the debts due to the estate amounted to Rs 24,873-9-6, and the debts due to the chief to Rs. 51.380-1-0 of which, however, only Rs. 24.886-3-8 were supposed to be recoverable ;-(The amounr actually recorded was Rs 28,400-13-4) The debts were paid off, and during the minority the average annual excess of receipts over expenditure amounte to Rs 44,208, so that the young Raja came into his estate with a cash balance of upwards of three lakhs of rupees in hand. Half of this sum the chief interest to the prosecution of public works,

Bulwunt Row Raja was spared but a short time to the enjoyment of his estate. On the 27 th March 1862 he died suddenly, leaving two children. a girl, (married some time before her father's death to a nephew of the Raja oe Kolapore, who was present on the occasion with all his retinue, this being the first time, it is said, that a member of Sivajee's family visited Moodhole since Bajee Raja's death, or indeed had nay friendly intercourse with the Moodholekur.) agad five years, and an infant son of one year old vankut Row. The event was much lamanted, as the young Raja had given promise of being one of the best chiefs in the Southern Maratha Country., His administration of justice was most satisfactory, and he had shown much interest in the prosecution of public works and the spread of education. In the words of the Governor's letter of condolence to the widow, it was a source of sincere regret. "that a chief who promised to be such a wise ruler and such a bright example to his fellow should have beeh cut of at the early age off twenty one."

Immediately after the death of Bulwunt Row Raja, his widow sent a letter to the Assistant Political Agent, informing him that her husband on his deathbed had expressed his wish that she, together with the karbharee and the moonsiff, should carry on the administration of the estate durning the infant chlf's minority. It had been found, however, that karbharees in charge of minor's estates, unless made directly responsible to Government almost invariably betrayed their trust. It was feared that if the widow's wishes in the present

case were at attended to, and the officials were made, responsible to har alone, there would inconsequence, of her total inexperience be no check whatever on her proceedings It was accordingly directed by Government that the karbharee and moonsiff should carry on the administration of the state, consulting the widow on all reasonable occasions, and being guided as far as feasible by her wishes, but being held directly responsible to the political authorities. A memorandum of instructions was then drawn up to the guidance of the two officials, defining their several duties and the new arrangements were at once carried into operation.

During the late chief's life time a discussion had commenced regarding his inam village of Koomteh and Nandgaum in the Satara collectorate, to which had been intended to apply the provisions of the Act for the summary settlement of inams. The Raja contended that these inams were secured to his by tretay but the Government declined to take this view of the case. It was intimated to the Raja, however, that if he desired it, his villages and lands in the Satara collectorate would be excluded from the summary settlement on the ground that they were held on a political tenure. This intimation caused considerables perplexity to the chief. He could not omancipate his mind from the idea that these villages were really guaranted to him by treaty, and he feared that the admission that he held them merely on a political tenure would effect his title to them. At one time he thought of proposing to exchange these villages for others of equivalent in Belgaum collectorate, but his death prevented any steps being taken towards this end. The case was then laid before Government, which decided that, for political reasons, they complied with the late chief's request that these inams should be considered as forming part and portion of the Moodhole estate, and that therefore the summary settlement should not be applied to them. With regards to the question which had arison whether Koomteh should be brought under the regulation, it appeared to the Government that, "Karbharee appointedh by Government was in charge of Moodhole, the most obvious mode of conducting the police and maglsterial work of the village during the young chief's minority would be to place it under the regulations and in the Satara magistracy, the jagheerdar's agent at the spot being appointed a subordinate of the I st or 2 nd class accaording to his fitness. Had the late chief survived" it was observed, this might have been felt as irksome but it will not be falt on by the young chief, nor by the people of the village, if the karbharee and local agent now, and the young cnief afterwards, be invested with jurisdication in civil suits in the village.

The Moodhole estate has now been six years under the management above described. Careful arrangement have been made for the young chief's education and for the proper administration of his estate. The districts have been measured and the land classified bv the revenue survey, and one-anna cess for educational purposes and public work has been sanctioned and introduced. A considerable sum is being spent every year in public

works of which a detailed account is given elsewhere and such of the large surplus receipts as are not devoted to this purposes are invested in Government securities. There is there fore on every ground for hoping that when Venkut Row Raja is old enough to be invested with full powers he will be found well be qualified for the dutie, of his high position. His finauce will be in a more prosperous state than was ever the cash with any of his ancestors, and he will reap the benefit of the expenditure that has incurred on account of public works in the increased prosperity of his estate, and the enhanced contentment of his ryots.

५ तात्विक—वृत्तांतपर

१९ देशमुखी वतन

(श्री. शं. ना. वत्स जोशी)

'देशमुखी वतन' हे सर्व वतनात श्रेष्ठ वतन आहे. ह्याचे महत्व देशव्यवस्था आणि राज्यकारभार पद्धती ह्या दोन्ही दृष्टीनी अतिशय आहे. ह्या देशमुखी संस्थेचे काम, मानपान, आणि हक्क व ह्या संस्थेचा व्याप, तसेच ह्या संस्थेविषयीचे अनुकूल प्रतिकूल उल्लेख पाहिले असता, इतकी गुंतागुंत त्यात दिसून येते की, त्यामुळे ह्या संस्थेच्या स्वरुपाविष्कार पूर्णपणे व नेमका होणेही कठिण होऊन बसले आहे. अशा ह्या महत्त्वाच्या, गुंतागुंतीच्या पण अत्यंत आवश्यक असलेल्या संस्थेसंबंधाने, सामान्यतः शिवकालास अनुसरून, येथे काही विचार मांडण्याचे योजिले आहे.

१. 'देशमुखी' ह्या शब्दातील 'देश' व 'मुख' ही दोन्ही पदे संस्कृत असली तरी देशमूख असा सामासिक शब्द संस्कृत वाङमयात नाही. अर्वाचीन म्हणजे शक तेराशे पुढील संस्कृत ग्रंथरचनेत कदाचित आढळेल. तत्पुर्वी ह्या शब्दाचे काम 'विषयपति' ह्या संज्ञेने होत असे, **ग्रामपति' विषयपति' 'राष्ट्रपति'** अशा चढत्या संज्ञा ताम्रशिलाशासनात येतात. 'आहार' 'भूति' 'मंडल' 'देश' ह्या संज्ञा मुसलमानपूर्व राजवटीत येतात आणि त्यात देश शब्द आहे. तथापि ज्याचेपासून मुख हा शद्व साधता येईल असा मुख्यः किंवा **मुखं**, **मुखी** हा शब्द त्यास जोडलेला नाही. सांराश. 'देशमुख' हा शब्द मुसलमानोत्तर अधिकृप्रसृत व रूढ झाला हे म्हणणे इष्ट होईल. येथेच हेही सहज लक्षात येणार आहे की, ग्राममति, विषयपति, आहारपति ह्या सामासिक शब्दात ल पूर्वपद, गणपति, नरपति, ह्याप्रमाणे समुदायबोधक नसून एकत्वबोधक समजावयाचे. जर तसे न समजले तर इतर शब्दांना वैयथर्य येऊन अनवस्था प्रसंग येईल. देशमुख ह्या शब्दामध्ये देश ह्या पदाने एक परगणा, एक प्रांत घ्यावयाचा. देशमुख ह्या शब्दाच्या जोडीला देसाई, नौडगोंडा हे दोन शब्द योजिलेले आहेत. पण ते कोकणात व कर्नाटकात अधिक प्रमाणात आढळतील. त्याबरोबर हेही लक्ष्यात घेतले पाहिजे की, महाराष्ट्रातील देशमुख बाहुल्याने मराठाज्ञातीतील आहेत, तसेच कोकणातील देसाई ब्राम्हण व कर्नाटकातील नाडगौडा लिंगाईत ज्ञातीतील आढळतील. कर्नाटकातील हे नाडगौडा पुढे मराठ्यांचे लिंगाईत झालेले आहेत. 'नाड' म्हणजे प्रांत व गौडा म्हणजे पाटील. हा गौडा शब्द कसा झाला हे अमळ लक्ष्यात घेण्याजोगे आहे. तिकडे ग्रामगंड असा संस्कृत कानडी समाज ताम्रपत्रात यतो. गंड म्हणजे पती. ग्रामगंड ह्यापासून गाऊंड गावुंड व त्यापासून गौडा हा शब्द साधित झाला व तो पाटील ह्या अर्थी रूढ झाला. आपल्याकडील गावगुंड हा ह्या वेळी साक्षेपी वाचकांच्या ध्यानी येईल. असो कर्नाटकात देसाई ही संज्ञाही पत्रव्यवहारात येते, पण ती नाडगौडाच्या मानाने अर्वाचीन वाटते. **महाराष्ट्रात देशमुख म्हणजे तरी देशाचा प्रांताचा पाटीलच** आहे. देसाई शब्द देशस्वामी किंवा देशपति ह्यापासून बनला आहे. त्यातही देशपति ह्या शब्दापासूनच देसाई ह्याची उपपत्ति अधिक संयुक्तिक वाटते कर्नाटकात देसाई व नाडगौडा हे द न्ही शब्द कागदपत्रातून आले आहेत. त्यातहि नाडगोडा हा शब्द किल्लाप्रमुख देश विभागाला लावलेला आहे. श्रीनिवास वेंकटाद्री हे गदग परगण्याचे देसाई व नादगौड आहेत (शि. च. सा. खं. ६ ले. २० पहा) येथे हे दोन्ही शब्द भिन्नर्थक आहेत हे उघड आहे. धारवाडचे देसाई हेही नाडगौड आहेत. नाडगौडकीचे वतन किल्लेदाराशी संबंधी आहे. (कित्ता ले. ५ पृ. ५ ले. २५ पहा)

देसाई, देसगत, जमेदार हे शब्द सामान्यतः देशमुख ह्या संस्थेचेच वाचक आहेत. ह्यातही मुसलमानी अधिकारी पत्र इत्यादी लिहिताना जमेदार, देशमुख देसाई हे शब्दच प्रामुख्याने योजतात. जमेदार ह्याचा मूळ शब्द झमीन्दार (जमीन बाळगणारा) हा आहे. सभासदी बखरीत जमीदार व मोकासी एक जाहलियाने ते व रयत बेकैद होतील आणि कमाविस (वसूल) होणार नाही, असे जे म्हटले आहे, त्यातील जमीदार हा शब्द देशमुख ह्या अर्थाचा मुख्यतः आहे.

देशमुख ह्या शब्दाचा प्रतिशब्द म्हणून जो चुकीचा एक शब्द सांगितला गेला आहे असे वाटते. विशेषतः शिवाजीचे देशमुख कोण ह्यांचे प्रतिपादन करीत असता सांगितला आहे. त्याचा थोडक्यात येथे विचार करणे प्राप्त आहे. शिवाजी महाराजांची राज्यपद्धती संस्कृतातील प्रसिद्ध शुक्रनीतिसाराशी संनिकट असून प्रागतिक प्रवृतीची दिसते हे सांगताना प्रो. शेजवलकर म्हणतात शिवाजीचे देशमुख (साहसाधिपती) व पाटील (भागग्राही) हे मराठेच असत. (भा. ई. सं. त्रै. व. ४ पृ. ७७) श्री. शेजवलकरांचे हे म्हणणे त्यांनीच उद्धृत केलेल्या वचनार्धाशी जमणारे नाही. भानग्राही क्षत्रिधस्तु साहसाधिपतिश्च सः शुक्रनीतिसार (ह्यातील साहसाधिपति व भागग्राहि ह्या संज्ञा शुक्रनीतीमधील अ. २ श्लोक १२० मध्ये आल्या आहेत.)

साहसाधिपती चैव ग्रानेतारमे च :
भागहार तृतीयं तु लेखकं च चतुर्थकम : :

हा श्लोक राजाने आपले अधिकारी कोठे कोठे व कोण नियुक्त करावेत हे सांगत असता आला आहे नितिसारातील भागग्राहीच्या जागी येथे भागहारी हा शब्द आहे. पण त्यामुळे त्याच्यात अर्थात अतर पडण्याचे कारण नाही. साहसाधिपति म्हणजे दंडाधिकारी. साखरन्दंड (साहसं तु दमो दंडः अमरकोश) भागग्राही किंवा भागहारी म्हणजे कमविसदार, वसूल गोळा करणारा. दंडाधिकारी ह्याला सध्याचा फौजदार हा शब्द सांगता येईल व तो गीर्वाण कोशामध्ये सांगितलाही आहे. तात्पर्य, साहसाधिपति व भागग्राही ह्या दोन्ही शब्दांचे देशमूख व पाटील हे अर्थ युक्त वाटत नाहीत. शिवाय हे राजनियोजित आहेत. शिवकाली व मुसलमानी अमदानीत देशमूख ह्या शब्दास दुसरा शब्द जमीनदार हा आला आहे. हे व मुसलमानपूर्व कालात विषयपति हाच शब्द देशमुख संज्ञेशी अधिक जवळचा आहे, हे वर दिलेच आहे.

२. देशमुखीचे महत्व :— ह्या देशमुखीचे महत्व केवढे आहे, हे व्यतिरेकाने प्रथम पाहू. म्हणजे त्याचा निषेध केला. तेथील उल्लेख एकप्रकारे पाहण्याजोगे आहेत. अमात्य आपल्या राजनितीत म्हणतात.

“राज्यातील देशमुख देशमूख आदिकरुन यास वतनदार ही प्राकृत परिभाषा मात्र आहे. ते स्वल्पच परंतु स्वतंत्र देशनायकच आहेत. त्यास साधारण गणावे असे नाही. हे लोक म्हणजे राज्याचे दायादच आहेत.” वि ज्ञा वि. आवृत्ति पृ. २९

सभासद आपल्या शिवाजी चरित्रात पृ. २९ वर म्हणतात —

इदलशाही, निजामशाही, मोगलाई देश कबज केला, त्या देशात मुलकांचे पाटील कुलकर्णी व देशमुख यांचे हाती कुल रयत [असेल सभासद बखरीची वाढ केलेल्या चितगुप्त विरचित बखरीतहि आहे. पण सभासदी बखरीची अनुकरण केलेल्या शेडगावकर बखरीत नेमके विरुद्ध लिहिले आहे. तसेच मल्हार रामराव यांचे बखरीत व रजनीतीतहि अमात्य नितीत उल्लेखाविरुद्ध मजकूर आहे. उत्तरकालीन लिखाण कसें असते व का ३ प्रमाण तसेच हे वतनासक्ती केवढी ह्यावरुन सहज दिसून येईल.]

ह्या दोन उताऱ्यावरुन ध्यानात येईल की, शिवकालाचे प्रारंभी देशव्यवस्था पूर्णपणे ह्या वतनदार मंडळींच्या आधीन होती. गावची रयत गावचे शिवार म्हणजे गावाखालील शेतीची व चराऊ अथवा पड भूमी ही सर्व पाटलाचे ताब्यात आणि परगण्यातील रयत व भूमी देशमुखांचे हाती म्हणजे राज्य चालविण्यास राजाला जो पैका व धान्यादी सामग्री पाहिजे ती ह्या देशमुख—देशपांडे वतनदारांकरवी मिळवावायची. देशमुख देशपांड्यांच्या जोडीला राज्यसूत्र— चालकांकडून सुभेदार नेमलेले असतात, पण तेही देशमुख देशपांडे हे आपले काम बरोबर करतात न करतात हे पाहण्यासाठी असतात. म्हणजे त्यांनीहि देशमुखादिकांचेकडूनच हे वसूलीचे काम करवून घ्यावयाचे आहे. स्वातंत्र्याने नाही. तात्पर्य देशमूख हे परगण्यासाठी सरकारला जबाबदार सरकारचा व रयतेचा प्रत्यक्ष संबंध केव्हाही व मुळीच नाही. असा प्रकार असल्यामुळेच लेखाच्या प्रारंभी देशव्यवस्था व राज्यकारभार पद्धति हे दोन विभाग दिले आहेत. प्रस्तुत राज्य कारभारपद्धतीविषयी पाहावयाचे नाही. देशव्यवस्थेविषयीच मुख्यतः पहावयाचे आहे व त्यासाठी देशमुख ह्या वतनसंस्थेविषयी माहिती मिळविणे इष्ट आणि त्यातील जेवढा तपशील पाहता येईल तेवढ्या प्रमाणात देशव्यवस्थेची बाजू आपल्या निदर्शनास येईल.

३ राजप्रधानादिक सरकारकून मंडळी आणि हे परगण्याचे वतनदार लोक जेव्हा एकच एखाद्या निर्णयसभेमध्ये उपस्थित असतात तेव्हा ह्या देशमुख वतनदारांची प्रतिष्ठा केवढी मोठी आहे, हे दिसून येते. एकदा म्हणजे इ. सं. १७१८ आक्टोबर (१६४० आश्वीन) मध्ये सातारा किल्ल्यावर दाभोळचे देशमूख व रायरी मामल्याचे सरदेशमूख असलेले शिर्के मंडळीत, सरदेशमुखी व देशमुखी वतनाविषयी भांडण लागले होते व त्याच्या निर्णयासाठी सर्व प्रधान, बरेचसे सरकार, देशमूख पाटील इत्यादी प्रमुख मंडळींची सभा भरली होती. ह्या निर्णयसभेत अष्टप्रधान व त्यांचे हाताखालील इतर अधिकारी १८ आले आहेत. तसेच सरलष्करादिक सरदारमंडळीहि २७ आहेत. आणि नंतर देशमूख पाटील मंडळींची नावे सभेस उपस्थित होते त्यांची दिली आहेत. ह्यात विशेष कौतुकाची व आवर्जून उल्लेख करण्यासारखी गोष्ट ही की, ह्या निर्णयसभेत छत्रपति शाहूमहाराज हे उपस्थित आहेत, पण ते राजमुद्राधिकारी ह्या नात्याने. प्रारंभी म्हणजे कागदाच्या अगदी डोक्यावर अष्टप्रधानादि मंडळी आहेत. तेथे नसून देशमुख मंडळींची जेथे नोंद आहे तेथे त्यांचे नाव देशमुख ह्या नात्याने आहे. तेथेच शाहू छ. नी. आपली देशमुखीची मुद्राहि दिली आहे. शाहूराजे ह्यांनी वाई प्रांताची देशमुखी मिळविली होती. ह्या देशमुखीचे प्रथमचे व खरे अधिकारी पिसाळ. पण सुर्याजी पिसाळ व दत्ताजी पिसाळ ह्यांचे ह्या देशमुखीतील वडिलकी व वाटा ह्याबद्दल बराच कालपर्यंत भांडण चालू होते. अशातच ही देशमुखी औरंगजेब इकडे आला असता न्याहारखान गोरी, ह्या वाई प्रांतावरील तेव्हांच्या मोगली अधिकाऱ्याने आपल्या स्वतःच्या नावार चढवून घेतली. पुढे लवकर औरंगजेब इकडेच मृत्यू पावला व शाहूमहाराजांची सुटका होऊन ते साताऱ्यास आले तेव्हा, त्यांनी ही वाईची देशमुखी स्वतःकडे घेतली. आणि देशमूख प्रांत वाअी असा शिक्काहि करविला आणि ह्या नात्याने म्हणजे देशमुख म्हणून ह्या वरील सभेत ते उपस्थित आहेत. वतनपत्रे निवाडपत्रे पृ. ७४—८० पानावर हा महजर छापला आहे. ह्यावरून राजकीय मानापेक्षा समाजामधील देशमुखीमुळे मिळणारा मान हा श्रेष्ठ आहे. असेच निश्चितपणे ठरत आहे. आणि देशमुखी ही संस्था राज्यासनाष्ठित व्यक्तिलाही प्रलोभनीय अशी प्रतिष्ठेची व लोकमान्यतेची कशी वाटत होती हे उघड होत आहे. असाच दुसरा निर्णय राजवाडे खंड ३ पृ. १०८—१२० वर छापला आहे. हा निमसोड मायणी ह्या गावातील घारगे देशमुखांमधील तंट्यासबंधी आहे. ह्या निर्णयपत्राने पुढे (पृ. ११८) महाराजसाहेब म्हणजे हिंदुपती बादशाही ईश्वराचे आधिष्ठान असे ज्या छत्रपतींना उद्देशून गौरवून म्हटले आहे त्या शाहू छत्रपतीनी स्वतःचा निर्देश देशमुख मंडळीतच केला आहे. ही सभा सातारा येथेच श. १६४१ जेष्ठ शु. १—१७१९ मे, ९ रोजी झाली ह्या दोन्ही महजराच्या मजालसी म्हणजे निवड्याच्या गोतसभा सातारा येथे झालेल्या आहेत. हेही लक्ष्यात घेतले पाहिजे. म्हणजे अन्य कोठे तरी ही सभा बैठक झाली व तेथे

छत्रपति जाणे शक्य नाही म्हणून त्यांनी आपला मुतालिक पाठविला व ह्या कारणाने छत्रपतिचे नाव हमशाही गोतात व देशमुख मंडळीत पडले, असे म्हणण्यास अवकाश नाही. ह्या सभा साताऱ्यातच झालेल्या आहेत. राजवाडे खं. २० ले. ४३ मध्येही शाहू छत्रपतींचा देशमुख म्हणूनच महाजरामध्ये निर्देश आला आहे. ह्या सगळ्याचा अर्थ इतकाच घ्यावयाचा की, वतनदारांना रयतेमध्ये मान फार व त्यातही परगण्याचे वतनदार जे देशमुख त्यांना मान फारच मोठा समजला जाई. इतका की त्या मानाबद्दल छत्रपतिनाहि हेवा वाटावा.

४. देशमुख किंवा देशपांडे अथवा पाटील व कुलकर्णी ह्यांचा सरकारी कागदोपत्री उल्लेख केला जातो तेथील त्यांचा मायनाही येथे लक्ष्यात आणण्याजोगा आहे. विशेषतः ज्या पत्रात सरकारनियोजित सुभेदार व कारकून ह्यांच्याबरोबर ह्या लोकनिर्मित वतनदार मंडळींचा निर्देश केला जातो. तेथील उल्लेख अधिक लक्ष्य आहे.

अज रख्तखाने राजश्री जिजाआऊसाहेब दामदौलतहू बजानेबु कारकुनानी हाल व इस्तकबाल व देशमूखानी व देशकुलकर्णियानि कर्याती मावल इ.

अज रख्तखाने राजश्री शाहाजीराजे ... कारकुनानी हाल व इस्तकबाल व देशमुखानी परगणे पुणे यासी. शि. च. सा. खं. २ ले. १०८ व ले. ११७

ह्या उधृत केलेल्या पत्रप्रारंभीच्या मायन्यात जिजाबाईसाहेब व शाहाजीराजे भोसले यांचे कचेरीकडून परगणे पुण्याच्या कारकुनांना व देशमुख देशपांडे यांना उद्देशून आज्ञा केली आहे. पण ह्यात हाल व इस्तकबाल ही विशेषणे केवल कारकुनानाच लावलेली आहेत. हाल व इस्तकबाल म्हणजे आतांचे व ह्यापुढे येणारे (जे कारकून त्यांना) हाल हे हल्ली (सांप्रत, चालू) ह्या शब्दांचे रुप आहे. इस्तकबाल म्ह. भावी रा. खं. १५ ले. ३७९ मध्ये हे बदलणारे अधिकारी म्हणजे कारकून हुदेदार लोक ह्यांचा वेगवेगळा असा दोनदा उल्लेख पत्राचे प्रारंभी आला आहे. आणि ह्या दोनही उल्लेखात दोनदा हाल व इस्तकबाल हा शब्दप्रयोग आला आहे. ह्या मायेने पद्धतीवरुन देशमुख हे शाश्वतचे अधिकारी आणि कारकून सुभेदार हे आजचे वेगळे व पुढचे असे बदलणारे म्ह० अशाश्वत अधिकारी होत असे उघड दिसून येते. शाश्वत अधिकारी व अशाश्वत अधिकारी ही परिभाषा त्यावेळी होती व त्यातील शाश्वत अधिकारी म्हणजे वतनदार होत.

५. देशमुखी ह्या संस्थेचे श्रेष्ठत्व आणखी एकाप्रकारे निदर्शनास यते म्हणजे देशमुखांचा म्हणून सरकारी भूगोलाहून भिन्न असा भूगोल स्वतंत्र असे. येथे भूगोल हा शब्द आजच्या समजुतीसाठी भूगोलाचे पुस्तक ह्या कल्पनेने योजलेला आहे. त्यावेळचा शब्द तुमार वासलाती किंवा देह झाडापत्रक अथवा धुरुंग झाडा हा आहे. सरकारी भूगोल व देशमुखी भूगोल वेगळा कसा व का ह्यांचे थोडक्यात स्पष्टीकरण करणे अवश्यक आहे. पुणे प्रांत यात आपण उदाहरणार्थ घेऊ. ह्या पुणे परगण्याचे देशमूख शितोळे पुणे परगण्यावरील राजकीयसत्ता प्रथम निजामशाहीची त्याच्याही आधी बहामनीशाहीची पण ती प्रस्तुत नको. निजामशाही नष्ट होण्याच्या पुर्वीही हा पुणे परगणा अदिलशाही व निजामशाही ह्यांच्या सरहद्दीवर असल्यामुळे त्यावर सारख्या स्वाऱ्या होत असत. (हा परगणा शहाजीकडे का सोपविला गेला त्याचेही कारण सहज ध्यानी येते.) अशा वारंवार स्वाऱ्या होत असल्यामुळे ह्या प्रांताचे सरकारी ठाणे पुणे, भुलेश्वर अशा वेगवेगळ्या ठिकाणी बदलले आहे. म्हणजे त्या त्या वेळी ह्या परगण्यातील काही गाववार निजामशाही सत्ता तर काही गाववार अदिलशाही सत्ता चालू राही. पुनः निजामशाहीचा तह होई व पुनरपि पुर्ववत स्थिती

होई. शेवटी म्ह० इ. १६३६ मध्ये निजामशाही नष्टच झाली. तेव्हा, त्यातील गावाची वाटणी होऊन निमा भाग दिल्लीकर मोगलाकडे गेला व निमा भाग अदिलशाहीकडे आला. असे हे पुढे कायमचे विभाग झाले तरी किंवा मध्यंतरी अदिलशाही निजामशाही मधील हर्षामर्षामुळे अपतप्रसंगाने काही गावांची देवाणघेवाण व घालमेल झाली. तरी, शितोळे हे देशमुख कायमचेच व त्यांच्या अधिकारात वा मानापानात अथवा कामात उणेपणा केव्हांही आला नाही किंवा त्यांच्या देशमुखीविषयी कोणी अमान्यताही दाखविली नाही. म्हणजे निजामशाही विद्यमान असता निजामशाहीच्या सत्तेतील म्हणून पुणे परगण्यातील काही गावांची नोंद होई. तसेच तहामुळे जी गावे अदिलशाहीकडे जात त्यांची नोंद, अदिलशाही सत्तेतील म्हणून नोंद होई आणि पुढे काही गावे मोगलाईतील म्हणजे दिल्लीकरांच्या सत्ताविभागातील म्हणून तशी नोंदली गेली म्हणजे एका पुणे परगण्याचे सर्व गाव पहावयाचे झाल्यास सहकारी रीत्या तीन सत्तांमधील देहझाडे पहावे लागतील. पण स्वतः शितोळे देशमुखांच्या दप्तरी जी नोंद नेहमीची राहील तीत मात्र असा प्रकार असण्याचे कारण नाही.

ह्यावरून देशव्यवस्थेसाठी देशमुखाचा भूगोल हा स्थिर व प्रमाण होय. ह्यावरून देशमुखांचा देशविभाग हा कायम व त्याबरोबर त्यावरील देशमुख हे शाश्वत अधिकारी असे जे वर म्हणले ते कसे संयुक्तिक हे ध्यानी येईल.

६. देशमुखी ही संस्था केवढी मोठी आणि प्रतिष्ठेची आहे, हे लेखाचे प्रारंभी त्या संस्थेच्या निषेधात्मक उल्लेखातून म्हणजे व्यतिरेकरुपाने दाखविले आता स्वतः हे वतनदार आपल्या वतनाविषयी कसे आढ्यतेने बोलतात ते म्हणजे अन्वयरुपाने दाखवून ह्या देशमुखी वतनाच्या अंतर्गत माहितीविषयी पाहू.

शिवचरित्रसाहित्य खंड ३ ले. ६११ मध्ये इंदापूर परगण्यातील खुद्द इंदापूर कसब्याच्या पाटीलकीबद्दल वाद उत्पन्न झाला असता पाटिलकी, देशमुखी इत्यादी जे वतनदार त्याविषयी बोलणे चालले आहे व तेथे म्हणले आहे “पांढरीवरी शर्त भीष्म होऊन गेले असतील. सातपाचसे वर्षे वतनदारी नाही तो आजी वतनावरी उभा राहिला... ऐसी (काय) गोष्टी आहे ?”

ह्याच पत्रात ज्या गावास पाटील नाही तेथे देशमुख पाटील व कुलकरणी नाही तेथे देशपांडे कुलकर्णी हा दस्तुर बुनियाद आहे, नवा नाही असेहि वाक्य आले आहे.

ह्या उताऱ्यामध्ये वतनाविषयी वतनदारांची काय समजूत असे हे स्पष्टपणे आले आहे. तसेच वतनदारापैकी ज्या देशमुख वतनदारांसंबंधाने प्रस्तुत विवेचन चालले आहे त्या देशमुखीविषयी काही अंतर्गत माहितीही आली आहे.

येथे एक गोष्ट लक्षात येते ती अशी की, वतनदारांना येथे वृत्तिवंत असे संबोधिले आहे. इतरत्रही अनेक ठिकाणी वतनास वृत्ति हाच शब्द योजलेला आढळतो. पण अमात्यांच्या राजनीतीत वतनदार वेगळे आणि वृत्तिवंत वेगळे अशी दोन स्वतंत्र प्रकरणे कल्पून सांगितले आहे. तेथे ह्या दोघांमधील भेद ज्या गुणलक्षणांनी स्पष्ट केला आहे तो युक्तच आहे. पण प्रत्यक्ष व्यवहारात ह्या ऐतिहासिक कागदपत्रात तसा विवेक केलेली स्थळे जवळ जवळ नाहीत म्हटले तरी चालेल. असो.

वरील उताऱ्यात वतनदार व राजे लोक ह्यातील तुलना अभिप्रेत आहे राजे कितीही आले तरी ते आले तसे जातील तसेच ते कितीहि बलिष्ठ असले तरीही वतने नष्ट करुन त्यांचे चालणारही नाही. एवंच

आपण वृत्तिवंत म्हणजे वतनदार हे येथील चिरस्थिर होत. आपणा आपणात वतनभाऊपणा आहे. एकाच्या वतनावरील दुसरा उभा राहू देणे ही भाऊपणाची नीती नव्हे. प्रसंगी मार खावा, बंदी पडावे (परंतु वृत्तीस दुसरा जडो देऊ नये) ही वृत्तिवंताची नीती आहे. वरील तुलनेत पांढरीवरी शतं भीष्म होऊन गेले ह्या वाक्यातील पांढरी शब्द हाही लक्ष्य आहे. काळीवरी म्हणजे शेतवाडीवर शतं. भीष्म होऊन गेले असा प्रयोग नाही. म्हणजे शेतजमिनीनीशी ह्या राजे मंडळींचा संबंध नाही हाही अर्थ पांढर व काळी ह्या शब्दयुग्मापैकी पांढर शब्द लक्षात आणला म्हणजे बारीक श्लेष ध्यानात येईल.

७. देशमुखी वतनाती कामे :— वरील उताऱ्यातील उत्तरार्धात ज्या गावी पाटील नाही तेथील पाटिलकी देशमुखांची असा एक न्याय सांगितला आहे. ह्यावरुन परगण्याच्या देशमुखाकडे केवढा अधिकार व त्या देशमुखाच्या कामाचा व्याप केवढा मोठा तोहि निदर्शनास येतो. ह्या देशमुखी संस्थेची निर्मिती कशासाठी व कोणाकडून ते पे. द. भा. ३१ ले. १ मध्ये आले आहे व त्यावरुन देशमुखीच्या अधिकाराची व व्यापाची कल्पना स्पष्ट होईल. देशमुख हे राजसत्तेकडून स्वतःच्या म्हणजे राजसत्तेच्या हितासाठी स्वसत्तेतील काही अंश देऊन लोकांचे पण सरकारी सत्तेस जबाबदार असलेले प्रतिनिधी म्हणून मान्य केलेले दिसतात. पेशवे दप्तरातील लेखात हेच कसे निर्दिष्ट आहे ते पहा.

बहमनी पातशाहाचेवेळी इ. स. १४२६ मध्ये जुन्नरकडे भीवरा म्हणून एक मवासी राजा होता. तो भीमानदीपासूनच्या मुलखाचा पैका घेत असे व बहामनी पातशहाचा अमल काही बसू देत नसे. हे पाहून एका मजलसीत ह्या भीवराचा बंदोबस्त कसा करावयाचा ह्याबद्दल विचार झाला. त्यात भीवराला जिंकण्याबद्दल कोणी अमीरउमराव विडा उचलेना. पण तर्फ वाडेपैकी ८४ गावांचा अंमल मी बसवून पैका घेऊन येतो, असे भीवराव सावंत ह्याने त्या सभेत सांगितले. त्याबरोबर त्यास तेथील देशमुखी चौथाई हक्कासह देण्याचे मान्य करुन परवाना दिला.

ह्यावरुन देशात आपली सत्ता चालू व्हावी म्हणजेच देशातील रयेतेकरवी आपल्याला दिवाणदस्त म्हणून जो कर म्हणजे महसूल यावयाचा तो मिळावा व ह्यासाठी तेथील पहिले बलिष्ठ आणि बादशाही अंमल न मानणारे राजे लोक त्यांचाहि परस्पर बंदोबस्त व्हावा म्हणून रयत लोकातीलच जे अधिकारी ते देशमुख झाले. हा देशमुखी निर्मितीतील एक प्रकार होय. मुख्यतः प्रांत—वसाहत व लावणी उगवणी हे देशमुखीचे आद्य कर्तव्य आणि त्यासाठी तिची निर्मिती. पुढे देशमुखी ही संस्था राजमान्य झाली. देशमुखापैकी बहुतेक सर्व देशमुखांचे आजचे उगम मुलूख लावणीत व तेथे राजसत्ता चालू करण्यात दिसून येतात. [हांडे (जुन्नर) यांचो देशमुखी तरवारीच्या बळाची जाली—सनदांनपत्रे पृ. ७०] त्यातही गाव वसाहत व लावणी, हेच मुख्य काम व पुढेही हेच त्यांचे मुख्य काम म्हणून समजण्यात आले आहे. पे. द. ३१ ले. १६१ मध्ये म्हटले आहे. पातशाही अमील येत होता तो जमीनदाराचे विद्यमाने पैसा घेत होता. ह्यातील जमीदार म्हणजे वर म्हटल्याप्रो देशमुखच होत. व त्यांचेच हस्ते रयतेकरवी पैसा घ्यावयाचा. अफझलखान देशमुखीचे काम असे सांगतो.

देशमुखचे काईदा आहे की विलायती फिरोन एक तसू पडू नेदीता पडी जमीन पडले असेल त्यास नांगराचे व इस्तावेचे कौलबोल देवाऊन तमाम जमीन कीर्दी करावे. साल बसाल दस्त चढत असावे. हे तुमचे रवेश आहे.

(इ. १६५६ ऑक्टो. १८ — शि. च. सा. १ ले. ४६)

मसूर परगण्याचे देशमुख जगदाळे ह्यास असेच सांगितले आहे. खंड १५ ले. ६० श. १६३३इ. १७११

तुम्ही परगणे मजकूरच्या मोकदमास व कसबे मजकूरच्या सेटे महाजनास कौल देऊन आबादी व इस्तमालतीस (लावणी संचणीस) कोसीस करुन किफायत सरकार व रफायत रावा अमलांत आणोन व हरएक असामीस तुम्ही आपला कौल देऊन आणाल त्याप्रमाणे चालविले जाईल. सरकारचे काम बवजे अहसन सरंजाम करीत जाणे.

श्री. शिवरायाचे वेळीही देशमुखांचे काम सांगताना गावचा गाव फिरोन ऐसे करणे की अमका गाव त्यासी रकमा अमकी, त्याची जमीन अमकी, त्यासी अवल दूमसीम ऐसी जाती निवडोन कस्त केलियाने काय पिकेल ते चौकस करुन... आकार करणे. (ह्या) अखेर कामास ब्राह्मण अगर परभू (प्रभु) कारकून ठेवावा तर तो गैरआरामी आणि त्याणे काय करावे, जमिनीचे पोटफोडी गावी पीक काय, काय धारा, हे त्या गरिबास (काय माहित) तुमचे महालीचा मक्तेदार तुम्ही, असेच सांगितले आहे. खं. १५ पृ. ३६९—७०.

असे आणखीहि देशमुखांची कामे सांगणारे उतारे पुष्कळ देता येतील. पण तितक्यांचे कारण नाही का की त्यासर्वांमधून हेच एक मुख्य काम देशमुखांचे दिसून येणार आहे. रयतेची भरभराट व सरकारची किफायत ज्यामुळे वर्षानुवर्ष चालेल, बढती होऊन चालेल, ते काम देशमुखांचे फिरते व ठरते आणि रोजचे व आठवड्याचे किंवा यात्रादि प्रसंगाचे नैमित्तिक असे बाजारहाट, पांढरीतील इतर उद्योगधंदे साळी, कोष्टी, धनगर, चांभार, सोनार, तेली, बुरुड हे तसेच फिरत्या जमातीचे धंदे म्हणजे शिकलगार, धावा बसविणे, लोहार, घिसाडी घावड इ. इ कामगारांची पाले आणि मुख्यतः परगण्याखालील शेतीची सर्व भूमि लागवडीस आणणे, परगणा संपन्न राखणे हे कार्य देशमुख देशपांडे यांचे आहे. वरील उताऱ्यात अफजलखान म्हणतो मी मोकासदार झाल्यापासून थोडासुद्धा अन्य वावगा उपसर्ग रयतेस वा तुम्हास लागला नसता म्हणजे यत्किंचितहि तक्रारीस जागा नसता शिरवळ परगण्यातील सर्व पिकाऊ जमीनीत बीपेरणी नाही किंवा पड पडलेली जमीन नवीन लागवडीस आणलेली नाही असे का ? परगण्यातील अशा जमीनीपैकी एक तसुसुद्धा जमीन बिनशेतीची राहता कामा नये, सर्वच्या सर्व जमीन लागवडीस येण्यासाठी गावन् गाव तुम्ही देशमुख देशपांड्यांनी सारखे फिरते राहून, रयतेस उत्तेजित करुन कोणास काय पाहिजे ते देऊन जमीन पिकाऊ केलीच पाहिजे ते न करता तुम्ही बाहेर हिंडता मग देशमुखी कसली करता व देशमुखीचा हक्क आणि मानपान कसचा उपभोगिता ? पड जमीन लागवडीस आणण्यासाठी शेतकऱ्यांना पहिले वर्ष काही खंड आकारु नये, दुसऱ्या वर्षापासून पिकाच्या व शेतकऱ्याने केलेल्या कष्टाच्या मानाने थोडा खंड आकारावा, त्याच्या पुढल्या वर्ष आणखी थोडा खंड अधिक आकारावा, असे थोडे थोडे वाढवीत म्हणजे रयतेची भरभराट करीत सरकारचाहि फायदा करीत मुलूख आबाद राखावयाचा दुसऱ्या उताऱ्यात ह्या शेत लागवडीच्या कामाशिवाय बाजारहाट व इतर उद्योगधंदे चालू रहावेत व त्यातहि म्हणजे व्यापारधद्यातहि भरभराट होऊन त्या पासूनहि सरकारची किफायत अधिकाधिक होऊ लागेल, असे करावे व त्यासाठीही वाणो—बकालांना सुरक्षिततेचे आश्वासन द्यावे असे सांगितले आहे. तात्पर्य, देशमुखाने आपापल्या प्रांतातील सर्व प्रजा उद्योगी कशी राहील व सर्व प्रकारचे उत्पन्न कसे वाढेल ह्याची चिंता वाहिली पाहिजे. त्यासाठी त्याने आपल्या हाताखाली निरनिराळे अधिकारी नेमून घ्यावे, प्रांतभर सदोदित फिरते राहवे, पदरी चाकर प्यादे ठेवून प्रसंगी थोडे सैन्य ठेवावे आणि ही देशमुखी सत्ता चालवावी.

ह्या सर्व विवेचनावरुन हे आता लक्षात येईल की, देशमुख हा एक मांडलीक राजा, देशनायकच आहे. त्याच्याकडील कामाकरता त्याच्या पदरी राजाप्रमाणे पेशवा म्हणून एक अधिकारी असे. देशमुखाला स्वतंत्र मुद्रा आहे. प्रांतातील सर्व दप्तर त्यांच्या मुद्रेशिवाय प्रमाण नाही. वार्षिक जमाबंदी, कोणच्या गावच्या

शेतीवर किती किती आकार घ्यावयाचा, बाजारच्या व्यापारी कुळाकडूनही किती प्रमाणात वसूल घ्यावयाचा इत्यादी सर्व ठराव देशमुखाच्या सल्ल्यानेच सरकारी मुजुमदार व सुभेदार ह्यांनी निश्चित करावयाचे परगण्यातील सर्व प्रकारचे तंटेबखेडे देशमुखांनी मिटवावयाचे. गावच्या सीमा ठरविणे, गावशिवरातील बांध कायम राखणे, पिकांवर, गुराढोरांवर आणि रयतेवर सरकारी किंवा सावकारी जुलूम होऊ न देणे, नवान वसाहत करणे, परगण्यात कोणाला मिरासी हक्क देणे इत्यादि इत्यादि राजाप्रमाणे सर्व व्यवहार आपल्या दृष्टीखाली जो चालू ठेवतो, त्यास अमात्यांनी तो स्वतंत्र देशनायकच आहे, राज्याचे दायाद म्हणजे राज्याचा भागिदार आहे व दुसरा राजाच आहे असे म्हटले ते अगदी योग्य.

बरे हे देशव्यवस्थेचे काम कोणी तरी जबाबदारीने केले पाहिजेच. मुख्य जो खरा राजसत्ताधारी त्यास या कामाची आवश्यकता आहेच. ह्या व्यवस्थेशिवाय तो राजा तरी राज्य करणार ? तर राजकर्तव्यातील मुख्यच काम हे आहे व ते हे देशमुख करणार. अशी जर ह्या देशमुखांची अत्यंत आवश्यकता आहे. तर त्याविरुद्ध अमात्य आपल्या राजनीतीत इतके कठोरपणे का लिहितात. सभासदही शिवाजीचे धोरण म्हणून ह्या देशमुखांच्या विरुद्धच लिहितात ते का ? आणि देशमुखादि वतनदार नष्ट करण्याकडे शिवाजीचे जे धोरण होते, त्याचेच समर्थन तरी का केले जाते ?

ह्या प्रश्नाचे उत्तर देण्याच्या आधी हे लक्षात घेतले पाहिजे की, शिवाजी किंवा राजनीतिकार हे देशमुखीच्या विरुद्ध नाहीत. देशमुखांच्या विरुद्ध आहेत. म्हणजे देशमुख जी आपल्याला देशातील भूव्यवस्था राखणार ती अवश्यच व्हावयास पाहिजे पण ती व्यवस्था जेव्हा परकीय राजसत्तेचा आधार म्हणून चालू राहते तेव्हा त्या व्यवस्थेपेक्षा त्या व्यवस्थेचे चालक हे अडथळा म्हणून वाटू लागतात व ते अगदी साहजिकच आहे. येथूनच ह्या प्रकरणास राज्यकारभारातील ती एक बाब म्हणून प्रारंभ होतो व प्रारंभी देशव्यवस्था व राज्यकारभार ह्यांची गुंतागुंत आहे, असे जे म्हटले ते आता लक्षात घेणे सोपे होईल.

८. देशव्यवस्था आणि राज्यकारभार ह्यात वस्तुतः विरोध किंवा गुंतागुंत असण्याचे काही कारण नाही. भूराज्याशी स्वराज्याचे काहीच भांडण नाही. पण सत्ता बदल जेव्हा होतो तेव्हा ह्या विरोधाचे रुप प्रथम प्रगट होते आणि तेथेच काय तो खरा विरोधाचा उगम सापडतो. देशमुखीविरुद्ध नव्हे. देशमुखांच्याविरुद्ध शिवाजीराजे आहेत म्हणजे काय किंवा देशव्यवस्था व राज्यकारभार ह्यात अडथळा वाटेल अशी गुंतागुंत कशी ह्या संबंधीचे विवेचन करणे हे तत्कालीन राजकारणाचेच विवेचन करणारे होणार आहे. ह्या व्यवस्थेची ओळख करुन घेत असता त्या राजकारणाच्याहि दोन गोष्टी प्रसंगाने करु. पण प्रस्तुत आपणास देशमुखाकरवी होत असलेल्या देशव्यवस्थेचे रुप पाहावयाचे आहे. म्हणून देशमुखी संस्था व तिच्या करवी होणारा देशव्यवस्थेचा कारभार हे आपणास मुख्यतः पाहावयाचे आहे.

९. देशमुखी संस्थेसंबंधी विचार करीत असता त्या संस्थेच्या म्हणजे देशमुखांच्या अधिकारदर्शक मुद्रेसंबंधी थोडा विचार करणे युक्त आहे. पहिली गोष्ट ह्या बाबतीत ही की, परगणे वतनदारातील देशपांडे–देशकुलकर्णी कर्नाटकाकडील नाडकर्णी, देश चौगुला ह्या अधिकाऱ्यापैकी देशमुखानाच [पाटील व देशकुलकर्णी ह्यांची एक मुद्रा १८३६ इ. बृ. पृ. ७० खंड १५ पृ. ६०–६१ वर आली आहें. पण हा अपवाद आहे, नियम नाही.] फक्त मुद्राधिकार आहे व ह्यावरुनहि वतनदारांतील देशमुख हीच वरची श्रेणी होय हे सहज कळून येते. देशमुखांच्या मुद्रेचा म्हणजे शिक्याचा विचार करताना (१) मुद्रा ज्या पत्रावर उठविली असेल. त्या पत्राच्या प्रारंभीचा आणि मुद्रेतील नावाशी संबंध असलेले मायना व (२) मुद्रा महजरपत्रावर म्हणजे निर्णय देणाऱ्या सभेच्या पत्रावर असल्यास त्या मुद्रेच्या वर अथवा बाजूस मुद्राधिकाऱ्याच्या नावाचा उल्लेख केलेला असतो तो, ह्या दोन गोष्टी लक्ष्यात

घेऊनच केला पाहिजे. नुसत्या मुद्रेवरुन म्हणजे मुद्रेतील मजकुरावरुन विचार करणे अपुरे व निरुपयोगी होण्याचा हटकून संभव कोणत्याही ऐतिहासिक मुद्रेविषयी विचार करताना हाच नियम लागू केला पाहिजे. असो. ह्या दोन गोष्टी आणि मुद्रा लक्ष्यात घेता पुढील वैशिष्ट्य ध्यानी येते. देशमुख हे राजसत्तेच्या आश्रयावर व सुभेदाराच्या जोडीला राहून आपले वसुली काम करणारे असले तरी त्या राजसत्तेचे ते सेवक नाहीत. एकाहि देसाई देशमुखाच्या शिक्यात शिवचरणी तत्पर शाहूचरणी तत्पर किंवा बंदे निजामशाही आदिलशाही अथवा शहा सुलतान ह्यांचा निर्देश नाही. तसेच त्यांच्या पत्राचा प्रारंभ अज मुभा, अज दिवाणी, अज ठापा असा नसतो असा आरंभ असून जर कोणाचा शिक्का विना-हुद्दा असला तर ती व्यक्ती सरकार—नियोजित नोकर होय असे समजले पाहिजे. तर असा प्रारंभ नाही हे एक, आणि शिक्क्यात नांगर असतो हे दुसरे. ही दोन्ही लक्षणे विचारात घेतली म्हणजे देशमुख ह्या संस्थेचे राज्यकारभारातील मुख्य कार्य कोणते हे सहज कळून येते. आज नांगरहाक्या. नांगऱ्या, निशाणी नांगर ही दुर्विशेषणे झाली आहेत. पण हा बदलल्या काळाचा परिणाम आहे. नांदगर, ही वस्तु एका काळी नामांकित, सर्वजनप्रसिद्ध अशी थोर मानाची होती. काळीपेक्षा पांढर बळावली, म्हणजे काळीतील वस्तुना व कार्यकर्त्यांना सोपक्षेतेने कमी लेखले जाते. त्यातीलच हा प्रकार आहे. पण आपण ज्या काळातील चालिरीतींची ओळख करुन घेत आहो त्या कालात नांगर ही वस्तु देशमुखांच्या मुद्रेत म्हणजे अभिलषित अशा भूषणभूत वस्तूंत गणली जात होती अमुक नांगर जमीन हे एक [सनदा पत्रे ले. ४ पृ ९] जमीनीचे माप त्यावेळी होते. पदरी नांगर असणे म्हणजे नांदगर चालविणाऱ्या धुरीच्या दोन बैलांसह इतर दहा बैल असणे, ही गोष्ट तेव्हा श्रीमंतीची निदर्शक होती. नांगरास लागणाऱ्या बारा बैलात धुरीचे बैलांच्या जोडीचा हा विशेष आवर्जुन लक्ष्यात आणला पाहिजे. लहान नांगर म्हणजे नांगरी असेल तर बारापेक्षा कमी म्हणजे ६, ८, १० असे बैल लागतील पण त्यातही धुरीच्या बैलांची महती आहेच असो. असा नांगर ज्यांची निशाणी म्हणजे व्यवसायाचे प्रतीक आहे, त्यांचे मुख्य काम तेच सर्व भूमी लागवडीस आणून देशवसाहाती करुन सर्वप्रकारे जनतेची भरभराट करणे हे व ह्या कामास नांगर हेच प्रमुख साधन आहे. जमीन वहितीला आणण्यासाठी मुजेरी किंवा प्रज म्हणजे शेत कसणारे आणले, तरी त्यांना नांगर व बैल देऊन कीर्दीला प्रारंभ करविणे हे पाटील—देशमुखांचे काम असे. म्हणून नांगर ही निशाणी ह्या दोघांची आहे. त्यात श्रेष्ठ म्हणून देशमुखांना मुद्रेचा अधिकार आहे व तीन नांगरचिन्ह असावयाचे आणि पाटिलांच्या नामनिर्देशापुढ हाताने नांगर चिन्ह काढावयाचे येथेच हेही सांगितले पाहिजे की, ज्याचे नावापुढे नांगर ही निशाणी असते, त्यास लिहिता येत नाही निशाणी नांगर म्हणजे निरक्षर व्यक्ती असा अर्थ नाही. तर त्याच्या व्यवसायाचे हे चिन्ह दाखववावयाचे इतकाच त्यात हेतू आहे. कारण लेखन ज्या वर्गात, ज्या समाजात आहे त्यातही निशाणी नांगराचे धनी आहेत. ब्राह्मणापैकी पाटील देशमुख आहेत. पण ह्या अधिकाराने जेव्हा कागदपत्रात त्यांचा संबध येतो तेव्हा त्यांच्या नावापुढे नांगर काढलेला असतोच. शिवाय पाटील देशमुखादी मराठी मंडळीतहि साक्षर व लेखक, वाचक आहेत.

देशमुखांच्या शिक्क्यांचे (१) देशमुखाचे नाव व (२) देसाई, देशमुख हा अधिकार, (३) कोठल्या परगण्याची ही देशमुखी त्या परगण्याचा उल्लेख आणि त्यांचे (४) कार्यदर्शक नांगर चिन्ह असे चतुर्लक्षणयुक्त रुप असते. नांगर हा देशमुखांचे शिक्क्यात असावयाचाच ह्या नियमाची सिद्धि ऐ. सं. सा. खं. १ ले. ७० मधील उल्लेखावरुन पुढील प्रमाणे साधार सांगता येते. सासवडच्या जगताप देशमुखांमधील शिक्क्याचा धनी असलेला देशमुख गत झाला. तेव्हा त्याची बायको देशमुखीचा शिक्का घेऊन माहेरी गेली. पुढे भांडणावर प्रकरण येऊन शिक्का नवाच करावा लागला. तेव्हा सिका नवा कोरुन त्यात नांगर काढल्याचे स्पष्ट सांगितले आहे व त्याप्रोा ' फलटण, कुडाळ, चाकण, कासेगांव, भुपे, वाई, कर्यात, मावळ, वणी, राजूर ह्या ठिकाणच्या निंबाळकर, शिंदे, कडू, पिसाळ, पायगुडे, छत्रपती-शाहू राजे भोसले इ ह्या देशमुखमंडळींच्या मुद्रेत नांगर कोरलेला आहे, ह्यांचा आकार चौकोनी, अष्टकोनी वर्तुली, लंब चौकोन, इ.

विविध प्रकारचा आहे. एक शिक्का तर प्रत्यक्ष नांगराच्याच आकाराचा करुन त्यात देशमुखाचे नाव, दाखविले आहे. ह्यातील काही देशमुखांच्या शिक्क्यासंबंधाने थोडी स्पष्टता करण्याजोगो आहे. फलटण निंबाळकर देशमुखास नाईक ही पदवी आहे. ह्यांचेपैकी काही शिक्क्यात नांगर नाही व त्याचे कारण हे की हा परगणा त्याजकडे मोकासा म्हणजे जहागीर म्हणून होता व पुढे त्याची देशमुखी निंबाळकरांस मिळाली. शि. च. सा खं. ४ ले. ७० पहा. मुप्याचे देशमुख सर्फराजखान हे मुसलमान असून, त्यांचेहि शिक्क्यात नांगर आहे. कुडाळकर देशमुखांच्या शिक्क्यात नांगराबरोबर चंद्र, सूर्य कोरले आहेत.

वाआी व कराड परगण्याच्या देशमुखीसंबंधाने तर बरेच उद्बोधक व स्वतंत्रपणे सांगण्याजोगे आहे. वाआी देशमुखीचे तीन शिक्के प्रसिद्ध आहेत. दत्ताजी व सूर्याजी पिसाळ आणि शाहू छत्रपती भोसले राजेपैकी सूर्याजी पिसाळाच्या देशमुखी शिक्क्यात त्या घराण्याच्या दैवताचा—पद्मावती देवीचा निर्देश आहे आणि शाहू छत्रपतींच्या देशमुखी शिक्क्यात नांगर कोरलेला आहे काही देशमुखांचे शिक्के फारसी आहेत व हे देशमुख मराठे क्षत्रिय आहेत. वर सुप्याचे देशमुख मुसलमान असून शिक्का मराठी बालबोध असल्याचे सांगितलेच आहे. सिंदखेडचे जाधव देशमुख, खटाव—फडतरे **दो** ख, निंबसोड माईणीचे घारगे**दो** ख ह्यांचा शिक्का फारसीत आहे. कऱ्हाड (यादव) सिरवळ (निगडे) सुपे (दुसरे काटे) मलवडी (घाटगे) मसूर (जगदाळे) इत्यादि देशमुखांच्या प्रसिद्ध शिक्यात नांगर चिन्ह नाही व त्यांचे कारण साधार असे आज सांगता येत नाही. पण त्यामुळे वरील विधानास व विवेचनास बाध येत नाही. शिवाय येथे हीही गोष्ट सांगितली पाहिजे की, मूळ अस्सल कागदांच्या नकला यथातथ्य करणे व त्या यथामूळ छापल्या जाणे ह्या गोष्टी मुद्रित पत्राच्या बाबतीत सर्वदाच दक्षतापूर्वक व सर्व सोईस्कर व्यवस्था होऊन झालेल्या नाहीत. नकला करताना शिक्क्यांचा आकार आतील मजकुराच्यावेळी चिन्हे, वलये इ. बारीक लक्ष पुरवून शिक्के नकलून घेणे घडले नाही व केव्हा घडले तरी छापखान्यात त्याच्या प्रकाशनाची सर्व साधनसामुग्री असून, ते तसेच मुद्रित होणे घडलेले नाही. आज ज्या गोष्टींना महत्व देऊन आपण त्याचा विचार करतो, त्याचा तेव्हा तसा महत्वाचा भाग लक्षात येऊन प्रत्येक बारीक गोष्ट अगदी यथामूल प्रकाशित झाली आहे असे नाही व हे साहजिक आहे. तात्पर्य ह्या बाबतीत मूळ अस्सल पत्रे पुन्हा पाहून त्यावरुन वरील व पुढील विवेचनास भर वा दुरुस्तीस अवकाश आहे. असो. ह्या देशमुखीच्या शिक्क्याचा मोठा मान आहे. त्यासाठी अनेक भांडणे झालेली आहेत व त्यात गावे विभागून घेऊन शिक्क्याचा मान तेवढ्या भागापुरता घेतला गेला आहे. अशा वेळी त्या देशमुखीत तीन शिक्के झाले आहेत आणि ह्या सर्व गावाचा एका कागदात संबंध येऊन उल्लेख होत असेल तर तिन्ही शिक्के एकाच कागदावर उठविलेले आहेत. राजवाडे खं. १५ ले. ६४ पृ. १२९ वर कुडाळ देशमुखात तिघा भावाचे तीन देशमुखीचे शिक्के आहेत. तसेच काही देशमुखांच्या शिक्क्यात राहत्या गावचा त्याच ग्रामनावाने परगणा ओळखला जात असल्यामुळे मौजे असे विशेषण देऊन निर्देश केला आहे. कदाचित ह्या एका गावापुरतीच देशमुखी असल्यास असा उल्लेख असेल.ह्याच कागदावर (खं. १५ ले. ४५१) परगण्याचे देशमूख म्हणून ह्याच व्यक्तिचा निर्देश आला आहे व त्या उल्लेखाबरोबर ज्या दुसऱ्या देशमुखव्यक्तिचे नाव आले आहे ते ले. ४४५ (कित्ता) वरील शिक्क्यावरुन परगणे चाकण अशा उल्लेखाचे असल्यामुळे ले. ४५१ मधील देशमुखीचा चाकण हा एकच गाव त्याकडे आणि तो ले. ४५५ मधील सर्व चाकण परगण्यांचा देशमुख म्हणणे इष्ट होईल. ह्या शिक्क्याची जपणूकहि तशीच काळजीने करीत. प्रसंगी हा शिक्का [ऐ. सं. सा. ख. पृ. १६ पृ. १७ पायगुडे देशमूख हकीकत] गळ्यात एखाद्या अलंकाराप्रमाणे धारण करीत. ह्या मुद्रेच्या स्वरुपाची कल्पना द्यावयाची तर वर निमुळते व खाली रुंद होत गेलेली गोल व सामान्यतः टीचीपेक्षा कधीच लांब नसलेली अशी चिलमीप्रमाणे मूठ असलेली ही मुद्रा असते. त्यामधील अक्षरे उलट सुलट कळून येण्याकरता खुणेची टिकलीहि एक अंगास असते. मुठीमध्ये कित्येक वेळा नक्षीकाम केलेले व ती सामान्यतः चांदीची असते. सोन्याच्या मुठीच्याहि मुद्रा आहेत. पण त्यात देशमुखांच्या असल्याचे आढळले नाही. ह्या मुद्रेच्या महत्वकथनात पुढील

गोष्टी उल्लेखनीय आहेत. मुद्राधिकारी किंवा शिक्केकरी हा त्या घराण्यातील प्रमुख व देशमुख म्हणून, लोकदरबारातील वा राजदरबारातील खरा मानकरी. परगण्यासंबंधीची जमाबंदी प्रकरणाची सर्व खतेपत्रे, परगण्यातील गोतमहजर, परगणेवतनदारांचे पण परस्थली जाऊन केलेले आणि दुसऱ्या परगण्यातील ह्या परगण्यात येऊन झालेले महजर व न्याय निवाडपत्रे इत्यादि कागदपत्रांवर देशमुख देशपाड्यांचे शिक्के व दस्क्त असल्याशिवाय ते कागद प्रमाण आणि विश्वसनिय नव्हेत. दशमुखीच्या उत्पन्नात शिक्क्यासाठी स्वतंत्र एक गाव मानाचा असे, कागदावर देशमुखाचा शिक्का व्हावयाचा म्हणजे त्यासहि काही देकार होई. तात्पर्य, शिक्का ही जशी मानाची बाब तशी उत्पन्नाचीहि बाब असे. वतनपत्रे पृ. ८—११ मधील तंटा शिक्यासंबंधीचाच असून एक हजार रु. ज्याच्याकडे वडीलकी व शिक्क्याचे उत्पन्न आले, त्याने, सरकारात जिल्हेकडे म्हणजे सचिवांकडे ते भरले आहेत. शिक्याकरता स्वतंत्र वाटा, शिक्क्याकरता स्वतंत्र चाकर लोक व राबते महार आहेत. तेथील शिक्केकरी हा शब्द वडीलकी व मुख्य देशमुख ह्यांचे उपलक्षणात्मक आहे. देशमुखीतील शिक्का आपल्याकडे असणे, ही बाब किती महत्वाची असे ह्यांचे आणखी एक उदाहरण देऊन हे मुद्राप्रकरण संपवू. बाजी पासलकर देशमूख मुसेखोरेकर ह्याला शिवाजीने बेलसरच्या लढाईवर जपण्यास सांगितले. तेव्हा पासलकराने शिवाजीस म्हटले, साहेब कामावरी सेवक जावयास मागे सरतो यैसे नाही, परंतु बाळाजीचा व माझा देशमुखीचा निवाडा जाला नाही. इतका हेतू माझा राहतो तेव्हा शिवाजीने उत्तर दिले सांप्रत तुम्ही मोहिमेस जाणे. तुमचा शिका मजपाशी आहे. फत्ते करुन सुरक्षित आल्यावरी तो तुम्हास बाळाजीपासून घेऊन बहाल केला जाईल. साहेब कामावरी तुम्ही खर्च जाला तर तुमचे गोरीवर ठेवू. पुढे बाजी यशवंतराव पासलकर (यशवंतराव हा किताब आहे.) हा त्या युद्धात वीरस्वर्ग पावला. तेव्हा बाजीचा मुलगा कृष्णाजी यास बाजी हाच किताब देऊन सवाई बाजी नाव ठेविले. व देशमुखीचा शिक्काहि दिला.

अशी ही देशमुखीच्या शिक्क्याची महत्वाची बाब आहे.

आतापर्यंत १ देशमुख व तत्सम संज्ञा, २ देशमुखीचे व्यतिरेकाने महत्व, ३ छत्रपतीनाहि देशमुख पदाची हाव, ४ देशमुख हे शाश्वत अधिकारी ५ देशमुख वतनाची कामे, देशमुख ६ हा स्वतंत्र देशनायक, ७ देशव्यवस्था व राज्यकारभार ८ देशमुखीच्या विरुद्ध शिवाजीराजे नाहीत. ९ देशमुखीची मुद्रा इतक्या मुद्यासंबधी काही प्रतिपादन केले. शेवटी देशमुखीच्या उत्पत्तिसंबंधाने थोडक्यात लिहून हा निबंध येथे पुरा करू.

देशमुख हे जर शाश्वत व कुलागत अधिकारी, त्यांचे मुख्य काम जर देश वसाहतीचे व लावणीचे तर ह्या संस्थेची म्हणजे देशमुखीची निर्मिती प्राचीन आहे. मुसलमान—पूर्वकालीन आहे, असेच मानणे सहज प्राप्त आहे. येथे मानणे असा शब्द घातला, ह्याचा अर्थ इतकाच की, प्रत्यक्ष उल्लेख तितके जुने मिळत नाहीत. मिळतात ते अलीकडील व मुसलमान राजवटीतील. पण हे उल्लेख बलिष्ठ असलेल्या राजसत्तेचीही मान्यता आपणास आहे, हे दाखविणारे आहेत. एवढ्यावरुन देशमुखीची निर्मिती मुसलमानी अमदानीतील होय, असे समजणे संयुक्तिक होणार नाही. ह्याविषयी किंचीत विस्तारपूर्वक व स्वतंत्र लिहिणे आवश्यक आहे.

ह्यानंतर देशमुखीचे मान कोणकोणते, देशमुखीचे उत्पन्न कसे व किती, देशमुखी कचेरीतील म्हणजे देशमुखी कचेरीतील म्हणजे देशमुखाचे पदरचे अधिकारी कोणकोण व त्यांची कामे काय, देशमुखीतील अधिकात अधिक मुलूख केवढा इत्यादिविषयी माहिती द्यावयाची. पण झाला हाच लेख मोठा झाला म्हणून तूर्त येथे थांबणे इष्ट आहे. ही माहिती दिल्यावर राजकीय म्हणून जी देशमुखीची बाब ती स्वतंत्र द्यावयास

पाहिजे. देशमुखांच्या विरूद्ध शिवाजी होता. तो का ? छत्रपती आपल्या राज्यासच हे वतनी राज्य असा शब्द योजतात तो का ? प्रत्यक्ष मुलूख वसाहतीचे काही नियम, देशमुख मंडळीनी केलेली राजकीय कामे इ. इ. गोष्टी लिहावयाच्या आहेत. त्या आणखी एखादेवेळी मांडू.

१९४४

वादीतर्फे साक्षीदार नंबर नि. नं. १

याची जबानी

मी यावरुन प्रतिज्ञा करून सांगतो की :— माझे नाव बाबूराव बापाचे नाव बाळासाहेब घोरपडे धर्म हिंदु जात मराठा उमर वर्षे ३२ धंदा शेती राहाण्याचे गाव नांदगाव तो सातारा हल्ली मुकाम सबजेस सातारा.

सरतपासणी

वादी प्रत वादी माहितीचे आहेत. हल्लीच्या दाव्यामध्ये मी नि. नं. ४९ चे ऑफिडेव्हिट ता. १३—६—१९४४ इ रोजी केले आहे त्या ऑफिडेव्हिट मधील मजकूर बरोबर आहे. आमची घोरपड्यांची शाखा ही नांदगावकर घोरपडे यांची शाखा आहे. नांदगावचे घोरपडे व बहादूरवाडीचे घोरपडे हे मूळचे एकाच घोरपडे घराण्यातील आहेत. इतिहास संशोधनाचा व्यासंग मी १०—१२ वर्षे करत आहेत. या मुदतीत मी भा. इ. सं. मंडळ पुणे व राजवाडे इ. सं. मंडळ धुळे, या इतिहास संशोधन करणाऱ्या संस्थेच्या त्रैमासिकात काही इतिहास संशोधनाचे लेख लिहिले आहेत व काही जुने कागदही लिहून प्रसिद्ध केले आहेत. घोरपडे घराण्याचा इतिहास लिहिण्यकरिता मी ५—७ वर्षे माहिती गोळा करीत आहे. घोरपडे घराण्यातील माणसाशिवाय इतर माणसांच्याकडूनही कागद मिळविले आहेत व मला जे मिळाले नाहीत त्यांच्या नकला करुन घेतल्या आहेत. सरकारच्या परवानगीने इनाम कमिशनच्या दप्तरातील कागद मी पाहिलेले आहेत काही कागद माझे स्वतःजवळ होते व काही कागद ते असणाऱ्या माणसाकडून (पॉवर ट्रस्टडितून) मजकडे आलेले आहेत. नि. नं. ५० लगतचे १६ कागद हे अशारीतीने मजकडे आलेले आहेत. याशिवाय जादा कागद मजकडे आहेत. नि. नं. ४८ लगत वादीने गुदरलेली वंशावळ मला आता दाखविली ती पाहिली, ती वंशावळ वादीना मी त्यांना दिलेल्या ऐतिहासिक माहितीवरुन तयार करून गुदरली आहे. माझेकडे असलेली जुनी वंशावळ अस्सल कागद व इतर ऐतिहासिक माहिती यावरुन पडताळून मी ती माहिती दिलेली आहे. माझे माहितीप्रमाणे नि. नं. ४८ लगतची वंशावळ ही खरी वंशावळ आहे.

प्रतिवादी तर्फे इनाम कमिशनचेवेळी गुदरलेली वंशावळ त्याची छापील नक्कल या कज्ञात दाखल करणेत आलेली असून, त्याची छापील नक्कल मला आता दाखविली परंतु ती अपूरी आहे व कित्येक महत्वाच्या बाबतीत चुकीची आहे. ती अपुऱ्या माहितीवरुन तयार झालेली आहे. सरकारतर्फे प्रसिद्ध झालेले पुस्तक (memoir of the states of the southern maratha country.) हे मुंबई सरकारने प्रसिद्ध केलेले पुस्तक आहे. त्यामध्ये मुधोळ घराण्याची जी वंशावळ दिली आहे त्या आधारे व भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे यांच्या त्रैमासिकांच्या मे १९४० च्या अंकामध्ये पान १६१ यावर जे आमचे घराण्याचे कागद प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत, त्यावरून घोरपडे घराण्यातील मूळ चार पुरुषांची नावे मी सांगितलेली आहेत. घोरपडे घराण्याचा मूळ पुरुष कान्होजी हा आहे आणि नाथाजी हा नाही ही माहिती मी वरील पुस्तकाच्या आधारानेच दिलेली आहे इनाम कमिशनचेवेळी नाथाजी म्हणून मूळ पुरूष असल्याचे सांगण्यात आले. ते चुकीचे आहे, असेही मी वरील पुस्तकांच्या आधारानेच म्हणतो. वादीने गुदरलेल्या वंशावळीतील नावजी व

प्रतिवादाने गुदरलेल्या वंशावळीतील जावजी ही नावे माझे म्हणणे प्रमाणे एकाच माणसाची आहेत. मोडी लिहिण्याच्या पद्धतीवरून ही चूक आली असावी. (मोडी ना. व. जा.अक्षरे सारखीच दिसतात)

( ) या पुस्तकातील मुधोळ घराण्याच्या वंशावळीत नावजी असेच नाव दिले आहे. त्याचप्रमाणे मुधोळ संस्थानच्या घोरपडे घराण्याचा इतिहास प्रसिद्ध झाला आहे. त्यातील पान २२८ वर बाजी घोरपडे याच्या वडिलास नहुजी नावजी व प्रतापराव असल्याचे नमूद केले आहे. नावजीच्या वडिलांचे नाव पदमोजी होते हे मीच सांगितलेली आहे. ही माहिती वर उल्लेख केलेल्या त्रैमासिकात प्रसिद्ध झालेल्या अस्सल पत्रात जी माहिती दिली आहे त्यावरुन सांगितलेली आहे. मुंबई सरकारतर्फे प्रसिद्ध झालेल्या वरील पुस्तकात पन्नाजी असे नाव दिलेले आहे. पण जाखरोजी असे दिलेले नाही. मी सबंध माहिती मिळविली. त्यात जाखरोजी हे नाव मला कोठेही मिळालेले नाही. नावजी उर्फ जावजी याची सहा मुले होती ही माहिती मी दिली असून, ती बरोबर आहे. प्र. वादीने दिलेल्या वंशावळीतील फक्त ३ मुले दाखविली आहेत. ती माहिती अपूरी आहे.
या पुस्तकातही सहा मुले दाखविली आहेत. वादीने गुदरलेल्या वंशावळीतील व वरील पुस्तकातील वंशावळीमधील वरील धाकटेचा क्रम एकच आहे. फक्त सरकारने प्रसिद्ध केल्या पुस्तकातील वडिल मुलगा डाव्या अगास न छापता उजवे आंगास छापला आहे. हा क्रम मी वरील त्रैमासिकाच्या आधारे सांगत आहे. विठोजीचे घराण्याचा वंश फलटण संस्थानातील कापसी व अळजापूर व भाडळे खालील चेतेवाडी तोा कोरेगाव येथे चालू आहे. हा विठोजी वादीने गुदरलेल्या वंशावळीत दाखविलेला आहे.

अंबाजीचे वंशज हे घोरपडे घराण्यापैकी भाडळे, एकंबे व शिरढोण यंथील घराण्याची शाखा होय. बाजीचे वंशज ही मुधोळच्या राजघराण्याची शाखा होय. खंडोजी याच्या वंशाच्या बहादुरवाडीकर घोरपडे, आष्टेकर घोरपडे व गोजेगाव घोरपडे अशा तीन शाखा झालेल्या आहेत. या घराण्यात पाटीलकी वतने ही नावजीच्या पुर्वीपासून संपादन झालेली आहे. इ. स. १६४६—४७ मध्ये खंडोजी व बाजी यांनी अबाजी याला वडिलकीबद्दल पाटीलकीचा हक्क लिलून दिला अशा बद्दलचे पत्र असून ते भारत इतिहास संशोधन मंडळाच्या त्रैमासिकामध्ये प्रसिद्ध झालेले आहे. तो अंक मी हजर करतो. प्रतिवादीने छापील वंशावळ दाखल केली आहे. त्यात अंबाजीराव यास म्हसाजी व बिंबाजी असे दोन मुलगे दाखल लेले आहेत, ते चुकीचे आहेत. माझे माहितीवरुन वादीने तयार करुन गुदरलेल्या वंशावळीत अंबाजीचा थोरला मुलगा कृष्णाजी म्हणून दाखविलेला आहे. ही माहिती बरोबर असल्याबद्दलचा प्रत्यंतराबद्दल कागदपत्र आहेत. अंबाजीचा मुलगा कृष्णाजी याने किल्ले ताो वंदन व किल्ले परळी येथील देशमुखी संपादन केली होती. ती अंगापूरकर देशमुख यांचेशी करार करुन मिळविली होती. त्या संबंधीचे अस्सल कागदपत्र प्रसिद्ध झालेले आहेत. त्यात अंबाजीचा मुलगा कृष्णाजी असल्याचे नमूद आहे. या घोरपडे घराण्यामध्ये मुधोळ शाखेचे संस्थापक बाजी घोरपडे यांनी ताा सातारा येथील निमी देशमुखी मिळविली हल्ली ही देशमुखी याच शाखेकडे सुरू आहे. यानंतर या घराण्यात दुसरी देशमुखी तर्फ वाळव्याची होय. तर्फ वाळव्याची शिंदे व घोरपडे मिळून करित होते. ही खंडोजीने मिळविली. ही देशमुखी बहादुरवाडीचे घोरपडे घराण्याकडे चालू आहे. तिसरी देशमुखी ही मी वर सांगितल्याप्रमाणे कृष्णाजीची देशमुखी होय. याशिवाय या घराण्यात अष्ट्याचीही देशमुखी आहे. ती खंडोजीचा नातू वादीचे वंशावळीतील व्यंकटराव यांनी मिळविली आहे. या चारी देशमुख्या नावजीने मिळविल्या हे प्रा वादीचे म्हणणे आहे ते खरे नाही. त्याप्रमाणे त्या एकाच पुरुषाने मिळविल्या, हेही प्रतिवादीचे म्हणणे खरे नाही. या चार पुरुषांनी निरनिराळ्या वेळी संपादनकेल्या आहेत. त्या चार देशमुख्या वाटणीने नावजीच्या पुरुषाकडे एक एक गेल्या हेही म्हणणे खरे नाही. मी गुदरलेल्या कागदात या देशमुख्या कोणी व कशा संपादन केल्या हे दाखविणारे कागद आहेत.

आमच्या घराण्याची शाखा ही बाजीचे घराण्यापैकी होय. वादीने गुदरल्या वंशावळीमध्ये पेंदाजी बिन वाजोजी म्हणून जो इसम दाखविलेला आहे. त्याचा मी वंशज आहे. मी सांगितल्यावरून जी वंशावळ वादीने तयार करून गुदरलेली आहे तिचा मुधोळकर घोरपडे यांच्या मुधोळ घराण्याचा इतिहास प्रसिद्ध झाला आहे. त्यातील बाजीचे वडिल नावजी नंतरचे वंशावळीसी मेळ आहे. तसा मेळ प्रा वादीनी जो छापील वंशावळ इनाम कमिशनचेवेळी गुदरलेली आहे, तिच्याशी बसत नाही. प्रा वादीने गुदरलेल्या छापील वंशावळीत खंडोजीच्या शाखेचा जो तपशील दिला आहे, तो बरोबर नाही. बहादूरवाडीकर घोरपडे ही शाखा ही खंडोजीच्यापैकी वडिल शाखा होय. प्रा वादीने गुदरलेल्या वंशावळीतील मालोजी पासून खाली लिहिलेला तपशिल हा बरोबर आहे. त्याचप्रमाणे खंडोजीचा मुलगा मानसिंग हे दाखविले आहे, ते बरोबर आहे. प्रा वादीने गुदरलेल्या वंशावळीत संताजी हा मानसिंगाचा मुलगा दाखविला आहे, तो बरोबर नाही. संताजी हा मानसिंगाचा भाऊ आहे. मानसिंगाच्या मुलांची नावे खंडोजी व व्यंकटराव अशी आहेत. खंडोजीचा मुलगा संताजी म्हणून दाखववायास पाहिजे होता व संताजीचा मुलगा मालोजी म्हणून दाखववायास पाहिजे होता. खंडोजीस मानसिंग व संताजी अशी दोन मुले होती. संताजी हा मानसिंगाचा भाऊ व खंडोजीचा मुलगा होता

गु. का. नं ३ | हे दाखविण्याकरिता मजजवळ अस्सल कागद आहे. तो इ. स. १६४७ चा अस्सल कागद मी हजर करतो. मालोजीचा बाप संताजी, संताजीचा बाप खंडोजी व खंडोजीचा बाप मानसिंग असे दाखविणारे कागद मी पाहिलेले आहेत. ते पाहून मी हजर करीन. मालोजीचा चुलता मानसिंग यास खंडोजी म्हणून मुलगा होता या बद्दलचा १७५५ सालचा कागद मजजवळ आहे, तो मी हजर करितो. खंडोजी मानसिंग म्हणून वादीच्या वंशावळीत दाखविलेले आहेत. त्याचे वंशज बहादूर वाडीस आहेत. खंडोजी मानसिंग याना बहादूरवाडीचे वतनापैकी काही मिळालेले नाही. पोटगी करिता काही जमिनी मिळालेल्या आहेत. खंडोजी मानसिंग यांचे वंशजाबद्दलची जी माहिती मी वादीस वंशावळ करताना दिली आहे. त्याबद्दलच्या प्रंत्यंतराचे कागद मजजवळ आहेत. प्रा वादीने गुदरलेल्या छापील वंशावळीत मालोजी हा अंबाजीचे शाखेपैकी म्हणून दाखविलेले आहे. ते चुकीचे आहे. अंबाजीचे शाखेपैकी कोणीही बहादूरवाडीस नाही. त्याचे (अंबाजीचे) शाखेचे वशज भाडळे, एकंबे, व शिरढोण या तीन ठिकाणी आहेत. मालोजीचा बाप मनाजी व आजा जावजी होता असे दाखविणारे कागद माझे पाहण्यात आलेले नाहीत. छापील वंशावळीत नरसिंगराव हा अंबाजीरावचा नातू दाखविला आहे ते बरोबर नाही. नरसिंगराव अंबाजीचा मुलगा आहे. दुधोंडीकर

गु. का. नं. ४ वंशावळ | देशमुख यांचेकडून मला एक वंशावळ मिळाली आहे, ती मी हजर करतो. त्यात नरसोजी हा अंबाजीचा मुलगा दाखविला आहे. त्याचप्रमाणे नरसोजी अंबाजी राजे घोरपडे व खंडोजी अंबाजी राजे घोरपडे ही नावे शिवकालीन पत्रसार संग्रह म्हणून जो अस्सल पत्राचे सारांशाचा ग्रंथ प्रसिद्ध झाला आहे, त्यातही आलेली आहेत. त्यावरुन प्रा वादीने गुदरलेल्या छापील वंशावळीत नरसिंगराव हा अंबाजीचा नातू दाखविला आहे, ते चूक आहे, असे मी म्हणतो. प्रतिवादीने गुदरलेल्या वंशावळीत नरसिंगरावचा वंश मौजे बांबवडे तोा कोरेगाव तालुक्यात नाही. भाडळे याचे ऐवजी बांबवडे असे चुकीने लिहिले गेले असावे असे मी म्हणतो. मी मिळविलेल्या माहितीप्रमाणे नरसिंगरावचा वंश भाडळे येथे आहे व त्याच्या संबंधीचे कागदपत्र माझे संग्रहात आहेत.

खडोजीच्या शाखेपैकी मानसिंग याचा मुलगा व्यंकटराव याची जी शाखा आहे. ती अष्ट्याचे घराण्यापैकी होय. या व्यंकटरावानी अष्ट्याची देशमुखी मिळविली आहे. वादीनी गुदरलेल्या वंशावळीतील खंडेराव संताजी हा अष्टेकरांच्या शाखेपैकी होय. खंडेराव संताजी व बहादूरवाडीकर घराण्यापैकी महिपतराव खंडेराव यांचे मध्ये महाराज सरकारच्या राज्याच्या शेवटच्या दिवसात वाद झालेला होता.

त्यासंबंधीचे कागदपत्र मी पाहिलेले आहेत. आमची नांदगावकरांची जी शाखा आहे त्यातील नावे देणारी अशी अस्सल सनद आहे. त्या सनदेचा छापील तरजुमा मी नि. नं. ५० लगतच्या अ. नं. ५ या कागदामध्ये पुर्वी गुदरलेला आहे. त्याची अस्सल सनद आज मी हजर करितो. छापील तरजुमा बरोबर आहे, असे पाहून माझी अस्सल सनद परत मिळावी.

ता. ३—३—१९४६

सही :—इ. एम. मुल्ला,
क. कोर्ट, सातारा,
३—३—१९४६

सरतपासणी पुढे सुरू ता. १०—३—१९४६

मी या वरून प्रतिज्ञा करून सांगतो की :—

नि. नं. ६ ची वंशावळ तात्यासाहेब देशमुख दुधोंडीकर यांच्याकडून मला मिळाली आहे. त्यांच्याकडून मी एकंदर ४०—५० कागद आणले, त्यामध्ये जुनी अशी एकच वंशावळ मी आणलेली आहे. किती दिवसाची जुनी वंशावळ आहे, असे मी त्यांना विचारले नाही. या वंशावळीतील काळ्या शाईने लिहिलेला भाग मूळचा असून, निळ्या शाईने लिहिलेला भाग मी लिहिलेला आहे तो मुळचा नाही. संशोधनाच्या दृष्टीने पूर्तता करण्यासाठी मी निळ्या शाईने ते लिहून ठेवले आहे. त्याचप्रमाणे सनाचे आकडे माझे उपयोगाकरिता म्हणून पडताळून पाहून मी घातलेले आहेत. या सगळ्या घोरपड्यांचे मूळगाव भाडळे हे आहे. या भाडळ्यात प्रथम त्यांनी पाटीलकी वतन मिळविले. नावजीच्यापुर्वी पासून व जवळजवळ कान्होजीपासून भाडळे येथील पाटिलकी या घराण्याकडे आहे. या घोरपड्यांचे मूळचे आडनाव भोसले हे होते, हे भोसले व शिवाजी महाराजांचे भोसले घराणे हे एकच होते. मराठे राज्याचे अगोदर पासून हे घोरपडे वतनदार आहेत. भाडळ्याची पाटीलकी नावजीच्यापुर्वी पासून होती याबद्दलचा अस्सल कागद भारत इतिहास संशोधक मंडळाचा मे १९४० चा त्रैमासिकाचा जो अंक मी नि. नं. ३ ला दाखल केला आहे त्यामध्ये छापलेला आहे. त्या वरून मी म्हणतो. ही पाटीलकी ८—१० गावची होती व ती भाडळे येथील घोरपडे यांचेकडे होती. अंबाजीचा वडिल मुलगा कृष्णाजी यांचे शाखेकडे ही पाटिलकी चालत आहे. या भाडळ्याच्या शाखेला कृष्णाजीच्या पुढे पासून कृष्णाजीने संपादन केलेली देशमुखी होती. नावजीच्या वेळेला या घराण्याकडे कोणतीही देशमुखी नव्हती. भाडळेकरांची (अंगापूरची) कृष्णाजीने संपादन केली, त्यावेळी त्याची शाखा व बाजी खंडोजी यांच्या शाखा या अलग अलग झालेल्या होत्या. नावजीच्या मुलापैकी अष्टे वाळवेकडे जाऊन खंडोजी हे राहिलेले होते. अंबाजीचे बाकी शाखापैकी कोणीही अष्टे वाळवे येथे जाऊन स्थगित झालेले नव्हते. खंडोजी हे आष्टे वाळवे येथे जाऊन स्थगित झाले असे दाखविण्याकरिता मी नि. ५० लगतचा अ. नं. १ चा अस्सल कागद गूदरलेला आहे. तो शके १६९५ चा आहे. स्वतःच्या दप्तरातील आहे. ही वंशावळ बाजोजीचा मुलगा नवाजी याने तयार केली आहे. आमच्या व मुधोळच्या घोरपडे यांच्या शाखेचा तर्फ सातारेच्या देशमुखी संबंधी वाद झालेले होते कृष्णाजीने जी देशमुखी संपादन केली ती तर्फ वंदन तर्फ परळी येथील होय. ती देशमुखी मूळची अंगापूर येथील ब्राह्मण देशमुखांची होती. पाठीराखे म्हणून कृष्णाजीने ही देशमुखी मिळविली. याबद्दलचे अस्सल पत्र भारत इतिहास संशोधक मंडळाच्या वरील मे, १९४० च्या अंकात प्रसिद्ध झालेले आहे. खंडोजी व अंबाजी हजर असताना ही देशमुखी कृष्णाजीस दिली आहे, असे या पत्रावरुन स्पष्ट आहे. अगापूरची देशमुखी कृष्णाजीचे वंशामध्ये ३-४ पिढ्या चाललेली होती. या देशमुखीमध्ये वाटणी वगैरे झालेली नाही. ती असे तोपर्यन्त कृष्णाजीच्या वडील घराण्याकडे व चाली. पुढे पेशव्यांचे काळात मुळची शर्त मोडल्या कारणाने ती काढून घेऊन मुळच्या ब्राह्मण देशमुखांकडे परत देण्यात आली. त्याबद्दलचा मी नि. नं. ५० लगत अ. नं. १२ चा कागद हजर केलेला आहे. ही देशमुखी

नरसिंग तुकोजी यांच्या कारकिर्दीत परत घेतली गेली. यानंतर भाडळे घराण्यात कोणाकडेही देशमुखी नाही.

घोरपडे पैकी मुधोळ घराण्याचा मूळ पुरुष बाजी नावजी यांनी सातारा तर्फची अर्धी देशमुखी संपादन केली (नवीन) पाटिलकी फक्त तासगाव ता। सातारा येथीलच त्यांनी संपादन केली. बाजीने फक्त सातारा तर्फेची देशमुखी संपाहन केली, ही देशमुखी मुधोळच्या शाखेकडे होती. अशाबद्दल मुंबई सरकारने ऐतिहासिक कागद पत्र यांचा जो भाग प्रसिद्ध केला आहे, त्यामध्ये दाखला आहे.

बाजीनंतर त्याचा वडील मुलगा नावजी यांचेकडे ता। साताराची देशमुखी चालली. ही देशमुखी वडिल घराण्याकडे चालावयाची अशाबद्दल आमचे पूर्वज वाजोजी न मुधोळ शाखेचे अकोजी यांचे दरम्यान सन १७१७–१८ स. श्री. छत्रपती शाहू महाराज यांचेकडे वाद चालला होता. त्यानीही वडील घराण्याकडे म्हणजे वाजोजी कडेच चालवावी असा निर्णय दिला. मी गुदरलेल्या कागदापैकी अ. नं. ६ च्या कागदाची दिली त्याप्रमाणे ती वडिल घराण्याकडे सन १८०१ पर्यंत चालली. पुढे मुधोळ घराण्यापैकी मालोजी पिराजी यांनी ती जबरीने घेतली, त्यावेळी आमचे घराणे पडके स्थितीत होते व मालोजी हे मोठे हुद्यावर होते. व त्यांची पेशव्याना अतिशय जरुरी होती व त्यांना (पेशव्याना) त्यास दुखविता येणे कठीण होते या गोष्टीचा फायदा घेऊन त्यांनी ती दडपली आहे. त्यासंबंधाचे कागदपत्र एलियेनेशन ऑफिसच्या रेकॉर्डमध्ये सातारा जमाव दप्तर रु नं. १७१२ व कागदाचा क्रमांक ७४९३ व जमाव दप्तर रु. नं. १७१३ कागदाचा नंबर ७२९६ हे आहेत. हे अस्सल कागद मी स्वतः सरकारची परवानगी घेऊन पाहिलेले आहेत व त्याच्या नकलाही करुन आणलेल्या आहेत. त्या कागदाच्या असलबर हुकुम नकला २ दोन मी आजरोजी हजर करीत आहे. ही देशमुखी मुधोळकर घोरपडे राजघराण्याकडे गेल्यानंतर ती वडील घराण्यातील वडील पुरुषाकडेच चालत आहे. ज्युनिअर शाखाना त्यात काही हक्क प्राप्त झालेला नाही. घोरपडे घराण्यानी मिळविलेली तिसरी देखमुखी ता। वाळव्याची देशमुखी होय. त्यास बहादूरवाडीचीही देशमुखी म्हणतात, ही देशमुखी १८ गावची होय. या देशमुखी संबंधाचे कागदपत्र मी पाहिलेले आहेत, ही देशमुखी मुळजी शिंदे घराण्याची होती.

शिंद्यांच्या वंशजानी घोरपडे यांना पाठीराखे करुन घेऊन निमी देखमुखी दिली असा त्या संपादनाचा इतिहास आहे. खंडोजी नावजीने ही देशमुख प्रथम संपादन केली. सन १६२५ पासून या खंडोजीची कारकिर्द सुरू झालेली आहे खंडोजीच्या पुर्वी ही देशमुखी शिंदे करीत होते व खंडोजीच्या वेळेस ही शिंदे व खंडोजी करीत होते, असा ऐतिहासिक दाखला आहे. यावरून ती खंडोजीने संपादन केली असे मी म्हणतो. शिवकालीन पत्रसार संग्रह खंड १ या प्रसिद्ध झालेल्या ऐतिहासिक पुस्तकात नं. ३५४ चे सन १६६२–३३ चे पत्र छापलेले आहे. खंडोजी हा त्यावेळी तुकोजी शिंदे यांचे बरोबर देशमुखी करीत होता असा उल्लेख त्या पत्रात आहे. दुसरा उल्लेख याच पुस्तकातील पत्र नं ५७२ सन १६४९ चा यात आहे. खंडोजीच्या कारकिर्दीपुर्वी थोडे दिवस तर्फ वाळवे येथील एका कामाबद्दल महजर झाला आहे. त्यावर एकट्या शिंद्यांनी देशमुख म्हणून काम केले आहे. महजर म्हणजे एखाद्या कामाच्या बाबतीत पंचानी दिलेला निवाडा. पुर्वी एकादा वाद पडला म्हणजे लगतच्या गावचे देशमुख देशपांडे वगैरे पंच मिळून जो वाद तोडीत व ठराव करीत त्यावेळी हजर असलेल्या देशमुखांची नावे लिहून व त्यांचे नावे शिके घेण्याचा रिवाज होता. तो मजहर प्रांताच्या देशमुखांच्या अधिकारात होत असे. असे दोन महजर शिंदे आणि घोरपडे–देशमुख म्हणून काम करीत असल्याचे बद्दलचे नि. ५० लगतचे अ. नं. २–३ चे गुदरलेले आहेत. नि. ५०, ३ हा मजहर इ. स. १६४० मधील असून त्यावर घोरपडे यांच्या वतीने त्याचा हेजीब नरसिंह हेजीब याने घोरपडे यांचा शिक्का उठविलेला आहे. नि. नं. ५०/२ हा महजर इ. स. १६३६ मधील असून, त्यावर खंडोजी घोरपडे व शिंद्यांपैकी

एक शिंदे हे देशमुख म्हणून हजर होते, असा उल्लेख आहे. खंडोजी पुर्वी शिंदे हे एकटेच देशमुखी करीत होते, याबद्दलचा महजर भारत इतिहास संशोधक मंडळाच्या त्रैमासिकात प्रसिद्ध झालेला आहे. तो अंक मी पुढे हजर करीन. मी सन १९४० साली भारत इतिहास संशोधक मंडळाच्या त्रैमासिकात जे कागद प्रसिद्ध केले आहेत त्यामध्ये खंडोजी हा बहादूरवाडी शाखेचा मूळ पुरुष म्हणून दाखविलेला आहे. त्याचे लागून मी नि. नं. ५०/४ व ५०/५ हा हजर केलेले आहेत. या कागदांची रुजवात कागद प्रसिद्ध केल्यावेळी मुधोळच्या राजघराण्याच्या इतिहासाचे लेखक द. वि. आपटे व इतिहास संशोधक श्री. पुरंदरे व य. रा. गुप्ते यांनी घेतलेली होती, ही गोष्ट शिवचरित्र साहित्य खंड ८ पान ८४ यावर नमूद आहे.

पुढे वाद होऊन शिंद्याकडूनही सर्व देशमुखी बहादूरवाडीकर घोरपडे यांचेकडे आलेली आहे. आष्ट्याचे घोरपडे हे खंडोजीच्या शाखेपैकी होय. या शाखेकडे आष्ट्याची देशमुखी आहे, ही आष्ट्याची देशमुखी ही प्रांत मिरज पैकी होय. ही दाखविण्याकरिता मी नि. नं. ५०, १३ चा कागद दाखल केला आहे. त्या मिरज प्रांतात भिलवडी, घोगाव, दुधोंडी, जागराळे, ताकारी वगैरे गावे होती. आष्ट्याची देशमुखी व्यंकटराव मानसिंग यांनी प्रथम संपादन केली. मुळची ही देशमुखी मिरज प्रा ब्राह्मण व जैन देशमुखांची होती. जिवाजी गोसो हा ब्राह्मण मुळचा देशमुख होता. त्याचवेळी व्यंकटरावाने ही देशमुखी दडपशाहीने उपटली आशारितीने ती संपादन केली याबद्दल मी नि. नं. ५०/७, ५०/८, ५०/९, ५०/१० चे कागद हजर केलेले आहेत. हे कागद १७३१ ते १७३९ पर्यन्तचे आहेत. हे कागद दुधोंडीकर तात्यासाहेब देशमुख यांचे दप्तरातून मजकडे आलेले आहेत. दुधोंडीकर देशमुख हे ब्राम्हण आहेत. आष्ट्याच्या घोरपडे शाखेला दुधोंडीची पाटीलकी मिळालेली आहे. ती मूळ खंडोजीने मिळविली व व्यंकटरावने ती चालविली हे दाखविण्याकरिता मी नि. नं. ५०/१४ कागद हजर केला आहे. आष्ट्याची देशमुखीही घोरपडे दांडगाईने उपभोगितात हे दाखविण्याकरिता मी नि. नं. २०, ११ व ५०, १६ चे कागद दाखल केले आहेत. आष्ट्याच्या देशमुखीमध्ये बहादूरवाडीकर घोरपडे यांचा काहीही संबंध नाही. या कागदावरुन आष्ट्याची देशमुखी ही घोरपडे घराण्याचा मूळ संपादक याने मिळविली व पुढे ती वाटणीमध्ये आष्ट्याच्या शाखेकडे गेलो असे जे प्र. वादी आपले कैफियतीत म्हणतात ते खोटे आहे, असे मी म्हणतो. तांदुळवाडी हे गाव आष्ट्याच्या देशमुखी पैकी होय नाईकजी घोरपडे हा १७५९ चे सुमारास आष्टे शाखेचा देशमुख होता, असे दाखविण्यासाठी मी नि. नं. ५०/११ चा कागद दाखल केला आहे. तो महजर आहे. तसा उल्लेख नि. नं. ५०/१६ चे कागदात आहे

सातारा तर्फची देशमूखी बळकावण्याचा प्रयत्न मुधोळ शाखेपैकी मालोजी पिराजी याने पुन्हा इ. स. १७७२–७३ साली केला होता. त्यावेळी वडिलकी कडेच ती चालवावयाची याबद्दलचे आज्ञापत्र पंतप्रधान यांनी दिलेले आहे. ते मी नि. नं. ५०, ६ ला दाखल केलेले आहे. एलिएनेशन ऑफिसमध्ये मी मुधोळच्या घोरपडे शाखेसंबंधीचे कागदपत्र पाहिलेले आहेत. त्यामध्ये मुधोळ शाखेचे वतन हेही वडिलकीनेच चालावयाचे अशाबद्दलचा कागद माझ्या पाहण्यात आलेला आहे. मुधोळ शाखेपैकी व्यंकटराव यांनी आपले शाखेतील कुटुंबाची चाल यादीने कंपनी सरकारास कळविली आहे. धाकट्या बायकोचा मुलगा वयाने वडिल असला तरी दौलत त्याचेकडे न जाता वडिलकीने वडील बायकोचा मुलगा वयाने लहान असला तरी त्याचेकडेच जावयाची असोन व धाकट्या बायकोच्या मुलास पोटगी मिळावयाची असते, असे कळविले आहे. त्या अस्सल बरहुकूम मी नक्कल करुन घेतली आहे, ती नक्कल मी हजर करतो.

गोजेगाव व घोरपडे हे मूळ खंडोजी याचा मुलगा संताजी याचे वंशजापैकी आहेत. त्यांच्याकडे देशमुखी वगैरे नाही. फक्त पाटीलकी आहे. कारण ती खंडोजीची कनिष्ठ शाखा आहे. मी जो मागील तारखेस नि. न ४ चा कागद गुदरला आहे, तो त्या शाखेमध्ये पाटीलकीच्या ज्या जमिनी आहेत, त्याच्या

वाटणी संबंधीचा आहे हा आमचे घराण्यातील पंडीतराव घोरपडे यांच्यामार्फत मजला मिळालेला आहे. या सातारा जिल्ह्यामध्ये देशमुखी, देशपांडे वगैरे वतने आहेत. त्यासंबंधाने मी माहिती मिळविलेली आहे. त्या वतनामध्ये शिवाजी महाराजांच्या पुर्वीपासून देशमुख देशपांडे वगैरे चालत आलेली वतने व शाहू महाराजांच्या वेळेपासून चालत आलेली वतने असे दोन भाग आहेत. शिवाजी महाराजानी जी देशमुख, देशपांडे स्वराज्य स्थापनेच्या कामी सामील झाले नाहीत, त्यांची वतने काही काढून घेतली पुढे ती वतने शाहू महाराजांनी पुन्हा दिली. आदिलशाही पासून ज्या देशमुख्या चालत आल्या, त्यापैकी बहादूरवाडीची देशमुखी आहे. यांच्याबाबतीत त्यापुर्वीपासून वडील घराण्याकडेच चालवण्याची चाल चालत आलेली आहे व ती त्यांनी आता पर्यन्त पाळलेली आहे. ही चाल शाहू महाराजांच्या कारकिर्दीनंतर ज्या देशमुख्या चाललेल्या त्यामध्ये काही ठिकाणी चाललेली आहे. परंतु बहुतेक ठिकाणी ती चाललेली नाही. आदिलशहाच्या वेळच्यापासून जी देशगत वतने वर लिहिल्याप्रमाणे चालत आलेली आहेत, त्यापैकी बराचशा पन्हाळा प्रांतात होत्या. त्या वेळच्या पन्हाळा प्रांतामध्ये हल्लीच्या वाळवे तालुक्याचा दक्षिण भाग, तासगाव तालुक्याचा पश्चिम भाग, दक्षिणेस कागल, मुरगुड, गजेंद्रगड वगैरे पर्यंतचा भाग व बेळगाव जिल्ह्यापैकी काही भाग व सांगली संस्थान पैकी काही भाग येतो. ही मी पन्हाळा प्रांताचा नकाशा शिवाजी महाराजांनी परमानंद यांचेकडून सन १६६० साली शिवभारत नावाचा जो ग्रंथ लिहून घेतला व जो आता प्रसिद्ध झाला आहे, त्यातील २५ व्या अध्यायात दिला आहे त्यावरुन म्हणतो. तो नकाशा सदर पुस्तकात पंचविसाव्या अध्यायाच्या शेवटी छापलेला आहे. ते पुस्तक मी दाखवितो. व त्या बरहुकुम केलेली नक्कल मी हजर करतो.

प्र. वादीने एक कौलनामा इनाम कमिशनपुढे दाखल केलेला या दाव्यात हजर केलेला आहे. तो मी पाहिला. त्यामध्ये जाखरोजी बा नाथजी देशमुख यास बहादूरवाडीचे ठाणे व सवानरुचा वर जमीन इनाम दिल्याबद्दल उल्लेख आहे. हा जाखरोजी बहादूरवाडीकर घोरपडे घराण्यापैकी नाही, असे माझे म्हणणे आहे. हा बहादूरवाडीचे मुळचे देशमुख शिंदे यांचे पैकी कोणी पूर्वज असला पाहिजे. याचे कारण असे की, हा कौलनामा इ. स. १३६५ सालचा आहे. हा जाखरोजी जर प्र. वादीचे म्हणणे प्रो जावजी बाप धरला तर त्याची हयात सुमारे तिनशे वर्षाची धरावी लागेल. परंतु ही गोष्ट अशक्य आहे. जावजीची कारकिर्द इ. स. १५९८ ते १६४७ च्या दरम्यान असावी असे मुधोळकर घोरपडे घराण्याच्या इतिहासात प्रसिद्ध आहे. शिवाय बहादूरवाडीशी संबंध घोरपडे घराण्याचा खंडोजी जावजी याचे वेळी आला असा कागदोपत्री दाखला आहे. म्हणून हा जाखरोजी शिंदे घराण्यापैकी असावा असे मी म्हणतो.

हल्ली मुधोळच्या राजघराण्यात देशमुखी वगैरे वतने आजतागायत चालू आहेत. ती मुधोळ संस्थानाप्रो सध्याच्या वडील शाखेकडेच चालत आहेत. त्यांच्या शाखेतील ज्युनिअर ब्रँचला त्या वतनापैकी काही मिळालेली नाही.

ता. १०—३—४६
सही :— इ. एम. मुल्ला,
क. कोर्ट, सातारा.
१०—३—४६

निबंध संग्रह ४.
महाराष्ट्र इतिहास परिषद. (पान नं. ८९)

१०. "मुधोळकर राजे घोरपडे यांचा इतिहास" वंशावळ व काही चुकीची फर्माने.

श्री. बा. बा. राजे घोरपडे देशमुख,
नांदगाव, ता. व जि. सातारा.

मुधोळच्या घोरपडे घराण्याच्या इतिहासातील फर्माने, बखर व मुधोळ दप्तरातील जुनी अशी म्हणून प्रसिद्ध केलेली वंशावळ व त्या वंशावळीत, फर्मानात व बखरीत दिलेली काही नावे व नं. १०—११—१२ या फर्मानातील नावे पहाता व आमच्या घोरपडे घराण्यातील पूर्वजांनी आपल्या वतनासंबंधी झालेल्या महजरातून, शर्तनाम्यातून व इतर इंग्रजी ग्रंथातून व तत्कालीन उपलब्ध झालेल्या पत्रव्यवहारातून आलेली माहिती पहाता ही वरील फर्माने व त्यातील नावे संशयास्पद असल्याचे दिसून येत आहे व हा संशय खरा आहे हे समजण्यास त्याबाबत खालील व भारताच्या इतिहासाबद्दल प्रेम बाळगणारे व देशाचा खराखुरा इतिहास उपलब्ध होऊन ऐतिहासिक सत्याचा कसलाही खून न होता इतिहास उपलब्ध व्हावा असे ज्यांना ज्यांना वाटते अशा सर्वांनाच पटण्यासारखे आहे.

मुधोळचे राजे घोरपडे घराण्याचा इतिहासाची प्रस्तावना पान १५६ वर भोसले व घोरपडे घराण्यांचा भाऊबंधाचा संबंध दाखविणारी जी वंशावळ जोडलेली आहे, तसेच याच ग्रंथाच्या शेवटी घोरपडे घराण्याची जी वंशावळ प्रसिद्ध केलेली आहे, त्यातील बाजीराजे घोरपडे वडील आजे, पणजे यांची नावे व जी नावे वर म्हटल्याप्रमाणे ज्या फर्मानात आहेत ती नं. १०—११—१२ ही फर्माने पाहता बाजीचे वडील प्रतापराव, आजे पिलाजी व पणजे चोलराज अशी नावे दिलेली आहेत. तसेच पान १५६ वर जुनी अशी म्हणून दिलेली वंशावळही बाजींचा मुलगा मालोजी दुसऱ्या शाखेपैकी वल्लभसिंगचा पणतू संताजी व भोसले घराण्याचे संभाजी छत्रपतीपर्यंतच दिलेला आहे. यापुढे त्यांच्या कोणत्याही वंशजाची नावे दिलेली नाहीत यावरुन मालोजीराजे यांचे वडील बाजीराजे यांचे अगर मालोजीराजे घोरपडे यांचे कारकिर्दीत ही वंशावळ तयार झाली असली पाहिजे व तितकी जुनी आहे असा आभास निर्माण होत आहे. कारण मालोजीनंतरच्या पिढीची नावे आलेली नाहीत म्हणून व जर ती अलीकडे तयार झाली असतील तर त्यामध्ये मालोजीनंतरच्या सर्व पिढ्यांची ती वंशावळ ज्यावेळी तयार झाली, तेथपर्यन्त सर्व पिढ्यांच्या लोकांची नावे आली असती. परंतु मालोजीपर्यन्तच वंशावळ दिली असता ती जशी जुनी दाखविता येते, तशी मालोजीनंतरच्या वंशजांची नावे दिली असती तर त्या वंशावळीच्या पुराणत्वाला वाध आला असता. ही दृष्टी डोळ्यापुढे ठेवून मुधोळचा इतिहास लिहिताना इतिहास लिहून घेणाऱ्या कल्पनेप्रमाणे किंवा इच्छेप्रमाणे त्या इतिहासास पोषक अशी साधने करुन देणाऱ्या मालोजीराजे उर्फ नानासाहेब राजे घोरपडे मुधोळकर यांना ही वंशावळ अत्यंत जुनी म्हणून दाखवावयाची होती. तसेच एकमेकांना पोषक असे हे या घोरपडे घराण्यातील तीन विषय आहेत. १. वंशावळ २. या वंशावळीतीलच नावे असलेली वरील ३ फर्माने म्हणजे हे तिन्ही पुरावे उपलब्ध तयार करताना अत्यंत सावधानपणाने माहिती एकमेकांना पोषक अशी दिलेली आहे व ही माहिती देत असताना हा इतिहास लिहून घेणाराची अशी कल्पना असेल की एकदा इतिहास प्रसिद्ध झाला, त्यातील फर्माने प्रसिद्ध झाली, त्यातील वंशावळी प्रसिद्ध झालेवर त्यातील पुरुष व प्रसंगावर कोण वादविवाद करीत बसणार आहे. या इतिहासातील जो काही संशयीत कालखंड तो संशयीत आहे हे शाबीत करण्याइतका तद्कालीन अस्सल पुरावा उपलब्ध असेलच असे वाटत नसले पाहिजे. म्हणून ऐतिहासिक सत्याचा खून करुन जे घडले नसेल ते घडले व ज्या नावाची व्यक्ती अस्तित्वात नसेल ती व्यक्ती दाखविण्यात आलेली आहे. तसेच त्याफर्मानापैकी एकही अस्सल फर्मान मूळच्या स्थितीत श्री. द. वि. आपटे या घोरपडे यांच्या इतिहास लेखकाला पहावयास मिळालेली नाहीत. तशी श्री. खरे यांनाही ती पहावयास मिळालेली नसली पाहिजेत.

त्याशिवाय त्यांनी त्या फर्मानाचे फोटो व त्याचे भाषांतर तसेच बखर व तिचे भाषांतर असे कागद मिळाल्याचे संपादकांचे निवेदन या सदरात अगदी आरंभीच निवेदन केलेले आहे.

या वंशावळीतील घोरपडे यांची नावे फर्मान नं.१०—११—१२ या तीन फर्मानातील चोलराज पिलाजी व प्रतापराव ही नावे बनावट अगर चुकीची तरी असली पाहिजेत किंवा एका एका पुरुषांची दोन—दोन तरी नावे असली पाहिजेत हे निर्विवाद सत्य आहे. मुधोळ इतिहासात बखर पान २२८ मध्ये या प्रतापरावची दुसरी नावे नहुजी नावाची अशी होती, असे म्हटलेले आहे. हा एवढा व फर्मानातील नावाबद्दल संशयीत पुरावा बाळगल्यास इतर अनेक कागदपत्र प्रसिद्ध झालेले आहेत. त्या सर्व कागदात बाजीच्या वडिलांचे नाव नावबीच प्रसिद्ध झालेले आहे व नावजीचे नाव प्रतापराव किंवा प्रतापसिंह असल्याचे मुधोळ ईतिहासाव्यतिरिक्त किंवा या इतिहासाचा उपयोग दुसऱ्या एखाद्या इतिहास उपयुक्त म्हणून उपयोग केला असल्यास त्यातही या नावाचा उल्लेख येईल पाहा. श्री. बेंद्रेकृत मालोजीराजे व शहाजी महाराज या पुस्तकात व घोरपडे घराण्यातील कागदपत्रास या पुस्तकात भोसले घराण्याच्या इतिहासाचा पुरावा म्हणून बिनहरकत वापर केलेले दिसते व वरील तीन फर्मानातील नावे ही अनेक ऐतिहासिक ग्रंथ जरी लेखकांच्या डोळ्यापुढून गेले असले तरी या तीन फर्मानातील असलेल्या व्यक्तीच्या नावाचा लेखकांना संशय आलेला दिसत नाही. व या नावाची चूक कायमचीच राहिलेली दिसते

मुधोळकर घोरपडे घराण्याच्या इतिहासात प्रस्तावना पान १५६ वर जी जुनी म्हणून व मुधोळकर घोरपडे घराण्यातील जुन्या दप्तरातील सापडलेल्या एका वंशवृक्षाच्या आधारे तयार केली ती वंशावळ अशी—

घोरपडे व भोसले यांची वंशावळ

उग्रसेन (चंद्रसेन)


घोरपडे.	भोसले.
:	:
कणसिंह (१)	शुभ कृष्ण.
:	:
भीमसेन	रुपसिंह.
:	:
खेळोजी.	घोपजी.
:	:
मालोजी (१)	खेळकर्ण
:	:
अखैजी (१)	जयकर्ण.
:	:
कर्णसिंह (२)	संभाजी.

;		:
चोलराज.		मालोजी
:	:	:
:		
पिलाजी	वल्लभसिंग.	शहाजी
:	:	:
प्रतापराव	बहिरजी	शिवाजी
:	:	:
बाजीराजव	मालोजी.	संभाजी.
;	:	
मालोजी	संताजी.	

मुधोळच्या इतिहासात अनेक फर्माने छापलेली असताना व त्याही फर्मानांचे मूळ पहावयास मिळाले नाही. नुसते फोटोच पाहावयास मिळाले असे श्री. द. वि. आपटे यांनी म्हटले असताना बाकीच्या फर्मानाचा संशय न घेता फक्त या वरवर फर्मानांचा संशय का, हा प्रश्न उभा राहतो. मला तर या तीन फर्मानापुर्वीच्या सर्वच फर्मानांचा संशय आहे, परंतु ती फर्माने संशयीत आहेत असे दाखविण्याइतका सबळ पुरावा आला तरी आमच्यापुढे उपलब्ध नाही. म्हणून त्याबद्दल काही लिहिणे धाडसाचे होईल व ऐतिहासिक दृष्ट्या त्याचा उपयोगही काही नाही. मात्र या तीन फर्मानाबद्दल व त्यातील नावाबद्दल सबळ पुरावा उपलब्ध आहे. या मुधोळकर घोरपडे घराण्याचे निरनिराळ्या इतिहासप्रसिद्ध शाखा आहेत. व त्या बाजीच्या बंधू पासून विभक्त झालेल्या आहेत. तसेच बाजीचे मुलापासून विभक्त झालेल्या आहेत, त्या शाखा अशा भाडळे, घोरपडे, नांदगाव, तासगाव, राजे घोरपडे, आष्टेकर व बहादूरवाडीकर घोरपडे व मुधोळकर घोरपडे यांची शाखा. ही एकाच घोरपडे घराण्यांची शाखा होत. त्या निरनिराळ्या शाखांची कागदपत्रे आतापर्यन्त प्रसिद्ध अशी माझे संग्रही आहेत. ती वरवर न पाहता खोलात जावून अभ्यासू दृष्टीने पाहिल्यास वरील मुधोळ इतिहासातील वर नमूद केलेली नावे निःसंशयीत आहेत, असे म्हणावे लागते. मुधोळकर घोरपडे यांचे पूर्वज म्हणून संबंध येतो तसा तो आमच्या शाखेच्या नावाचाही पूर्वज म्हणून संबंध येतो व त्यांचे वंशज म्हणून त्या नावाच्या सत्यतेबद्दल आम्हीसुद्धा चर्चा करु शकतो. (नावजी, मालोजी, संत्रोजीसंकराजी) फक्त दोनच दाखविले आहेत. म्हणजे इतिहासाच्या अगर वंशावळीच्या विस्तारभयास्तव अवांतर भाऊबंदांची नावे न दाखविता जे पुरुष मुधोळच्या गादीवर आले त्यांचीच नावे दाखविलेली आहेत, असे म्हणावे तर वडील व जवळच्या भाऊबंदांची नावे टाळून चुलत घराण्याची नावे या इतिहासात दिलेली दिसतात. त्यामुळे या वरील मुधोळ घराण्यातील घोरपडे घराण्याच्या शाखा व त्यातील पुरुष व प्रसंग पाहता त्यांनी जो पराक्रम केलेला आहे. तो पुरुष कोणत्या शाखेतील कोणाचे कोण हे इतिहासाला माहित नसल्यामुळे आज इतिहास संशोधकही त्या नावाबद्दल व ते कोणाचे कोण हे सांगू शकत नाहीत. उदा. शिव—चरित्र साहित्य खंड ५ राजारामाची दिलिंद्र पद घेण्याची इच्छा व योजना त्यानिमित्त हणमंतराव कृष्णाजी, कृष्णाजी हणमंतराव घोरपडे यांच्यावर जी रायगड घेणे, विजापूर हस्तगत करणे, भागानगर घेणे औरंगाबाद घेणे, दिल्ली घेणे वगैरे कार्यांची मदार राजाराम छत्रपतींनी टाकलेली आहे. तसेच या हणमंतराव कृष्णाजी घोरपडे देशमुख यास इनाम गावाबद्दल आज्ञापत्र हे आज्ञापत्र मावजी पारसनीस यांनी प्रसिद्ध केलेल्या सनदाप्रत्रे या पुस्तकात संभाजी, राजाराम व दुसरे शिवाजी यांच्या वेळचे कागद म्हणून जो विभाग आहे, त्यात पान १७७ लेखांक २३ पहा. त्याप्रमाणे याच

पुस्तकात मुसलमानी राज्यातील सनदापत्रे या विभागात पान ३० वर खंडोजी घोरपडे यास मिळालेल्या सनदा व त्यात म्हटलेप्रमाणे, मौजे तांदुळवाडी, मौजे कुडळवाडी मौजे ढवळी उर्फ टाकळी, मौजे मानेवाडी, मौजे इटकरे व कसबे आष्टे कर्यात मजकूर व मामले मजकूर मलिक चाँद महंमद याजकडे होते. ते हे सदरहू गाव साम्यतेचे मंडळीचे उपमेहून जे अधिक असे जे खंडोजी घोरपडे, यास कुळबाबा, व कुलकानुसुद्धा व खेरीज तंबाकू व वेठ बेगार व जकात सहित स्वामीनी कृपाळू होऊन इनाम दिल्हे असे तर मौजे व कसबे मजकूर हे गाव घोरपडे यांचे दुमाला करावे व मशारनिल्हेचे इलाखेदार, म्हणजे कुटुंबातील घरमंडळीचे खर्चाकडे द्यावे. म्हणजे ते जाणोन वहिवाट करतील ही सन १६८१ मधील सनद व हे खंडोजी घोरपडे व त्यांच्या पूर्वजांची माहिती इतिहासात दिलेली नाही.

तसेच शिवचरित्र साहित्य खंड आठ पान ८३ राजे घोरपडे देशमुख नांदगाव तासगाव लेखांक ७४ ची सनद पान ८७ मध्ये स्वामिसंनिध विनंती केली की, आपले वडील सो बाजी घोरपडे निमे देशमुख ता मार व पटेलकी जिमे मौंजे नांदगाव व निमे मौजे तासगाव हे वतन यांनी अनुभवले. त्यांचे वडीलपुत्र थोरले बाईकाचे पोटीचे नावजी घोरपडे व धाकटे पुत्र आणि धाकटे बायकोचे मालोजी घोरपडे, नावजीचे पोटी दोघे पुत्र जाले. वडील राघोजी घोरपडे आणि धाकटे संताजी घोरपडे हे वडील बायकोचे व धाकटे बायकोचे मालोजी घोरपडे एकूण तिघे जहाले. त्यास राघोजी घोरपडे यांचे पोटोचे मानाजी घोरपडे होते भांडणी ठार झाले याकरिता राघोजीचे नकल जाले. संताजीचे पोटीचे आपण वगैरे मजकूर सर्व हमशाही गोतांचा पुरावा हजर करून मालोजी राजे घोरपडे मुधोळकरांनी बळकाविलेले वतन पुन्हा वडील घराण्यात छत्रपती शाहू महाराज यांनी पुर्वीप्रमाणे सुरु केले. तद्‌नंतर या वतनाची भांडणे पुढे शंभर वर्षे अधून मधून चालू होती. परंतु या वडील शाखेकडेच त्यावेळच्या राजकर्त्या पुरुषांनी निवाडा करुन ठेवलेली आहेत. यावरुन जी वंशावळ होती व शिवचरित्र साहित्य खंड पान ८५ वर दिलेली आहे, ती अशी :—




वर नमूद केलेल्या सनदेतील जी वंशावळ तयार होते त्या व्यतिरिक्त जी नावे या वंशावळीत दिलेली आहेत, ती नावे हा लेख पुर्वी देताना आमच्या दप्तरात जुनी अशी जी वंशावळ तत्कालीन होती, त्यावरुन दिलेली आहेत. व ती देताना याच लेखाच्या प्रस्तावेत मुधोळ इतिहासात मालोजी वडील होता व तो जिवंत

राहिला म्हणून आदिलशहाने त्यास बोलावून आणून सरदारकी दिली असे मुधोळकर इतिहासात म्हटले आहे. या ठिकाणी मालोजी घोरपडे यांच्या पदरी असलेला पर्शियन इतिहास– (बखर) कार म्हणतो या ठिकाणी इतिहास लेखक व इतिहास लिहून घेणारे मालोजी घोरपडे यांची माहिती एकांगी दिसते. असे मी हा लेख १९४२ साली दिला, त्यावेळीच नमूद केलेले आहे.

मुधोळ घोरपडे घराण्याचा इतिहास लिहिताना त्यांना काही कागदपत्रे उपलब्ध नसली पाहिजेत व जरी उपलब्ध असती तरी त्यांनी त्यातील साधक बाधक गोष्टींचा विचार करुन त्याना अगर त्यांच्या विचारात पोषक असतील अशी कागदपत्रे प्रसिद्ध केलेली असली पाहिजेत. ते कसेही असो, निव्वळ मुधोळच्या घोरपडे घराण्याचा इतिहास व त्यात प्रसिद्ध झालेली कागदपत्रे वंशावळ हाच काही अंतिम निर्णय बदलण्याइतका सबळ असा आणि उपलब्ध असलेला पुरावा देण्यासारखा आहे तो असा, आकोजी पुत्र पिराजी पुत्र मालोजी राजे घोरपडे, मुधोळकर यांनी सरकारात याद दिली व यात आमचे चुलत चुलते वाजोजी घोरपडे देशमुखी वतन अनुभवू लागले असे म्हटले आहे. तसेच शिवचरित्र साहित्य खंड ८ मध्ये नांदगाव घोरपडे देशमुख यांच्या सनदेतही वाजोजी यांच्याकडेच देशमुखी असल्याचे आहे. आजचा कागद सातारा जमाव दप्तर स. न. न. त्यातील ७५१२(१) नंबरचा कागद आहे, त्याची नक्कल मी समक्ष दाखवित आहे.

शिवचरित्र साहित्य खंड ५ पान १६२ लेखांक ९२१ हा इ. स. १६५४ साली भाडळे संमत कोरेगाव येथील पाटीलकीचा अस्सल महजर छापलेला आहे व त्या पाटीलकीचे मालक वृत्तकथक खंडोजीराजे व अंबाजीराजे विन नावजो राजे घोरपडे मोकदम भाडळे संमत कोरेगाव पा मजकूर यांनी टाणीयात येऊन मालून केले जे मौजे (मजकुराची) पटेलगी आपले (वडील) वडिलांचे मिरासी आपले वडील पणजे कान्होजी व नालजी व येकोजी व सोमा चौघे भाऊ यामध्ये नालजीस देवाज्ञा झाली. कान्होजी, येकोजी व सोमा हे तिघे भाऊ भाडळ्याचे पाटिलकी करीत होते, त्यास पटेलगीच मुतालिकास ठेऊन तिघे भाऊ चाकरीस गेले, तेथे कान्होजी दुखणे पडोन मोजे मजकुरास येऊन देवाज्ञा जाहले, त्यावरी येकोजी व सोमाजी हे दोघे चाकरी टाकून पटेलगोस आले. पान १६३

पुढे पान १६५ मध्ये याच महजरातील वरील खंडोजी राजे व अंबाजी राजे आपली वंशावळ देताना ती अशी देतात. कान्होजी, त्याचा लेक पदमोजी तोही थोड्याच दिवसामध्ये मयत जाहाला, त्याचा लेक जावजीΩΩ आपले बाप मौजे मजकुरासे येऊन आपले मिराशीचे जागा म्हणऊन सेतवाडी कुणबावा करुन होता, त्यास लेक सहा जण बि–तपसील.




मराठ्यांचे इतिहासाची साधने १७३

नेगोजी, विठोजी, तुकोजी, खंडोजी, बाजी, अंबाजी, यामध्ये हे नेगाजी व तुकोजी दोघे भाऊ पहिलेच मयत जहाले होते, त्यावरील आम्ही चवघे भाऊ विठोजीराजे, खंडोजीराजे, बाजीराजे, आबाजीराजे ऐसे दिवाणीचे चाकरी करू लागले असा मजकूर आहे व पुढे ओळ १३ नंतर याच महजरात म्हटले आहे.

या वरुन संकराजी दत्तो हवलदार व गंगाजी नाईक देसाई पा मा गावगना पटेल व हकजवार गोत याचे मनास आलेले मिरासी ००० चे नव्हे. उखाईस पटेलगी निसबत नाही. पटेलगी मिरासी विठोजी, खडोजी, बाजी, अंबाजी राजेघोरपडे याचे वडिलाची होये. उखाई ठाकूराचे निसबतीची तीत पटेलगी संबंध नाही, यैसे जहाले. या महजरावरुन खालीलप्रमाणे वंशावळ तयार होते.

अशा तऱ्हेची वंशावळ ही खरी वंशावळ तयार होत आहे व त्यातील वतनाचे वृत्त कथक खंडोजीराजे व अंबाजी राजे बीन नावजी राजे घोरपडे हे आपले बाप आजे, पणजे निपणजे कोण होते तसेच आपले बंधू कोण कोण होते हे सांगणे इतके सुज्ञ व सरकार दरबारात वागलेली व मोठ्या हुद्द्यावर वागलेली मंडळी होती. सर्वसाधारण मनुष्यसुद्धा आपले बाप, आजे, पणजे कोण हे सांगू शकतो. तसेच आपले भाऊ कोण हेही सांगू शकतात यावरून तत्कालीन अस्सल कागदपत्रावरून व तत्कालीन याच घराण्याच्या पुरुषांच्या सांगण्यावरून तयार होते. ती पहाता तसेच सन १८६९ साली प्रसिद्ध केलेला इंग्रजी ग्रंथ मुंबई गव्हमेंट रेकॉर्ड मेमोयर ऑफ दि स्टेटस् सदर्न मराटा कंट्री या पुस्तकात दिलेली मुधोळ घराण्याची वंशावळ पाहता महजरातील वंशावळ व ही एकच आहेत, असे दिसते. फक्त महराजामध्ये पदमोजी म्हटले आहे व या पुस्तकात पुन्नाजी म्हटले आहे. ही इंग्रजी उच्चाराची चूक असली पाहिजे. जसे बॉम्बे (मुंबअी) (खरबी खडकी) कॅलकट्टा (कलकत्ता)

सन १८३२ साली मुधोळ दरबारने आपल्या घराण्याची जी हकीकत वंशावळ देऊन इंग्रज कंपनी सरकारला यादीने कळविलेली आहे. त्यातील वंशावळ अशी :



यात जावजी म्हटले आहे परंतु नावजी असे पाहिजे, कारण ती मोडी वाचनाची चूक दिसते. मोडीत ना व जा ही अक्षरे सारखीच असतात, म्हणजे जाची गाठ पोकळ व ना ची गाठ भरीव.

ही वंशावळ पाहताही बाजीच्या वडिलांचे नाव नावजीच आहे, प्रतापराव असल्याचे दिसत नाही. तसेच नावजीस ५ मुले दाखविलेली आहेत. परंतु ती सहा पाहिजेत तसेच सहापैकी एका मुलाचे नाव राणोजी असल्याचे आतापर्यंत कोठेच आढळलेले नाही. तसेच नावजीच्या वडिलांचे नाव मालोजी म्हणून दिलेले आहे, ते चूक आहे, तर नावजीच्या वडिलांचे नाव पदमोजी होते, हे मुधोळ दरबारास माहिती नाही. तसेच ही याद कंपनी सरकारला देताना मुधोळच्या जुन्या दप्तरात सापडलेली ती मुधोळच्या इतिहासात पान १५६ वर छापलेली वंशावळ ती जर अस्तित्वात असती तर १८३२ साली जी याद कंपनी सरकारला दिली त्या यादीतीलच नावजीचा बाप मालोजीसारखा चुकीच्या नावाची याद न देता. दुसरी १५६ पानावर दिलेल्या वंशावळीतील प्रमाणे नावजीचा बाप पिलाजी म्हणून हेही नाव चुकीचेच आले असते. म्हणजे बाजीचा बाप प्रतापराव, त्याचा बाप पिलाजी, त्याचा बाप चोलराज अशी या घोरपडे घराण्यात जन्मास न आलेल्या इसमांची नावे या वंशावळीत येऊन ती एक मुधोळच्या घराण्यातील जुन्या दप्तरातील अमुल्य ठेवा म्हणून अस्तित्वात असलेली बनावट नावाची वंशावळ नक्कीच त्या यादीत दिली असती. म्हणजे १८३२ साली आपल्या घराण्याचे पूर्वज कोण होते, कोण उत्तरेकडून दक्षिणेकडे आले, कोणी वतन व जहागिरी संपादन केली, याची फारशी माहिती मुळात या मुधोळ घराण्यातील राजवंश म्हणून वापरण्याच्या इसमास असल्याचे दिसत नाही. तसेच वरील १५६ पानावर दिलेल्या वंशावळीतील नावे मालोजी बाजी प्रतापराव पिलाजी व चोळराज ही नावे घालून ती वंशावळ मुधोळचा इतिहास लिहिण्याच्या वेळेसच केलेली असली पाहिजे. १८३२ साली दिलेली यादी सोबत जोडलेली आहे, ती याद मी इनाम कमिशन ऑफिसमधून आणलेली आहे.

शिवचरित्र साहित्य खंड ८ पान ८५—६ भारत इतिहास संशोधक मंडळ त्रैमासिक वर्ष ३२ यात घोरपडे यांची वंशावळ दिलेली आहे. त्यात बाजीचा वडील नावजी हाच दाखविलेला आहे.

तसेच शहाजीराजे व या घोरपड्यामध्ये इ. स. १६५२ मध्ये झालेला शर्तनामा प्रसिद्ध केलेला आहे व हाच शर्तनामा मालोजीराजे शहाजी महाराज या पुस्तकात पान ५१४ मध्ये छापलेला आहे, तो असा. कारणे राजश्री बाजीराजे व अंबाजी नावजी राजे घोरपडे गोसावी, यासि महाराज राजश्री शहाजी राजे भोसले जोहार लेहून दिल्हे शर्तनामा ऐसाजे. हा शर्तनामाही पाहता बाजीराजे व अंबाजीराजे यांचे वडील नावजी यांचे नावाचाच उल्लेख केलेला आहे. बाजीचे वडील प्रतापराव असल्याचा उल्लेख नाही. मात्र मुधोळ इतिहास तक्रार केले की, मुधोळची वाई परगण्यातील गावे व किल्ले आणि कऱ्हाड परगणा यातील निम्मा हिस्सा पुर्वीपासून माझा असता हल्ली चोलराजाचा नातू प्रतापराव घोरपडे याने सर्व गाव व किल्ले जबरदस्तीने आपल्या ताब्यात घेतलेले आहेत. अशा तऱ्हेचा फर्मानाचा आशय आहे. व या फर्मानात बाजीचा वडील याचे नाव नावजी न उच्चारता प्रतापराव हे उच्चारले आहे. सन १६३७ साली जर बाजीचे वडिलाचे नाव प्रतापराव होते तर १६५२ साली वडिलांचे नाव नावजी हे शहाजी महाराजच म्हणतात. यावरुन त्या फर्मानाबद्दल संशय जास्तच दुणावतो.

शिव भारत अध्याय १२ श्लोक १६—१७—१८ यामध्ये बाजी राजे घोरपडे यांना कोण कोण भाऊ होते हे नमूद आहे. त्यात मानाजी हे बंधू म्हटलेले आहे. परंतु ते बंधू नसून ते पुतणे आहेत. व ते बाजीचे खंडोजी नावाचे बंधू त्यांचे ते मुलगे तसेच मागे खंडोजी घोरपडे यांना कसबे, आष्टे वगैरे गावची सनद हिचा उल्लेख केलेल्या खंडोजीचे ते वडील होत.

अथ खंडजिता चाबुजिता मानजिता तथा।
सहितो बंधुमिश्रान्यैः सैनिकैश्च समन्तताः॥१६॥
चंद्रहासधरैश्चापधरे प्रासधरैरपि।
अग्निर्यत्र धरैश्चक्रधरैश्च पुरुषे वृत्ति ॥१७॥
घोरकर्मा घोरकटो बाजराजो महाभुजः।
वाढवो असवत्नरच वाढवमग्निरिवापरः ॥१८ ॥

नंतर खंडोजी, अंबाजी, मानाजी बंधू, तसेच इतर सरदार आणि तलवारी, मनुष्ये भाले, बंदुका आणि चक्रेही धारण करणारे ज्यांचे भोवती आहेत, असा घोर कृत्य करणारा महाबाहू बाजीराजे घोरपडे वगैरे माहिती देताना बाजीना खंडोजी, अंबाजी वगैरे बंधू आहेत. तसेच पंढरपूर येथील विठ्ठल मंदिरात याच घोरपडे यांनी मंदिराचा जीर्णोद्धार केलेला आहे व चबुतऱ्यावरही दीपमाळ बांधणाऱ्या बाजीराजे व त्यांचे बंधू यांची नावे शिलालेखात दिलेली आहेत तसेच मजकडे असलेल्या अनेक पत्रातही नावे आहेत. तसेच शिवकालीन पत्रसारसंग्रहामध्येही नावे आहेत. असे असताना मुधोळच्या इतिहासात नावजीचा उर्फ प्रतापरावाचा मुलगा फक्त बाजीराजे हाच एकटा दाखविलेला आहे. परंतु नावजीला एकंदर ६ मुले होती हे वर नमूद केलेले आहे. मुधोळ इतिहासात पा. नं. २२८ वर प्रतापराव या नावाचा उल्लेख आहे व त्याची छत्री चेलेवाडीत आहे, असे म्हटले आहे. ती छत्री मी पाहिलेली आहे व त्यावर नावजी हेच नाव शिलालेखात खोदलेले असे दिसते. यावरून अनेक प्रसिद्ध व अप्रसिद्ध कागदपत्रात व माझे संग्रही अद्यापही काही कागद आहेत, त्यात बाजीच्या वडिलांचे नाव नावजीच आहे. प्रतापराव या नावाचा एकाचाही उल्लेख नाही. प्रतापराव फक्त मुधोळ इतिहासातच दिसतो व त्याला नावजीही म्हणत होते. नावजीचा बाप व आजा यांची नावे जी मुधोळ इतिहासात दिलेली आहेत, ती एकंदर पुरावा पाहाता बिलकूलच विश्वासास पात्र नाहीत. इतकेच नव्हे तर त्या नावाची फर्मानेच चुकीची आहेत.

भारत इतिहास सं. मंडळ शिवचरित्र साहित्य खंड ५ लेखांक १२१ पाहता इ. स. १६६२ जुलै, ३० मध्ये अंबाजी राजे घोरपडे यांचे पुत्र कृष्णाजी राजे घोरपडे यांसी आंतू कोंडो देसाई आपले आपले देशमुखीचे मिरास पत्र दिले त्यावेळी हजरमजालसी म्हणून अंबाजी राजे घोरपडे हजर होतो. परंतु मुधोळ इतिहासात पान २३३–२३४ मध्ये बाजीचा बंधू अंबाजी इ. स. १६५६ साली मोंगलांच्या झालेल्या लढाईत पडला म्हटले आहे. ते चुकीचे आहे. याच अंबाजीचा नातू हणमंतराव व पणतू कृष्णाजी या बापलेकांना सरंजाम ६ लाख होनांचा करून दिला आहे, पहा शिवचरित्र साहित्य (खंड ५) राजारामाची दिल्लीन्द्रपदप्राप्तीची इच्छा व योजना लेखांक ७६० त्याप्रो मावजी पारसनीस सनद पत्रे पान १७७ ते २३ हणमंतराव कृष्णाजी घोरपडे देशमुख यांना इनाम गावची सनद आहे. माझ्या जवळही एक हणमंतराव घोरपडे यांना दिलेल्या इनाम वतनाच्या सनदेची नक्कल इनाम कमिशनमधून घेतलेली आहे. ती आपणास समक्ष दाखवित आहे.

मुधोळचा इतिहास पान २४० वर बाजीराजे यांच्या मृत्यूची हकीकत आहे व ती १६६० साली घडलेल्याचे म्हटले आहे. परंतु हा मृत्यु १६६४ साली अगर त्यानंतर घडलेला आहे. या वेळी बाजीराजे याची दोन्ही मुले लहान असून, ती मेवाडात दहीसर गावी आपले आजोळी होती व तेथून ती आणली. बापाची जहागीर त्यांना दिली असे म्हटले आहे, तेही खरे नाही. बाजीराजे घोरपडे यांच्या मृत्युच्यावेळी व त्या अगोदर ही मुले लहान नव्हती. कारभार पहाण्याइतकी व युद्धात भाग घेण्याइतकी मोठी होती. तसेच दोन मुले नसून ३ मुले होती. मालोजीराजे घोरपडेपेक्षाही वडील मुलगा नावजी नावाचा होता. तो बाजीच्या हयातीतच इकडे स्वराज्याकडे होता व तर्फ साताऱ्याची देशमुखी व नांदगाव तासगाव गावची पाटीलकी करीत होता. (पहा शिवचरित्र साहित्य खंड ८ पा. ७५ वरील वंशावळ व लेखांक ७४ या सनदेतील वंशावळ) तसेच दुसरा मुलगा मृत्युसमयी लहान नव्हता. मालोजी इ. स. १६३० सालीच मोठा होता. भा. इ. सं. मंडळ ऐतिहासिक फारसी साहित्य खंड १ लेखांक ६७ वार्ड येथील थिटे व मालोजी घोरपडे.

तसेच मालोजीचा धाकटा बंधू संकराजी हेही इ. स. १६६५ साली झालेल्या युद्धात कामास आले (मुधोळ इतिहास पान २४० पहा) यावरून बाजीच्या मृत्युच्यावेळी त्याची मुले लहान होती. तसेच दोनच मुले होती. ते खरे नसून तीन मुले होती व ती मृत्युच्यावेळी मोठीही होती, हे सिद्ध होत आहे. तसेच माझ्याकडे एक जुनी अशी आमच्या पूर्वजांनी १५०–२०० पूर्वी केलेली वंशावळ आहे. त्या वंशावळीत तीन मुले दाखविलेली आहेत. तसेच मुंबई गव्हर्नमेंट रेकॉर्ड मेमोयर ऑफ स्टेट सदर्न मराठा कंट्री यात मुधोळकर घोरपडे घराण्याची वंशावळ छापलेली आहे. त्यात तीन मुले आहेत व मालोजीपेक्षा मोठा मुलगा महालोजी हा दाखविलेला आहे. तो महालोजी व शिवचरित्र साहित्य खंड ८ लेखांक ७४ मधील व वंशावळीतील नावजी ही एकाच मुलाची नावे आहेत.तसेच आपणापुढे या सर्व घोरपडे घराण्यांच्या शाखा व त्यातील ऐतिहासिक पुरुषांची नावे कळण्याकरिता एक वंशावळ सगळ्यांना पाहण्याकरिता ठेवीत आहे व त्या वंशावळीतील पुरुषांच्या नावाचा प्रत्येकाचा एखादा तरी कागद माझ्या संग्रही आहे. तसेच काही कागदे प्रसिद्धही झालेली आहेत. यावरुन पाहता मुधोळकर घोरपडे घराण्याचा इतिहासातील काही फर्माने व वंशावळीतील नावे चुकीची आहेत. त्या इतिहासप्रेमी मंडळीस व संशोधकास या दृष्टीने विचार करण्यास व संशोधन करण्यास जरूर ती संधी निर्माण होत आहे. तसेच मुधोळकरांनी आपल्या पुरती वंशावळ ती संशयीत अशा पुरुषांची नावे घालून प्रसिद्ध केली असल्यामुळे खऱ्या वंशजांच्या नावाची त्यांच्या पराक्रमी पुरुषांची हे कोणाचे कोण कळणेही अवघड होऊन बसले आहे. उदा. हणमंतराव कृष्णाजी घोरपडे व कृष्णाजी घोरपडे या बापलेकांना छ. राजारामाने एवढा मोठा सरंजाम दिला व त्यांच्या एवढी मोठी कामगिरी सोपविली ते हणमंतराव कृष्णाजी कोणाचे कोण, हे कोणत्याही इतिहास संशोधकाला कळण्यास अवघड

होते. परंतु या विवेचनावरून त्याप्रित्यर्थ दिलेले पुरावे पाहता ही गोष्ट सोपी होईल, असे मला वाटते. आज एवढेच लिहून पुरे करतो.

FIRISHT'S REFERENCE TO MHEERUT

(Scott's translation,1974).

Arranging his dominions in four principal Governments he conferred that of the Capital and its dependencies Debul, Beejore, and Mudkal, on Mallek Syefuddin Ghoree: Choule, Khiber, Dowlutabad to Mheerppottum with the territory of Mheerut, he committed to Mahummad, son of his brother Ali Shah,. Mahoor, Ramgeer, and his division of Berar were entrusted to Kusder Khan Syestaunee and Bieder, Indore, with Kolauss, and the Possessions in Telingana fo Azim Humaiun, son of Mallek Syefaddin Ghoree (Scott, P. 13)

चालत आहेत व प्रतिवादी अर्जी आल्यापासून येथे वादास तोंड देत नाहीत. चुकाऊन घेतले इत्यादी एकपक्षी चौकशी पाहता मुलवतन सिंदे याचे त्याणी आदेकर घोरपडे दुय्यम वादी याचे वडीलास वतन भाऊ करुन घेतले तेव्हा तीघे घोरपडे बुडाचे मोठ मोठ्या रोजगारावर होते ते प्रथक परंतु एक विचाराने चालत होते. त्याणी वेगळाले रोजगार देशमुखीचे वतने मेळविली होती. खंडेराव घोरपडे यानी शिंदे याजकडून देशमुखीचा हिस्सा मिळविल्यावर आष्टेची देशमुखी मिळविली. तेव्हा साऱ्या घोरपड्यास देशमुखी देण्याची चाल आहे. तेव्हा या वतनाची वहीवाट मोकले चीटी होय परयत आष्टेकर घोरपडे व सिंदे याची वहीवाट सिध होती. प्रतीवादी याणी तीघाची नांवे सोडचिटी घेऊन आपण ऐवज भरुन वतन सोडविले म्हणोन कर्जात अनभव वतनाचा करीतात असे दिसते यास साधनी कागद अलिकडील निा ६६–६७ चे आहेत यात शिवाजी थोरात याचे विद्यमाने करार ठरोन ऐवज घेऊन वतन महीपतराव घोरपडे यांणी सोडावे याविसी माधराव वलाळ प्रधान याचीपत्रे तीत्या सितेनातील थोरातास व महीपतराव घोरपडे यास आहेत. निा ६४–६५ ची त्याजवरून पाहाता वादीनी ऐवज तयार केला. त्याजबदल व्याज मनोती वादीचे अंगावर पडली ऐवज कराराप्रमाणे न घेतला आणि वतनाची वहीवाट रेटाईने अजपर्यंत करीतात असे आलीकडच्या कागदाकरुन दिसते यावरून पुरावेस बल कायद्यातील आहेत. प्रतिवादीचा भागवाटा सोडचिटी पासून अजपर्यंत आहे. सोडचिटी पासुन वादाचे भोग्य नाही परंतु वाद भोग्य आहें. तेव्हा वतनाचे काम दावा थोर तीन वर्षेही फिर्याद वादीचे निराकरण प्रतिवादीनी हजर होऊन केले नाही ही गैर गोष्ट केली याउपरी अर्जीचे मर्यादा राहीली नाही. सरकारी हुकुमही प्रतिवादीस जाहीर केले तथापी आलेनाहीत व नोटीस दाखल पत्रे ही मामलेदार मारपत गेली, तरी प्रतिवादीनी येऊन वादास सुरुवात न केली यावरुन वादीचा कायद्याचा कागद घेऊन एकतर्फी वादीचे पुराव्यातील विच्यार पाहाता वतनाचे अधिकारी मालक पहील्या पासुन वादीस आहैत असे होते प्रतिवादीनी नजराण्याचा ऐवज भरुन तिघा घोरपडे याचे नावे सोडचिटी घेऊन सावकारी दाखल ऐवज नजराण्याचा भरला या सबबीने आपण एकटेच वतन आनभवीतात वगैरे हे गैर आहे इत्यादी मजकुरावरुन नजरेस येते की सदरहु वतनाचा (फाटले आहे) इलाखा पटवर्धन त्या गांवची फिर्याद वादीनी तीकडे केली आहे त्याला एकसाल उत्पादनाचे दसपट रु. ८९१५ सदरहूचे दाव्यात वजा करावयाचे म्हणोन निा ३८ चीयाद वादीनी दिली त्याप्रमाण रु. ८९१५ सदरहूचे दाव्यात वजा जाऊन बाकी दावा रु. ८१०८५ चा दावा कायद्यात वादीचे मोग्य जाहले आहे आणि वादीचे वतन पुर्वापार पुराव्यावरुन दिसते. सबब वादीचे प्रतिवादीनी सोडावे म्हणोन वादीचा दावा प्रतिवादीवर एकतर्फी नोटीस वरुना सही होऊन फेसला. जाहला असे हुकमनामा निा ११० जाणीजे छ २० जिल्हेज मुा तारीख ३१ दसेवर सन १८४४ इसवी.

१) अर्जी वादीची

२) प्र. वादीस पत्र समानदाखला

३) प्र. वादीतर्फे मखत्यारनामा

४) वादी तर्फे यादनादार सबब आमची जात चीटी घ्यावी म्हणोन.

५) जाब प्र. वादीचा

६) प्र. वादीतर्फे यादतर्फ मलूची देशमुखीचे उत्पन्न लावून घेऊन जात चिटी घ्यावी म्हणोन लिा दिली.

७) वादीचे जामीना विसी बापुबीन द्वारकोजी पाा जानकर भोजे बोरगांव पेटा वाळवे याणी वाद लिहून दिली.

८) मामलेदार पेटा वाळवे यास पत्र आमीनाचे गेले त्याची नक्कल.

९) मामलेदार पेटा वाळवे यास पत्र आमीनाचे गेले त्याची नक्कल.

१०) मामलेदार मारकत बापु पा । । जानकर भौजे बोरगांव यास सवाल.

११) मामलेदार पेटा वाळवे, याचे पत्राची नक्कल.

१२) वादीतर्फे मुख्त्यार नामा

१३) दुय्यमवादी घोरपडे तर्फे याद.

१४) दुय्यमवादी संताजी घो

१५) मामलेदार मारफत मौजे साखरले कर्यांत आष्टे याची कागद व घोरपडे याचे उत्पन्नाविसी.

१६) हूजुरचे आज्ञा पत्राची नकल.

१७) मामलेदार पेटा वाळवे याचे पत्राची नकल.

१८) मामलेदार मारफत गोपाळ अनंत याचे पत्राची नकल.

१९) मामलेदार मारफत मौजे कामेरीचे मोकदमीचे कागदाची नक्कल.

२०) वादीनी हुजुर विनंतीची अर्जी आमची नादारीची जात चिटी घ्यावी म्हणोन दिली तीची नकल.

२१) वादीची जात चिटी गुन्हे गारी बा।

२२) वादीतर्फे मंत्रीचे राख्याची नकल सनसित खमसेनची त्याची नकल रोखा.

२३) वादी तर्फे मत्रीचा मौजे येडेचे मेकदमीस त्याची नकल. सनसित खमसेनची

२४) वादीतर्फे मंत्रीचे रोख्याची नकल

२५) वादीतर्फे मंत्रीचे रोख्यानी नकल.

२६) वादीतर्फे मंत्रीचेरोख्याची नकल.

२७) वादीतर्फे गावगनाचे सामान पोटगीचे वगैरे आले त्याची नकल.

२८) सवाल वादीस

२९) प्र. वादीस पत्र जामीनाचे कायद्याप्रमाणे पेसल होईल म्हणोन मामलेदार मार्फत गेले त्याची नकल.

३०) हुजुरचे आज्ञापत्र आले त्याची नकल.

३१) प्र. वादीची याद हजर जाल्याची

३२) टेप चिटीप्रमाणे वादीकडून मुखत्यार याची नकल.

३३) सवाल प्रतीवादीस

३४) हुजुर विनंतीपत्र आमीन याचे गेले त्याची नकल.

३५) हुजुरचे आज्ञापत्र आले त्याची नकल.

३६) प्र. वादीस पत्र आमीन याचे गेले त्याची नकल.

३७) प्र. वादीनी पत्र हजर होतो म्हणोन पा ो ते.

३८) वादीतर्फे याद दाव्याचे तपशीलाची नकल.

३९) वादीतर्फे कागदाचे फेरीस्त

४०) वादीतर्फे जमीन झाड्याची नकल

४१) वादीतर्फे जमीन झाड्याची नकल

४२) वादीतर्फे जमीन झाड्याची नकल

४३) वादीतर्फे पत्र फिरंगोजी सिंदे यास सदाशीव चिमाजी याचे सिक्याचे त्यानी नकल.

४४) वादीतर्फे फिरगोजी सिंदे यास वरमाजी पाटील का । । वाळवे याचे त्याची नकल.

४५) वादीतर्फे फीरगाजी शिंदे यास पत्र देशपांडे यांचे त्याची नक्कल.

४६) वादीतर्फे वाळवे येथील म्हारास कौल त्याची नक्कल.

४७) वादी तर्फे मौजे वहे येथील पाटीलकीची महजर त्याची नक्कल.

४८) वादीतर्फे संताजी घोरपडे याचा रोखा वाळव्यास जाला त्याची नकल.

४९) वादीतर्फे तर्फ मालूचे अठरा गावास ताकीद सिध्या बा प्रतिनिधीची तीची नकलेची नकल.

५०) वादीतर्फे आठरा गांवही वहीवाटीची हिसेवारीचे यादीची नकलेची नकल.

५१) वादीतर्फे सिंदे व घोरपडे व वाणी याचे दिंव्य जाले त्याचा महजर सनसित ख्मसेन याची नकलेची नकल.

५२) वादीतर्फे उच्यापतीचे यादीची नकल.

५३) वादी तर्फे अंताजी निा सिंदे यास तहची याद महीपतराव घोरपडे यानी करुन दिली त्याची नकल.

५४) वादीतर्फे महीपतराव घोरपडे याचे पत्र येसु बाईस पाो. त्याची नकल

५५) वादीतर्फे नाईकजी घोरपडे यास पत्र, महीपतराव घोरपडे याणी पाो. त्याची नकल.

५६) वादीतर्फे त्रींबकराव नारायण याणी पत्र साईकजी घोरपडे यास पाो. त्याची नक्कल.

५७) वादीतर्फे नाईकजी घोरपडे यास पत्र महीपतराव याणी पाो. त्याची नकल.

५८) वादीतर्फे मोकल चिटी पेशवे सरकारातुन जाली त्याची नकलेची नकल.

५९) वादीतर्फे आठरा गांवास मोकल चीटी त्याची नकलेची नकल.

६०) वादीतर्फे मौजे बहादुरवाडीस मोकलचीठीची नकल.

६१) वादीतर्फे आंताजी रघुनाथ यास पावती मत्रीची अंताजी रघुनाथयास त्याची नकलेची नकल.

६३) वादीतर्फे बाळाजी जनार्दन यासपत्र माधवराव बलाळ प्रधान याचे त्याची नकल.

६५) वादीतर्फे शिवाजी थोरात यास पत्र पंतप्रधान याचे त्याची नकल.

६६) वादीतर्फे महादजीपंत यास पत्र नाईकजी घोरपडे याचे त्याची नकल.

६७) वादीतर्फे सुभानराव थोरात याचे पत्र नाईकजी घोरपडे यास त्याची नक्कल.

६८) वादीतर्फे मौजे धानपडेची पावती रु. १७ त्याची नकल.

६९) वादी तर्फे रोख्याची नकल.

७०) वादीतर्फे रोख्याची नकल.

७१) वादीतर्फे रोख्याची नकल.

७२) वादीतर्फे रोख्याची नकल.

७३) वादीतर्फे रोख्याची नक्कल.

७४) वादीतर्फे रोख्याची नक्कल.

७५) वादीतर्फे पंतप्रधान यांचेपत्र आंताजी नि ा देशमुख यास त्याची नक्कल.

७६) वादीतर्फे जागोजी शिंदे यास बालाजी महादेव रोखापत्र पनास मोकसाल याचे त्याची नकल.

७७) वादीतर्फे फिरगोजी शिंदे यास पत्र महीपतराव घोरपडे याचे त्याची नकल.

७८) वादीतर्फे फिरंगोजी शिंदे यास पत्र कृष्णाबाई घोरपडे याचे त्याची नकल.

७९) वादीतर्फे मंत्रीचेपत्र अतोबास त्याची नकल.

८०) वादीतर्फे मंत्रीचे पत्र आताजी रघुनाथ यास त्याची नकल.

८१) वादीतर्फे मौजे कामेरीस ताकीद मंत्रीची नकल.

८२) वादीतर्फे महीपतराव घोरपडे यास पत्र मंत्रीचे त्याची नकल.

८३) वादीतर्फे पीराजी सिंदे यास पत्र आंताजी रघुनाथ याचे त्याची नकल.

८४) वादीतर्फे सखोजी सिंदे यानी सरकारात करीणा दिली त्याची नकल.

८५) वादीतर्फे राजीनामा महीपतराव घोरपडे याणी अतांजी रघुनाथ यास दिला त्याची नकल.

८६) वादीतर्फे मंत्रीचे पत्र महादजीपंत व सीउबास पा ो. त्याची नकल.
८७) वादीतर्फे बापूजी पंत याचे पत्र दादाजी पंतास त्याची नकल.
८८) वादीतर्फे अंताजी रघुनाथ याचे पत्र दादाजी पंत यास त्याची नकल.
८९) वादीतर्फे आंताजी रघुनाथ याचे पत्र रामचंद्र पंत यास त्याची नकल.
९०) वादीतर्फे जागोजीं शिंदे यास पत्र गोपालजी भोसले याचे त्याची नकल.
९१) वादीतर्फेपत्र लक्ष्मणराव सिंदे यांस त्याची नकल.
९२) वादीतर्फे रामाजी वलाळ याचे पत्र हरीपंत आपास व रामचंद्र पंत यास त्याची नकल.
९३) वादीतर्फे रामजी बकले याचे पत्र हरीपंत आपास त्याची नकल.
९४) वादीतर्फे महीपतराव घोरपडे याचे पत्र.
येसाजीपंत व रामचंद्रपंत यास त्याची नकल.
९५) वादीतर्फे बरमाजी सिंदे यास पत्र मुरारजी येवले याचे पत्र त्याची नकल.
९६) वादीतर्फे रामजीपंत यास पत्र मंत्रीचे त्याची नकल.
९७) वादीतर्फे – लागत नाही – विनंती दुसरी म्हणोन त्याची नकल.
९८) वादीतर्फे सखोजी सिंदे याचे पत्र सताजी गाईकवाड यास त्याची नकल.
९९) वादीतर्फे रामजी बलाळ याचेपत्र हरीपंत आपास.

१५	१९	ते
१६	३	सिध्यास
१७	२०	कोण
२२	१९	व
२२	२०	त
२३	८	म्हणोन
२४	२२	व
२४	२७	देवाजी
२५	२५	आहेती
२६	२५	न
२७	२२	याची
२९	१५	पत्र
३०	२६	ते
३२	४	पासी
३३	७	स
३४	६	ग
३६	२४	हेच
३९	१०	जमीन
३९	२१	पासुन पर्यंत.

४४	२	नी
४४	१०	ते
४५	३	ऐवज
		मागील अंगास
३८	१७	दिली
३६	६	नी
३५	श १७	नकल
३५	२१	नकल
३४	९	नकल

एकूण सहासष्ट अक्षरे
आसेत.

प्र वादीस पेसल्याची
प्रत घ्यावयाची ते हजर
नाहीत सबबत हुजुर फर
आहे. ता. २० ज्यानेवारी

सन १८४५ इसवी.
रजु पाहाणार विष्णु वेळ—
देश कारकून नि ा आमीननबर
पांच ठाणे मा ा

दानकलेस पान ३ मागील ओळ ९ (ऐवज) शोधपान ५ पुढील बाजु ओळ ४ (फेसल) शोध व सदरहु मधील कार शोध चालु ओळीत घेतले आहे बाकी कार शीध नाहीत.

X X X

नकल करणार	श. सुमारे १००००		खरी नकल
			एस. पी. दणखे
अबदुलमजीद	लिखाई	१४८४	२३—१०—४४
वाचणार	रजुवात	४८११	क्लार्क ऑफ दि कोर्ट
शेख हसन रहीमान	कागद	८९	
मुजावर	————————		

रुजु पहाणार एकूण :— १९८८ (एकोणीस रु. आठ आणे फक्त)

यांतील — आखीव शब्दांची दुप्पट आकारणी केली आहे.

शद्ब संख्या व आकारणी बरोबर आहे.

मुजावर
फी कारकुन.

डीस्ट्रीक्ट कोर्ट, सातारा

र. नंबर स्पेशल अपील नंबर ३०९/१८५२ निकाल ता

४५३५/४४

नकलेस अर्ज आला २३ तेवीस माहे सप्टेंबर सन १९४४

येवुन नकलेस काम मिळाले ता
३० सप्टेंबर सन १९४४

व्ही आर एस
रेकॉर्ड किपर

नकल तयार झाली ता सात माहे आक्टोबर सन १९४४

सबब उशीर

व्ही आर एस
रेकॉर्ड किपर

नकल अर्जदार मि. कुलकर्णी वकील यास

समक्ष बारा माहे आक्टोबर सन १९४४

१२
सन १८५२ १
————
(मोर्तब) ३७

सदतीस बंद

(मोर्तब)

हुकूमनामा अदालत सरकार कंपनी इंग्रज बहादुर कामसेन साहेब फस्ट असिस्टंट कमिशनर इलाखा सातारा अपील नंबर १४८७ सन १२५४ फसली अपीलवादी महीपतराव बीन खंडेराव घोरपडे देशमुख तर्फ वाळवे पेटा मजकुर प्रतवादी कृष्णा बीन शाळीग्राम शिंदा रा. मौजे कामेरी व नारायण बीन कासी शिंदा मौजे बोरगांव व संताजी बीन सुबराव घोरपडे कसबे अष्टे पेटाकल — दावा देशमुखी बदल ——— रुपये ८१०८५ अवल फिर्याद प्रतिवादीनी ता १५ नवंबर सन१८४२ इसवीस केली त्याची चौकशी लक्ष्मण कासी अमीन नंबर ५ ठाणे कासेगांव यासी एक तर्फी करुन फैसल ता३१ दसंबर सन १८४४ इसवीस केली त्याजवर अपील ता १८ फेब्रुवारी सन १८४५ इसवीस केले त्याची अपील फैसल ता ७ फेब्रुवारी सन १८५० ईा स केला की या मुकदम्याची व आणखी मुद्याची चौकशी फार होणे आहे याज करीता अमीनय हुकुमनामा फिरविला आणिया फिर्यादीचा निवाडा हुजुरत पंचाईत नेमली जाईल त्याजकडे हा मोकदमा देऊन त्याणी नवीन हुकुमनामा करावा त्याप्रो पंचानी सादोष करण्या—ा करता आनंदराव माधव अमीन ठाणे खानापूर

याजकडे मोकदमा पाठविला परंतु पंचाचे हातून मु॥ प्रो॥ सादोष न जमल्यामुळे अमीन मणू याणी हु॥ प्रो॥ मोकदमा हुजुर पाठविला तो दिवाणी रजिष्टर नंबर २६ ता॥ २१ आगष्ट सन १८५१ इसवी रोजी रावसाहेब सदर अमीन कोर्ट कराड याचकडे अभिप्रायाकरीता सर्व कागदपत्र सु॥ पाठविल्या त्यानी २० ता जुलई सन १८५२ इसवी रोजी आपले रिपोर्ट बरोबर अभिप्रायासह याद पाठविली ती ता॥ आगष्ट सन इसवी रोजी हुजुर दाखल झाल्यावरुन ता॥ मजकुरी अपील फैलावर दाखल केले या मुकदम्याचे वादी खुद व प्रा॥ वादीपैकी कृष्णाजी व नारायण याचेतर्फे वकील कृष्णाजी वासुदेव जोशी व खुद नारायणराव हजर व प्रतिवादी संताजी मयत त्याचा लेक खंडेराव गैरहजर आणि चौकशी सुरु अबल अर्जी प्रा॥ वादीची त्यात तर्फ मजकूरचे देशमुखीचे वतन मुळ पुरातन सिंदे यांचे त्याणी आम्हा घोरपडे यासी पाठीराख भाऊ करुन घेतले त्यादिवसापासून आम्ही सिंदे व घोरपडे उभयता देशमुखीचे वतनाची वहीवाट सनसित खमसेन मया व अलफे पावेतो करीत आंलो ते वेळेस मलजी बीन हेगोजी माने वाणी याणे खटला केला तेव्हा पेशवे सरकारतुन मंत्रीकडे चौकशी सांगितली तेथे श्री कृष्णेत दिव्य होऊन आम्ही उभयता खरे जालो वाणी खोटा ठरला त्या वेळस सरकारातुन हरकी देऊन वतनाची वहीवाट करावी म्हणोन आम्हास सांगितले आमचे वडील फिगोंजी शिदे व खंडोजी घोरपडे यांनी हरकीचा ठराव करुन घेतला परंतु ऐबजाची सोय झाली नाही मागे वहीवाटीचे काम सरकारातून वतन अनामत ठेवुन हरकीचा ऐवज येईतोपर्यंत अंताजी रघुनाथ याजकडे सांगितले नंतर महीपतराव बीन मालोजीराव घोरपडे यासी या वतनाची अधिकार नसता आमचे वडील भावाचे वतन म्हणोन नजराण्याचा ऐवज ठरावा प्रो॥ कबुल करुन अनामत प्रो॥ ऐवज आपण देऊन मोकलचिटी नाईकजी व मालोजी व महिपतराव घोरपडे या वर्गाचे नांवची सनद अवेसिनास घेतली आणि वतनाची वहिवाट करु लागले पुढे नजराण्याचा ऐवज घेऊन आमचे वतन आम्हास द्यावे म्हणोन सरकारची पत्रे आणिली परंतु मानली नाहीत याजकरिता आम्ही आटकाव करु लागलो सबब यावर्गाचे वहिवाटीत नांव न घालीता नि॥ घोरपडे म्हणोन अताजी रघुनाथ याणी वहिवाट करावी स्वारीहुन आल्यावर जाव साल उलगडून देऊ या पा॥ बोलुन स्वारीस गेले त्यानी जबरदस्तीने कागद पत्र कारकुने याचे नेले त्या वतना पा॥ कांही उत्पन्न आम्हाकडे चालत आले आहे याची चौकशी होऊन आमचे वतन आम्हास देण्याविसी हु॥ व्हावा म्हणोन जबाब वादीचा त्यात पेशजी हेत शिंदे यानी या वतनाबद्दल १०७०२ नंबरची अर्जीसन इहीदे आर्विन साली आणिली त्यांत वतन आपले असे लिहील्या आणि हाली अष्टंकर घोरपडे व आपण उभयतांनी मिळून अर्जी आणिली त्यांत वतन सनसित स्वयसेन मया व अलफे परयंत आम्ही वहीवाट करीत आलो असे हेच प्रा॥ वादी लिहीतात. त्या प्रा॥ दोन अर्जावर दोन मजकुर यावरुन कोणती अर्जी प्रमाण धरावी शिंदे यानी वतनाची वहीवाट कधी केली याची व त्रीवर्गानी वहीवाट केल्याची माहीती नाही पुर्वापार वतनं आमचे त्याची सबंधांत आम्हाकडे चालत आहे म्हणोन अमीज याचे फैसलात वादी जबाब देऊन गैरहजर जाल्यामुळे प्रतिवादीतर्फे एक तर्फा पुराव्यावरुन याचे साराशांवर भरवसा ठेवुन व प्रतवादीची कायद्याची वहीवाट जाल्यावरून वतन पूर्वापार प्रा॥ वादीचे सबब सदरहु वतनाचे आठरागांव प्रो॥ दोन गांव पटवर्धन इलाख्यातील त्याची फीर्याद प्रा वादीने तिकडे केली आहे त्याजबदल प्रतिवादीतर्फे नि॥ चे यादी प्रो॥ एक साल उत्पन्नाचे दसपट रु॥ ८१९५ दाव्यांत वजा जाऊन बाकी ८१०८५ चा दावा कायम केला आणि प्रा वादीचे वतन वादीने सोडावे असे हसील आहे.

अपील फैसल्यात आपला प्रा॥ वादी याणी मंत्री याचा सारांष सन सितखमसेन म्हणजे सन १७६५ इसवी सालचा म्हणोन हजर केला तो बरोबर व खरा आहे असे समजोन आमीन यानी आपला अभिप्राय दिल्हा आहे त्यास तो दस्तऐवज खरा आहे यावरुन पुरावा नसोन पेशवे याणी नाना फडणीस यास हुकुम

दिल्हा आहे त्यात सदरहू सारांष असल नाही असे लिहिले आहे जर तो असल असेल तर त्या पहिले व दुसरे प्रतवादीचे वडीलाची नवीन नावे घातली आहेत असे. सदर हुकूमावरुन दिसते व त्या हुकुमांत व मंत्री याचे साराशाचा मजकूर लिहून माने वाणी व घोरपडे यांचा तंटा होता तो तुटून घोरपडे देशमुख आहेत असे ठरले मानें खोटे झाले सबब घोरपडे याणी नजराणा दिल्यावरुन वतन त्याचे स्वाधीन केले. त्या दिवसापासुन अपील वादी याचे ताब्यात वतन आहे सदरहू दस्तऐवज अपील प्र॥ वादी यानी हजर करुन उभयपक्षी कबुल केला आहे परंतु हुकुमांत पहिले व दुसरे प्रतिवादीची नांवे नाहीत त्याचबदल त्यांच सांगणे की अपील वादीनी दगाबाजीने ती नांवे घालविली नाहीत एसीयास या मुद्यांची चौकशी या मोकदम्यात फार होणे आहे याज करता आमीन याचा हुकुमनामा फीरवुन या फिर्यादीचा निवाडा हुजुरुन पंचाईत नेमली जाईल त्याजकडे हा मोकदमा देण्याचा ठराव केला आणि आपील वादीने जातोने किंवा वकील हजर राहाण्याचा पांचसे रुपयेचा जामीन घ्यावा आणि प्रतिवादीनी जो सारांष हजर केला तो खरा आहे त्याजबदल पुरावा घ्यावा व अपील वादी याणी मालकी वहीवाटीबद्दल पुरावा करावा तो पुरावा घेऊन नवीन हुकुमनामा करावा म्हणोन– –––

सदरहू प्रो चौकशी करण्याकरता उभयतांचे राजीप्रो पंच व सरपंच नेमुन त्याजकडुन सारांष करवावा असा जमीन खानापूर यास हु॥ गेला त्याणी पंच व सरपंच नेमले परंतु त्याजकडुन मुदतोंप्रो सारांष आला नाही प्र॥वादी तर्फे दोन पंच यानी आपले अभिप्रायाची याद दिली ज्या प्रो तिघांच्या अभिप्रायाची याद देणे आहे त्या विशी अमीन याणी हुजुर ता॥ २८ जुलई सन १८५१ इसवी अपिलाकडील नंबरचे रिपोटात मजकूर लिहीला त्यालगत याप्रकर्णी कागद असतील ते हुजुर पाठविण्या विसी हु॥ जाल्यावरून मुकदम्याचे सर्व कागद पो मे. राव साहेब सदर आमीन याजकडे अभिप्रायाकरता पाठविला त्याजवरून त्याणी आपले अभिप्रायाची याद जरुरची पाठविली त्यात मा॥

खानापुरचे अमीन याजकडुन एकंदर कागदपत्र आलेले वाचुन पाहिले त्यात बहुत करून नकला आहेत यास्तव असल कागदपत्र आपआपले साधनाचे असतील ते हजर करावे म्हणोन पक्षकारास ताकीद केल्यावरुन असल कागद पत्र हजर केले तेच खानापुरचे आमीन याजकडुन आलेले कागदपत्र वाचून पक्षकाराचे अर्जवाचून मालूम पडते की... या अभिप्रायात पक्षकार याणी आम्हाकडे हजर केलेले कागद पत्रास नि॥ पासुन निराळी लावीली आहे त्या निशाणी वरून कागदपत्र ओळखावा या फिर्यादीत अवलवादी उभयता सिंदे हे मुळ वतनदार आपण आहो म्हणोन व तिसरा वादी यासिंदे यासी आपण पाठराखी वतन भाऊ जालो असे कारण दाखऊन फीर्याद करतात तर प्रथम असल वादी उभयत सिंदे याचे मालकीचा तपास पाहीला पाहीजे–––––

सिंदे म्हणजे अवल वादिपो कृष्णाजी बीन शालीग्राम व नारायण रावबिन काशीराव हे दोघे देशमुखीचे वतन पुरातन आपले आहे म्हणतात तर––––

१ यांचे वंशांत कोणते पुरुषाने कोणत्यासाली कोणापासुन हे देशमुखीचे वतन मिळविले–––

२ वतन मिळविले तागाईत कोणकोणते पुरषाने कीती किती वर्षे परयंत वहीवाट केली आणि ती वहीवाट कोणत्या पुरुषाचे हातुन कोणत्या साली कशा करता गेली–––––

येणेप्रो। प्रथम शाबीती जाली पाहीजे-----

असल वादी प्रो। कृष्णाजी व नारायण सिंदे हे दोघे सुमारी सात आठ पीढीचे भाऊबंद असुन वतन घेण्यास्तव हाली एकमत होऊन फिर्याद करतात तर आपले वंशांत कोणते पुरुषानी कोणत्या साली कोणापासुन वतन मिळविले याचबदल सनदपत्र वगैरे दाखला काय आहे ते कांही एक रुजु करुन शाबीत केले नाही विचारले असता माहिती नाही म्हणतात त्यास इतके भारी वतनदार मालकी वहीवाट करतात त्याचे शाबीदो बदल मालकीची सनदपत्र वगैरे दाखला जरूर असला पाहीजे त्याखेरीज मालकीमुस्तकिम बिलकुल होऊ शकत नाही सबब सदरहु अव्वल दोघेवादी सिंदे याचे वंशात कोणते पुरुषाने कोणत्यासाली कोणापासुन देशमुखीचे वतन मिळविले याची कांहीच शाबादी जाली नाही-तथापी वतनाची वहीवाट री याचे वंशांत कोणकोणते पुरुषानी कीती वर्षे परयंतकेली याचा तपास पाहांता अमुक पुरुषानी अमुक वर्षे वहीवाट केली असा कांही एक दाखला शाबीत केला नाही नि। चे असल अर्जीत सन १७५५ इसवी पावेतो आपले वंशांत वतनाची वहीवाट जाली म्हणोन लिहीतात परंतु त्यामध्ये हर एकरीतीने दाखला दाखविला नाही--------------

मेहरबान फस्ट असिटेंट कमीशनर साहेब बाहादुर याचे अपील हुकुमनाम्यांत वादी म्हणजे आपला प्रा। वादी याणे मंत्रीचा सारांष आहे म्हणोन सनसित खमसेन म्हणजे १७५५ इसवीचा हजर केला आहे तो खरानसोन आमीन याणी त्याजवर भरवसा ठेवुन हुकुमनामा केला यास्तव हा सारांष खरा आहे असे वादी याणे शाबीत करुन घ्यावे असे आहे तरी मंत्रीचा सारांष नि।। १३ वाचून पाहुन मालुम पडते की हा मंत्रीचा सारांष नव्हे कोणी एकानी हकीकत लिहील्या सारखी आहे हा कागद फीरंगोजी शिंदे म्हणजे असल वादीचा पणजा हा खंडेराव घोरपडे म्हणजे तिसरे वादीचा पाचवे पीढीचा पुरुष याचा व मलापा बिन हेगापा व कांडापाबीन सिवादा वगीरयापामाने याचे दरम्यान देशमुखीचे वतनाचा तंटा पडला होता तेव्हा पक्षकार श्री. कृष्णानदीत उभे राहीले जमा झालेले दैवानी फीरंगोजी शिंदे वतनदार खरा म्हणोन हातधरुन बाहेर आणिले नंतर शिंदेयाणी सर्वत्रास नमस्कार केला व देवास मेजवानी केली व फिरगोजी सिंदे व खंडेराव घोरपडे देशमुख याचे नावे घेतले माहाजर करुन दिला ॥ सिंदेयानी मंत्री यास भेटून वतनाचे कागदपत्र दाखविले देवास अगोदरच निरोप झाला होता म्हणोन वगैरे म ॥ आहे त्यावरुन हा मंत्री याचा सारांष आहे असे बिलकुल मानता येत नाही. जर सारांष आहे असे अखेरची हकीकत ईनसाफ करणार ----

लिहीणार आणि यांत मंत्री यानी ठराव केल्यासारखे बिलकुल म।। नाही शिवाय याजवर सांप्रदाया प्रमाणे मंत्रीची सहदिस्तुर अंगरे सिक्का मोर्तब वगैरे खण कांही एक सदरहू दोघे वादी सिंदे म्हणतात की घनशाम नारायण मंत्री यानी सदरहू साराष कर्णात साक्षी बदल दुसरे गावकरास बोलावण्यास्तव आज्ञापत्रे त्याचसाली सन १७५५ इसवीची पाठवली होती ते नि।। १४.·१५ १६.·१७ हजर केली आहे तर या कागदावर सिंरस्तेप्रमाणे सिळा मोर्तब वगैरे खुणा आहेत परंतु जर मंत्री यांनी असे भारी वतनाबदल सारांष केला असता तर त्या सारांषवर आपला शिक्का मोर्तब वगैरे खुणा न करता कधी राहणार नाहीत मंत्री याची आज्ञापत्रे दाखवल्याबदल हजर केलेली नि।। १४-१५-१६-१७ वरूनच नि।। १३ चा कागद मंत्री याचा नव्हे असे साफ मालुम पडते शिवाय आणखी एक मोठी हरकत आमचे ध्यांनात येते की बिरोजी बिन बुकाजी माने व शिवाजी बीन खंडोजी माने व देवजी बीन नरसोजी माने याचा फिरंगोजी सिंदे म्हणजे अवल वादीचा पणजा व मालोजी म्हणजे घोरपडे याचे वंशातील पुरुषाचे दरम्यान पूर्वी खटला पडुन मरहुस शाहु माहाराज

छत्रपती राज्याधिकारी यानी ठराव केलेला हुकुम वादी सिंदे यानीच निा १०६ १०७ व राजशक ५२ विश्वावसुनामसंवत्सरे मुा सन १७२६ इसवीचे व त्याच सालचे अज्ञापत्र श्री. निवास परशराम प्रतिनिधी याचेनि १०९ हजर केले आहे त्यात फिरंगोजी सिंदे व मालोजी घोरपडे खोटे ठरले सदरहु माने याणी वतनदार खरे ठरले सबब रु. ३००० नजराणा घेऊन देशमुखीचे वतन माने याजकडे मोकळीक करुन माने याचे दुमाला केले आहे म्हणोन वगैरे मत आहे त्यानंतर सुमारे २६ वर्षांनी म्हणजे सुमाईसने खमसेन मया अलफे मुा सन १७५१ इसवीस आईसाहेब महाराज याणी देशमुखीचे वतनाचे आगरा गांवकरास निा १०१ चाइा दिल्हा तो वादी याणीच हजर केला आहे त्यात मलापा व कोडापा व सीबाजी माने हे पुरातन वतनदार आहेत त्याचा इसनसाफ शाहु महाराज याचे कारकिर्दीस होऊन निवाडपत्रे आहे तीमनास आणुन आज्ञापत्र सादर केले असे तर देशमुखीचे वतन माने याजकडे चालवावे म्हणोन आहे याजवरून वादी शिंदे याचा हक वतनावर अगदी राहीला नाही असे साफ शाबीत होते केलासवासी शाहु महाराज छत्रपती व आईसाहेब महाराज हे राज्याचे अधिकारी होते त्याणी ठराव केला त्या ठरावानंतर सुमारे चार वर्षांनी म्हणजे शके १६७७ मुा सन १७५५ इसवीत मंत्री यानी आपला हक शाबीत ठेवुन निा ३३ चा सारोष केला असे वादी दाखवितात हे फार आश्चर्य आहे की मरहुम शाहु महाराज छत्रपती व आईसाहेब माहाराज राज्याधिकारी होते याचे ठरावास उलट वादीचे वतीने साराष कर्ण्यास मंत्री यास मुळीच अधिकार नव्हता या एकंदरावरुन निा १३ कागद मंत्रीचा साराष नव्हे आणि शाहु माहाराज याचे ठरावाचे साल सन १७२५ इसवी पासोन आजपर्यंत सुमारे १२७ वर्षे वादीकडे वतनाची वहीवाट नाही असे शिंदे यानी हजर केलेले कागद पत्रावरून साफ मालुम पडते तर शाहु माहाराज याचे ठरावाचे अलीकडे दावा संमधे वतन आपणास कोणते अधिकाऱ्याने साली दिले व वहीवाट कोणत्या साली कोणते पुरुषाने केली हे कांही शाबीत केले नाही—परंतु वतनाची वहीवाट आपले वंशातील पुरुष करीत होते असे समजण्यास कांही कागद दाखल केले आहेत त्या कागदावरुन वतनाची वहीवाट केल्याचा मुद्दा कांही निघत नाही निा ४९—६९ असे दोन कागद मुस्तकीम दाखवितात तर निा ४९ चा कागद सुमासन सितेन मयाअलफे म्हणजे सन १७६६ इसवीचा आहे तो थानपेट महालकरास सिंदे देशमुख म्हणजे कोण याचे कांही नाव नमूद नाही व असल अर्जीने कबूल करतात की सन १७५५ इसवी पासून वतनाची वहीवाट आपणाकडे नाही सन १७६३ पासोन वहीवाट प्रा वादी करतात म्हणोन असे असोन सन १७६६ इा ची पावती निा ४९ ची एक गावची कांही हकाचे येविसी बीन नावाचे सिंदे देशमुख म्हणोन कसीजाली हे फार आश्चर्य आहे. सन १७६३ इसवी पासोन प्रा वादींकडे वहिवाट असोन सन १९६६ इसवीत हकाचे खर्च दुसऱ्यासदेण्यास व घेण्यास अधिकार नाही तथापी ते खरे आहे. असे समजण्यास ही प्रत्यंतरचा कांही दाखला नाही आणि या पावती वर एक मोर्तब आहे ते साफ खोटे आहे असे मालुम पडते मोर्तबातील अक्षर कांहीच दिसत नाही व मोर्तबाची चिन्हे दिसावी याहेतुने मोर्तबाचे चिन्ह मात्र करुन मोर्तबाचे शेवटची रेघ दिसण्याबद्दल लेखणाने काढील्यासारखे साफमालुम पडते यावरुन निा ४९ चा कागद मंजुर नाही व निा चा कागद सुरू सन ११२४ ही जरी म्हणजे सन १७०८ इसवीचा एक बंद कागद आहे त्यात १६ गांवचे नांवे लिहून अमुक गांवची अमुक बेरीज असे नमूद करून त्याचे बाजुस फिरंगोजी शिंदे म्हणजे अवलवादीचा पणजा वसंताजी खंडोजी म्हणजे तिसरे वादीचे वंशात कोणी पुरुष होता. याचा कांही थाक लागत नाही असी दोघांची नांवे लिा आहे तरी कागद आहे तरी कागद कोणी लिहीले याचा कांही दाखला व त्याजवर सही अगर सिकामोर्तब वगैरे कांही एक नाही अशा कागदावरून वादी याणी आपल्या वहीवाटीची काहीही दाखविली हे फार आश्चर्य आहे याजवरून वादी शिंदे याची वहीवाट आहे असे बिलकुल हर कोणते

अदालतीत शाबीद होणार नाही आणखी किती एक कागद सन १७१० इसवी पासोन सन १७६८ [इा] परयंत दरम्यान काही काही सालचे कागद हजर केले आहेत व कांही कागद बीनसालचे आहेत त्यात मजकूर तुमचे म्हणजे सिंदे यांचे वंशात तीन चार पिढीत आमुक पुरुषाचे व घोरपडे यांचे वंशातील पुरुषांत तंटा आहे याचा निकाल होण्यास तुम्ही हुजुरयेणे म्हणोन व दुय्यमवादी सिंदे याचे घराण्या[प्रो] नागोजी सिंदे याणी गांवगना दंगा केला वरयतेची माल मिळकत नुकसान केले व बैल वगैरे धरून नेले असे होऊ नये देशमुखीचे कांही बोलणे असेल तर हुजुर येणे असे कांही मजकुराचेपत्रे आहेत शिवाय आपले वंशातील पुरुषाने नांवे कारणाकुरते दुसऱ्याची पत्रे लिहीली त्यात देशमुख असे[लिा] आहे म्हणोन कांही कागद हजर केले आहेत. तुमची वतनाची मालकी व वहीवाट शाबीत नसोन अशा कागदावरून वादी सिंदे हे वतनदार खरा आहे आणि वतनाची वहीवाट केली असे बिलकुल होत नाही आणि हर कोणी इनसाफाचे कोडन कबूल करणार नाहीत आणि तंट्याचे निकाल होण्याकरीता हुजुर येणे अशी जी पत्रे दाखवितात त्या[प्रो] जाऊन तंट्याचा निकाल कोणते प्रकारे आला व कोणते अधिकाऱ्याने निकाल केला हे कांही दाखवित नाहीत या एकंदरावरून आमचा अभिप्राय आहे की दावा समध्ये देशमुखीचे वतनावर असल वादी कृष्णाजी बीन शाळीग्राम बहुयंमवादी नारायण राव बीन कासीराम सिंदे या दोघाचा दावा शाबीत नाही अता तिसरे वादी संताजी बीन सुबराव घोरपडे याचे फिर्यादीचा तपास पाहाता संताजी यानी सदरहु दोघे सिंदे यासी सामील होऊन दावा केला की सिंदे याणी आपणास पाठीराखी भाऊ करून घेतला सबब वतनावर आपली मालकी आहे अशी फिर्याद करुन मयत जाला त्याचा वारस केला खंडेराव घोरपडे हा ती फिर्यादा चालवतो तर————

१ यांचे वंशांत कोणता पुरूष सिंदे यास कोणतेसाली पाठराखी——— भाऊ जाला व त्या शिंदे यांचे नांव काय आणि वतनावरून उभयताचे दरम्यान काय करार झाला———

१ पाठराखी भाऊ याचे नात्याने वतनाची वहीवाट कोणकोणते पुरुषानी किती किती वर्षे केली———

येणे [प्रा] प्रथम शाबीती जाली पाहीजे——— परंतु यांचे वंशातील कोणते पुरूषास कोणते साली शिंदे यांचे घराण्यातील कोणता पुरुष पाठराखी भाऊ करून घेतला आणि उभयताचे दरम्यान वतनदारीबद्दल काय करार जाला हे कांहीच शाबीत केले नाही विचारल्यावरून आपणास ठाऊक नाही म्हणोन जबाब देतात मुळी वतन शिंदे यांचे आहे अशी शाबीदी जाली नाही त्यापेक्षा आपण शिंदे याचे पाठराखी वतनी भाऊ याचे वंशज आहोत असे म्हणणे बिलकुल असंभव आहे. तथापि यांचे वंशात वहीवाट तरी कशी झाली आहे आणि कोणकोणता पुरुष किती किती वर्षे करीत आला याचा तपास [निा] ९२(x)कागद १७१९ सन व सन [इा] असे तीन सालचे पाहाता व बीन सालचे [निा] ९३ येणे[प्रो] हजर केले आहेत याचे सदर नाम्यावर संताजी घोरपडे देशमुख म्हणोन [लिा] त्याजखाली मौजे बहादुर वाडी गावचे नाव लिहून जमीनीचे हिंशाचे वसुल बाकी रु. तपशील [लिा] आहे त्याजवर कोणाची सही अगर सिक्का मोर्तब कांही एक नाही अगदी खरड्या सारखे आहे त्याजवर भरवसा ठेवण्याजोगे अगदी लायख नाही संताजी घोरपडे यानी दुसऱ्याचे नांवे कच्चे लिहुन दिले त्यांत देशमुख असे [लिा] आहे म्हणोन सन १७२९/३० इसवीचे असे दोन सालातील कागद [निा] ८१पासुन [निा] ९१ मीनहुचे व [निा] ८० चा कागद सन १७२५ इसवीत संताजी घोरपडे देशमुख असे लिहून साहामील करून तुमचाहक तुम्हांस देऊ म्हणोन लिहुन दिले आहे ते व कांही कागदांत संताजी घोरपडे देशमुख खंडेराव घोरपडे देशमुख म्हणोन दुसऱ्याने कारण परत्वे पत्रे लिहिली आहेत ते व कांही कागदात तुमचे देशमुखीचे वतनाचा तंटा आहे त्याचे चौकशी बदल हजर होणे म्हणोन पत्र सन १७२९ पासोन सन १७६८ पर्यंत दरम्यान काही काही सालचे व किती एक कागद बीन सालचे हजर केले आहेत तर हे सर्व तपासून

पाहाता मालुम पडते की संताजी घोरपडे याचे नांव तिसरा वादी याणी अवल चौकशीत पुर्वीचे आमीन याजकडे हजर केलेली वंशावळ निा यात व प्रतवादी याणी हाली आम्हा पासी हजर केलेली वंशावळा निा १४५ यात ही नमुद आहे तर सदरहु संताजी कोण याचा निश्चय होत नाही, तिसरा वादी याने निा वंशावळीत मुळपुरुष नावजीराजे लिहुन त्यास पुत्रप्रा। पहिला पुत्र खंडोजी राजे हा आपले वंशीला व दुसरापुत्र बाजीराजे हा मुधोलकर घोरपडे यांचे वंशीला व तिसरा पुत्र अंबाजीराजे हा प्रा वादी महीपतराव घोरपडे यांचे वंशीला म्हणोन दाखविले प्रा वादी याने हजर केली ती वंशावळ निा मुळपुरुष अंबाजी राजे यांचे नाव लिहून पुढे संततीची नावे उभयतानीही आपआपले वंशावळीत लिहीली आहेत ती बिलकुल मिळत नाहीत प्रा वादी सदरहु कागद पत्रातील संताजी हा आपले वंशातील पुरुष आहे म्हणोन तक्रार करतो त्यास सदरहु कागदपत्रावरून तीसरे वादी याचे वंशातील पुरुष संताजी असून त्याणी वतनाची वहीवाट केली असे कांही प्रत्यंतर दाखल्यावरून मुस्तकीम शाबीदी नाही आणि सदरहु कागद खरे आहेत असे प्रत्यंतर मुद्दाम दाखवित नाही शिवाय शाहु महाराज छत्रपती व आईसाहेब माहाराज व श्रीनिवास परशराम प्रतिनिधी याणी सन १७२५ इसवी व सन १७५१ इसवीत देशमुखीच्या वतनाचे तंट्याचा निकाल करून मानेवाणी याजकडे वतन ठेवीले होते असे निा वरून १०६/१०७/१०९ साफ शाबीद आहे. सबब त्याचे अलीकडे कागद सदरहु रीतीने काय असतील ते कांही या दाव्यास जोर पोहचत नाही व त्याजवर भरवसाही नाही आणि बीन सालचे व बीन मीतीचे कागद फार आहेत तर ते कागद लिहीणार कोण अधिकारी होता व कोणत्याअधिकाऱ्याचे नांवे लिहीले आहे हे काही मालुम पडत नाही आणि दुसऱ्यानी कारण परत्वे लिहीले या कागदांत देशमुख असे लिहील्यानेच वतनदार खरा होईल व वहीवाट केली असे बिलकुल होऊ शकत नाही आणि चौकशीबद्दल हजर होणे म्हणोन कांही कागदात लिहीले आहे त्याप्रो हजर होऊन व नावेचा काय निकाल कोणते अधिकाऱ्याने केला हे कांही दाखवीत नाही या एकंदरावरून याचे वंशातील अमुक अमुक पुरुषाने अमुक वर्षे वतनाची वहीवाट केली असे शाबीत होत नाही. आणि श्रीनिवासराव परशराम प्रतिनिधी याणी निा ७७ चे पत्र सुमासित अशरीनमया अलफे मुा सन १७२५ इसवीत आपले निपणंजा संताजी याचे नांवे लिहीले ते पत्र म्हणोन हजर केले त्यात मजकुर तुमची हकीकत बापुजी रामाजी याणी विदीत केली वतनाचे घालमेलीचा प्रसंग तर जो जाहला तो भीडेस्तव जाला आहे पुर्वीपासून सर्वप्रकारे तुमचे आठसिक आहे तुम्ही विपरीयास न आणिता माहालची लावणी संचणी कर्णे व देशमुखीचे कार्यभाग कर्णे म्हणोन वगैरे आहे तर या कागदावर मोठी हरकत आहे. की सन १७२५ इसवीत शाहु महाराज छत्रपती यांनी निा। १०६–१०७ चे हुकूम फरमाविले आहेत त्यात फिरंगोजी शिंदे व मालोजी घोरपडे वतनास खोटे ठरले व माने हे खरे ठरले कारण वतन माने याचे दुमाला केले असे म्हणोन आहे व याच साली श्रीनिवास परशराम प्रतिनिधीयाणी याप्रमाणेच देशमुखीचे वतनाचे आठरागांवकरास आज्ञा निा १९ चे दिल्हे आहे असे असोननंतर सुमार सात आठ महिन्याने सदरहु निा ७७ चे कागदात श्रीनिवास परशराम प्रतिनिधी याणी मुखतीचे व तर्फदारीने हुा दिल्याचे माचा दाखला नमुद असलेला दाखवितो याजवर हरगीन भरवसा नाही. मुखती व तर्फदारी प्रत्यक्ष त्या कागदांत कबुल करतात याजवर काय भरवसा होईल तथापि शाहु माहाराज छत्रपती हे राज्याचे अधिकारी होते त्याणी ठराव केलेला रद करून त्यास उलट हुा देण्यास मुळी प्रतिनीधीस अधिकार नव्हता निा चे कागद वाचून एकदम मालुम पडते की संताजी घोरपडे यांचे फक्त संतोषास्तव अगर लालचीने मुखती करतां तसे पत्र लिा आहे म्हणोन आणि निा ५२ चे पत्र शके १६९१ मुल्सन १७६९ इसवीस नाईकजी घोरपडे म्हणजे तिसरे वादीचे वंशातला पुरुष व मालोजी घोरपडे व नरसिंगराव घोरपडे याचे नावे महीपतराव घोरपडे म्हणजे प्रतिवादीचा चुलता याणे लिहुन दिले होते म्हणोन हजर केले आहे त्यात मा

तुमचा आमचा भाऊपणाने वतनसंमधी कज्याड आहे तर तुम्ही मालोजीराजे घोरपडे सांगाल त्या प्रा वर्तणुक करा म्हणोन आहेत प्रा वादी याणे या कागदात साफ इन्कार केला आहे वादीयाने काही शाबीद केले नाही आणि हे कागद पाहुन श्रीकारापासोन शेवटपर्यंत व साक्षीचे अक्षर खु एकाचे हातचे आहे असे उघड मालुम पडते तथापि याजवर लिहुन देणार याची सही अगर खुण वगैरे कांही एक नाही सिवाय हलीचा दावा भाऊपण्याचे बदल नाही याचे एकंदर वरून ना५२ चा कागद नामंजुर केला सदरहु एकंदर कारणावरून आमचा अभिप्राय आहे की दावासमध्ये वतनावर तिसरे वादी संताजीराव मयत त्याचा वारस लेक खंडेराव घोरपडे याचा हक पोहचत नाही. अता प्रतवादी कडील पुराव्याचे तपास पाहता प्रा वादी महीपतराव बीन खंडेराव घोरपडे यानी आपला हक शाबीत करण्याबद्दल कागदपत्र दाखल केले आहेत ते तपासुन पाहता मालुम पडते की –––––– जाखरोजी बानाथाजी घोरपडे देशमुख म्हणजे प्रतिवादीचे वंशातील पुरुष याचे नावे आलाहुताला दिवाण साहेब याणी लिहुन दिला तो कोलनामा नि ११६ सुरू ७६५ म्हणजे सुमारे वर्षाचा आहे त्यातील अक्षरे बहूत करून गाहाळ जाली आहेत थोडे थोडे दिसते या कागदाची नकल नि ११५ हजर केले आहे हे दोन्ही भीडवुन आक्षरे मोठे दिसण्याचे चष्मा लाऊन रुजुवात पाहाता या असल कागद नि ११६ तील अक्षरे व मजकुर लागणे त्यास बहादुरवाडीगांव सवा नऊ चाहुर जमीनीचा इनाम दिला आहे म्हणोन लि आहे. व श्रीनिवास परशराम प्रतिनिधी याचे हु संताजी घोरपडे देशमुख म्हणजे प्रा वादीचा चुलता याचे नांवे नि सुरू सन सर्व अशा रमया अलफे ११८ म्हणजे १७१६ सन इसवांचा आहे त्यास बहादुरवाडी गांव तुम्हास पुर्वी इनाम दिला आहे त्याचे इनाम तिजाई तुम्हास माफ करून पेशजीस सनद सादर आहे त्या प्रो तुम्हास वतन करून दिल्हे आहे म्हणोन आहे–––

वहीवाटीविशी पाहता गंगुबाई देशमुख म्हणजे प्रा वादीची पणजीचे नांवे विठोजी चव्हाण हीमतबहादुर यानी नि ११९ चा कोलनामा सुरू सन इसने अशरीन मया अलफे मुतादक सन १७२१ इसवीत सादर केला आहे त्यात गाव कराचे नावे–वसवस राहुन किर्दी आबादाजी कर्णे व गंगुबाईकडे व सुलाचा अेवज देणे म्हणोन आहे व नंबर नि १२० चे कागद पंतप्रतिनिधी याणी सुरू सन सकस अशरीन मया अलफे मु सन इसवित सोळा गांवकरास आज्ञापत्र सादर केले आहे त्यात ज्या प्रो हक चालत आहे त्या प्रां गंगाबाई देशमुख याजकडे येणे म्हणोन व नि १२१ चे पत्र मालोजी घोरपडे म्हणजे प्रा वादीचा आजा याचे नावे श्रीनिवास परशराम प्रतिनिधी यानी सुरू सन सित अशरीन मया अलफे मु शके १७२५ इसवित लि त्यात माहालची लावणी केली म्हणोन तुम्ही पत्र लि ते उत्तम केले म्हणोन व नि १२२ चे कागद उदाजी चव्हाण हीमत बहादुर यानी वाळवे तर्फेचे गांवकरास हु सुरु सन सकसीन मया अलफे मु सन १७२९ इसवी लि आहे त्यात मालोजी घोरपडे देशमुख म्हणजे प्रा वादीचा आजा यासरावला वगैरे चालविणे म्हणोन आहे संताजी घोरपडे देशमुख म्हणजे प्रा वादीचा चुलत पणजा याचे नावे मोकादम लिहुन दिल्हे ते कागद १३३/१३४/१३५ नि सुरुसना इहीदे सलासिन मया अलफे मु बला सन १७३० इसवीत लिहून दिल्हे त्यात हकाचे खर्च देत जाऊ म्हणोन वगैरे आहेशिवाय नि १२४/१२५/१२६/१२७ बीन सालचे कागद त्यात प्रा वादीचा अन्ना मालोजी व पणजी गंगुबाई याचे नांवे दुसऱ्याचे कांही कामकाजाबद्दल लिहिले आहे त्यात देशमुख लि आहे प्रा वादीची पणजी गंगुबाई यांचे नांवे देशमुख म्हणोन दुसऱ्या मनुष्याने पत्र व

राजीनामा व कतके लिहून दिल्हे आहेत ते निा १२८/१२९/१३०/२३० सन १७३० सालचे आहेत येणेप्रमाणे कागदावरून प्रा वादीचे वंशातील पुरुषाने देशमुखीचे वतनाची मालकीने सन १७३० इसवी परयंत वहीवाट केली असे शाबीद आहे ही एकंदर पुरवणी एकीकडे ठेवून प्रतवादी याणे दाखल केलेले कागद प्रत्राप्रो। खाली लिहिले कागदावरून आणखी फार मजबुद मोटामुदा साला मुा त शाबीत आहे की— सुमा आर्वसितेन मयाअलफे मुा सन १७६३ इसवीत राज्याधिकारी माधवराव बलाळ प्रधान पेशवे सरकार याणी बालाजी जनार्दन म्हणजे नाना फडणवीस यांचे नांवे पत्र निा १३७ व देशमुखीचे आठरा गांवकरास आज्ञापत्र निा १३८ व इसाफतीचे बहादुरवाडी गांवचे मुकदमास आज्ञापत्र निा १४९ फर्माविले आहेत त्याजवरून मालुम पडते की नाईकजी व मालोजी व महीपतराव घोरपडे देशमुख ताो वाळवे याचे व राजाजी व हेगोजी माने वाणी यांचे भांडण पडले होते त्याचा इनसाफ घनःशाम नारायण मंत्री याचेमार्फत होऊन माने वाणी खोटे ठरले सदरहु घोरपडे हे पुरातन देशमुखीचे वतनदार आहेत. त्यांचे वतन सरकारात जप्त आहे ते मोकळीक केले असे सुदामत वतन चालवावे व साल मजकुरचा वसुल घेतला असेल तो माघारा देणे आणि सरकारास नजराण्याबद्दल रुपये २२००० येणे त्याऐवजाचा वसुल घेण्याचा वगैरे मा लिहिला आहे या ठरावाचे हुकुमाप्राो सन १७६३ इसवी पासून वादीचे असल अर्जीचे तारखेपर्यंत सुमारे ७९ वर्ष सतत प्रा वादी महीपतराव घोरपडे या एकट्याकडेच वतनाची वहीवाट आहे या प्राो वादीचे अवल अर्जात साफ कबुल करतात व कागदपत्रावरून ही शाबीद आहे परंतु सदरहु हुकुमांत नाईकजी म्हणजे तिसरे वादीचे वंशातील पुरुष व मालोजी म्हणजे मुधोलकर घोरपडे यांचे वंशातील पुरुष आहे त्यांचा दावा कांही नाही महीपतराव म्हणजे प्रा वादीचा चुलता याप्राो तिघाचे नांवचा पेशवे सरकारचा हुा वतन मोकळीक केल्याबद्दल आहे असे असोन प्रा वादी महीपतराव येकट्याकडेच वतनाची वहीवाट इतके भारीमुदती परयंत कशी जाली अशी शंका घ्यावी तर कधी याणी असल अर्जीत लि की पेशवे सरकारानी नजराण्याचा ऐवज देणे ठरविला तो आपले हातुन उलगडून देणे जाले नाही सबब महीपतराव घोरपडे म्हणजे प्रा वादीचा चुलता एकटाच नजराण्याचा ऐढज देऊन वतन सोडवुन घेतले म्हणोन आणो अवल चौकशीत अमीन याजपासी निा चे सवाल जबाबात नजराण्याचा एकंदर ऐवज सदरहु महीपत घोरपडे याणी एकट्यानीच देऊन वतन सोडवुन घेतले आहे असे आपणास तेव्हाच समजले होते म्हणोन लिहीतात एशी यास माधवराव बलाळ प्रधान पेशवे सरकार यानी प्रावादीचा चुलता महीपतराव घोरपडे या एकट्या पासोन सरू सन सित सितेन मया अलफे मुा सन १७६६ इसवीत नजराण्याचा ऐवज घेऊन पावती निा १३९ महीपतराव एकट्याचेच नांवे दिल्ही आहे त्याजवरून व आज पर्यंत बहुत वर्षे प्रा वादी महीपतराव या एकट्याकडे वतनाची वहीवाट आहे याज वरून ही मालुम पडते की नाईकजी म्हणजे तीसरे वादीचे वंशातील पुरुष मालोजी म्हणजे मुधोळकर घोरपडे यांचे वंशातील पुरुष या दोघानी पेशव्याचे ठरावाप्राो नजराण्याचा ऐवज देण्यास ताकद नसोन वतनावरून आपला हात काढुन वतन टाकुन दिले त्यासमई प्रतिवादीचा चुलता महीपतराव घोरपडे याने आपण एकट्यानेच हीमत धरून नजराण्याचा ऐवज येकंदर आपणच भरून वतन कबज्यांत घेऊन आजपर्यंत ब ता वर्षापासुन एकटाच वतनाची वहीवाट करीत आहे याजविसि काही शंका राहीली नाही. हल्ली नाईकजी घोरपडे याचे वंशातील पुरुष तिसरे वादी हा अता आशास गुंतुन एकदम ऐता फायदा घेण्यास ईच्छिता हे दुरुस्त नाही ज्या समई महीपतराव एकट्यानेच पेशवे सरकारातुन वतनाची मोकळीक करून घेणार व घेतले असे वादीस समजले तेव्हा समजुन उमजुन बिन तजवीने उगीच राहिले त्यापेक्षा जरूर समजले पाहिजे की वादी यानी वतनास धिक्कार करून आपला हक सोडून दिला त्या वतनावर प्रतिवादी सिवाय दुसरे

कोणाचा हक राहिला नाही कदाचीत त्यासमई प्रतीवादीचा चुलता महीपतराव याणे पेशवे सरकारास नजराण्याचा ऐवज देऊन वतन कबज्यांत न घेते तर कंपनी सरकारानी पेशव्याचे राज्य घेतले त्यात दाव्यासमध्ये वतन ही खालसातील येत होते अता सदरहू तिघे घोरपडे याचे कोणी पेशव्याचे ठरावाप्रा। नजराण्याचा ऐवज देतो वतन मोकले करावे असे कंपनी सरकारास अर्ज करतील तर वतन कधीही मोकळे होणार नाही सरकार वरयस याचे दरम्यान व उभय रयतेचे दरम्यान इनसाफ सारखा आहे हर कोणाविशी इनसाफांत कांही तफावत नाही ——— माधवराव बलाळ पंतप्रधान पेशवे सरकार याणी सुरू सन खमस सितेन मया अलफे मु।। सन १७६४ इसवीत वालचे तर्फेचे मोकदाम्याचे नांवे आज्ञापत्र नि।। १५४ व सदाशिव रघुनाथ मंत्री याचे नावे पत्र नि।। १५६ असे दोन फरमावीले आहेत त्यात महीपतराव घोरपडे याची देशमुखीचे वतन पेशजी पासून जप्त होते ते मोकलीक करून पहिली पत्रे अमलदारास वगैरे आलाहिदा सादर आहेत त्याचा हक व जमीन देशमुखीचा इनाम सुदामत चालवावे ——— अल्यास ——— होणार नाही म्हणोन व त्रींबकराव नारायण मंत्री यानी नाईकजी थोरात यांचे नावे सन १७६४ इसवीत लि।। ते पत्र नि।। १४१ त्यात मा।। महीपतराव घोरपडे देशमुख यांनी पंतप्रधान म्हणजे पेशवेसरकार याच्या सनदा आणुन दिल्याच आहेत तुम्ही आपणाकडील तालुक्यातील गावास ताकीद देऊन सुदामत वतन चालुन देशमुखीचे वतनाची सेवा घेत जाणे म्हणोन माधवराव बलाळ पंतप्रधान पेशवे सरकार याणी रामाजी बलाळ याचे नांवे पत्र सुमासव सितेन मया वअलफे मु।। सन १७६६ इसवीत सादर केले आहे त्यात महीपतराव घोरपडे देशमुख ता। वाळवे याजकडे देशमुखीचा हक वगैरे सुदामत चालता म्हणोन वगैरे आहे सिवाय सदरहु पेशवे याणी थोरात भोसले याचे नावेपत्र नि।। १४२।१४३।१४४ सन १७६८ इसवीत लिहीले आहेत त्यात महीपतराव घोरपडे देशमुख याज बराबर बापभाऊ वतनाविसी कज्याकरतात म्हणोन घोरपडे यांनी जाहीर केले तर ज्याजकडे वहीवाट आहे त्याजकडे चासविणे बरकत घोरपडे याचा इनसाफ करण्यास बाळाजी महादेव यास सांगितले आहे म्हणोन वगैरे मजकूर आहे येणे प्रमाणे प्रा।। वादी कडुन साधन मजकुर आहे त्याजवरून प्रा।। वादीची मालकी वहीवाट साफ शाबीत आहे पेशवे सरकार यानी वतन मोकळे केले त्यापुर्वी वतन कोणते साली जाले इतके दाखला मात्र पक्षकार याजकडुन खटल्यांत दाखल जाला नाही सदरहु एकंदर सबबेवरून निश्चित अर्थ होतो की पुर्वी सिंदे व घोरपडे व मानेवाणी यांचे तंट्यावरून वतन जप्तीस नव्हते फक्त घोरपडे व मानेवाणी याचे तंट्याबद्दल जप्ती जाली होती त्याचा इनसाफ राज्याधिकार माधवराव बलाळ पेशवे सरकार याणी केला माधवराव बलाळ पंतप्रधान पेशवे सरकारचे राज्यकारभारांत व इनसाफात धुरंदर होते त्याचे आमलात घालमेल व जुलीम नसतां राज्याचे याजवर इनसाफाने केले अशा धन्याधिकारी याणी इनसाफ करून वतन जप्त जाले ते मोकळीक करून प्रतिवादीचा चुलता महीपतराव याचे कबज्यांत दिले तेव्हा पासुन आज परयंत सुमार ८९ वर्षे व त्यांचे पुर्वी बहुता वर्षापासुन प्रा।। वादीचे घराण्यातील पुरुषांचे व प्रतिवादी महीपतराव घोरपडे यांचे कबज्यात दाव्यासमध्ये वतनाची वहीवाट आहे त्याप्रा। वतन त्याजकडे कायम असावे ———

सदरहु एकंदरावरून आमचा अभिप्राय आहे की वादीचा दावा रद्द आहे. सर्व खर्च वादीयाणे भरून घ्यावा म्हणोन ———

येविसी अवल व अपील मोकदम्याचे कागद पाहुन तपास करता या फिर्यादीचा ता. ७ फेब्रुवारी सन १८५० इसवी रोजी फस्ट असीस्टंट कमीशनर याणी आपला फैसला केला त्या अन्वये पंचाकडे परंतु पंचानी ठरविल्या मुदतीत साराष केला नाही सबब पंचाईत रद्द करून मुकदमा ता २१ माहे ऑगष्ट सन १८५१ रोजी सदर अमीन याजकडे अभिप्रायाचा रपोट करण्याकरता पाठविला होता त्यावरून रावसाहेब सदर अमीन याणी फार चांगला सारांष करून त्यात वादी प्रतिवादी याणी पुरावा दिला त्याचा खुप नजरेने तपास करून

निर्णय केला की प्रा वादी यांनी जो दावा केला त्याबद्दल त्याजवळ भरवसा ठेवण्या मापक बिलकूल पुरावा नाही सदरहू सारंष सदरी लिहीले वादी प्रा वादी समक्ष आज रोजी वाचला आणि प्रा वादी याजकडे याचे दाव्याचे शाबीतीबदल जो पुरावा त्यांनी सांगितला तो ऐकोन घेतला त्यात पुराव्याची अगर मुद्याचा सदर आमीन याणी आपले खोटात निर्णय केला नाही असे कांही दाखल शकला नाही सदरहू रपोट – फस्ट असिस्टंट कमीशनर सो याणी फार पसंत करून तोच अपीलातील फैसल ठरवुन त्याचा तरजुमा करून खटल्यात दाखल करण्याचा हुा दिल्हा आणि प्रतिवादीचा दावा काढून टाकून खर्च त्याजवर घातला

हुकुमनामा नंबर

कागदाचा तपशील

१ अपील अर्जी वाा ची

२ अवल फेसल वादीकडील

३ जातचीटी वादीची

४ मुखत्यारनामा वाा तर्फे

५ तक्रारीची याद वाा तर्फे

६।७।८ समनं तीन प्रा वादीस

९।१०।११ मुखत्यार नामे व ठेव

२

चीठी प्रा वादीतर्फे कागद

१ ३

१२ विनंती पत्र १ वादीचे व मुख्यत्यार याची अर्जी व ठेवचिठी

१३ सवाल वादीस

१४ वादीकडील पुराव्याचे कागदाच्या नकला ६ व फेरीस्त १ येन ७

१५ मुख्यत्यार नामा वादीतर्फे आबाजी गोपाळ नासल कर याचे नावे व विनंती पत्रे २

१६ मुख्यत्यार नामा प्रा वादीनी सिंदे याचेतर्फे –

१७ अवल मोकदमा नंबर ११०

१८ हुकुमनामा हुजुराची

१९ आमीन खानापुर याचे खोटा बरोबर पंचाईतकडे आलेले कागद आहेत

खर्चाची तपशील

0 वादीचा खर्च आवल व आपीलात

0 प्रतिवादीचा खर्च प्रतिवादीचे शिरावर

————

—————————

१ फेरिस्त पंचाचे कागदाचे

पोठ नि॥ ८ कागद ४४

१ प्रतिवादी तर्फे पंचाची

यादी पोटनंबर २ कागद १

१ ———————————————

याद पोटनंबर

३ ३

—————

४६ कागद

२० सदर आमीन याजकडील अभि
प्रायाचे यादीसह फेरीस्त वर
हुकुम नि॥ १ पासुन नि॥ १५७ प्रा॥
आमीन खानापूरचा रपोट सदरहु
१९ निशाणीत आहे बाकी १५६
व फेरीस्त १ येथे १५७

२१ वकीलात नामा प्रा॥ वादीतर्फे

२२ हुकुमनामा
येणेप्रा॥ बावीस निशणीचे कागद असेत तारीख ६ आगष्ट सन ई॥ १८५२

सही इंग्रजी

(शिक्का)

यान कलेत पान ५ मावाचे २३ (दरम्यान) काट पा ८ मा वा ओळ २२ देशमुख
काट पान ११ ओ १२ (याद १) काट असे

अब्दुल मजीद इस्माईल	शा. सु. ५२००
नकल लिहिणार	लिखाई
x x x	रुजुवात
रुजवात	
	कागद
x x x	

दहा रुपये दोन आणे फक्त.

रुजु पाहणार

x x X

फी कारकुन

डीस्ट्रीक्ट कोर्ट

सातारा

र. नंबर काळा $\frac{४५३५}{४४}$ सातारा येथील स्पेशल आपील नंबर $\frac{३०९}{१८५२}$ निकाल तारीख

नकलेस अर्ज आला २३ सप्टेंबर सन १९४४

व्ही. आर. एस.

अमानत येवुन नकलेस नकल तयार ता. १० अक्टोंबर सन १९४४

काम मिळाले ता. ३०—९—४४

व्ही. आर. एस.

रे. किपर.

नकल अर्जदर यास समक्ष दिली

तारीख बारा १२ माहे ऑक्टोबर सन १९४४

व्ही. आर. एस.

रेकार्ड किपर

नि ॥ १५७

१

२४

यादी अभिपाय विद्यमान श्रीनिवासराव हाणमंत सदर— आमीन सुभा सातारा तारीख २० माहे जुलई सन १८५२ ईसवी मु, शके १७७४ पराधावीनामसंवत्सरे श्रावण शु॥ ४ रीज मंगळवार मुकाम सातारा—

वादी	प्रतिवादी
१) कृष्णाजी बिनशालीग्राम शिंदे	महीपतराव बिनखंडेराव घोरपडे
२) नारायण बिन कोसीराव शिंदे—	देशमुख तर्फ वाळवे पेठा मा॥
३) संताजी बिन सुभराव घोरपडे मयत त्याचा वारस लेक खंडेराव घोरपडे.	

देशमुख तर्फ वाळवे पेठा मजकुर — दावा ९०००० ।— रुपये. वादीचे असल अर्जी नि ॥ १ यात तर्फ मजकुरी देशमुखीचे वतन पुरातन सिंदे म्हणजे अवल व दुयम वादी यांचे त्याणी येक वादी घोरपडे यासी पाठराखी भाऊ करून घेतले त्या दिवसापासोन आम्ही सिंदे व घोरपडे उभयता देशमुखी वतनाची वहीवाट सनसितखमसेन मया व अलफे म्हणजे मा॥ शके १६७७ युवनाम संवत्सरे सन १७५५ इसवी पावेतो करीत आलो. तेव्हा मलजी बिन हेगोजी माने वाणी याणी आम्हा उभयता बरोबर खटला केला कारण पेशवे सरकारानी मंत्री यांचे विद्यमाने चौकशी करविली आम्ही सारे लोक सरकारानी आम्हास हारकी देऊन वतनाची वहीवाट करावी म्हणोन सांगितले आमचे वडील फीरंगोजी शिंदे व खंडोजी घोरपडे याणी हरकीचा

ठराव करुन घेतला परंतु ऐवजाची सोई जाली नाही हरकीचा ऐवज देईतोपर्यंन्त वतनसरकारात अनामत ठेऊन त्याची वहीवाट अंताजी रघुनाथ याजकडे सांगितली नंतर महीपतराव बिन मालोजीराव घोरपडे यानी या देशमुखी वतनाचा अधिकार नसून आपले वडील भावाचे वतन आहे म्हणोन समजाऊन नजराण्याचा ऐवज देवुन वतनाची मोकळीक चीटी नाईकजी व मालोजी व महीपतराव घोरपडे असे तिघाचे नांवची सन आर्बसितेन म्हणजे मु॥ शके १६८५ सुभानु नामसंवत्सरे सन १७६३ इसवीत घेऊन महीपतराव याने आपणच वतनाची वहीवाट करीत आहोत. सबब वतनाचा आकार – दसपट रुपये नमुद करून एकंदर देशमुखी वतन प्रतिवादी कडुन आपणास देवावे म्हणोन फिर्याद –

प्रतिवादी याणे नि॥ ५ चे जावात सदरहुचे देशमुखी वतन पुर्वापार आपले आहे त्याची वहीवाट आपणाकडे आहे शिंदे याणी कधी वतनाची वहीवाट केली नाही म्हणोन वगैरे लिहुन दिले आहे–या मोकदम्याची चौकशी पुर्वी अनम लक्ष्मण कासी अमीन नंबर ५ ठाणे कासेगांव याणी एकतर्फी करून वादीचा दावा साबीत येऊन पर इलाख्यातील वतनाचा आकार दसपट रुपये ८९१५ वजा करून बाकी सातारा इलाख्यातील देशमुखीवतनाचा आकार दसपट रुपये ८१०८५।– चे वतन वादीस प्रतिवादी याणी द्यावे. म्हणोन तारीख ३१ माहे डीशंबर सन १८४४ ई॥ रोजी आमीन नंबर–४७ हुजुर नंबर ३६८१ चा हुकुमनामा केला. सदरहु हुकुमनाम्यावरून प्रतिवादी महीपतराव याणी हुजुरात सन १२५४ फसली नं १४८ सात अपील केले. त्याचा तपास मेहरबान फस्ट असिस्टंट कमीशनसाहेब बहादुर याणी करून अमीन यांचा हुकुमनामा फिरऊन विचार होणे याचे कलम ठरवुन आणी तपास करण्याबद्दल हुजुरातुन पंचाईत नेमुन घ्यावी असे चाल चलाऊ हुकुमनामा तारीख ७ माहे फेब्रुवारी सन १८५० इसवी रोजी केल्या.

त्याबरहुकुम पंचाईत नेमुन दिल्ही त्याजप्रमाणे दोघे पंचाईतदारवादीचे वतीने तारीख माहे जुलई सन १८५१ इसवी रोजी निवाडा केला. परंतु राजीनाम्याचे कराराप्रमाणे– तीघे पंचाचा सारांष आणि मुदतीत कांही जाहला नाही. पंचाईतदारावर मनस्वी तकरार पडली– नंतर खानापुर अमीन याणी तारीख २८ माहे जुलाई सन १८५१ इसवी– रोजी पंचाईतीचे काम बदल हुजुर रपोट पाठविला त्याजखाली मेहरबान कामसन साहेब बहादूर फस्ट असिस्टंट कमीशनर याणी आमचे नांवे तारीख माहे २१ ऑगष्ट सन १८५१ इसवी ऱोजी हुकुम पाठविले त्याचा नि।। त्यात खानापूर आमीन याजकडून आलेले सर्व कागद आपलेकडे पाठविले आहेत. तरी पाहण्यात येऊन या कागदावरून आपले नजरेस कसा अभिप्राय येत आहे त्याविशी तपसिलवार रिपोर्ट करावा म्हणोन लिहुन एकंदर कागदपत्र आम्हाकडे पाठविले सबब ते कागदपत्र पाहुन उभय वाद्यास बोलावुन विचार करुन सफ्ई करावयाची जरुर जाणोन आम्ही मेहरबान फस्ट असिष्टंट कमीशनरसाहेब बहादुर यास रपोर्ट केल्यावरून उभय वाद्यास सिरस्तेप्रमाणे बोलावण्यास कांही हरकत नाही म्हणोन हुकुम तारीख माहे २४ नवंबर सन १८५१ इसवीची नि।। २ चा आला सबब सिरस्तेप्रमाणे उभय वाद्यास समन पोहचविले. वादी प्रमाणे कृष्णाजी बिन शालीग्राम व नारायणराव बिन कासीराव सिंदे व प्रतिवादी महीपतराव बीन खंडेराव घोरपडे हजर जाहले. तीसरा वादी संताजी मयत त्याचा वारस लेक खंडेराव हजर जाहला नाही.

खानापुर आमीन याजकडुन एकंदर कागदपत्र आलेले वाचुन पाहीले त्यात बहुत करून नकला आहेत यास्तव असल कागदपत्र आपआपले साधनाचे जे असतील ते हजर करावे म्हणोन पक्षकारास ताकीद केल्यावरून असल कागदपत्र हजर केले व खानापुर आमीन याजकडुन आलेले कागदपत्र वाचुन पाहुन पक्षकाराचे अर्ज ऐकुन तजवीज करून मालुम पडते की – या अभिप्रायात कागदपत्राच्या नि॥ लाविली

आहेत पक्षकार याणी आम्हाकडे हजर केलेले कागदपत्रास निा १ पासुन निराळे लाविली आहे, त्या निा वरून कागदपत्र बोलखावा— या फिर्यादित असल व दुयम वादी सिंदे हे मुळ वतनदार आपण आहे म्हणोन व तिसरा वादी याणे सिंदे यासी आपण पाठराखी वतनी भाऊ जाहली म्हणोन असे कारण दाखउन फिर्याद करीतात. तर प्रथमतहा अवल व दुयम वादी सिंदे याचे मालकीचे तपास पाहिले पाहिजे.

सिंदे म्हणजे वादीपैकी कृष्णाजी बिन शालीग्राम व नारायणराव बिन कासिराव हे दोघे देशमुखीचे वतन पुरातन आपली आहे. म्हणतात तर ——

१ याचे वंशात कोण पुरुष कोणत्याही साली कोणापासुन हे देशमुखीचे वतन मिळविले —

२ वतन मिळविले तागायेत कोण कोणते पुरुष किती किती वर्षे परयंत वहीवाट केली आणि ती वहीवाट कोणत्या पुरुषाच्या हातुन कोणत्यासाली कशा करीता गली.

येणेप्रमाणे प्रथमता शाबीती जाहली पाहिजे. —

वादीप्रमाणे कृष्णाजी बीन शालीग्राम सिंदे व नारायण— राव बीन कासिराव सिंदे व दोघे सुमार सातआठ पीढीचे भाऊबंध आसुन वतन घेण्यास्तव एकमत होऊन फीर्याद करीतात तर आपले वंशात कोण पुरुष कोणत्यासाली कोणापासून वतन मिळविले याज बद्दल सनदपत्र वगैरे दाखला काय आहेत कांहीएक रुजु करून साबीत केले नाहीत. तथापि आपले वंशातील कोण पुरुष —
कोणत्यासाली वतन मिळविले इतके सुद्धा सदरहु दोघे सिंदे याणी दाखवु सकले नाही. विच्यारल्यावरून माहीती नाही म्हणतात त्यास मुळी माहीती नाही इत्के भारी वतनावर मालकीचा दावा करतात त्याचे साबीती बदल मालकीची सनदपत्रे. वगैरे दाखला जरूर असले पाहिजे यारीतीचे वतनी कामात सनद पत्राचे दाखल्याखेरीज मालकी सु. सुत्र बिलकुल होऊ शकत नाही सबब सदरहु दोघे वादी सिंदे याचे वंशांत कोण पुरुष कोणत्यासाली कोणापासुन देशमुखी वतन मिळविले याची कांहीच साबीती जाली नाही. तथापि वतनाती वहीवाट तरी याचे वंशात कोणकोणत्या पुरुष किती किती वर्षेपर्यंत केली याचा तपास पाहता — अमुक पुरुषानी अमुक वर्षे वहीवाट केली असे कांही एक दाखला रुजु करून साबीत केले नाही. नि ा १ चे असल अर्जित सन १७५५ इसवीपावेतो आपले वंशात वतनाची वहीवाट जाली म्हणोन लिहितात. परंतु सन १७५५ इसवीचे पुर्वी कोण कोणते सालात कोणकोणते पुरुषाने वहीवाट केली याचा दाखला हरगित दाखविले नाही. मेहरबान फस्ट असिस्टंट कमिशनरसाहेब बहादुर याचे अपिल चाल चलाऊ हुकुमनाम्यात वादी म्हणजे अपिल प्रा ची याणे मंत्रीचा सारांष आहे म्हणून सनसित खमसेन म्हणजे सन १७५५ इसवीचा हजर केला आहे, तो खरा नसोन आमीन यानी त्याजवर भरवसा ठेवुन हुकुमनामा केला. यास्तव हा सारांष खरा आहे असे वादी याने शाबीद करून घ्यावे असे आहे. तरी मंत्रीचा सारांष नि ा १३ वाचुन पाहुन मालुम पडते की —
हे मंत्रीचा सारांष नव्हे कोणीएकानी हकीकत लिहील्यासारखे आहे हा कागद फिरगोजी सिंदे म्हणजे अवल वादीचा पणजा खंडेराव घोरपडे म्हणजे तिसरे वादीचा पाचवे पिढीचा पुरुष याचा व मलापा बिन हेगापा व कोंडादा बिन सिवापा व गिरयाणाा माने वाणी यांचे दरम्यान देशमुखी वतनाचा तंटा पडला होता, तेव्हा पक्षकार श्री कृष्णा नदीत उभा राहीले जमा केलेले दैव यानी फीरगोजी सिंदे वतनदार खरा म्हणोन हात धरून बाहेर आणलेनंतर सिंदे यानी सर्वत्रास नमस्कार केला व दैवास मेजवानी केली फिरगोजी सिंदे व खंडेराव घोरपडे देशमुख याचे नांवे दैवाने माहाजार करून दिला सिंदे याणी मंत्री यास भेटुन वतनाचे कागदपत्र दाखविले दैवास अगोदरच निरोप जाहला होता म्हणोन वगैरे मजकुर आहे याजवरून ह मंत्री

याचा सारांष आहे असे बिलकुल म्हण[ता] येत नाही. जर सारांष आहे तर आसे खबरचे हकीकत इनसाफ करणार हा काम लिहीणार नाहीत आणि यात मंत्री यानी ठराव केल्यासारखे बिलकुल मजकुर नाही.— सिवाय याजवर सांप्रदायाप्रमाणे मंत्रीची सही अगर सिका मोर्तब वगैरे खुण कांहीएक नाही. आणि सदरहु दोघे वादी सिंदे म्हणतात की, घनशाम नारायण मंत्री यानी सदरहु सारोष कर्ण्यात साक्षीबद्दल दुसरे गांव — करास बोलावण्यास्तव आज्ञापत्र याच साली सन १७५५ ईसवीचे पाठविले होते ते [निा] १४—१५—१६—१७. हजर केले आहे. म्हणोन तर या कागदावर सिरस्ते[प्रो] सिकामोर्तब — वगैरे खुणा आहेत जर मंत्री यानी असे भारी वतनाबद्दल सारोष करतील त्या सारोषावर आपले सिक्का मोर्तब वगैरे खुणा कांही न करीता कधी राहणार नाहीत मंत्री याचे आज्ञापत्र म्हणोन दाखले बदल हजर केलेले सदरहु कागद [निा] १४—१५—१६— १७ वरुनच [निा] १३ चा कागद मंत्री याचा नव्हे असे साफ मालुम पडते शिवाय आणखी एक मोठे बहरकत — आमचे ध्यानात येते की — बिरोजीबीन बुकाजी माने व शिवाजी बीनखंडोजी माने व देवजीबीन नरसोजी माने याचा व फीरंगोजी सिंदे म्हणजे आवल वादीचा पणजा व मालोजी म्हणजे घोरपडे याचे वंशातील पुरुष याचे दरम्यान पुर्वी खटला पडुन मरहुम शाहुमहाराज छत्रपती राज्यधिकारी याणे ठराव केलेला [हु ा] व ही सिंदे यानीच [निा] १०६ व १०७ राजशक ५२ विधावसुनामसंवत्सरे [मुा] सन १७२५ इसवीचे व त्याच सालचे आज्ञापत्र श्रीनिवास पर्शराम प्रतिनिधी याचे [निा] १०९ हजर केले आहे, त्यात फिरंगोजी सिंदे व मालोजी घोरपडे खोटे ठरले सदरहु माने याणी वतनदार खरे ठरले सबब रुपये ३००० नजराणा — घेऊन देशमुखीचे वतन माने याजकडे मोकळीक करून माने याचे दुमाला केले आहे म्हणोन वगैरे मजकुर आहे — त्यांनंतर सुमारे २६ वर्षांनी म्हणजे सुमाई सेन खमसेन मया अलफे [मुा] सन १७५१ इसवीत आहे साहेब माहाराज याणी देशमुखी वतनाचे अठरा गांवकरास [निा] १०१ चा [हु ा] दिला तो वादी याणीच हजर केला आहे — त्यात मल्लापा व कोंडापा व शिवाजी माने हे पुरातन वतनदार आहेत. त्याचा इनसाफ शाहु माहाराज याचे कारकिर्दीस होऊन निबाड पत्रे आहेत. ते मनास आणुन आज्ञापत्र सादर केले. असे तर देशमुखीचे वतन माने याजकडे चालवावे म्हणोन आहे याजवरून वादी सिंदे याचा हक वतनावर अगदी राहीला नाही असे साफ शाबीत होते, कैलासवासी शाहुमहाराज छत्रपती व आईसाहेब महाराज हे राज्यांचे अधिकारी होते त्याणी ठराव केला त्याठरावानंतर सुमारे चार वर्षाने म्हणजे असल[प्रोा] १६७७ [मुा] सन १७५५ इसवीत मंत्री यानी आपला हक शाबीत ठेऊन [निा] १३ चा सारांष केला. असे वाणी दाखवितात हे फार आश्चर्य आहे की — मरहुम शाहु माहाराज छत्रपती व आईसाहेब माहाराज राज्यधिकारी होते त्याचे ठरावास उलट वादीचे वतीने सारोष कर्ण्यास मंत्री यास मुळीच — अधिकार नव्हता. या एकंदरावरून [निा] १३ चा कागद मंत्रीचा सारोष नव्हे आणि शाहू महाराज याचे ठरावाचे साल १७२५ इसवी पासोन आजपर्यंत सुमारे १२७ वर्षे वादीकडे वतनाची वहीवाट नाही असे वादी सिंदे याणी हजर केलेले कागद — पत्रावरून साफ मालुम पडले तरी शाहु महाराज याचे ठरावाचे अलिकडे दावेसंबंध वतन आपणास कोण अधिकाऱ्यानी कोणत्यासाली दिल्हे व वहीवाट कोणत्यासाली कोण पुरुष केली हे काही शाबीत केले नाही.

परंतु वतनाची वहीवाट आपले वंशातील पुरुष करीत होते असे समजल्यास काही कागद दाखल केले आहेत. त्या कागदावरुन वतनाची वहीवाट केल्याचा मुद्दा काही निघत नाही. परंतु [निा] ४९—८९ असे क्षेत्र कागद — दाखवितात सन [निा] ४९ चे कागद सुमासन सवती सेनमया अलफे म्हणजे सन १७६६ इसवीचा आहे. ते थानापेड — गांवकऱ्याचे नावे शिंदे —

—देशमुख म्हणोन लिहुन हक्काचे ऐवजी रुपये १७ पावले म्हणोन लि॥ आहे तरी शिंदे देशमुख म्हणजे कोण याचा कांही जाब—नमुद नाही व असल अर्जीत कबुल करतात की सन १७५५ इसवी—पासुन वतनाची वहीवाट आपणाकडे नाही सन १७६३ ई॥ पासोन वतनाची वहीवाट प्रतिवादी करीतात म्हणोन असे असोन सन ई॥ १९६९ ची नि॥ ४९ ची पावती एक गावची काही हकाचे रुपया बिसी दाखल नावाचे सिंदे देशमुख म्हणोन कसी जाली हे फार आश्चर्य आहे—सन १७६३ इसवी पासोन प्रतिवादीकडे वहीवाट असोन सन १७६६ इसवीत हकाचे रुपये दुसऱ्यास देण्यासंबंधे व घेण्यास कांही अधिकार नाही. तथापि ते खरे आहे असे समजण्यास प्रत्यंतर कांही दाखला नाही आणि या पावतीवर एक मोर्तब आहे ते साफ खोटे आहे असे मालुम पडते. मोर्तबातील अक्षर कांहीच दिसत नाही— मोर्तबाचे चिन्ह दिसावे या हेतुने मोर्तबाचे चिन्ह मात्र करून मोर्तबाचे शेवटचे रेघ दिसण्याबद्दल लेखणीने काढल्यासारखे साफ मालुम पडते या एकंदरावरून नि॥ ४९ चा कागद—मंजूर नाही व नि॥ ६९ चे कागद सु॥ आकराशे चोवीस (११२४) हीजरी म्हणजे सन १७०८ इसवीचा एक बंद कागद आहे त्यात सोळा गांवचे नावे लिहुन अमुक गांवचे अमुक बेरीज असे नमुद करून त्याचे बाजुस फीरगोजी सिंदे म्हणजे अवल वादीचा पणजा व संतोजी खंडोजी म्हणजे तिसरे वादीचे वंशात कोणी पुरुष होता याचा काही थाक लागत नाही असे दोघाचे नांवे लि॥ आहे तरी हे कागद कोणी लिहीले याचा कांही दाखला व त्याजवर सही अगर शिक्का मोर्तब वगैरे कांही एक नाही. अशा कागदावरून वादी याणी आपल्या वहीवाटीची शाबीती दाखवितो हे फार आश्चर्य आहे याजवरून वादी सिंदे याची वहीवाट आहे असेबीलकुल हर कोणी अदालतीत शाबीत होणार नाही.—

आणखी किती एक कागद सन १७१० इसवी पासुन सन १७६८ ई॥ परीयंत दरम्यान कांही कांही सालचे कागद हजर केले आहेत व कांही कागद बीन सालचे आहेत, त्यात म॥ तुमचे म्हणजे सिंदे याचे वंशातील चार पीढीतील अमुक पुरुषाचे व घोरपडे याचे वंशातील अमुक पुरुषासी तंटा आहे याचा निकाल होण्यास्तव तुम्ही हुजूर येणे म्हणोन—— दुय्यम वादी सिंदे याचे घराण्या पो॥ नागोजी सिंदे म्हणत गाव गनात दंगा केला व रयतेचे माल मिळकत— नुकसान केले व बैल वगैरे धरून न्हेलेअसे होऊ नये देशमुखीचे कांही बोलणे असेल तर हुजुर येणे असे काही मजकुराचे पत्र आहेत— शिवाय आपले वंशातील पुरुषाचे नांवे कारणपरत्वे दुसऱ्यानी पत्रे लि॥ त्यास देशमुख असे लि॥ आहेत. म्हणोन काही कागद हजर केली आहेत तरी मुळी वतनाची मालकी वहीवाट शाबीत नसोन आशा कागदावरून वादी सिंदे हे वतनदार खरा आहे- आणि वतनाची वहीवाट केली असे बिलकुल होत नाही आणि हर कोणी इनसाफाचे कोडत कबुल करणार नाहीत आणि तंटा निकाल होण्यास हुजुर येणे असे जे पत्र दाखवितात त्याप्रो॥ जाऊन तंटा निकाल कोणते प्रकारे जाहल व कोण अधिकारी निकाल केले ते कांही दाखवित नाही —

सदरहु एकंदरावरून आमचे अभिप्राय आहे की दावे संमध्ये देशमुखी वतनावर अबलवादी कृष्णाजी बीन शालीग्राम व दुयम वादी नारायणराव बीन कासिराव सिंदे या दोघाचा दावा शाबीत नाही — आता तिसरे वादी संताजी बीन सुभराव घोरपडे यांचे फिर्यादीचा तपास पाहता —

तिसरे वादी संताजी बीन सुबराव घोरपडे याणी सदरहु दोघे वादी सिंदे यासी सामील होऊन दावा करीतो की — सिंदे याणी आपणास पाठराखी भाऊ करून घेतला सबब वतनावर आपली मालकी आहे असे फिर्याद करून मयेत जाला त्याचा वारस लेक खंडेराव घोरपडे हाती फिर्याद चालवितो तर

१ याच वंशात कोणता पुरुष सिंदे यास कोणत्या साली पाटराखी भाऊ जाला व त्या सिंदे यांचे नांव काय आणि वतनाबद्दल उभयतांचे दरम्यान काय करार जाला —

१ पाठराखी भाऊचे नात्याचे वतनाची वहीवाट कोण—कोणते पुरुषाने किती किती वर्षे केली —

येणेप्रमाणे प्रथम साबीती जाली पाहिजे —

परंतु याचे वंशातील कोणते पुरुषास कोणते साली सिंदे याचे घराण्यातील कोणता पुरुष पाटराखी भाऊ करून घेतला आणि उभयताचे दरम्यान वतनाबद्दल काय करारजाहला हे काहीच शाबीती जाली नाही व दाखवु सकत नाही. विचारल्यावरून आपणास ठाऊक नाही म्हणोन जबाब देतात, मळी वतन शिंदे याचे आहे असे शाबीती जाली नाही. त्यापेक्षा आपण शिंदे याचे पाठीराखी वतनीभाऊ याचे वंशक आहे असे म्हणे बिलकुल असंभव आहे.

तथापी याचे वंशात वहीवाट तरी कसी जाली आहे. आणि कोणकोणता पुरुष कीती किती वर्षे केली — याचा तपास पाहता नि ॥ ९२ तागायत १०० — कागद सन १७१९ व सन १७२८ व सन १७२९ ई॥ असे तीन सालाचे व बीन सालाचे नि ॥ ९३ येणे प्रमाणे हजर केले आहे याचे सरंजामेवर संताजी घोरपडे देशमुख म्हणोन लिहुन त्याजखाली मौजे बहादुरवाडी गांवचे नांव लिहुन जमीनीचे व गावचे वसुल बाकीचे तपशिल लि ॥ आहे. याजवर कोणाची सही अगर सिकामोर्तब कांही एक नाही. आगदी खड्‌र्यासारीखे आहेत. यावर भरवसा ठेवण्याजोगे अगदी लायक नाही — व संताजी घोरपडे याणी दुसऱ्याचे नांव कतबे लिहुन दिल्हे त्यात देशमुखी असे लिहिले आहे म्हणोन सन १७२९—३० इसवीचे दोन सालातील कागद नि ॥ ८१ तागायत नि ॥ ९१ मिनतुचे न नि ॥ ८० चे कागद सन १७२८ इसवीत संताजी घोरपडे देशमुखी असे लिहुन साहा गांवकरानी तुमचा हक तुम्हास देऊ म्हणोन लिहुन दिले आहेत ते व कांही कागदात संताजी घोरपडे देशमुख व खंडेराव घोरपडे देशमुख म्हणोन दुसऱ्यानी कारणपरत्वे पत्र लिहीले आहेत, ते व कांही कागदात तुमचे देशमुखीचे वतनांचा तंटा आहे. त्याचे चौकशी बदल हजर होणे म्हणून पत्र सन १७२९ पासोन सन १७६८ परीयंत दरम्यान काही काही सालचे व किती — एक कागदबीन सालचे हजर केले आहेत. तर हे सर्व तपासून पाहता मालुम पडते की संताजी घोरपडे याचे नांव हा तिसरा वादी यानी अवल चौकशीत पुर्वीचे आमीन याजकडे हजर केलेले वंशावळी नि ॥ १०८ यात व प्रतिवादी याणी हली आम्हापासी हजर केलेले वंशावळी नि ॥ १४५ यात ही नमुद आहे तर सदरहु संताजी कोण याचा निश्चय होत नाही — तिसरा वादी याणे नि ॥ १०८ वंशावळीत मुळ पुरुष जावजी राजे लिहुन त्यास पुत्र ३ प्रो॥ पहीला पुत्र खंडोजीराजे हा आपले वंशाली व दुसरा पुत्र बाजीराजे हा मुधोळकर घोरपडे यांचे वंशीला व तिसरा पुत्र अंबाजीराजे हा प्रतिवादी महीपतराव घोरपडे याचे वांशीक म्हणोन दाखवितो.

प्रतिवादी याणी हजर केला तो वंशावळी नि ॥ १४५ यात आपले मुळ पुरुष आबाजीराजे मात्र—परंतु पुढे संततीचे नांव उभयाताही आपआपले **मुळ पुरुष आबाजीराजे** मात्र वंशावळीत लिहिले आहेत. ते बिलकुल मेळ मिळत नाही. प्रतिवादी याणे सदरहु कागदपत्रातील सताजी हे आपले वंशावळीतील पुरुष आहे म्हणोन तक्रार करतो. तथापि सदरहु कागदपत्रावरून तिसरे वादी याचे वंशातील पुरुष संताजी असुन त्यानी वतनाची वहीवाट केली असे कांही प्रत्यंतर दाखल्यावरून मुस्तकीम—साबीती—नाही आणि सदरहु कागद खरे आहेत प्रत्यंतर मुदा दाखवत नाही शिवाय शाहु माहाराज छत्रपती व आईसाहेब माहाराज व श्रीनिवास पर्शराम प्रतिनिधी याणी सन १७२५ इसवी व सन १७५१ इसवीत देशमुखी वतनाचा तंटा निकाल करून माने वाणी याजकडे वतन देविले होते असे नि ॥ १०६—१०७—१०९ कागदावरून साफ साबिती आहे सबब त्याचे अलिकडे कागद सदरहुरीतीचे जे काय असतील ते काही या दाव्यास जोर पोहचवीत नाही. व त्याजवर भरवसाही नाही आणि बीन सालचे व बिनमितीचे कागद फार आहेत. तर ते कागद लिहीणार कोण अधिकारी होता व कोणत्या अधिकाऱ्याचे नांवे लिहिले हे कांही मालुम पडत नाही आणि दुसऱ्यानी कारणपरत्वे जे लिहिले त्या कागदात देशमुख असे लिहिल्यानेच वतनदार खरा होईल व वहीवाट केली असे बिलकुल होऊ शकत नाही आणि चौकशी बद्दल हजर होणे म्हणून कांही कागदात लिहिले आहे, त्याप्रमाणे

हजर होऊन व शेवटी काय निकाल कोण अधिकाऱ्याने केला हे दाखवित नाही— या एकंदरावरून त्याचे वंशातील अमुक अमुक पुरुषाने अमुक वर्षे वतनाची वहीवाट केली असे शाबीत होत नाही आणि श्रीनिवासराव पर्शराम प्रतिनिधी याणी नि ग ७७ चे पत्र सुमासनित अशरीन मया अलफे मु ग सन १७२५ इसवीत आपले निपणजा संताजी याचे नांवे लिहिले ते पत्र म्हणोन हजर केले त्यात मजकुर तुमचे हकीकत बापुजी रायाजी याणी विदीत केले. वतनाची घालमेलीचा प्रसंग तर जो जाला तो भीडेस्तव जाला आसे, पुर्वी पासोन सर्वप्रकारे तुमचे आवश्यक आहे— तुम्ही विपरीयास न आणता माहालची लावणी संचणी कर्णे व देशमुखीचा कार्यभाग कर्णे म्हणोन वगैरे आहे तर या कागदावर मोठी हरकत आहे की सन १७२५ इसवीत शाहु माहाराज छत्रपती यांनी नि ग १०६—१०७ चे हुकुम फरमाविले आहेत त्यात फीरंगोजी सिंदे व मालोजी घोरपडे वतनास खोटे ठरले व माने हे खरे ठरले. कारण वतन माने याचे दुमाला केले असे म्हणोन आहे व त्याचसाली तेच श्रीनिवास पर्शराम प्रतिनिधी याणी याप्रमाणेच देशमुखी वतनाचे आठरा गावकरास आज्ञापत्र नि ग १०९ चे लिहिले आहेत असे असोन नंतर सुमार सात आठ महिन्याने सदरहु नि ग ७७ चे कागदात श्रीनिवास पर्शराम प्रतिनिधी याणी सरवतीचे व तर्फदारीचे हु ग दिल्याचे मजकूराचा दाखला नमुद असलेला दाखवितो याजवर — भरवसा नाही. मुखत्री व तर्फदारी प्रत्यक्ष त्या कागदात कबुल करीतात याजवर काय भरवसा होईल तत्रपि शाहु महाराज छत्रपती हे राज्याचे अधिकारी होते त्यानी ठराव केलेला रद्द करून त्यास उलट हु ग देण्यास मुळी प्रतिनिधी यास अधिकारी न येता नि ग ७७ चे कागदवाचून एकदम मालुम पडते की संताजी घोरपडे याचे फक्त संतोषास्तव आगर लालसीचे मुरवती करीता तसे पत्र लि ग आहे म्हणोन आणि नि ग ५२ चे पत्र शके १६९१ मु ग सन १७६९ इसवीस नाईकजी घोरपडे म्हणजे तिसरे वादीचे वंशातील पुरुष व मालोजी घोरपडे व नरसिंगराव घोरपडे याचे नावे महीपतराव घोरपडे म्हणजे प्रतिवादीचा चुलता याणे लिहुन दिल्हे म्हणोन हजर केले आहे त्यात म ग तुमचा व आमचा भाऊपणाचे वतन संमधी कज्या आहे. तर तुम्ही मालोजी राजे घोरपडे सांगाल त्या प्रमाणे वर्तणूक करू म्हणोन आहे तर प्र. वादी याणे या कागदास साफ इनकार करीतो—वादी याणे कांही शाबीत केले नाही आणि हे कागद पाहुन त्रीकारपासोन शेवट परीयंत व साक्षीचे अक्षर सु ग एकाचे हातचे आहे असे उघड मालुम पडते— तथापि याजवर लिहुन देणार याची सही अगर खुण वगैरे कांही एक नाही— शिवाय हालीचा दावा भाऊपण्याचे हीशा बदल नाही — या एकंदरावरून नि ग ५२ चा कागद नामंजुर केला.

सदरहु एकंदर कारणावरून आमचा अभिप्राय आहे की दावेस मध्ये वतनावर तिसरे वादी संताजीराव महीपतराव मयत त्याचा वारस लेक खंडेराव घोरपडे याचा हक्क पोहचत नाही.

आता प्रतिवादीकडील पुराव्याचे तपास पहाता प्रतिवादी महीपतराव बीन खंडेराव घोरपडे यानी आपला हाक साबीत करण्या ब ग कागदपत्र दाखल केले आहेत ते तपासुन पाहता मालुम पडते की, जाखरोजी नाथाजी घोरपडे देशमुख म्हणजे प्रतिवादीचे वंशातील पुरुष याचे नावे आलाहुताला दिवाणसाहेब यानी लिहून दिला तो कोल नामा नि ग ११६ सुरु सन ७६५ म्हणजे सुमारे ४८८ वर्षाचा आहे यातील आक्षरे बहुत करून गाहाळ जाहले आहेत. थोडथोडे दिसते या कागदाची नकल नि ग ११५ हजर केले आहे हे दोन्ही भिडवून आक्षर मोठे दिसावयाचे चष्मा लाऊन सुरुवात पाहाता आसन (फाटले) आहे. ११६ तील अक्षरे व मजकूर लागते व त्यात बहादुरवाडी गांव सवा नऊ ९। चाहुर जमीनीचा इनाम दिल्हा आहे म्हणोन लिहीले आहे व श्रीनिवास परशराम प्रतिनीधी याचे हु ग संताजी घोरपडे देशमुख म्हणजे प्रतिवादीचा चुलता याचे नांवे नि ग ११८ सुरु सनसद अशर मया अलफे म्हणजे सन १७१६ इसवीचा आहे. त्यात बहादुरवाडी गाव

तुम्हास पूर्वी इनाम दिल्हा आहे त्याचे इनाम तीजाई तुम्हास माफ करून पेशजी सनद सादर आहे. त्याप्रमाणे तुम्हास नुतन पत्र करून दिले आहे म्हणोन आहे.

वहीवाटी विसी पाहता गंगुबाई देशमुख म्हणजे प्रतिवादीची पणजीचे नावे विठोजी चव्हाण हीमत बहादूर यानी नि॥ ११९ चा कोलनामा सुरुसन इसने अशरीन मया अलफे मुतावला सन १७२१ इसवीत सादर केला आहे. त्यात गावकराचे नांवे बेवस सबस राहुन किर्दी आवा दामी कर्णे व गंगुबाईकडे वसुलाचा ऐवज देणे म्हणोन आहे व नि॥ १२० चे कागद पंत प्रतिनिधी यांनी सुरुसन सल्लास अशरीन मया अलफे मु॥ सन १७२२ इसवीत सोळा १६ गावकरास आज्ञापत्र सादर केले आहे. त्यात ज्याप्रमाणे हक्क चालत आहे त्याप्रमाणे गंगाबाई देशमुख याजकडे येणे म्हणोन व नि॥ १२१ चे पत्र मालोजी घोरपडे म्हणजे प्रतिवादीचा आजा याचे नांवे श्रीनिवास पर्शराम प्रतिनिधी यानी सुमा सीत अशरील मया अलफे मु॥ शके १७२५ इसवीत गोत्यान माहालाची लावणी केली म्हणोन तुम्ही पत्र लि॥ ते उत्तम केले म्हणोन व नि॥ १२२ चे कागद – उदाजी चव्हाण हीमत बहादर यानी बाळवे तर्फचे गावकरास हु॥ सुरू सन सलासोन मया अलफे मा॥ सन १७२९ इसवीन लि॥ आहे त्यात मालोजी घोरपडे देशमुख म्हणजे प्रतिवादीचा आजा यास राबता माहार वगैरे चालविणे म्हणोन आहे व संताजी घोरपडे देशमुख म्हणजे प्रतिवादीचा चुलता पणज्याचे नाव – मुकदम यानी लिहुन दिल्हे ते कागद नि॥ १३३ । १३४ । १३५ सुमाइहीदे समसिन मया अलफे भु॥ सन १७३० इसवीत लिहून दिल्हे त्यात हकाचे रुपये देतजाऊ म्हणोन वगैरे आहे. सिवाय नि॥ १२४ । १२५ । १२६ । १२७ हे बीन सालचे कागद त्यांत प्र. वादीचा आजा मालोजी व पणजी गंगुबाई याचे नांवे दुसऱ्यानी काही कामकाजा व॥ लिहिले आहे त्यात देशमुख म्हणोन लि॥ आहेत व प्रतिवादीची पणजी गंगुबाई याचे नांवे देशमुख म्हणोन दुसऱ्या मनुष्यानी पत्र व राजीनामा व कतवे लिहुन दिले आहेत. नि॥ १२८। १२९ । १३० । १३१ सन १७२५ व सन १७२७ व सन १७३० सालचे आहेत येणेप्रमाणे कागदावरून प्रतिवादीचे वंशातील पुरुषानी देशमुखी वतन मालकीने सन १७३० इसवी पर्यंत वहीवाट केले असे एकंदर पुरवणी एकीकडे ठेवून प्रतिवादी याणे दाखल केले कागदपत्राप्रो खाली लि॥ कागदपत्रावरून आणखी फार मनसुद मोठामुद्दा साला सु॥ साबीत आहे की,

सुरु सन आर्वे सितन मया अलफे मु॥ सन १७६३ इसवीत राज्याधिकारी माधवराव बल्लाळ प्रधान पेशवे सरकार याणी – बाळाजी जनार्दन म्हणजे नाना फडणीस यांचे नावे पत्र नि॥ १३७ व देशमुखीचे आठरा गावकरास आज्ञापत्र नि॥ १३८ व ईसाफतीचे बहादुरवाडी गावचे मुकदम यास आज्ञापत्र नि॥ १४९ फरमाविले आहेत. त्याजवरून मालुम पडते की, नाईकजी व मालोजी व महीपतराव घोरपडे देशमुख तर्फ वाळवे याचे व रायाजी व हेगोजी मानेवाणी याचे भांडण पडले होते त्याचा इनसाफ – घनःशाम नारायण मंत्री याचे मार्फत होऊन माने वाणी यानी खोटा ठरले. सदरहु घोरपडे यानी पुरातन देशमुखी वतनदार खरे आहोत त्याचे वतन सरकारात जप्त आहे ते मोकलीक केले आहे–सुदामतवतन चालवावे व सालमजकुरचे वसुल घेतले असेल ते माघार देणे आणि सरकारास नजराण्या बदल रुपये २२००० येणे त्या ऐवजाचा वसुल घेण्याचा मजकुर वगैरेचा आहे याठरावाने हुकमाप्रमाणे सन १७६३ इसवी पासुन वहीची असल अर्जीचे तारखेपरयंत सुमारे ७९ वर्षे सतत प्रतिवादी महीपतराव घोरपडे या एकट्याकडेच वतनाची वहीवाट आहे याप्रमाणे वादी हे असल अर्जीत साफ कबुल करीनात व कागद पत्रावरूनही शाबीत आहे परंतु सदरहु हु॥ नाईकजी म्हणजे तिसरे वादीचे वंशातील पुरुष व मालोजी म्हणजे मुधोळकर घोरपडे याचे वंशातील पुरुष आहे. त्याचा दावा काही नाही – महीपतराव म्हणजे प्रतिवादीचा चुलता या प्रा॥ तिघाची नांवे पेशवे

सरकारचा हु॥ वतन मोकळीक केल्या ब॥ आहे असे असुन प्रतिवादी महीपतराव एकट्याकडेच वतनाची वहीवाटत इतकेजारी मु॥ परीयेत कसी जाली – अशी शंका घ्यावी तर वादी याने असल अर्जीत लिहीतात की पेशवे सरकारानी नजराण्याचे ऐवज येणे ठरविले ते आपले हातुन उलगडून देणे झाले नाही सबब महीपतराव घोरपडे म्हणजे प्रतिवादीचा चुलता एकटाच नजराण्याचा ऐवज देऊन वतन सोडवून घेतले म्हणोन – आणि अवल चौकशीत आमीन याच पासी नि॥ २८ चे सवालजबाबात नजराण्याचे एकंदर ऐवज सदरहु महीपतराव घोरपडे यांनी एकट्याचे देऊन वतन सोडवून घेतले असे, असे आपणास तेव्हाच समजले होते म्हणून लिहीतात ऐसीयास माधवराव बलाळ प्रधान पेशवे सरकार याणी प्रतिवादीचा चुलता महीपतराव घोरपडे या एकट्या पासोन सुमासित सितेन मया अलफे मु॥ १७६५ इसवीत नजराण्याचा ऐवज घेऊन पावतो नि॥ १३९ महीपतराव एकट्याचे नांवे दिल्ही आहे त्याजवरून व आजपर्यंत बहुत वर्षे प्रतिवादी महीपतराव या एकट्याकडे वतनाची वहीवाट आहे. याजवरून ही मालुम पडते की नाईकजी म्हणजे तिसरे वादीचे वंशातील पुरुष व मालोजी म्हणजे मुधोलकर घोरपडे यांचे वंशातील पुरुष या दोघानी पेशव्याचे ठरावाप्रमाणे नजराण्याचे ऐवज घेण्यास ताखत नसुन वतनावरुन आपले हात काढुन वतन टाकून दिले त्यासमई प्रतिवादीचा चुलता महीपतराव घोरपडे याणे आपण एकटाच हिमत धरून नजराण्याचा ऐवज एकदर आपण एकटाच भरून वतन कबज्यात घेऊन आजपरीयंत बहुतावर्षापासुन एकट्यानीच वतनाची वहीवाट करीत आहे याज विषयी काही षक राहीला नाही. हली नाईकजी घोरपडे याचे वंशातील पुरूष तिसरा वादी हा आता आशा एकदम आयेता फायदा घेण्यास इच्छितो हे उ–त्क नाही ज्या समई महीपतराव एकट्यानीच पेशवे सरकारातुन वतन मोकळीक करून घेणार व घेतले असे वादीस समजले तेव्हा समजून उमजून बिन तजबीजेने उगीच राहीले त्यापेक्षा जरूर समजले पाहिजे की, वादी याणी वतनासधिकार करून आपले हक सोडून दिले त्या प्र. वतनावर वादी शिवाय दुसरे कोणाचा हक्क राहीला नाही. कदाचित त्यासमई प्र. वादीचा चुलता महीपतराव याणी पेशवे सरकारास नजराण्याचा ऐवज देऊन वतन कबज्यात नाही घेतले तर कंपनी सरकारानी पेशव्याचे राज्य घेतले. त्यात दावेस मध्य वतनही खालसातील येत होते. आता सदरहू तीघे घोरपडे पा॥ कोणी पेशव्याचेच ठरावाप्रमाणे नजराण्याचा ऐवज देतो मोकळीक करावी असे कंपनी सरकारास अर्ज करीतील तर वतन कधी मोकळीक होणार नाही. सरकार व रयत याचे दरम्यान व उभय रयतेचे दरम्यान इनसाफ सारखा आहे हर कोणा विषयी इनसाफात काही तफावत नाही.

माधवराव बलाळ पंतप्रधान पेशवे सरकार याणी सुरू सन खमसेन सितेन मया अलफे मु॥ सन १७६४ इसवीत वाळवे तर्फेचे मुकदम्याचे नाव आज्ञापत्र नि॥ १५४ व सदाशीव रघुनाथ मंत्री याचे नावे पत्र नि॥ १५६ असे दोन फरमाविले आहेत. त्यांत महीपतराव घोरपडे याचे देशमुखी वतन पेशजी पात्याने जप्त होते ते मोकळीक करून पहीलीपत्रे आमलदारास वगैरे आलाहीदा सादर आहेत. त्याचा हक व जमीनी देशमुखीचा इनाम सुदामात चालवावे बोभार आत्यास मुल्लाईना होणार नाही. म्हणोन व त्रींबकराव नारायण मंत्री याणी नाईकजी थोरात याचे नावे सन १७६४ इसवीत लि॥ ते पत्र नि॥ १४१ यात मजकुर महीपतराव घोरपडे देशमुख याणी पंतप्रधान म्हणजे पेशवे सरकार याच्या सनदा आणुन दिल्याच आहेत. तुम्ही आपणाकडील तालुक्यातील गावास ताकीद देऊन सुदामत वतन चालवुन देऊन देशमुखी वतनाची सेवा घेत जाणे म्हणोन माधवराव बलाळ पंतप्रधान पेशवे सरकार याणी रामाजी बलाळ याचे नांवे पत्र सुमासवसितेन मया व अलफे मु॥ सन १७६६ इसवीत सादर केले आहेत. त्यात महीपतराव घोरपडे देशमुख तर्फ वाळवे याजकडे देशमुखीचे हक वगैरे सुदामत चालवणे म्हणोन वगैरे आहे सिवाय सदरहु पेशवे याणी थोरात याचे नांवे पत्र नि॥ १४४ सन १७६८ ई॥ त लिहीले आहेत त्यास महीपतराव घोरपडे देशमुख

याजबरोबर बाप भाऊ वतनाविषयी कज्या करीतान म्हणोन घोरपडे याणी ज्याहीर केले तर ज्याकडे वहीवाट आहे त्याजकडे चालविणे वरकड घोरपडे याचा इनसाफ करण्यास बाळाजी महादेव यास सांगितले आहे म्हणोन वगैरे मजकुर आहे येणेप्रमाणे प्रतिवादीकडील साधन मजबुज आहे. त्याजवरून प्रतिवादीची मालकी वहीवाट साफ शाबित आहे. पेशवे सरकार याणी वतन मोकळीक केली त्यांचे पूर्वी वतन कोणते साली जप्ती जाली इतके दाखलामात्र पक्षकार याजकडून खटल्यात दाखल जाला नाही. सदरहु एकंदर सबबे वरून निश्चितार्थ होतो की पुर्वी सिंदे व घोरपडे व माने वाणी याचे तंट्या वा। वतन जप्तीस नव्हते फक्त घोरपडे व मानेवाणी यांचे तंट्या वा। जप्ती जाली होती त्याचा इनसाफ राजाधीकारी माधवराव बल्लाळ पेशवे सरकार याणी केली माधवराव बल्लाळ पेशवे सरकार हे राज्य कारभारात व इनसाफात धुरंदर होते. त्याचे अमलात घालमेळ व न होता राज्याचे पाळण इनसाफने केले अशा राज्या ही (फाटले) इनसाफ करून वतन जप्त जाले ते मोकळीक करून प्रतिवादीचा चुलता महीपतराव याचे कबज्यात दिली तेव्हा पासोन आजपर्यंत सुमारे ८९ वर्षे व त्याचे पुर्वी बहुता वर्षापासुन प्रतिवादीचे घराण्यातील पुरषाचे व प्रतिवादी महीपतराव घोरपडे याचे कबज्यात दावे संबंध वतनाची वहीवाट आहे त्याप्रमाणे ते वतन त्याजकडे कायम असावे, सदरहु एकदरावरून आमचे अभिप्राय आहे कीं वादीचा दावा रद्द आहे सर्व खर्च वादीयाने भरून घ्यावे.

सदरहु प्रा। आमचे अभिप्राय आहे.
सही श्रीनिवासराव हाणमंत
सदर आमीन कोडत सातारा.

दाखल ता। ६ ऑगष्ट सन १८५२
सही इंग्रजी.

यानकलेत ४ पा. पु. ओ १२ (उत्प) काट ७ पान ओ १० (शदेसह) काट १२ ओ. (कलुन) काट मा. वा. ओ. ११ (कोणी) चार १० पा. ओ. (मुलपुरुष आवाजी राजे मात्र) काट १४ पा. ५ ओ. (त) काट येणे प्रा। असे काटशोध पुरता दस्तुर — शेख हाशय हुसेन सदर नकल करणार अनंत केशव कुलकर्णी.

लक्ष्मण बळवंत	लिखाई ७८२	खरी नकल
वाचणार	रूजवात २८७	सही /—
राजाराम बळवंत	कागद ८४	क्लार्क ऑफ दी डी. कोर्ट.
रुजु पाहणार	—————————	
	एकूण : ९८१३	

यातील आखीव शब्दाची दुप्पट आकारणी केली आहे.
शब्द संख्या व आकारणी बरोबर आहे.

राजाराम बळवंत
फी कारकून

डिस्ट्रीक्ट कोर्ट सातारा.

रजिष्टर नंबर $\frac{४५३५}{१९४४}$ **सातारा येथील स्पेशल अपील नंबर** $\frac{३०९}{१८५२}$

निकाल तारीख
तेवीस सप्टेंबर सन १९४४
२३
व्ही. आर. एस.
रेकॉर्ड किपर
नक्कल तयार झाली नऊ ९ ऑक्टोंबर
सन १९४४
व्ही. आर. एस.
नक्कल अर्जदार मी. कुलकर्णी वकील

अनामत येवुन नकलेस
काम मिळाले
तारीख
३०—६—४४
१ सबब उशीर
व्ही. आर. एस.
रे. कीपर.

यास $\frac{\text{समक्ष दिली}}{\text{व्ही. पी. ने. पाठविली}}$

तारा $\frac{\text{बारा}}{१२}$ ऑक्टोंबर सन १९४४

व्ही. आर. साने
रेकॉर्ड किपर.

शिक्का

निवाडा स्पेशल अपील कोर्टाचा विद्यमान
न्याय इनसी साहेब इस्कोस्टर कलेक्टर इलाखा
सातारा तारीख १९ माहे नवेबर सन १८६१ इसवी.

स्पेशीयल ॲपीलेट्	स्पे. रीसपाडेट्
नारायणराव वीन	महीपतराव वीन खंडेराव घोरपडे
कासीराव शिदे राहणार	मयत वारस स्त्रीया लक्ष्मीबाई
मौजे बोरगांव व कृष्णा	व भवानीबाई कोम महीपतराव
जिबीन शालीग्राम सिंदे	बीन खंडेराव घोरपडे राहणार
राहणार मौजे कामेरी	मौजे बहादुरवाडी तालुके
व खंडेराव बीन संताजी	मजकुर वकील दाजीकृष्ण

घोरपडे राहणार कसबे

आष्टे तालुके वाळवे

वकील रामचंद्र नारायण ठकार

दावा ८१०८५ रुपये

तालुके वालवे पा॥ आठरा गांवचे देशमुखी वतन मिळणेबद्दल

१) स्पेशल अपीलेट नारायणराव वगैरे यांनी असल अर्जी सन १८४२ साली सातारचे माहाराजाचे कोर्टात केली त्यातील हसील तर्फ मजकुरीचे देशमुखी वतन मुळ पुरातन सिंदे याचे त्याणी आम्हा घोरपडे यासी पाठराखे भाऊ करुन घेतले त्या दिवसापासुन आम्ही शिंदे व घोरपडे उभयता देशमुखीचे वतनाची वहीवाट सन सित खमसेन मया अलफे म्हणजे सन १७५५ इसवी पावेतो करीत आलो ते वेळेस मलजीबीन हेगोजी माने वाणी याने खटला केला तेव्हा पेशवे सरकारांतुन मंत्रीकडे चौकशी सांगितली तेथे श्री कृष्णेत दिव्य होऊन आम्ही उभयता खरे झालो वाणी खोटा ठरला त्या वेळेस सरकारातुन हरकी देऊन वतनाची वहीवाट करावी म्हणोन आम्हांस सांगितले आमचे वडील फिर्गोजी शिंदे व खंडोजी घोरपडे याणी हरकिचा ठराव करुन घेतला परंतु ऐवजाची सोय जाहली नाही मागे वहीवाटीचे काम सरकारातुन वचन अनामत ठेऊन हरकीचा ऐवज येईतोपर्यंत अंताजी रघुनाथ याजकडे सांगितले नंतर स्पेशलरीस पाडैट्र याचा चुलता महीपतराव बीन मालोजीराव घोरपडे यासी वतनाचा अधिकार नसता आमचे वडील भावाचे वतन म्हणोन नजराण्याचा ऐवज ठरावाप्रमाणे कबुल करुन अनामत पा॥ ऐवज आपण देऊन मामले चीठी नाईकजी व मालोजी व महिपतराव घोरपडे त्री वर्गाचे नांवची सन अर्बासितेन म्हणजे सन १७६३ ई॥ सालात घेतली आणि वतनाची वहिवाट स्पेशलरी हा एकटाच करीत आहे सबब आमचे वतन आम्हास देवावे म्हणोन —

२) स्पेशलरिस पाडैट्र महीपतराव याने जबाब दिला. की तंठ्यातील वतन माझेकडे पीढीपीढीने चालत आले असोन वतनाची वहीवाट स्पेशल अपीलेट याजकडे कधीही नव्हती.

३) सदर कज्याचा महाराज सरकारचे हु :: वरुन आनम लक्ष्मण कासी आमीन कोर्ट कासेगांव यानी तारीख ३१ माहे डीसेंबर सन १८४४ ई : त फैसला केला त्यात स्पेशल अपीलेटतर्फे एकतर्फी निवाडा दिल्हा —

४) सदर ठरावावर तारीख १६ माहे फेबरेवारी सन १९४५ इसवीस स्पेशल रीसपाडैट्र महीपतराव याने अपील केले ते सातारा इलाखा खालसा होईपावेतो फेसल न होता तसे राहीले पुढे तारीख ७ माहे फेबरवारी सन १८५० इसवीस मेहेरबान कामसनसाहेब फस्ट असिस्ट्रेंट कमीशनर यानी कासेगाव आमीनाचा फैसला रद्द करून पंचाकडे सदर कज्या चौकशीस दिल्हा

५) पंचानी मुदतीत फैसला न केले कारणाने तारीख २१ माहे ऑगष्ट सन १८५१ ईसवीस मेहरबान कामसनसाहेब यानी हा कज्या अभिप्रायसहीत रपोर्टाकरीता रावसाहेब श्री. निवासराव हणमंत सदर आमीन कोर्ट सातारा याजकडे पाठविला व त्यानी या कामी दिल्हेला अभिप्राय आपला निवाडा म्हणोन फस्ट ओ. कमिशनर यानी तारीख ६ माहे आगस्ट सन १८५२ ईसवीस दाखल केला त्यात स्पेशल आपीलेट् याचा दावा खर्चासहीत खाली लिहीलेले कारणावरून रद्द केला आहे.

१) सनदपत्र आगर दुसरे दस्तऐवज पुराव्यावरून तंट्यातील वतनावर मालकी आगर त्याचा आपण आगर आपले पुर्वज यानी उपभोग केल्याचे स्पेशल आपीलेट् शिंदे यानी साबीद केले नाही.

२) शाहु माहाराज व आईसाहेब महाराज वगैरे यानी स्पेशल अपीलेट् याचा वतनावर हक्क नाही म्हणोन ठराव केले आहेत. निा १०१—१०६—१०७—१०९.

३) नि :: १३ चा मंत्री यानी १७५५ साली केलेले फैसल्या वरून स्पेशल अपिलेट् दाव्यासंबंधी वतनावर आपला हक्क साबीद करण्यास पावत आहेत तो निवाड खरा असल्याबद्दल कांही पुरावा नाही सदर निवड्यावर मंत्री यांचा सही शिका काही नसोन शाहु महाराज वगैरे यानी केलेले फैसल्या विरूद्ध मंत्री यास ठराव करणेस अधिकार होता असे होणे नाही नि ::

१०१—१०६—१०७

४) सन १७५५ इसवीपासुन स्पेशल अपीलेट् याजकडे वतनाची वहिवाट नसल्याचे त्याचे कबुलायती वरूनच शाबीत आहे ———

५) सदरी लिहीलेप्रमाणे स्पेशीयल अपीलेट् सिंदे यांचा दावा वतनावर पोचत नाही सबब त्यांचा पाटराखी भाऊ नंबर ३ ची स्पेशीयल अपीलेट् याचाही पोचत नाही हे उघड आहे शिवाय त्याने त्याचा दावा कबुल करण्यासारखा पुरावाही हजर केला नाही ———

६) नि :: ११५—११६ व ११८ तागाईत नि :: १३० वरून सन १७२३ तागाईत सन १७३० पावेतो स्पेशल रीसपाडेट् याजकडे वतनाची वहीवाट असल्याचे साबीत आहे.

७) नजराणा घेण्याचे करारावर स्पेशल रीसपाडेट् याचे सरळ पुर्वज नाईकजी — मालोजी महीपतराव घोरपडे याचे नावे सन १७६३ इसवीत माधवराव बलाळ पेशवे यानी वतन सोडण्याचा हु :: केला नि :: १३७—१३८—१३९

८) सदरी ज्या तीन असायीचे नावे सन १७६३ ईसवीसाली देशमुखी वतनाची सोडचिटी जाली त्या[प्रा] स्पेशल रीसपाडेट् महीपतराव याचा चुलता महीपराव बीन मालोजी याने ठरलेला नजराणा दिल्हा यावरून वचनावर स्पेशल रिसपोडेट् याचा हक्क कायम होत आहे नि :; १३९

९) या ठरावावर तारीख २१ माहे आगष्ट सन १८५२ व तारीख १८ माहे जुलई १८५४ इसवीची स्पेशल आपीले झाली बिनतनबीन फैसल न होता तारीख ४ माहे डिसेंबर सन १८६० ई :: पावेतो राहीली उशीराचे कारण माजी कलेक्टर यानी दाखल केले नाही. सबब हा उशीर निरर्थक व दुषणीय असल्याचेच समजले पाहिजे.

१०) या खटल्याची तपासणी तारीख ४ माहे डीसेंबर सन १८६० ई : : स स्पेशल आपील कोर्टानी केली त्यात खाली लिहीले प्रमाणे अभिप्राय दाखल केला.

स्पेशल अपील करणारे यानी नादारीत फिर्याद करण्याबद्दल हुकुम मागितला तो होण्यापुर्वी सन १८२७ चा कायदा ६ प्रमाणे कज्यात स्पेशल अपील मंजुर करण्यास योग्य कारण आहे की काय याचा विचार केला पाहिजे.

प्रथम सदर आमीन याचे अभिप्राय बरपोटाकरीता कज्या त्याजकडे देऊन त्याचा रिपोर्ट फस्ट असिस्टेट्र कमिशनर यानी आपला निवाडा म्हणोन दाखल केला. ही मोठी गैरसिस्त वहीवाट जाहला हे एकच कारण स्पेशल आपील मंजुर करण्यास योग्य होईल परंतु सातारा इलाख्यात बरोबर कायद्याप्रमाणे वहीवाट सुरु होण्यापुर्वीचे मुदतीत जाहलेले गैरसिस्तपणा संमंधी फक्त ज्या कायद्याच्या तकरारी त्यावरुन तजवीज करण्याचे योग्य नजरेस येत नसल्यावरुन कज्याचा अधीक पूर्णपणे काय विचार करीत आहे.

सदर आमीन यांची या कज्यांत दाखल केलेला अभिप्राय व रिपोर्ट फार मोठा असोन उभयता पक्षकार यानी दिलेली एकंदर पुराव्याचा त्यात विचार करणे सारखे आहे परंतु त्यांत पुराव्याबद्दल फोड करुन व्यवस्था केलेली वाईट आहे असे कोर्टास वाटते सबब मेहरबान कामसन साहेब यानी त्याची अती उत्कृष्ट म्हणोन जी तारीफ केली आहे. ती या कोर्टाच्याने देखवत नाही. हलीचे स्पेशल आपील करणारे यानी कज्यांत हजर केलेले कागदपत्रावरुन सिंदे हलीचे स्पेशल अपील करणारे प्रो देवाचे पुर्वज व माने या नावाचे घराण्या दरम्यान सन १७५० इसवीपुर्वी वतनाबद्दल तंटा असोन त्यात माने हे वतनाचे खरेमालक ठरले जाऊन सिंदे याचा दावा शाहु माहाराज व आईसाहेब माहाराज (राजाराम यांची विधवा स्त्री व शाहुची काकी) यानी रद्द केल्याचे नि. १०१—१०६—१०७——१०९ वरुन खात्री प्रमाणे साबीत असल्याचे नजरेस येते सिंदे याचा दावा योग्य अधिकार यानी ना कबुल केला असोन हली त्यास दावा चालवण्यास कसा अधिकार येतो हे नजरेस येत नाही. नि १३ चा मंत्री याचा निवाडा कनिष्ट कोडतानी कारणे दाखविलेली आहेत त्यावरुनच तो योग्य असल्याचे साबीत आहे असे कोर्टाचे नजरेस येत नाही सबब त्याची किंमत थोडीच आहे असे समजले पाहिजे —

माने याचे स्वाधीन वतन करण्याबद्दल हु, दिल्यानंतर मागाहुन ते वतन जप्त जाल्याविसी नि. १३६ ता. १४४ कागदपत्रावरून नजरेस येत असोन ते कागदपत्र खरे नसल्याबद्दल तकरार नाही यावरून सदरहु वतन सन १७६३ इसवीसालचे सुमारास नाईकजी व मालोजी व महीपतराव घोरपडे म्हणजे नंबर - ३ चा स्पेशल अपील, अपिल करणार खंडेराव स्पेशल जाब देणारा महीपतराव याचे सरळ पुर्वज्याचे स्वाधीन केल्याचे साबीत आहे. महीपतराव याने वतन सोडवून घेण्याकरीता बावीस हजार रुपयाचा नजराणा दिल्याचे नजरेस येते. पोा १२००० रूपये मात्र दिलहाचे नि. १३९ वरून साबीत आहे.

नि. १४०—१४१—१४२—१४३—१४४ चे कागद पत्रावरून साबीत आहे की, सन १७६४ व सन १७६८ इसवीचे सालचे दरम्यान महीपतराव व त्याचे दुसरे भाऊबंद यांचे दरम्यान तंटा असोन त्या बाबतीत ठराव करण्या करता पेशवे सरकार यानी हा कज्या बाळाजी महादेव याजकडे दिल्ह्याचे उघड असोन तो तंटा हली जीतकी माहीती तीत्क्या वरून तुटक जाल्याचे सदरील नि, वरून नजरेस येत नाही. महीपतराव यानी नजराणा दिल्यावरून ते व त्याचे पीढीतील लोक ठकवले सर्वातरी वतनाचे मालक होतात असे सदर आमीन यानी समजुन—रपोटना लिहील. आणी तोच रपोट फस्ट असिस्टेट् कमिशनर यानी आपले निवाड्या प्रो लोक तर मागील कलमात लिहिल्या वरून असे दिसोन येते की जरी महीपतराव यानी नजराणा दिल्हा तरी तेवढ्या वरूनच त्यास किंवा त्याचे पीढीतील लोकास वतनाची मालकी होत नाही अशी त्यावेळची समजुत होती व जर कुटुंबाच्या वाटण्या जाल्या नाहीत तर हिंदुशास्त्राप्रमाणे सर्व भाऊबंदास वतनाचे हिशास मालकी असावी परंतु अविभक्तपणाचे किंवा विभक्तपणाचे मुद्याकडे सदर आमीन यानी बिलकुल लक्ष दिल्हे नाही. पेशवे सरकारचे व दुसरे सदरी लिहिलेले नाईकजी व मालोजी व महीपतराव याचे वतीने दिल्हे हुकमावरुन असा अर्थ निष्पन्न होतो की एकंदर कुटुंबाकडे वतन चालत होते यावरुन माल मिळकतीच्या

वाटण्या जाल्या नवत्या असे दिसते — नंबर — ३ चा स्पेशल अपील करणारा खंडेराव हासदरील नाईकजी याचा पणतु म्हणतात व स्पेशल नावे देणारा महीपतराव हा ज्या महिपतरावने नजराणा दिल्हा त्याचे पिढीतील म्हणोन म्हणतात परतुं महीपतराव याणी १२००० रुपये मात्र दिल्याचे साबीद असोन सदर आमीन यानी लिहिल्याप्रमाणे २२००० हजार रुपये दिल्हे नाहीत. सबब या मुद्द्याची ज्यास्ती चौकसी करुन विच्यार जाला पाहिजे —

आपला पणजा नाईकजी याचेवतीने हुकुम झाला, त्यावरुन व शिवाय ज्या महीपतरावने नजराणा दिल्हा त्या महीपतरावाचे घराण्यातील आपण आहा या समधाने खंडेराव यास हीसा मिळणेचा त्याचा दावा आहे की काय व महीपतराव याने नजराणा दिल्हा असल्यावरुन त्याचेच केवळ प्रत्यक्ष वंशजाकडे वतन चालावे दुसरे त्याचे भाऊ—बंद व त्याचे वंशजाकडे चालू नये म्हणोन सदर आमीन याणी दिल्हेला अभिप्राय बराबर आहे की कसे याचा विचार करणे या खटल्यात कारण आहे. नारायणराव व कृष्णाजी या उभयतांस खंडेराव हा या कज्यात सामील जाला आहे यावरून आपला व त्याचा हक कबुल केल्यासारखे त्याने दाखविले आहे तरी दाव्याचा ईनसाफ करतेवेळी उभयता सिंद्यांचे दाव्याबद्दलही विचार सहज केला जाईल हली मुदतीचे कायद्यातील ठरावाच्या कज्यांत सुटल्याचे कारण लिहीताना असे दप्तरी दाखल करणे जरूर हे की फीर्याद व अपील सातारचे राज्याचे कारकिर्दीत जाले असोन त्यावेळेच वतनातील बाबतीचे ठराव वरून जर सन १८१८—१९ ईसवी म्हणजे दक्षण मुलकात इंग्रजी सरकारचा अमल सुरू होण्याचे प्रथम वर्षपुर्वी सतरा वर्षे कबजा असल्याचे साबीत असेल तर असी फिर्याद करण्यास हरकत नव्हती.

नाईकजीचे वतीने सदरी लिहिलेले जे हुकुम मिळाले आहेत ते सुमारे सन १७६३ इसवीचे असोन महाराज सरकारानी मुदतीबद्दल जो कायदा ठरविला होता त्या कायद्यात खंडेराव याचा वतन संमधी येत आहे हा फायदा दुसरे दोघा सिंद्यांस असल्याचे दिसोन येत नाही परंतु सदरी लिहील्याप्रमाणे खंडेराव बीन संताजी याचे बरोबरच त्याचाही बीन हरकत विचार करण्यास हरकत नाही—

स्पेशल अपील फैलावर दाखल करण्यापुर्वी सन १८२७ चा कायदा—६ प्रमाणे स्पेशल अपील करणारे यास नादारीत स्पेशल अपील करण्यास आधार आहे किंवा नाही याची साबीती त्यास करणे जरुर आहे. सबब याबद्दल तपासणीची तारीख माहे ज्यानेवारी सन १८६१ नेमली आहे. तरी सर्व पक्षकारानी सातारा येथे जुडीशियल असीस्टेट कलेक्टर यांचेसमोर हजर राहुन नादारीत दावा करण्यास अधिकार आहे किंवा नाही याची साबीती वतनदार केली पाहिजे तसी त्यानी करावी.

८) सदरी लिहीलेप्रमाणे चौकसीस हजर होणे करीता स्पेशल आपीलेट् वरीस पोडेट् यास नोटीसा करण्यात येवुन ज्युडीशियल असीस्टेंटे कलेक्टर साहेब यांनी चौकशी अंती स्पेशल आपीलेट यास या कज्यात नादार समजावे म्हणोन तारीख १९ आगटोंबर सन १८६१ ई,. चा रिपोर्ट केला तो कज्यात दाखल आहे—

९) सबब तारीख ४ माहे डीसेंबर सन १८६० इसवीत स्पेशल अपील कोर्टाने आपला अभिप्राय लिहीलेला सदरी दाखल केला आहे, त्यातील मुद्द्याचा विचार होऊन ठराव होणेकरीता हा कज्या फैलावर नोंदावा म्हणोन स्पेशल आपील कोर्टानी तारीख १९ मो आगटोबर सन १८६१ ई, स, हुकुम दिल्हा.

१०) या खटल्याची हकीकत तारीख १६ व तारीख १९ माहे नवेंबर १९६१ ई, स, ऐकोन घेऊन त्याजबद्दल पुर्णपणे विच्यार करण्यात आला. उभयपक्षकार तर्फे वकील कोर्टात हजर असोन स्पेशल अपीलेट पो

खंडेराव घोरपडे व नारायणराव बीन कासीराव सिंदे हेही हजर असोन कोर्ट आपला ठराव पुढे लिहील्याप्रमाणे दाखल करीत आहे.

११) या कज्याची हकीकत कोर्टाने आपले तारीख ४ माहे डीसेंबर सन १८६० इसवीचे मिनीटात पुर्ण तऱ्हेने लिहीली ती सदरील उतरण्यात आली आहे. सबब पुन्हा या ठीकाणी ती तपशिलवार दाखल करण्याची जरूरी नाही. उभय पक्षकारानी या कज्याचे बाबतीत केलेले तक्रारीचे मुद्याबद्दल संपूर्णपणे विचार पाहता तारीख ६ माहे ऑगष्ट सन १८५२ इसवीस सातारचे फस्ट असिस्टेट् कमीशनर यानी केलेले निवाड्यातील ठरावात हात घालण्याचे कोर्टास काही कारण दिसत नाही.

१२) या कज्यातील मुख्य पक्षकार स्पेशल अपीलेट् नारायणराव व कृष्णाजी शिंदे असोन त्यानी नंबर—३ चा स्पेशल अपीलेट खंडेराव यास आपणामध्ये सामील करून घेतले आहे. स्पेशल अपीलेट याचे म्हणणे की तिघाचे पुर्वज्याकडे एकत्रपणाने सन १७५५ इसवी पावेतो वतन चालत होते या शेवटला म्हणण्याबद्दल खात्रीजोगा पुरावा नाही व सन १७५५ इसवी साली इसलामपुरचे मंत्री यानी केलेला फैसल म्हणोन जो नि, १३ चा दस्त दाखल आहे, तो साबीद अगर व्यवहार उपयोगी असल्याचे कोर्टास वाटत नाही, तो दस्त खरा असल्याबद्दल एक शब्दाचाही पुरावा नसोन त्यावर सहीसिकाही कांहीनाही व नि, १३६ चे दस्तांत घनःशाम नारायण मंत्री यानी केलेले फैसल याचा संदर्भ लिहीला आहे.

त्यावरुन सिंदे याचे दाव्यास कोणतेही रीतीने बळकटी येते असे नाही. सबब तांबे कोर्टानी केल्याप्रमाणे हा म्हणविलेला मंत्री याचा निवाडा नामंजुर धरण्यास कोर्टास योग्य कारण दिसोन येते. कामेरीचे हक तंट्यातील वतनासंबंधी म्हणोन म्हणे असोन ते स्पेशल अपीलेट सिंदे यांचे कबज्यात आहेत. या गोष्टीवर ते फारमन बुद भरवसा ठेवित आहेत परंतु जरी या हकाची वहीवाट त्याजकडे असेल तथापी तेवढ्या वरुनच आज शंभर वर्षानंतर इतर गावचे वतनाचे कबज्याबद्दल त्याची मालकी साबीत होते असे नाही. त्यावेळी वतने अगर त्या पोट भाग एका मनुष्याचे हाताने दुसऱ्याचे हाती दुसऱ्याचे हाताने तिसऱ्याचे हाती तऱ्हेचे कारणावरुन जात होता. सबब निःसंशय मालकी बदल व पुर्वी वहीवाट असल्याबद्दल मजबुद पुरावा असे बाबतीत निवाडा देणेपुर्वी असे जरुर आहे.

१३) तंट्यातील वतनांत आम्ही व खंडेराव घोरपडे व त्यांचे पुर्वज्य हे एकत्रपणाने वागत आलो व नि, १३६ व १३७ वगैरे यात घोरपडे याची मालकी असल्याचे कबुल केले आहे व नि, १३ चे मंत्रीचे फैसल्यात जी चवकशी जाल्याचें लिहिले आहे त्यांत सिंदे व घोरपडे हे एकत्रपणाने वागत असलपोच लिहीले आहे. सबब अगदी पहीलेपासुन वतनात दोनी घराणी काम करीत असल्याचे समजले पाहिजे. सबब या कज्याचे बाबतीत जो कांही ठराव होईल तो सर्व लोकास सारखा लागु पडावा म्हणोन ताबे कोडतापुढे व या कोर्टापुढे सिंदे यानी मोठे वजन देऊन तक्रार केली आहे.

१४) परंतु हे म्हणणे कोर्ट कबुल करीत नाही. दावा असलेले वतनावर सिंदे याची प्रत्यक्ष मालकी अगर संबंध असल्याबद्दल साफ पुरावा असल्या खेरीज सदरचे म्हणणे निरुपयोगी आहे व असा पुरावा त्यानी हजर केला नाही.

१५) नि,, नंबर १०६—१०७—१०९ यात स्पेशल अपीलेट नारायणराव व कृष्णाजी शिंदे यांचा पणजा फिरगोजी याचे नाव लिहिले आहे त्यावरुन म्हणविलेला मंत्री याची नि,, १३ चा फैसल साबीद असल्याचे

समजावे म्हणोन शिंदे याची इच्छा आहे. परंतु सदर दस्ताचा विचार व उपयोग यातील एकदर मजकुरावरुन पाहीला पाहिजे. तसे पाहीले तर सदर वतनावर सिंदे याचा दावा आगदी नामंजुर करुन सिंदे त्या कोणतेहीरीतीने संमंध नाही असे माने या नांवाचे घराण्याचा दावा सदर दस्तात कायम ठेविला आहे.

१६) नि,, ४९–५२–६९–७७ व ८० तागाईत १०० येणेप्रमाणे किरकोळ कागद सिंदे यानी हजर केले आहेत, परंतु त्या पैा थोडेच दस्त खरे असल्याबद्दल त्याजवर खुणा आहेत व त्याजवर अशा खुणा आहेत, त्यावरुन हली असलेला दावा साबीत होत नाही. सन १७२५ तागाईत सन १७६० इसवीचे दरम्यान या वतना प्रकर्णी तंटे होते हे समजणेची कोर्टास जरूरी नाही, तंटे होते यात संशय नाही. सन १८१८–१९ ईा चे पुर्वीचे ७० वर्षात बरेच दिवस सिंदे याजकडे साधिकार निर्वेध वहीवाट असल्या बा। कोर्टास पुरावा पाहिजे असोन त्याबद्दल कज्यातील कागदावरून काही दिसोन येत नाही.

१७ सदरी लिहीलेले कारणावरून नारायणराव व कृष्णाजी शिंदे यांचा दावा चालू शकत नाही. सबब तो तावे कोडतानी ना मंजूर केला हे बरोबर केले.

१८ सिंदे याचा जो हक होता त्यासमंधाने आपला हक असल्याबद्दल खंडेराव घोरपडे याने आपला दावा सिंदे याचे दाव्याशी सामील केला आहे त्याकारणाने तेवढ्या पुर्ता त्याचा ही दावा ना मंजूर समजले पाहिजे परंतु तारीख ४ माहे डीसेंबर सन १८६० इसवीचे मिनीटात लिहीले प्रमाणे निा १३६–१३७–१३८ यात लिहिलेले नाईकजी कडोन खंडेराव यास स्वतः किती हक येतो याजबद्दल विचार करणे बरे दिसते.

१९) सदर निा चे दस्त योग्य अधिकारी याजकडोन जाहलेस त्यात स्पेशल अपीलेट् खंडेराव याचा पुर्वज्य–––––नाईकजी व मालोजी व स्पेशल रीसपाडेट्र यांचा पुर्वज्य महीपतराव व याजकडे तंट्यातील देशमुखी वतन सोडल्याचा हुा आहे यात संशय नाही, परंतु नाईकजी याजकडे वहीवाट चालण्या बिा निा १३९ तगाईत १४४ चे दस्तावरून त्याप्रमाणेच खचीत आहे व महीपतराव याजकडे वहीवाट आल्यापासून त्याने व त्याचे वंशातील लोकानी आजपर्यंत वहीवाट केली सन १८१८–१९ साली दक्षिण व सातारा इंग्रज सरकारनी जिंकोन घेतला त्यापुर्वी ५५ वर्षे म्हणजे ईा तील निा १३६–१३७–१३८ चे कागद आहेत व निा १३९ तगाईत निा १४४ चे दस्त सन १७६४ तागाईत सन १७६८ चे दरम्यानचे आहेत व त्यावरून नाईकजी व महीपतराव व मालोजी या त्री वर्गाकडे वतन सोडण्याचा हु॥ जाहला तथापि त्याप्रमाणे वहीवाट जाहली नाही व वतनाचे मोकलीके बदल २२००० रूपयाची नजर ठरली प्रोा १२००० रूपये फक्त महीपतराव याने दिल्हे असे साबीत आहे बाकी नजराणा कोणी दिल्हा ते दिसोन येत नाही. सबब स्पेशल अपीलेट् खंडेराव याचे पुर्वज्याकडे सन १८–१८–१९ असलप्रमाणे इसवी पुर्वी ५५ वर्षे वहीवाट नव्हती असे निःसंशयपणे साबीत आहे व ५५ वर्षा पुर्वील वहीवाटी विसी जो सिंदे याचे समधांने पुरावा सदरी दाखल करण्यात आला आहे त्याखेरीज दुसरा पुरावा नसोन सदरचा पुरावा आपुर्ता व योग्य असल्याविसी अलाहीदी ठरविण्यात आले आहेच.

२०) स्पेशल अपीलेट् खंडेराव याने हजर केलेले निा चे १०८ वंशावली वरून दिसोन येते की, ज्या घराण्यासी स्पेशल अपीलेट् खंडेराव हा आपला संमध दाखवीत आहे. त्या घराण्याचा मुळ पुरूष नावजी राजे असोन त्या घराण्याची तीन घरेजाहली आहेत. ती असीली १) अष्टेकर २) मुधोलकर ३) बहादुर वाडीकर याप्रमाणे पहिले घराण्यातील खंडेराव हा आहे व शेवटील म्हणजे तिसरे घराण्यातील स्पेशल रीस

पाडेट्र हा आहे यावरुन उघड आहे की, स्पेशल अपीलेट् खंडेराव व स्पेशल रीस पाडेट्र हे विभक्त आहेत व सदरी महिपतराव यानी १२००० रुपये नजराणा दिल्हे त्यात खंडेराव व याचे घराण्या शो॥ काही वाटणी आली नाही.

२१) हली जारी असलेले कायद्यावरून स्पेशल अपीलेट् याचा दावा एक क्षणभरही चालणार नाही, यात संशय नाही सबब जी हली रूलचाळी नाही असे महाराज सरकारचे जुनी रुळी प्रमाणे जरी स्पेशल अपीलेट यास दावा चालवु दिल्हा आहे तथापि मुळ मालकी व निदान काही दिवस वहीवाटीचा पुरावा त्याचा दावा योग्य समजणेपुर्वी असणे विशेष करून जरूर आहे. सिंदे यासी मूळ मालकी असल्याचे दिसोन येत नाही असा कोर्टाचा अभिप्राय आहे व खंडेराव हा जेवढ्या बाबतीत त्यास सामील जाहला आहे तेवढ्यापुर्ता त्याप्रमाणे त्याचा दावा साबील नसल्याचे समजले पाहिजे नाईकजी सी आपला संमंध असले कारणाने खंडेराव याचा दावा पोचतो की काय याबद्दल पाहाता नाईकजी याजकडे कोणतेवेळी वहीवाट असल्याचे साबीत आहे. असे कोर्टास वाटत नसोन सातारचे महाराजाचे कोर्टात हलीचा दावा होणेचे पुर्वी महिपत व त्याचे घराण्याकडे फारदिवसी सतत सुमारे ८० वर्षाची वहीवाट साबील जाली आहे व इतके फारदिवशी वहीवाटीचे वजन व फायदा जितका नि संशईत पणे समजणे योग्य आहे, तितका दर एक रीतीने स्पेशल पाडेट्र तर्फे समजला पाहिजे असा कोर्टाचा अभिप्राय आहे.

२२) सबब सर्व खर्च स्पेशल अपीलेट नारायणराव व कृष्णाजी शिंदे व खंडेराव घोरपडे याजवर ठेवून फस्ट असिस्टेट कमीशनरसाहेब याचा निवाडा कायम करण्यात येतो.

कागदाचा तपशील.
१) स्पेशल अपील अर्जी
२) याद कामसन सो॥ यास
३—४) अर्ज स्पे. अपीलेट् तो॥
५) वकील पत्र स्पे. अपीलेट नंबर १ याचे तर्फे
६) अर्ज स्पे. अपीलेट तर्फे
७) वकील पत्र स्पेशल अपीलेट् नंबर २ याचे तर्फे
८ ते १२) अर्जे स्पेशल अपीलेट नं. १ याचे तर्फे
१३) नोटीस पक्षकार यास
१४) याद. जु. आ. सो॥ यास.
१५) अपील मुकदमा
१६) मीनीट से. आ. मंजुरीचे
१७) या द जु असिस्टेट् यास
१८) समन स्पे. अपीलेट यास
१९) समज स्पेशल री॥ यास
२०) सेरा जु. असिस्टेट को॥ साहेब याचे वाळवे मु॥
याचे हुकुमा लगत.
२१) याद जु. अ को॥ सो॥ यास
२२) वकील पत्र स्पे. अपीलेट नंबर ३ याचे तें॥

२३) वकील पत्र स्पेशल री याचे तें ॥
२४) निवाडा स्पे. आ. कोर्टाचा
एकूण चोवीस कागद असते.

अर्जाचा तपसील

१५-६ नादार स्पेशल अपीलेट नारायणराव व कृष्णाजी सिंदे व खंडेराव घोरपडे यास खर्च जालेला त्याचा त्यानी सोसावयाचा तो.

—बर हु ॥ अपील हु ॥ नामा

१५-६ स्पेशल अपीलात.

—स्टॉप कागदाबद्दल नादार खा॥

७-६ भत्याबद्दल नादारी ठरण्यापुर्वीचे

०-८ वकीलाबद्दल सरकार.

१५-६

१५-६

६३१-६-१० स्पेशल रीस पांडेट महीपतराव मयत वारस स्त्रीया लक्ष्मीबाई व भवानीबाई घोरपड्यास खर्च जालेला स्पेशल अपीलेट नारायणराव वगैरे यानी घ्यावयाचा तो.

० बर हु ॥ अपील हुकुल नामा.

६३१-६-१० स्पेल अपीलात

४-८ स्टॉप कागदाबद्दल

२—८ नादारीचे चौकसीत

२ नि ॥ २३ चे वकील पत्रास

४-८

२६-१४-१०

वकीलाबदल

१-८—

१-० प्रा. नादारीचे चौकसीत

०-८ प्रा स्पेशल अपीलात.

१—८

६२५-६-१० फी दावा रु. १०—५ याचा

६० प्रा रकम २००० दरसदेदर प्रो ३

१६० प्रा रकमा ८००० दरसदेर प्रो २

१०० प्रा रकम १००० दरसदे प्रो १

३०५—६—१० प्रा रक्कम ६१०—५ दर सेद ८ प्रो

६२५-६-१०
६२६-१४-१०
६३१-६-१०
६३१—६—१०
६३२—६—४

एकूण साहासे बतीस रू. साहा आणे
चारशे खर्च असे.
खर्च तपासून लिहिला
(सही) बळवंत मोरेश्वर आकटीक
कारकुन हुजुर.

(सही इंग्रजी)
स्पे. जज्.

(शिक्का)

सदरहु नकलेस स्टाप कागदसाहा दिल्हे होते प्रो पाच कागदावर नकल तयार झाली ती व एक स्टॉप कोरा येणेप्रो आम्ही प्रतीसह भरून पाठविले तारीख १० माहे दसंबर सन १८६१

सही दाजी कृष्ण जोशी वकील.
कोर्ट.

या हुकुम नाम्यातील नकल मी दिली ती मी घेऊन भरून पावलो तारीख १८ माहे फेब्रुवारी सन १८६२

(सही) नारायणराव शिंदे देशमुख
दस्तुर खुद

या नकलेन पान २४ ओ ३ (नंतर २ याचे तर्फे) काट.

ही नकल करणार शब्द सुमारे		३२००	रबरी नक्कल
	लिखाई	४८९	एल. पी. डाके ए—१०—४४
वाचणार	रुजवात	१८८	क्लार्क ऑफ दि डि कोर्ट
	कागद	८४	
	एकूण —	६८५	

शेख हाशम हुसेन
रूजुपहाणार

यातील आरवी व शब्दांची आकारणी
दुप्पट आकारी आहे.

शब्द संख्या व आकारणी बरोबर आहे.

शेख हाशम

फी – कारकुन

(गोल शिक्का)

–: डीस्ट्रीक्ट कोर्ट, सातारा :–

सातारा येथील सिव्हील अज् सो सी. डी.

यांचे कोर्टात.

स्पे. दि. मु. $\frac{३}{१९४३}$

महिपतराव खंडेराव घोरपडे – वादी

बिा

कलेक्टर अँड कोर्ट ऑफ वार्ड– प्र. . वादी

सदरहु कामी वादी तर्फे गुदरला –

११–७–४६०

के. व्ही. कुलकर्णी.

वादी वकील

दाखल ता. ११–७–४६.

शिरस्तेदार

हुजुर हुकुम नं. $\frac{१७९३}{१९–}$ वरून सदरहु कागद

१२–४७

वादी वकील यांस परत दिला

ता. २२–१२–४७

रेकॉर्ड किपर

रजिष्टर नंबर $\frac{४५३५}{४४}$ सातारा येथील स्पेशल अपील नंबर $\frac{३०९}{१८५२}$ निकाल तारीख

अनामत येंवुन नकलेस काम

मिळाले तारीख ३०–९–४४

सबब उशीर

रे. किपर

नकलेस अर्ज आला ता. तेवीस (२३) सप्टेंबर.

सन १९४४

व्ही. आर. एस्.

रेकॉर्ड कारकुन

नकल तयार झाली ता. नऊ (९) माहे आक्टोंबर

सन १९४४

व्ही. आर. एस्.
रेकॉर्ड किपर

नकल अर्जदार – मी कुलकर्णी वकील यास
समक्ष दिली ता. १२ माहे आक्टोंबर सन १९४४

व्ही. पी. ने पाठविली.

व्ही. आर. एस्.

सन १८५० ईसवी — रेकॉर्ड किपर

आदालत सरकार — निा १८

शिक्का — १/१२

सातारा

शिका — बाराबंद राद्र

हुकुमनामा अदालत सरकार कुपनी ईग्रज बहादुर बिा काक्सन साहेब फस्ट असिस्टंट कमीशनर ईलाखा सातारा अपील नंबर १४८ सन १२५४ फसली अपील वादी महीपतराव बीन खंडेराव घोरपडे देशमुख ता वाळवे, पेटा मजकुर प्रतिवादी कृष्णाजी बीन शाळीग्राम सिंदा बा मौजे कामेरी वनरुबीन कासी शिंदा बा व संताजी बीन सुबराव घोरपडे देशमुख आष्टे मयत त्याचे वारस लेक खंडेराव घोरपडे देशमुखीचे वतनाबद्दल दसपट दावा ८१०८५ रुपये असल फीर्याद प्रतिवादीनी केली त्याची चौकशी लक्ष्मण कासी आमीन नंबर ५ ठाणे कासेगांव यानी करुन फेसल नामा तारीख ३१ दसंबर सन १८४४ इसवीस केला त्याजवर अपील तारीख १८ फेब्रुवारी १८४५ सन इसवी या मोकदम्याचे वादी खुद व

प्रतिवादी सिंदे दोन हजर व मुख्त्यार माधवराव मल्हार व तिसरे खंडेराव घोरपडे हजर आणि चौकसी सुरु असल अर्जी प्रतिवादीनी केली त्या तपशील तर्फ मजकुरचे देशमुखीचे वतन मुळ पुरातन सिंदे यांचे त्यांनी आम्हा घोरपडे यासी पाटीराखे भाऊ करुन घेतले त्या दिवसापासून आम्ही शिंदे व घोरपडे उभयता देशमुखीचे वतनाची वहीवाट सनसित खमसेनमया व अलफे पावेतो करीत आलो ते वेळेचे मलजीबीन हगोजी माने वाणी याने खटला केला तेव्हा पेशवे सरकारातुन मंत्रीकडे चौकशी सांगितली तेथे श्रीकृष्णेत दिव्य होऊन आम्ही उभयता खरे जालो वाणी खोटा ठरला तेव्हा सरकारातुन हरकी देऊन वतनाची वहीवाट करावी म्हणोन आम्हास सांगितलेवरुन आमचे वडील फिर्गोजी सिंदे व खंडोजी घोरपडे यांनी हरकीचा ठराव करुन घेतला परंतु ऐवजाची सोय जाली नाही. मागे वहीवाटीचे काम सरकारातुन वतन अनामत ठेवून हरकीचा ऐवज येतो परीयत अंताजी रघुनाथ याजकडे सांगितले नंतर महीपतराव बीन मालोजी घोरपडे यासी या वतनाचा अधिकार नसता आमचे वडील भावाचे वतन म्हणोन नजराण्याचा ऐवज ठरावा प्रमाणे कबुल करुन अनामत पाो ऐवज व आपण देऊन मोकले चीटी नाईकजी मालोजी व महीपतराव घोरपडे त्रीवर्गांचे नांवची सन अर्बाशीते नात घेतली व वतनाची वहीवाट करु लागले पुढे नजराण्याचा ऐवज घेऊन आमचे वतन आम्हास द्यावे म्हणोन सरकारची पत्रे आणली परंतु मानालि नाहीत याज करीता आम्ही आटकाव करु लागलो सबब त्रीवर्गाचे वहीवाटीत नाव न घालीता नि ा घोरपडे म्हणोन अंताजी रघुनाथ यानी वहीवाट करावी स्वारीहुन आलीयावर जाबसाल उलगडुन देऊ त्याप्रमाणे बोलुन स्वारीस गेले ते

जबरदस्त कारकुन याचे कागदपत्र जबरदस्तीने नेले आम्हास मानले नाही त्या वतना पा । काही उत्पन्न आम्हाकडे चालत आहे याची चौकशी होऊन आमचे वतन आम्हास देण्याविसी हुकुम जाला पाहिजे म्हणोन

जाब अपील वाढीचा नि ॥ ५ चा त्या तपसील प्रती वादीनी आम्हावर अर्जी आणिली त्याचा जबाब देणे म्हणोन अज्ञा त्यास पेशजी हेच सिंदे यानी या वतनाबद्दल १०७०२ नंबरची अर्ज सनइहीदे अवैन साली आणिली त्यात वतन आपले असेली हीतात आणी हाली अष्टेकर घोरपडे व आपण उभयता मिळोन अर्जी आणली त्यात वतन सनसित खमसेनमया व अलफे परयत आम्ही वहीवाट करीत आलो असे हेच प्रतिवादी लिहीतात याप्रमाणे दोन अर्जात दोन मजकुर यावरुन कोणती प्रमाण धरावी सिंदे यानी वतनाची वहीवाट कधी केली त्याची माहीती आम्हास नाही व त्रीवर्गानी वहीवाट केल्याची माहीती नाही पुर्वापार वतन आमचे त्याची वहीवाट आम्हाकडे चालत आहे म्हणोन.

आमीन यानी फैसला केला त्या तपशील प्रतीवादी हजर राहून वादी अर्जीचा जबाब देऊन गैर हजर सबब त्यास बोलावणे केले असता आले नाहीत. यास्तव प्रतिवादी पासुन एक तर्फी चौकशी बदल नि ॥ २८ चे कागदात सवाल करुन जबाब घेऊन त्यानी पुराव्यास कागद दिले ते ११ प्रतीवादी शिंदे व घोरपडे याचे मुळ ठरवांचे वहीवाटीचे दाखले नि ॥ ४० पासुन नि ॥ ५० पावेतो.

८ फिर्गोजी सिंदे व खंडोजी घोरपडे याची व मलजी व कोउजी माने व गीरापा माने वाणी याचा तर्फ मजकुरचे देशमुखीचे वादाचा निवाडा घनःशाम नारायण मंत्री यांनी केला त्याजबदल कागद नि ॥ २२ पासुन नि ॥ २७ परीयत साहा ६ व नि ॥ ५१ पासून नि ॥ ५२ पावेतो एकूण १ महिपतराव घोरपडे यानी अंताजी रघुनाथ यादकरुन दिली सावकारी कर्ज काढुन वतन सोडवीले म्हणोन आहे नि ॥ ४ येडुरचे मुकामातुन त्रीबंकराव नारायण व महीपतराव घोरपडे यानी पत्रे नाईकजी घोरपडे यास व युसुबाईचे नांव पाठविली त्यात देशमुखीचे वतनाचा मजकुर आहे ती पत्रे नि ॥ ५४ पासुन नि ॥ ५७ पर्यंत ६ पेशवे सरकारातुन देशमुखी तर्फ मजकुरचे वतनाची मोकळीक सन आवेसितेन साली झाली त्याज ब ॥ मंत्रीस पत्र व गावास ताकीदी वगैरे माधवराव बलाळ प्रधान याच्या नि ॥ ५८ पासुन नि ॥ ६३ पर्यंत केला. ४ मालोजी घोरपडे मुधोळकर यानी पेशवे सरकारात वतन समधे मजकुर समजाविला त्याविसी पत्रे बगैरे नि ॥ ६४ पासुन नि ॥ पर्यंत ६७ पर्यंत नकला ६ नागोजी शिंदे यानी गावगना रोखे तर्फ मगारी केले ते नि ॥ ६८ पासुन नि ॥ ७३ परीयंत नकला

१ नाईकजी घोरपडे यानी तर्फ वाळवेचे मोकदमीस रोखा केला त्याची नकल नि ॥ ७४
३२ जागोजी शिंदे व सखोजी सिंदे यानी वतनामध्ये खटला करुन गावगना खराबी केली त्याजबदल पेशवे सरकारची पत्रे व त्रींबकराव नारायणमंत्री याची वगैरे कामगार यांची पत्रे व ताकीदी नि ॥ ७५ पासून नि ॥ १०६ परीयत नकला

२ प्रतिवादी शिंदे याची वौशावल नि ॥ १०७ व दुय्यम प्रतिवादी घोरपडे याची वोंशवृक्ष नि ॥ १०८ ची येणे प्रमाणे कागद प्रतिवादीनी देऊन कायद्याची नि ॥ १०९ चा लिहून घेऊन एक तर्फी चौकशी पाहता मुळ वतन शिंदे याच त्यानी आष्टेकर घोरपडे दुय्यम प्रतिवादी याचे वडीलास वतनभाऊ करुन घेतले तेव्हा

